आचार्य विष्णुगुप्त (चाणक्य) यांनी रचलेल्या चाणक्य नीतिचा मुख्य विषय मनुष्याच्या जीवनातील प्रत्येक बाजूचे व्यवहारिक शिक्षण देणे हा आहे. यात मुख्य रूपाने धर्म, संस्कृती, न्याय, शांती चांगले शिक्षण आणि सर्वमुखी मानव जीवनाची प्रगती यांची एक झलक प्रस्तुत केली आहे. जीवन सिद्धांत आणि जीवन व्यवहार तथा आदर्श आणि यथार्थाचा एक सुंदर समन्वय आचार्य चाणक्य यांच्या दया नीती उपदेशपर ग्रंथात पाहाण्यास मिळतो.जीवनातील रीति नीति संबंधी गोष्टींचे जसे अद्भुत आणि व्यवहारिक चित्रण येथे पाहाण्यास मिळते तसे अन्यत्र मिळणे दुर्लभ आहे. त्यामुळेच हा गंथ संपुर्ण विश्वात मान्यता पावलेला आहे.

कौटुंबिक
वाचनासाठी

आर्य चाणक्य
प्रणीत

# चाणक्य नीति

अश्विनी पाराशर

“जे कोणी या नीतिशास्त्राचा मनापासून अभ्यास करतील,
त्यांची जीवनात कधीही फसवणूक होणार नाही,
यश नेहमी त्यांच्या पायावर लोळेल.”

- रेणुकादास गं. देशपांडे, 18 , ‘अभ्योदय’
विद्युत कॉलोनी, बेगमपुरा, औरंगाबाद

## विषय अनुक्रमणिका


भूमिका

पहिला अध्याय:

ईश प्रार्थना , चांगला मनुष्य कोण , राजनीति जग कल्याणासाठी असते , शिक्षण योग्य सत्पात्रीला , मृत्यूच्या कारणापासून वाचा , विपत्तीत काय करावे , अशा जागी राहू नये , परीक्षा वेळेवर होते , हातात आलेली वस्तु गमावू नका , समान असणाऱ्यातच लग्न शोभते , पाहून-पारखून विश्वास ठेवा , सार समजून घ्या , स्त्री पुरूषापेक्षा पुढे असते.

दुसरा अध्याय:

स्त्रियांचे स्वाभाविक दोष , जीवनातील सुख भाग्यवंताला मिळते , जीवन सुखातच स्वर्ग आहे , सार्थक होण्यातच संबंधाचे सुख आहे , कपटी मित्राचा त्याग करा , मनातील भावना गुप्त ठेवा , परस्वाधीनता , साधू पुरूष , पुत्राच्या विषयी कर्तव्य , स्वाध्याय , लोभ विष आहे , विनाशाची कारणं , व्यक्तीचे बळ , जगाची रीत , दुष्कृच्यापासून सावध रहा , मैत्री बरोबरच्यांशी करा.

तिसरा अध्याय:

दोष कोठे असतो , लक्षणावरून आचरण कळते , व्यवहार कुशल व्हा , दुष्टापासून सावध रहा , संगत चांगल्याची करावी , संताचा आदर करा , मुर्खाचा त्याग करा , विद्येचे महत्व ओळखा , रूपापेक्षा कीर्ती चांगली , श्रेष्ठतेला वाचवा , कष्टानेच फळ मिळते , अतिचा त्याग करा , वाणीत गोडवा आणा , एकच गुणवान पुरेसा असतो , आई-वडीलांनीही दायित्व ओळखावे वेळेच ज्ञान , जीवनतील निष्फळता , लक्ष्मीचा वास.

चौथा अध्याय

कांही गोष्टी भाग्याने मिळतात , संतांच्या सेवेमुळे फळ मिळते , होईळ तेवढे पुण्य करा , विद्या कामधेनूसारखी असते , एकच गुणवान पुत्र पुरेसा आहे . मुर्ख पुत्र काय कामाचा , यांच्यापासून नेहमी सावध रहा , ज्यांचा उपयोग नाही त्यांचे काय होणार ? यापासून सुख मिळते , या गोष्टी एकदाच होतात , केव्हा एकटे आणि मिळून केव्हा राहावे , पतीव्रताच पत्नी असते , निर्धनता शाप आहे , ज्ञानाचा अभ्यास करा , यांचा त्याग करणेच चांगले आहे , म्हातारपणाचे लक्षण , कामापूर्वी विचार करा , आई वडीलांचे वेगळे रूप .

पाचवा अध्याय:

अभ्यागत श्रेष्ठ असतो , पुरूषाची परीक्षा गुणावरून होते , आलेल्या संकटाला तोंड घ्या , दोन जणांचा स्वाभाव सारखा नसतो , स्पष्टवादी व्हा , यात द्वेषभावना असते , यामुळे या वस्तु नष्ट होतात , यामुळे गुणांची ओळख होते , कोण कुणाचे रक्षण करतो , मुर्खांचा त्याग करा , आत्म्याला ओळखा , मनुष्य एकटा असतो , संसाराला काडीमात्र समजा , मित्रांची वेगळी रूपे , कोण केव्हा बेकार आहे , प्रिय वस्तु जी समोर नाही त्याचे आकर्षण कशाला , धर्मच अटळ आहे , यांना धूर्त समजा.

सहावा अध्याय:

ऐकले सुद्धा पाहिजे , दुष्ट प्रकृत्ती , यामुळे शुद्धि होते , प्रवास आवश्यक आहे , संपत्तीचा प्रभाव , बुद्धि भाग्याची देणगी असते , काळ प्रबळ असतो , सर्वच कांही दिसत नाही , कर्माचा प्रभाव , शत्रू कोण , यांना वश करा , दुष्टापासून सावध रहा , कूणाकडूनही शिकून घ्या -वाघाकडून , बगळ्याकडून , गाढवाकडून , कावळ्याकडून कुत्र्याकडून , शिक्षण सबळ बनविते .

सातवा अध्याय:

मनातील गोष्ट मनातच ठेवा , लाज-संकोच पाहून करा , समाधान मोठी गोष्ट आहे , यापासून वाचा , यौवनच स्त्रियांचे बळ आहे , हंसासारखे वागू नका , कमाविलेली संपत्ती त्यागीत रहा , सत्कर्मातच महानता आहे , दुष्कर्मी नरक भोगतात , विद्येशिवाय जीवन बेकार आहे , परोपकार सर्वात मोठी शुद्धता आहे , शरीरातच आत्मा पाहा.

आठवा अध्याय:

सन्मानच महापुरूषांचे धन आहे , दानाला वेळ नाही , जसे अन्न तशी संतती , सगळ्यात मोठा नीच , संपत्तीचा सदुपयोग करा , स्नानामुळे शुद्धता मिळते , पाणी एक औषध आहे , ज्ञानाला व्यवहारात आणा , याला विटंबनाच समजा , शुभ कार्य करा , भावनेतच ईश्वर आहे , शांतीच तप आहे , समाधान मोठी गोष्ट आहे , यामुळे शोभा वाढते , दुर्गुण सदगुणांना मारतात , यांना शुद्ध समजा , दुर्गुणांचे दुष्प्रभाव , विद्वानाची सर्वच जागी पुजा होते , यांच्यामुळे नुकसान होते.

नववा अध्याय:

मोक्ष , विटंबना , सर्वात मोठे सुख , विद्येचा सन्मान , यांना झोपू देऊ नका , यांना जागवू नका , यांच्यापासून काही नुकसान नाही , यांना भिऊ नका , देखावा सुद्धा आवश्यक आहे , महापुरूषांचे जीवन , सौंदर्याचा ऱ्हास , मर्दन , उपचार गुण.

दहावा अध्याय:

विद्या संपत्तीपेक्षा मोठे धन , विचार करून कार्य करा , भाग्य , लोभी यांना कांही मागू नका , गुणहीन नर पशुसमान , उपदेश सत्पात्रीला द्यावा , निर्धनता अभिशाप आहे , ब्राह्मण धर्म , घरात त्रैलोक्य सुख , भावनेपासून सावध रहा , बुद्धिच शक्ती आहे , सगळी देवाची माया आहे , तूप सगळ्यात मोठी शक्ती आहे , चिंता चित्तेसारखी आहे.

अकरावा अध्याय:

संस्काराचा प्रभाव , द्रोह्यांचा नाश होतो , रूपापेक्षा कीर्ती मोठी आहे , जसे गुण तशी प्रवृत्ती , सवय बदलत नाही , मुर्खाकडून काय अपेक्षा, मौन , विद्यार्थ्यांनी न करण्याच्या गोष्टी , ऋषी , ब्राह्मण , वैश्य , मार्जार , यवन , चांडाळ , दानाचा महिमा .

बारावा अध्याय:

गृहस्थ धर्म , महापुरूषावरच समाज टिकून आहे, गुणवान व्हा, सत्संगतीचा महिमा , साधु दर्शनाचे पुण्य , तुच्छतेत मोठेपण कोठे , नातेवाईकाचे सहा गुण , दुष्ट दुष्टच असतो , अनुरागच जीवन आहे , रामाचा महिमा , कोठूनही शिका , विचार करून कार्य करा.

तेरावा अध्याय:

कर्माचे प्राधान्य , झालेली गोष्ट विसरून जा , मधुर बोल , अति स्नेह दु:खाचे मूळ आहे , भविष्याविषयी जागरूक राहा , जसा राजा तशी प्रजा , धर्महीन मेल्यासारखा असतो , मोक्षमार्ग

, सुखदु:ख , सेवाभाव , पूर्वजन्म , गुरूमहिमा.

चौदावा अध्याय:

पृथ्वी रत्न , जसे पेरळे तसे उगवते , शरीराचे महत्व , एकता , थोडे सुद्धा जास्त आहे , वैराग्याचा महिमा , कर्म केल्यावर विचार कशाचा , अहंकार , मनाचे अंतर , मधुर वाणी , यांच्या जवळ राहू नका , देव सर्वव्यापी आहे , गुणहीनाचे काय जीवन , वस्तु एक गोष्टी अनेक , गुप्त , वाणीने गुण उजाळतात , यांचा संग्रह करा , मानवधर्म.

पंधरावा अध्याय:

दयावान व्हा , गुरू ब्रह्म आहे , दुष्टांचा उपचार , लक्ष्मी कोठेच राहात नाही , धन हाच खरा भाऊ , सत्संगत , आचरण , तत्व ग्रहण , चांडाळकार्य , मुर्ख कोण ? ब्राह्मणाला मान घ्या , परस्वाधीनतेत कुठले सुख , ब्राह्मण आणि लक्ष्मी , प्रेम बंधन दृढता , पुण्यापासून यश .

सोळावा अध्याय:

संतती , स्त्री-चरित्र , विनाशकाले विपरीत बुद्धि , महानता , अनुचित धन , सार्थक धन , याचकता , निर्धनता , मधुर बोल , विद्या व धन वेळेचे.

सतरावा अध्याय:

गुरूकृपेचे ज्ञान , ठकासी महाठक , तपाचा महिमा , विटंबना , लाचारी , आईहून मोठे कोण , दुष्टता , कुपत्नी , पती परमेश्वर , सुंदरता शोभा , सुगृहिणीचा महिमा , गुणहीन पशु , परदु:ख न समजता , पतीपरायणता , गुण मोठा दोष लहान .

# चाणक्यः एक संक्षिप्त परिचय

प्राचीन भारतीय संस्कृत साहित्याच्या इतिहासात आचार्य विष्णुगुप्त चाणक्य आपल्या गुणांनी समृद्ध राजनीतिचे पंडित, आचार-विचारांचे मर्मज्ञ, कूटनीतिमध्ये सिद्धहस्त आणि पारंगत रूपात प्रसिद्ध आहेत. त्यांनी नंद वंशाचा समूळ नाश करून त्या स्थानावर आपला सुयोग्य व तीव्र धारणशक्ती असलेला शूर शिष्य चंद्रगुप्त मौर्याला शासक म्हणून सिंहासनावर बसवून आपल्या विलक्षण प्रतिभेचा जो परिचय करून दिला त्याला सारे जग ओळखते. मौर्य वंशाची स्थापना हीच आचार्य चाणक्याची एक महान उपलब्धी आहे.

हा काळ तेव्हाचा होता जेव्हा मौर्यकाळचे पहिले सिंहासनाधिष्ठीत चंदगुप्त मौर्य शासक होते, त्या वेळी चाणक्य राजनीतिचे गुरू होते. आज सुद्धा राजकारणात पारंगत असलेल्यांना चाणक्याची उपमा देतात. संपूर्ण आणि संघठीत आर्यावर्त हे चाणक्याचे स्वप्न होते व त्यासाठी त्यांनी यशस्वी प्रयत्न केले होते.

चाणक्याचे जन्मनाव विष्णुगुप्त होते आणि चणक नावाच्या आचार्याचे पुत्र असल्यामुळे त्यांचे नाव चाणक्य पडले. काही लोकांचे असे मत आहे की त्यांच्या अत्यंत कुशाग्र बुद्धिमुळे त्यांना चाणक्य म्हटले गेले. कुटिल राननीतित पारंगत असल्यामुळे त्यांना कौटिल्यसुद्धा म्हणत असत. पण बहुधा हे त्यांच्या गोत्राचे नाव होते. पण अनेक तज्ज्ञांच्या मतानुसार कुटिल नीतिचे निर्माते असल्यामुळे कौटिल्य हे नाव पडले. म.म. गणपती शास्त्रींनी कुटिल गोत्राचे उत्पन्न पुमान कौटिल्य या व्युत्पत्तीच्या आधारे त्यांना कौटिल्य गोत्रचे असण्यावर जोर दिला आहे. हे चंद्रगुप्त मौर्याचे महामंत्री, गुरू, हितचितंक आणि राज्याचे संस्थापक होते. चंद्रगुप्त मौर्याला राजपदावर बसविण्याचे कार्य म्हणजे त्यांच्या बुद्धि कौशल्याची कमाल होती.

चाणक्याच्या जन्म स्थळाविषयीचा इतिहास उपलब्ध नाही. परंतु त्यांचे शिक्षण तक्षशिला विद्यापीठात झाले होते. ते स्वभावाने अभिमानी, चारीत्र्यवान, दोषरहित, रूपाले कुरूप, तीक्ष्ण बुद्धिचे ठाम निश्चयी, युगद्रष्टे आणि युगस्रष्टा होते. जन्मापासून पाटलीपुत्रात राहाणाऱ्या चाणक्याच्या बुद्धिचा पूर्ण विकास तक्षशिला आयार्चांच्या संरक्षणात झाला. स्वतःच्या प्रगाढ ज्ञानाने तेथील विद्धानांना प्रसन्न करून राजनीतिचे प्राध्यापक झाले. देशाची दुरावस्था पाहून त्याचे हृदय दुःखी होत होते. त्यामुळे त्यांनी एक सविस्तर कार्यक्रम तयार करून देशाला एकाच सुत्रात बांधण्याचा निश्चय केला न त्यात ते यश्स्वीही झाले.

चाणक्याच्या जीवनाचा उद्देश्य फक्त ‘बुद्धिर्यस्य बलंतस्य’ हा होता. त्यासाठी त्यांना आपली

बुद्धि व पुरूषार्थावर पूर्ण विश्वास होता. ते दैवाधिन तगत्सर्व सिद्धांताला भ्रम मानत होते.

चाणक्य आणि चंद्रगुप्त मौर्याचा काळ एकच होता म्हणजे 325 ई. पू. मौर्य सम्राट चंद्रगुप्ताचा काल हाच चाणक्याचा होता. चाणक्याचे घर शहर बाहेरची पर्णकूटी होती ती पाहून चिनी ऐतिहासिक प्रवासी फाह्यान म्हणाला होता “अशा विशाल देशाचा प्रधानमंत्री अशा झोपडीत राहतो.’ तेव्हा चाणक्याचे उत्तर ‘जेथील प्रधानमंत्री झोपडीत राहतो, तेथील लोकं भव्य महालात राहतात आणि ज्या देशाचा प्रधानमंत्री राजमहलात राहतो, तेथील सामान्य जनता झोपड्यात राहते” असे होते. चाणक्याच्या झोपडीत गोवाया फोडण्यासाठी एक दगड होता आणि शिष्यांनी आणलेल्या गवताचा ढीग दुसऱ्या बाजूला होता. समिधा छतावर वाळत घातलेल्या असत त्यांच्या वजनामुळे छत झुकलेले होते. अशी जीर्ण-शीर्ण झोपडी म्हणजे चाणक्याचे निवास स्थान होते.

ज्या देशाचा प्रधानमंत्री एवढा समजुतदार, प्रामाणिक, जागरूक आणि चारीत्र्यवंत व कर्तव्यपरायण असेल तो देश महान का नसावा.

त्याचे हे भाव पाहून लोक चकित होत, मनाच्या वीणेचे संवेदनशील तार हे दृष्य पाहून झंकार करीत. त्या तारांमधून असा राग ऐकू यायचा की चाणक्याच्या राजनीतितील उच्छृंखलता त्यात विरून जायची. त्याच्या ज्योतिष्चक्रासमोर डोळे मिटून चाणक्याला त्यागी व तपस्व्याच्या रूपात मस्तक नत होते.

2500 ईसपूर्वी चणकाचा पुत्र विष्णुगुप्ताने भारतीय राजनायकांना राजनीतिचे शिक्षण देण्यासाठी अर्थशास्त्र, लघु-चाणक्य, वृद्ध-चाणक्य नीतिशास्त्र इत्यादी ग्रंथांबरोबरच व्याख्यानमान सुत्रांचे निर्माण केले.

संस्कृत साहित्यात नीतीपर ग्रंथांमध्ये चाणक्य नीतिचे स्थान महत्वाचे आहे. यामध्ये सुत्रात्मक शैलीत जीवन सुखी व सफल संपन्न करण्यासाठी उपयोगी अशा अनेक विषयांवर प्रकाश टाकला आहे. चाणक्याच्या मतानुसार आदर्श राज्य तेच आहे ज्याच्या योजना प्रजेला त्याची जमीन, संपत्ती व धान्य मिळण्याचा मूळहक्कापासून वंचित करणाऱ्या नसतात.

प्रजेकडून निरनिराळ्या लहान मोठ्या योजनांच्या नावाखाली कर लावून आकांत करणारी नसावी. राष्ट्राच्या उन्नतीसाठी राबवायच्या योजना राजकीय खर्चातून बचत करूनच चालविल्या पाहिजेत. राजाचा समजलेला भाग त्याला देऊन वाचलेल्या प्रजेच्या तुकड्यांचा बळावर लांब-रूंद योजना तयार करणे म्हणजे प्रजेचे शोषण करणे होय.

चाणक्याचे साहित्य समाजात शांती, न्याय, चांगले शिक्षण, सर्वांगीण प्रगती शिकविणारे ज्ञानाचे भांडार आहे. राजनैतिक शिक्षणाचे हे एक दायित्व आहे की ते मानवी समाजाला राज्य स्थापना, संचालन आणि राष्ट्राचे संरक्षण अशी तिन्ही कामं शिकवतील.

हे भारताचे दुदैव आहे की चाणक्याच्या ज्ञानाची उपेक्षा करून देशी-विदेशी शत्रूंना आक्रमण करण्याचे आमंत्रण देऊन शत्रुची शिकार बनविणाऱ्या अघोरी शिक्षणाला जवळ केले. नैतिक शिक्षण, धर्म शिक्षणाचा अस्त झाला. चारीत्र्य निर्मितीला बहिष्कृत केले गेले. परंतु कारकून निर्माण करणारी, सिद्धांतहीन, फक्त पोट भरण्याचे शिकविणारे शिक्षण राहिले आहे. समाज हळू हळू राक्षसी रूप घेत आहे. पैशाचा दास - सन्मान व आत्म-गौरवाची उपेक्षा करतो आहे. स्वाभिमानाची शवयात्रा काढली जात आहे.

आजच्या स्वार्थप्रणीत अज्ञानाच्या अंधारात बुडलेल्या शुद्ध स्वार्थी राजनैतिक दृष्यात

एकमात्र मार्ग दाखविणारा, भारताला दिशा दाखविणारा वाटाड्या म्हणजे फक्त चाणक्याचे ज्ञानामृत आम्हाला राजनैतिक, सामाजिक आध्यात्मिक मुक्तीचा मार्ग दाखवू शकतो. आजची दोषपूर्ण राष्ट्रीय परिस्थिती ह्याच आजच्या वाईट शिक्षणाचे परिणाम आहेत. राष्ट्रीय भावना, राष्ट्रहित आणि मनुचे आदर्श आज लोप पावले आहेत. अहंकारी विद्येचा बडेजाव आहे. सांस्कृतिक रूप उध्वस्त झाले आहे. निष्काम सेवा-भावाचे तर हिवाळे वाजले आहे. लोभी नेतेगिरीच्या दारूने मुकेपण दिले आहे. वेडेपण दिले आहे. भारताचा उद्धार चाणक्याच्या राजनैतिक प्रवाह सामील करूनच करता येईल. ह्याच्या अध्ययन व पारायणामुळे राजनीतिच्या बुद्धि विकास बरोबरच व्यक्तीचे चारीत्र्य सदाचारी, व्यवहार कुशल आणि धर्मनिष्ठ व कर्मशील मानवाच्या योग्य, चांगल्या विकासाची शक्यता आहे. यासाठीच हा नीति-पाठ आज सुद्धा प्रासंगिक आहे.

-अश्विनी पाराशर

34 , कादंबरी,
19 / 9 , रोहिणी,
नवी दिल्ली- 10085

**साधुभ्यस्ते निवर्तन्ते पुत्रा मित्राणि बान्धवाः।**
**ये य तैः सह गन्तारस्तद्धर्मात् सुकृतं कुलम।।**

चा. नि. 4/2

**कामधेनु गुणा विद्या ह्य काले फलदायिनी ।**
**प्रवासे मातृ सदृशी विद्या गुप्तं धनं स्मृतम् ।।**

चा.नि 4/5

# चाणक्य नीति
## प्रथम अध्याय

ईश्वर प्रार्थना

प्रणम्य शिरसा विष्णु त्रैलोक्याधिपतिं प्रभुम्।
नाना शास्त्रोद्धतं वक्ष्ये राजनीति समुच्चयम ।। **1** ।।

तिन्ही लोकांचे (स्वर्ग, पृथ्वी, पालाक) स्वामी भगवान विष्णुच्या चरणावर मस्तक टेकवून प्रणाम करून अनेक शास्त्रातून वेचलेल्या राजनीतिचे संकलनाचे वर्णन करीत आहे.

चाणक्य येथे राजनीति संबंधी विचारांचे प्रतिपादन करताना निर्विघ्न समाप्तीसाठी म्हणतात की-मी कौटिल्य सर्वप्रथम तिन्ही लोकांचा स्वामी भगवान विष्णुला मस्तक झुकवून, नत करून वंदन करीत आहे. या ग्रंथात मी अनेक शास्त्रातून निवडून काढलेली राजनीतिच्या गोष्टी एकत्रित केल्या आहेत. येथे मी त्यांचे वर्णन करीत आहे.

चाणक्यासाठी (विष्णुगुप्त) कौटिल्य हे संबोधन त्याच्या कुटनीतित प्रवीण असल्यामुळे केलेले आहे. हे एक सत्य आहे की चाणक्याची नीति राजा आणि प्रजा दोघांसाठीही प्रयोग करण्यासाठी होती. राजाकडून निर्वाहासाठी प्रजेसाठी असणारा धर्म हाच राजधर्म मानला गेला. या धर्माचा उपदेश नीतिवचनांच्या स्वरूपात कोणतेही विघ्न न येतापूर्ण व्हावा या अर्थाने प्रारंभीच्या मंगलाचरणात विष्णुची आराधना करून कार्यारंभ केला आहे.

चांगला मनुष्य कोण :-

अधीत्येद यथाशास्त्र नरो जानाति सत्तम:।
धर्मोपदेशविश्यातं कार्याऽ कार्याशुभाशुभम् ।। **2** ।।

धर्माचा उपदेश देणारे, कार्य-अकार्य, शुभ-अशुभ सांगणारे हे नीति-शास्त्र वाचून जो याला सत्य स्वरूपात जाणतो, तोच श्रेष्ठ मनुष्य होय.

या नीतिशास्त्रात कर्माची व्याख्या करताना काय केले पाहिजे, काय नाही करावे, काय चांगळे आहे, काय वाईट आहे इत्यादी ज्ञानाचे वर्णन केले आहे याचे अध्ययन करून आपल्या जीवनात आचरणारा मनुष्यच श्रेष्ठ मनुष्य आहे. आचार्य विष्णुगुप्त (चाणक्य) यांचे येथे म्हणणे आहे की ज्ञानी व्यक्ती नीतिशास्त्र वाचून जाणून घेते की त्याच्यासाठी काय करणे योग्य आहे व काय करणे अयोग्य आहे. त्याबरोबरच त्याला कर्माच्या चांगल्या वाईटाविषयीचे सुद्धा ज्ञान होत जाते. कर्त्तुत्वाबद्दल व्यक्तीने ज्ञानाने मिळलैली, प्राप्त करून घेतलेली ही दृष्टीच धर्मोपदेशांचा

मुख्य परस्पर व्यवहार, संबंध व प्रयोजन आहे. कार्याच्या प्रति व्यक्तीचा धर्मचा व्यक्ती-धर्म (मानव-धर्म) समजला जातो. अर्थात मनुष्य किंवा एखाद्या वस्तुचा गुण आणि स्वभाव म्हणजे जसा अग्नीचा धर्म जाळणे व पाण्याचा धर्म विझविणे आहे. त्याच प्रकारे राजनीतित कांही कर्म धर्माला अनुकूल असतात व फार कांही धर्माच्या विरूद्ध असतात.

गीतेमध्ये कृष्णाने युद्धाच्या वेळी अर्जुनाला क्षत्रिय धर्म याच अर्थाने सांगितला होता की रणांगणावर जेव्हा शत्रू समोर येतो तेव्हा युद्ध करणे हाच क्षत्रियाचा एकमेव धर्म असतो. युद्धातून पलायन किंवा पाठ फिरविणे डरपोकपणा समजला जातो. याच अर्थाने आचार्य चाणक्य धर्माला ज्ञानसम्मत समजतात.

## राजनीति जगाच्या कल्याणासाठी :-

तदहं सम्प्रवक्ष्यामि लोकानां हितकाम्यया।
येन विज्ञान मात्रेण सर्वज्ञत्व प्रपद्यते।। **3** ।।

मी (चाणक्य) लोकांच्या भल्याच्या इच्छेने म्हणजे लोकहितासाठी राजनीतिच्या त्या रहस्य बाजूला सादर करीन ते केवळ प्राण घेतल्यामुळे व्यक्ती स्वतःला सर्वज्ञ समजतो.

हे स्पष्ट आहे की राजनीतिचे सिद्धांत अंगीकारणे तेवढे महत्वाचे नाही जेवढे की ते समजून-उमजून ते काय आहे आणि त्याचा काय प्रभाव पडू शकतो यासाठी त्याच्या नीतिशास्त्राचे पारायण करणारी व्यक्ती राजनीतिची पंडित होऊ शकते. त्यामुळे आत्मकल्याणच नाही तर जगकल्याणासाठी राजनीति जाणणे आवश्यक आहे.

## शिक्षण सत्पात्रीचे :-

मुर्खाशिष्योपदेशेन दुष्टास्त्री भरणेन च।
दु:खितैः सम्प्रयोगेण पण्डितोऽ प्यवसीदति ।। **4** ।।

मुर्ख शिष्याला शिकविल्याने, उपदेश दिल्याने, दुष्ट स्त्रीचे भरण-पोषण केल्याने व दु:खी लोकांची सोबत करण्यामुळे विद्वान व्यक्तीसुद्धा दु:खी होते म्हणजे असं म्हणू शकता की कुणी कितीही हुशार का असेना मुर्ख शिष्याला शिकविल्यामुळे, दुष्ट स्त्री बरोबर जीवन घालविल्यामुळे आणि दु:खी व रोगी लोकात राहिल्यामुळे विद्वानसुद्धा दु:खी होतात, शेवटी नीति सांगते की मुर्ख शिष्याला विद्या देऊ नये. दुष्ट स्त्रीबरोबर संबंध ठेऊ नये किंबहूना तिच्यापासून दूरच राहावे आणि दु:खी लोकामध्ये राहू नये. असे होऊ शकते की या गोष्टी कोणत्याही व्यक्तीला सामान्य वाटतिल पण जर यावर गंभीरपणे विचार केला तर हे स्पष्ट आहे की विद्या त्याच व्यक्तीला घ्यावी जो की सत्पात्र आहे किंवा ज्याच्या मनात या बोधप्रद गोष्टी ग्रहण करण्याची इच्छा आहे.

आपल्याला माहित आहे की एकदा पावसात भिजणाऱ्या माकडाला चिमणीने घरटे करण्याचे शिकविले परंतु माकड त्या शिक्षणायोग्य नव्हते. त्रासलेल्या माकडाने त्या चिमणीचेच घरटे नष्ट केले. त्यामुळेच म्हणतात की ज्या व्यक्तीळा कोणतेही ज्ञान नाही त्याला कोणतीही गोष्ट सहज समजावून सांगता येते पण जो अर्धवट ज्ञानी आहे त्याला ब्रह्मा सुद्धा समजावून सांगू शकत नाही. याच संदर्भात चाणक्य म्हणतात की मुर्खाप्रमाणेच दुष्ट स्त्रीची संगत करणे वा तीचे

पालन पोषण करणेसुद्धा त्या व्यक्तीच्या दुःखाचे कारण होऊ शकते. कारण जी स्त्री स्वतःच्या पतीविषयी आस्था ठेवीत नाही ती दुसऱ्यासाठी कशी विश्वासनीय होऊ शकेल? नाही. याचप्रमाणे दुःखी व्यक्ती जी आत्मबळ कमी झालेली आहे, निराश झाली आहे, त्याला कोण उभारी देऊ शकेल. यामुळे बुद्धिमान व्यक्तीने मुर्ख, दुष्ट स्त्री व दुःखी व्यक्ती तिघांपासूनही स्वतःला वाचवून आचरण करावे. पंचतंत्रात सुद्धा सांगितले आहे की-

‘माता यस्य गृहे नास्ति भार्या चाप्रियवादिनी।
अरण्यं तेन गन्तव्यं यथारण्यं तथा गृहम्।।-पचं 4/53

म्हणजे ज्या घरात माता नाही आणि स्त्री व्याभिचारीणी आहे, त्याने अरण्यात निघून जावे कारण त्याच्यासाठी घर आणि अरण्य सारखेच आहे.

दुःखी व्यक्तीचे पालन सुद्धा संतापदायक असते. वैद्य ‘परदुःखेन तप्यते’ लोकांच्या दुःखामुळे दुःखी होतो. तसेच दुःखी लोकांबरोबर व्यवहार केल्याने विद्वानसुद्धा दुखी होतात.

## मृत्यूच्या कारणापासून सावध रहा :-

दुष्टा भार्या शठं मित्र भृत्यश्चोत्तरदायकः।
ससर्पे गृहे वासो मृत्युरेव न संशयः।। **5** ।।

दुष्ट पत्नी, धूर्त मित्र, उत्तर देणारा नोकर आणि साप असलेल्या घरात राहणे ही मृत्यूची कारणे आहेत, यात कोणताही संशय नाही.

आचार्य चाणक्य म्हणतात की या चार गोष्टी कोणत्याही व्यक्तीसाठी जिवंत जागते मृत्यु समान आहेत. वाईट चारीत्र्याची पत्नी, दुष्ट मित्र, तोंडाला लागणारा नोकर या सगळ्यांचा त्याग केला पाहिजे. घरात राहणाऱ्या सापाला कांहीही करून मारले पाहिजे. असे नाही केले तर व्यक्तीच्या जीवनाला नेहमी धोका असतो. कारणकी कोणाही सदगृहस्थासाठी त्याच्या पत्नीचे दुष्ट असणे मृत्यूसमान असते. ती व्यक्ती आत्महत्या करण्यासाठी विवश होऊ शकते. ती स्त्री नेहमी व्यक्तीच्या दुःखाचे कारण असते. त्याच प्रकारे नीच व्यक्ती, धूर्त जर मित्राच्या रूपात आपल्याजवळ बसतो ते आपल्यासाठी हानिकारकच असते. नोकराला सुद्धा घरातील गुप्त गोष्टी माहित असतात आणि तो जर मालकाच्या आज्ञा पाळणारा नसेल तर तो संकटाचे कारण होऊ शकतो. त्याच्यापासून सुद्धा सतत सावध राहावे लागते. दुष्ट स्त्री, कपटी मित्र, दुष्ट नोकर हे केव्हाही धोका देऊ शकतात. अशात पत्नीचे आज्ञाधारक व पतीव्रता असणे, मित्र समजूतदार व विश्वसनीय असणे आणि नौकर मालकावर श्रद्धा ठेवणारा पाहिजे. याच्या विरूद्ध असले तर त्रासच त्रास असतो. यांच्यापासून व्यक्तीने सावध राहावे नाहीतर अशी व्यक्ती केव्हाही मृत्यूमुखी पडू शकते.

## विपत्तीमध्ये काय करावे :-

आपदर्थे धनं रक्षेद् दारान् धनैरपि।
आत्मानं सततं रक्षेद् दारैरपि धनैरिप ।। **6** ।।

विपत्तीच्या काळासाठी संपत्ती रक्षण केले पाहिजे. संपत्तीपेक्षा जास्त रक्षण पत्नीचे केले पाहिजे. पण आपल्या रक्षणाचा प्रश्न उभा राहिला तर धन व पत्नीचे बलिदान करावे लागले तरी करावे.

संकटात, दुःखात संपत्तीच मनुष्याच्या उपयोगी पडते. अशा संकट समयी साठविलेली संपत्तीच कामी येते म्हणून मनुष्याने धनाचे रक्षण केले पाहिजे. पत्नी संपत्तीपेक्षा जवळची असते म्हणून तीचे रक्षण संपत्तीच्या अगोदर करावे. पण संपत्ती आणि पत्नीच्या आधी तसेच दोन्ही पेक्षा जास्त स्वतःचे रक्षण केले पाहिजे. स्वतःचे रक्षण केल्यावर सर्वांचेच रक्षण करता येते.

आचार्य चाणक्य संपत्तीचे महत्व कमी लेखीत नाहीत कारण संपत्तीमुळे मुनष्याची अनेक कामं होतात पण कुटुंबातील भद्र महिला, स्त्री अथवा पत्नीच्या जीवन सन्मानाचा प्रश्न समोर आला तर संपत्तीची चर्चा करू नये. कुटुंबाच्या मान मर्यादेमुळेच व्यक्तीची आपली मान-मर्यादा असते. तीच नसेल तर जीवन काय कामाचे आणि संपत्ती काय कामाची? पण जेव्हा व्यक्तीच्या स्वतःच्या जीवनावर बेतले तर धन, स्त्री सर्वांची काळजी त्यागून व्यक्तीने आपल्या जीवनाचे रक्षण केले पाहिजे. व्यक्ती राहिली तरच पत्नी व धनाचा उपभोग घेऊ शकतो नाहीतर सगळेच व्यर्थ आहे. राजपूत स्त्रियांनी जेव्हा पाहिले की राज्याचे रक्षण करणे वा ते वाचविणे अशक्य आहे तेव्हा त्यांनी जोहार व्रताचे पाळन केले आणि आपल्या प्राणांची आहूती दिली. हाच जीवनाचा धर्म आहे.

आपदर्थे धन रक्षेच्छ्रीमतांकुतः किमापदः।
कदाचिच्चलिता लक्ष्मी संचिताऽ पि विनश्यति ।। **7** ।।

आपत्ती काळासाठी संपत्तीचे रक्षण केले पाहिजे पण श्रीमंताला कशाची आपत्ती, म्हणजेच श्रीमंतावर आपत्ती येतेच कुठे? प्रश्न उभा राहतो की लक्ष्मी चंचल आहे. तर केव्हा नाहीशी होईल आणि जर असे असेल तर जमा केलेली संपत्ती सुद्धा नाहीशी होऊ शकते.

वाईट वेळ आल्यावर व्यक्तीचे सर्वच नष्ट होते. लक्ष्मी स्वाभावानेच चंचल असते. तिची कांहीच खात्री नाही की केव्हा सोडून जाईल. त्यामुळे श्रीमंतानीही असे समजू नये की त्याच्यांवर संकट येणार नाही. वाईट वेळेसाठी संपत्तीचा कांही भाग सुरक्षित ठेवला पाहिजे.

वस्तुतः हा श्लोक 'भोज प्रबंधात'सुद्धा आहे. राजा भोज व कोषाध्यक्षाच्या संवादाचा प्रसंग आहे. राजा भोज अतिशय दानशूर होता. त्याचा दानधर्म पाहून कोषाध्यक्ष एक श्लोक सांगतो तर राजा उत्तरादाखल श्लोक सांगतो. शेवटी कोषाध्यक्ष राजाचे मत व दानाचे महत्व ओळखून आपली चूक कबूल करतो.

येथे असे मत आहे की धन अयोग्य कामात खर्च केले तर ते नष्ट झाल्यावर मनुष्याला विपन्नावस्था येते पण ते सत्कार्यासाठी खर्च केले तर ते व्यक्तीचा मान-प्रतिष्ठा आणि समाजात आदरणीय होतो कारण संपत्ती अशाश्वत असते. तीचा काय गर्व करावा? व्यक्ती ते कमावते पण वास्तविक शक्ती ईश्वर देणगी आहे व शाश्वत आहे. जोपर्यंत त्याची कृपा आहे तोपर्यंत सगळच आहे पण हेही निश्चित आहे कि संपत्ती मनुष्याच्या कष्ट, बुद्धी व कार्यक्षमतेने प्राप्त होते आणि हे आहे तोपर्यंत तीचा ऱ्हास होत नाही. श्रम, बुद्धी आणि कार्यक्षमतेच्या अभावामुळे ती साथ सोडते. मूळ बाब श्रम, बुद्धिची कार्यक्षमता टिकून रहाण्यामुळेच लक्ष्मी टिकून राहते.

## अशा स्थानी राहू नका :-

यस्मिन् देशे व सम्मानो व वृत्तिर्न च बानधवाः।
न च विद्यागमोऽ प्यस्ति वासस्तत्र न कारयेत् ।। **8** ।।

ज्या देशात सन्मान नाही, जेथे उपजीविकेचे साधन नाही, जेथे आपले भाऊबंद नाहीत आणि जेथे विद्या अशक्य आहे अशा स्थानी राहू नये. अर्थात ज्या देशात किंवा शहरात खालील सोयी नाहीत अशा स्थानी आपण निवास करू नये-

जेथे कोणाही व्यक्तीचा सन्मान होत नाही.

जेथे व्यक्तीला कांहीही काम मिळत नाही.

जेथे आपले कोणी नातेवाईक किंवा परिचित नाहीत.

जेथे विद्या प्राप्तीचे साधन नाही म्हणजे शाळा, कॉलेज व वाचनालय नाही. अशा स्थानी राहून कांहीही लाभ होत नाही. त्यामुळे अशा स्थानांचा त्याग करणेच उचित होय. मनुष्याने उपजीविकेसाठी उपयुक्त स्थळ निवडले पाहिजे. तेथील समाजच हा खरा त्याचा समाज असतो. कारण मनुष्य सांसारिक प्राणी आहे, तो केवळ पोट भरण्यासाठी जिवंत राहू शकत नाही. जेथे त्याचे मित्र-भाऊबंद आहेत तेच त्याच्या उपजीविकेसाठी योग्य स्थान आहे. विचार-शक्ती टिकविण्यासाठी ज्ञान-प्राप्तीची साधन तेथे सुलभ असतील त्याशिवाय त्याचा निर्वाह नाही. यामुळे आचार्य चाणक्य येथे नीति वचनात सांगतात की व्यक्तीने त्या देशात निवास करू नये जेथे त्याला सन्मान मिळणार नाही व उपजीविकेचे साधन नाही. ना तर भाऊबंद आहेत ना तर विद्याप्राप्तीचे साधन. जेथे ही साधने उपलब्ध आहेत तेथे राहावे.

धनिकः श्रोत्रियो राजा नदी वैद्यस्तु प**ञ्च** मः।
प**ञ्च** यत्र न विद्यन्ते न तत्र दिवसे वसेत ।। **9** ।।

जेथे कोणी सावकार, वेदपाठी विद्वान, राजा व वैद्य नाही, नदी नाही अशा पाच स्थानावर एकही दिवस राहू नये.

अर्थात या स्थानावर एक दिवससुद्धा राहू नये-

ज्या शहरात एकही श्रीमंत व्यक्ती नाही.

ज्या देशात वेद जाणणारा विद्वान नाही.

ज्या देशात राजा किंवा सरकार नाही.

ज्या शहरात किंवा गावात कोणी वैद्य (डॉक्टर) नाही.

ज्या स्थानाजवळ एखादी वाहती नदी नाही.

-कारण आचार्य चाणक्य मानतात की जीवनातील अडचणीत या पाच वस्तुंना अत्यधिक महत्व आहे. संकटकाळी धनाची आवश्यकता असते तीची पूर्ती श्रीमंतच करू शकतात. कर्मकांडासाठी विद्वान पुरोहिताची गरज असते. राज्य शासनासाठी राजाची गरज असते. पाणी पुरवठ्यासाठी नदी व रोग निवारणासाठी वैद्याची गरज असते. यामुळे आचार्य चाणक्य वरील पाचही सुविधांना जीवनासाठी अपेक्षित सुविधा मानून त्यांच्या आवश्यकतेवर जोर देतात आणि या सुविधांनी युक्त जागी राहण्यास सांगतात.

लोक**यात्रा** भयं लज्जा दाक्षिण्यं त्यागशीलता।
प**ञ्च** यत्र न विद्यन्ते न कर्यात्तत्र संगतिम।। **10** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की ज्या जागी कामधंदा नाही मिळणार, लोकांमध्ये भय लज्जा, उदारता आणि दान करण्याची वृत्ती नसेल, अशा पाच स्थळांना मनुष्याने आपल्या निवासासाठी निवडू नये. या पाच वस्तूंना विस्ताराने सांगताना म्हणतात की जेथे खालील पाच नाहीत त्या जागेशी, स्थानाशी कोणताही संबंध ठेऊ नये.

जेथे रोजगाराचे साधन किंवा उपजीविकेसाठी व्यापाराची परिस्थिती नाही.

जेथे लोकांमध्ये लोकलाज अथवा कोणत्याही प्रकाराची भीती नाही.

ज्या स्थानी परोपकारी लोकं नाहीत व ज्यांच्यामध्ये त्यागाची भावना नसेल.

जेथे लोक समाज व कायद्याला भीत नाहीत.

जेथील लोकांना दान करणे माहित नाही.

अशा स्थानावर मनुष्याचा सन्मान होत नाही व तेथे राहणेही कठीण असते. त्यासाठी मनुष्याला आपल्या निवासासाठी सर्व प्रकारचे साधन आणि व्यवहारिक स्थान निवडावे म्हणजे तो चांगल्या वातावरणात आपल्या कुटुंबासह सुरक्षित व सुखाने राहू शकतो. कारण तेथील लोक ईश्वर, लोक-परलोक यात आस्था ठेवतात, तेथे सामाजिक आदराची भावना असते, अमंगल काम करण्याचे भय, संकोच लज्जा असते. लोकात त्यागभावना असेल आणि ते लोक स्वार्थासाठी कायद्याचे उल्लंघन करीत नाहीत. उलटपक्षी दुसऱ्यांच्या हितासाठी दानधर्म करतात.

परीक्षा वेळप्रसंगी होते-

जानीयात्प्रेषणे भृत्यान् बान्धवान्**व्य** सनाऽऽ गमे।
मित्रं या **ऽऽ** पत्तिकालेषु भार्यां व विभवक्षये ।। **11** ।।

आचार्य चाणक्य वेळेला संबंधीतांच्या परीक्षेसंदर्भात म्हणतात. कोणत्याही महत्वाच्या कामाला पाठविताना नोकराची ओळख पटते, दुःखाचे वेळी भाऊबंदांची, संकटात मित्राची व धनऱ्हास झाल्यावर पत्नीची परीक्षा होते.

जर एखाद्या विशेष प्रसंगी नोकराला विशेष कार्यासाठी पाठविले तेव्हाच त्याच्या ईमानदारीची पारख होते. रोग व संकटातच नातेवाईक व मित्रांची पारख होते, आणि गरीबीत, धन नसताना पत्नीची पारख होते.

सगळेच जाणतात की मनुष्य सामाजिक प्राणी आहे. तो एकटा राहू शकत नाही. त्याला प्रत्येक कामात साहाय्यक, मित्र व भाऊबंदांची आवश्यकता असते. परंतु एखाद्या कारणास्तव त्याचे साहाय्यक त्याच्या जीवन-यात्रेत वेळला सहाय्यक नाही झाले तर त्याचे जीवन निष्फळ होते. म्हणून खरा नोकर तोच जो संकटात साहाय्यक होतो. मित्र व भाऊ तेच चांगले जे संकटात कामी पडतात, व्यसनापासून मुक्त करतात, आणि पत्नी हीच साहाय्यिका व खरी जीवन-साथी आहे जी गरीबीतसुद्धा पतीची सदैव साथ देते, असे नसेल तर तीचे असणे निरूपयोगी आहे.

आतुरे व्यसने प्राप्त दुर्भिक्षे शत्रुसंकटे।
राजद्वारे श्मशाने या यात्तिष्ठति व बान्धवः।। **12** ।।

येथे आचार्य चाणक्य भाऊबंद, मित्र व कुटुंबीयांची ओळख सांगताना म्हणतात की रोग अवस्थेत, अवेळी शत्रुने घेरल्यावर, राज्यकामात मदतनीसाच्या रूपात आणि मृत्यूनंतर स्मशान भूमीत नेणारी व्यक्तीच खरा मित्र व बंधु असते.

तसे पाहिले तर सामाजिक पाणी असल्यामुळे मनुष्याच्या संपर्कात अनेक लोक येतात-जातात आणि स्वतःच्या लाभासाठी ते व्यक्तीशी संबंधीत असल्याचे भाव दाखवितात. पण ते कितपत खरे मित्र आहेत व किती संधी साधू आहेत याचा अनुभव वेळ आल्यानंतरच येतो.

वर वर्णिलेली स्थिती अशाच प्रसंगाचे उदाहरण आहे. जेव्हा व्यक्ती रोग ग्रस्त होते तेव्हा त्याला मदतनीसाची आवश्यकता भासते तेव्हा कुटुंबीय व मित्र-भाऊ जे मदतनीस होतात तेच खरे मित्र असतात. बाकी सगळे तोंडदेखले असते. याचप्रकारे जर शत्रुने एखाद्या व्यक्तीला घेरल्यावर त्याचे प्राण संकटात सापडतील तर जो कोणी मित्र, नातलग त्याची शत्रुपासून मुक्तता करतो, प्राण-रक्षण करतो तोच त्याचा मित्र व हितकारक असतो. बाकी सर्व नाती स्वार्थापुरती असतात.

असंच राजा आणि सरकारतर्फे न्यायाच्या मामल्यात खटला लावला जातो व एखाद्या राजकीय कार्यात त्याच्यासमोर समस्या येते तेव्हा मित्र-भाऊ (जर ते खरे असतील तर) हेच सहकार्य करतात. मृत्यूनंतर तर आपण सगळेच जाणतो की मनुष्य चार जणांच्या खांद्यावरच स्मशानात पोहोचतो. अशा वेळी मित्र व संबंधीच अपेक्षित असतात. अशाच वेळेस खऱ्या व ईमानदार मित्राची वास्तविक पारख होते.

## हातात आलेली वस्तु गमावू नका-

> यो ध्रुवाणि परित्यज्य ह्यध्रुवं परिसेवते।
> ध्रुवाणि तस्य नश्यन्ति चाध्रुवं नष्टमेव तत् ।। **13** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की जो निश्चित असलेले त्यागून अनिश्चिततेचा आधार होतो त्याचे निश्चितही नष्ट होते. अनिश्चित तर स्वतःच नष्ट होते. अभिप्राय असा आहे की जी वस्तु मिळणे निश्चित आहे तीच प्रथम प्राप्त करून घ्यावी तेच कार्य प्रथम करा. असं न करता जो मनुष्य जी वस्तु मिळणार नाही तीच्याकडे प्रथम धावतो, त्याचे निश्चितही नष्ट होते म्हणजेच मिळणारी वस्तुही मिळत नाही. अनिश्चिताचा विश्वास करणे हाच मुर्खपणा आहे. ती नष्ट होणारच असे गृहीत धरावे. असा मनुष्य नेहमी “अर्धे सोडून संपूर्णाकडे धावतो, अर्धही मिळत नाही व पूर्णही मिळत नाही” अशा स्थितीचा बळी ठरतो.

या संदर्भात अनेक उदाहरणं देता येतील. कांही व्यक्ती फक्त मनोरथ रचून कार्याची प्राप्ती मानतात. ते जे की मिळण्यासारखे हातात आहे त्याची पर्वा न करता जे हाती नाही त्याच्या भ्रमात पडतात आणि होते हे की जे मिळवू शकले असते ते सुद्धा गमावून बसतात. असे लोक फक्त मोठेपणा सांगतात, कामात ढिलाई दाखवितात व शेखचिल्ली होऊन बसतात. त्यामुळे मनुष्याने आपल्या साधनानुसार कार्याची योजना करून पुढे चालावे तरच ते या जीवनसागरात शरीररूपी नौकेने पार जाऊ शकतात. नाहीतर नाव प्रवाहात मनोराज्यांच्या भोवऱ्यात फसून बसेल. म्हणून मनुष्याने आपली क्षमता ओळखून काम करावे. काम केल्याने होते मनोरथाने नाही.

## समान असणाऱ्यातच विवाह शोभतो-

वरयेत्यकुलजां प्राज्ञो निरूपामपि कन्यकाम्।
रूपवतीं न नीचस्य विवाह: सदृशे कुले।। **14** ।।

आचार्य चाणक्य विवाह संदर्भात रूप आणि कुल यात कुळाला श्रेष्ठ मानून म्हणतात की बुद्धिमान मनुष्याने संदुर नसली तरी कुलीन कन्येशी विवाह करावा. पण नीच कुळातील कन्या सुंदर व सुशील असली तरी तीच्याबरोबर विवाह करू नये. कारण विवाह समान कुळातच करावा.

(विवाहासाठी वर आणि वधु दोघांचेही घराणे सारखेच असावे. बुद्धिमान पुरूषाने आपल्या बरोबरीच्या कुळातील कन्येबरोबरच विवाह करावा. जरी कन्या साधारण रंग-रूपाची असेल तरीही, हलक्या कुळातील कन्या सुंदर, सुशील असली तरी तीच्याशी विवाह करू नये.)

गरूड पुराणात हा श्लोक पाठभेदाने सापडतो. त्यातसुद्धा हे सांगितले आहे की 'समान कुलव्यसने च सख्यम' म्हणजेच मैत्री व विवाह सारख्या लोकातच शोभून दिसतो. विजातीय किंवा विषम (मेळ नसलेले लग्न) विवाहात अनेक अडचणी येतात. अनेक समस्या उत्पन्न होतात. मनुस्मृतीमध्ये जरी प्रतिकूल विवाहाचे विधान असले तरी पाहण्यात हेच येते की विजोड विवाह अनेक कारणामुळे अयशस्वी ठरतात किंवा त्यांचा परिणाम सुखद होत नाही. यासाठी जीवनाच्या संदर्भात विवाहासारख्या महत्वपूर्ण प्रश्नाला भावनेची शिकार होण्यापासून वाचविणे हेच नीतिमान्य आहे.

## पाहून-पारखून विश्वास ठेवा-

नखीनां न नदीनां व श्रृंगीणां शास्त्रपाणिनाम्।
श्विसातो नैव कर्तव्य: स्त्रीषु राजकुलेषु चा ।। **15** ।।

येथे आचार्य चाणक्य विश्वसनीयतेच्या लक्षणांची चर्चा करताना म्हणतात की लांब नखं असणारे हिंसक पशु, नदी, मोठ्या शिंगांचे पशु, शस्त्रधारी, स्त्रिया आणि राजपरिवारांचा कधीही विश्वास करु नये. कारण हे केव्हा घात करतील व केव्हा वार करून जखमी करतील याचा काही भरवसा नाही. जसे लांब लांब नख असलेले सिंह, अस्वल आणि वाघ इत्यादींवर भरवसा ठेवता येत नाही कारण त्यांच्या बाबतीत आपण हे गृहीत धरू शकत नाहीत की ते आक्रमण करणारच नाहीत. हिंसक पशु स्वभावानेच आक्रमक वृत्तीचे असतात. त्यामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवणारा नेहमीच फसतो. तसच आपण जर एखादी नदी पार करू इच्छित असाल तर आपण कोणाही असे सांगणाऱ्या व्यक्तीवर विश्वास ठेवू नये की नदीच्या पाण्याला किती खोली आहे. कारण नदीचा प्रवाह व खोलीसंबंधात निश्चित कांही अनुमान सांगता येत नाही. त्यासाठी आपण नदीत उतरत असाल तर सावध राहणे आवश्यक आहे.

याच प्रकारे आचार्य चाणक्याचे सांगणे आहे की शिंग असणारे पशु आणि शास्त्रधारी मनुष्याचा भरवसा देता येत नाही. कारण ते आपल्या स्वार्थासाठी किंवा आपल्या वेडेपणात केव्हा आपले नुकसान करतील ते सांगता येत नाही.

अशाच प्रकारे स्त्रीयांचा सुद्धा डोळे झाकून विश्वास करता येत नाही कारण त्यांच्या मनात

काय आहे हे कोणास ठाऊक. त्या आपले संकुचित विचार, द्वेष व ईर्षेने आपल्याला चुकीचा सल्ला देऊन चुकीचे व त्यांच्या मनासारख्या कामाला प्रेरित करतील. आचार्य चाणक्याचे स्पष्ट मत आहे की बऱ्याच स्त्रीया बोलतात एक आणि करतात एक. त्या प्रेम एकावर करतात व प्रेमाची प्रदर्शने दुसऱ्याबरोबर करतात म्हणून त्यांच्या स्वामीभक्ती व पतीव्रता असण्यावर विश्वास ठेऊ नये. त्यापासून सावधच राहिले पाहिजे.

अशाच प्रकारे आचार्य चाणक्य राजकुळाची सुद्धा चर्चा करतात. त्यांच्या मते राजनीति नेहमी परिवर्तनशील असते. राजपरिवारातील लोक सत्ता पक्षाशी संबधित असल्यामुळे किंवा सत्ता हस्तगत करण्यासाठी कपटीचाली करतात, त्याचेच ते बळी ठरतात. त्यांचे मित्र व शत्रू सामाईक लाभ-नुकसानीवर अवलंबून असतात. या संदर्भात ऐतिहासिक दाखले पाहिजे तर हे सत्य स्पष्ट असते की राज्य प्राप्तीसाठी पुत्र पित्याची हत्त्या करतो. त्याला कारागृहात डांबतो. कंसाने लोभापायीच वडील उग्रसेनाला तुरूंगात डांबले होते. आपल्या प्राणांचे रक्षण करण्याच्या हेतूने बहीण असलेल्या देवकीला पती वासुदेव सोबत जेलमध्ये टाकले होते. कृष्णाचा जन्म कंसाच्या कारागृहातच झाला होता.

म्हणून चाणक्याच्या मतानुसार या सहा (6) संबंध आणि शक्तींवर अंधश्रद्धा ठेवू नये. कारण यांचे मन व वृत्ती क्षणोक्षणी बदलत असते. नीति हेच सांगते.

## सार समजून घ्या-

विषादप्यमृतं ग्राह्यममेध्यादपि कांचनम्।
नीचादप्युत्तमां विद्यां स्त्रीरत्नं दुष्कुलादपि।। **16** ।।

आचार्य चाणक्य येथे साध्याचे महत्त्व विशुद्ध करताना साधनाला दुय्यम मानून म्हणतात विषातून अमृत व घाणीतून सोने घेतले पाहिजे, नीच व्यक्तीकडून सुद्धा उत्तम विद्या घेतली पाहिजे आणि दुष्ट कुळातून सुद्धा स्त्री-रत्न घेतले पाहिजे.

अमृत हे अमृतच असते. ते जीवनदायक आहे म्हणून विषात पडलेले अमृत घेणे सुद्धा योग्य आहे. सोने कोठे घाणीत जरी पडलेले असले तरी ते उचलून घ्यावे. चांगले ज्ञान व विद्या नीच कुळातील व्यक्तीकडून मिळाली तरी घ्यावी. याचप्रकारे दुष्ट कुळातील गुणवान सुशील कन्या असेल तर तीचा स्वीकार अवश्य करावा.

सांगण्याचे तात्पर्य हे आहे की व्यक्तीने अमृत, सुवर्ण, विद्या आणि गुण व स्त्री-रत्न ग्रहण करण्यास कधीही संकोच करू नये. त्यांच्या स्वीकार करताना गुणाला महत्व घ्यावे साधनाला नाही. अर्थात वाईट स्त्रोतापासून एखादा उत्तम पदार्थ प्राप्त होत असेल तर तो प्राप्त करून घेण्यास मनुष्याने संकोच करू नये. कारण लक्ष्य साध्य आहे, साधन नाही. एका जागी चाणक्य म्हणतात की नीच कुळातील सुंदर कुमारी बरोबर विवाह करू नये. परंतु येथे त्यांचे म्हणणे असे आहे की जरी कन्या हलक्या कुळात जन्मलेली असली पण ती गुणवती असेल तर तीचा स्वीकार करणे हे चाणक्य आपत्ती मानत नाहीत. येथे त्यांनी तीच्या गुणांचा संकेत दिला आहे, फक्त रसिकासारखे तीच्या रूपाकडे नाही. विवाहसंबंधी चाणक्याचे स्पष्ट मत आहे की तो समान पातळीवरील कुटुंबातच व्हावा. असे दिसून येते की विवाहानंतर होणाऱ्या परिणामांशी पूर्णत: परिचित होते. जसे की आज आपण पाहतो समान पातळी आणि सम विचारी कुटुंबांमध्ये विवाह

न झाल्यामुळे मनुष्याला अनेक संकटातून जावे लागते. पण असे असले तरी गुणाचे महत्व आहेत. त्याला पारखण्यात चूक करू नये.

## स्त्री पुरूषापेक्षा पुढे असते-

स्त्रीणां द्विगुण आहारो लज्जा चापि चतुर्गुणा।
साहसं षड्गुणं चैव कामश्चाष्टगुणः ।। **17** ।।

आचार्य चाणक्य येथे पुरुषाच्या तुलनेत स्त्रियांची क्रियावृत्तीची तुलना करताना म्हणतात की स्त्रियांचा आहार दुप्पट, लज्जा चौपट असते. कोणतेही वाईट काम करण्याची हिंमत स्त्रीमध्ये पुरुषापेक्षा सहापट असते व कामभावनेत संभोगाची इच्छा पुरुषापेक्षा आठपटीने जास्त असते. आणि ही गुणवत्ता तीचे शारीरिक दायित्व जे लग्नानंतर ती वाहते त्यामुळे असते. स्त्रीला गर्भ धारण करावा लागतो. संतानप्राप्ती नंतर त्यांचे पालन-पोषण करावे लागते. या कामामध्ये त्यांना जेवढे कष्ट करावे लागतात त्याची कल्पना स्त्रीशिवाय दुसरे कोणी करू शकत नाही. “वांझ स्त्रीला प्रसूतीच्या यातना कशा कळतील” प्रसूती यातना सहन करणे वा होणाऱ्या गौरवापुढे ती एक सामान्य प्रक्रिया होऊन जाते.

जिथे कामभावनेचा प्रश्न आहे, ती स्त्रियांमध्ये पुरुषापेक्षा जास्त असते. कारण मैथुनानंतर वीर्यस्खलना बरोबरच काम शांती आणि काम वैराग्य निर्माण होते. स्त्रियांमध्ये सुद्धा कामशांती असते त्याचबरोबर अतृप्तावस्थेत स्वाभाविक क्रिया न झाल्यामुळे अन्य पुरुषासोबत संबंध ठेवण्याची प्रबळ भावना तीच्यामध्ये वेश्यापन (परपुरुषसंगत) निर्माण करते. परंतु पुरुषात अशी प्रतिक्रिया तात्काळ पाहण्यास मिळत नाहीत. म्हणून स्त्रीमध्ये पुरुषाच्या तुलनेत काम भावना जास्त असते असा अंदाज करण्यात आला आहे.

# दुसरा अध्याय

## स्त्रियांचे स्वाभाविक दोष-

अनृतं साहसं माया मूर्खत्वमतिलोभिता।
अशौचत्वं निर्दयत्वं स्त्रीणां दोषाः स्वभावजा:।। **1** ।।

येथे आचार्य चाणक्य स्त्रियांच्या स्वाभावाचे वर्णन करताना म्हणतात की खोटे बोलणे, साहस, छल-कपट, मुर्खता, अतिलोभ, अपवित्रता व निर्भयता हे स्त्रीचे स्वाभाविक दोष आहेत. ही प्रवृत्ती स्त्रीमध्ये जन्मत:च असते. त्या आपल्या दु:साहसामध्ये कोणतेही असे कार्य करू शकतात की ज्याच्यावर विश्वास बसत नाही.

आचार्य चाणक्यांनी येथे स्त्रीच्या स्वभावाचे वर्णन केले आहे आणि ते मानतात की सृष्टीच्या रचनेत स्त्रीचे योगदान मोलाचे आहे. पण जेव्हा स्वभावाचा प्रश्न येतो तेव्हा तेथे हे दोषसुद्धा पाहिले जातात. याचा अर्थ हा नाही की “दारं किमेकं नरकस्य नारी” म्हणजेच नरकाला असलेल्या एकमेव दाराच्या रूपाने स्त्रीचा उल्लेख केला आहे. तुळशीदासांनी म्हटले आहे की “नारी स्वभाव सत्य कवि कहही, अवगुण आठ सदा उर रहही”! या आठ अवगुणात याच श्लोकात असलेल्या नावांचा अनुवाद केला आहे. त्याचबरोबर सामान्य नियमांना विशेष नियम प्रभावित करतात. कारण स्त्री माया, दया क्षमा इत्यादींचे एकमात्र स्थान आहे. हिच्याशिवाय सृष्टी अपूर्ण आहे. म्हणून सीता, राधा, जीजाबाई, लक्ष्मीबाई यांच्यामधील अवगुण शोधणे म्हणजे आपला अविचारीपणा आहे. या तर स्त्रियांच्या आदर्श आहेत आणि आचार्य चाणक्याने स्त्रीच्या ज्या दोषांची वर चर्चा केली आहे ते स्वाभाविक आहेत. सर्वच स्त्रियांमध्ये हे दोष असणे आवश्यक नाही.

## जीवनातील सुख भाग्यवंताला मिळते-

भोज्यं भोजनशक्तिश्च रतिशक्तितर वरांगना।
विभवो दानशक्तिश्च ना**ऽ** ल्पस्य तपसः फलम्।। **2** ।।

येथे आचार्य चाणक्य सांगतात की भोजनलायक पदार्थ, भोजन-शक्ती, रतीशक्ती, सुंदर स्त्री, वैभव आणि दान-शक्ती ही सर्व सुख कमी, अल्प तपस्येची फलं नसतात. अर्थातच खाण्या-पिण्याचे सुग्रास पदार्थ मिळावेत आणि जीवनाच्या शेवटपर्यंत खाण्याची-पचविण्याची क्षमता राहावी, स्त्री संभोगाची इच्छा कायम असावी, सुंदर स्त्री भेटावी, धन-दौलत असावी व दान करण्याची सवय असावी. ही सगळी सुख एखाद्याच भाग्यवंताला मिळतात. पूर्व-जन्मीच्या पुण्याईमुळेच असे सौभाग्य लाभते.

हे नेहमी पाहण्यात येते की ज्या माणसांजवळ खाण्या-पिण्याची काही कमी नाही त्यांच्यापाशी ते खाऊन पचन करण्याची शक्ती नसते. यालाच म्हणतो की ‘जिथे दात आहेत तिथे

चणे नाहीत’ आणि ‘जिथे चणे आहेत तिथे दात नाहीत.’ अर्थात अत्यंत श्रीमंत व्यक्तीसुद्धा अशा आजारांनी ग्रस्त असतात की त्यांना साधे पदार्थ सुद्धा पचत नाहीत. पण ज्या व्यक्ती धुष्ट-पुष्ट आहेत, दणकट आहेत, ज्यांची पचनशक्ती चांगली आहे त्यांच्याजवळ खाण्यासाठी काही नसते. याच प्रकारे अनेक लोकांजवळ धन-दौलत आहे, वैभवात कमतरता नाही. पण या त्यांच्यामध्ये उपभोग घेण्याची व दान धर्माची वृत्ती नसते. ज्या लोकांजवळ या गोष्टी असतात तशांना आचार्य चाणक्य पूर्वजन्माच्या तपस्येचे फळ मानतात. त्यांचे म्हणणे आहे की खाण्या पिण्याच्या वस्तुबरोबरच त्या पचविण्याची शक्ती, सुंदर स्त्री सोबत संभोगाची शक्ती आणि संपत्तीचा सदुपयोग आणि दान धर्माची वृत्ती ज्या व्यक्तीमध्ये असते ते अत्यंत भाग्यशाली असतात. याला पूर्वजन्मीचे पुण्यच मानावे.

## जीवन-सुखातच स्वर्ग आहे-

यस्य पुत्रो वशीभूतो भार्या छन्दानुगामिनी।
विभवे यस्य सन्तुष्टिस्तस्य स्वर्ग इहैव हि ।। **3** ।।

आचार्य चाणक्याचे सांगणे आहे की ज्याचा पुत्र अंकीत आहे, पत्नी वेद मार्गनुसार वागते आणि जो आपल्या वैभवामुळे संतुष्ट आहे, त्याच्यासाठी येथे स्वर्ग आहे.

अर्थ असा की ज्या मनुष्याचा पुत्र आज्ञाधारक आहे, सर्व आज्ञा मानतो, पत्नी धार्मिक व चांगल्या चलनाची असते, सद्गृहिणी असते आणि जो आपल्याजवळ जेवढी संपत्ती आहे, त्यात आनंदी राहतो, संतोष मानतो अशा व्यक्तीला याच संसारात स्वर्ग: सुख प्राप्त होते. त्याच्यासाठी पृथ्वीवरच स्वर्ग असतो.

कारण पुत्राचे आज्ञाधारक असणे, स्त्रीचे पतीव्रता असणे आणि व्यक्तीचे संपत्तीविषयी लालसा न ठेवणे किंवा मनाचे समाधान करण्यातच स्वर्गात मिळणाऱ्या सुखाचे समाधान आहे. असं मानतात की अनंत शुभ व पुण्य कार्यामुळे स्वर्ग प्राप्त होतो. याचप्रकारे या जगात हे तीन सुख मनुष्याला पुण्य कर्माचे फळरूपात मिळतात. ज्या व्यक्तीला हे तीन सुख प्राप्त होतात, त्याला फार भाग्यशाली समजावे.

## सार्थकतेतच संबंधाचे सुख-

ते पुत्रा ये पितुर्भक्ता: स: पिता यस्तु पोषक:।
तन्मित्रम् यत्र विश्वास: सा भार्या या निवृति: ।। **4** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की पुत्रतोच जो पितृभक्त आहे. पिता तोच जो पोषणकर्ता आहे, मित्र तो जो विश्वासपात्र आहे. जी मन प्रसन्न करते तीच पत्नी.

म्हणजे वडीलांची आज्ञापालन करणारा, सेवा करणाराच पुत्र म्हटला जातो. आपल्या संततीचे योग्य पालन-पोषण करणारा, त्यांना योग्य शिक्षण देऊन चांगला घडविणारा मनुष्यच खऱ्या अर्थाने पिता असतो. ज्याच्यावर विश्वास आहे, जो विश्वासघात करणार नाही, तोच खरा मित्र असतो. पतीला दु:खी न करणारी, नेहमी त्याच्या सुखाकडे लक्ष देणारीच पत्नी समजली जाते.

अर्थ असा की या जगात अनेक प्रकारचे संबंध आहेत पण निकटच्या संबंधाच्या रूपात वडील, मुलगा, आई अणि पत्नीच समजले जातात. त्यामुळे सांगता येईल की संतती तीच जी आई-वडीलांची सेवा करते नाहीतर ती व्यर्थ आहे. याच प्रकारे आपली संतती व आपल्या कुटुंबाचे पालन-पोषण करणारी व्यक्तीच वडील मानल्या जातात आणि मित्रसुद्धा अशा व्यक्तीला मानले जाते, ज्याच्यावर कधीच, कोणत्याही प्रकारे अविश्वास दाखविता येत नाही. जी नेहमी विश्वासु आहे आपल्या सदाचरणाने पतीला सुख देते तीच खऱ्या अर्थाने पत्नी होय. याचा अर्थ असा की नाव आणि संबंध निमित्ताने एकमेकाशी जोडून राहण्यात कांही अर्थ नाही. संबंधांची वास्तविकता तोपर्यंत आहे जोपर्यंत सगळे आपल्या कर्तव्याचे पालन करून एक-दुसऱ्याला सुखी करण्याचे प्रयत्न करतील आणि संबंधांची वास्तविकतेचे नेहमी पालन करतील.

## कपटी मित्राचा त्याग करा-

परीक्षे कार्यहन्तारं प्रत्यक्षे प्रियवादिनम्।
वर्जयेत्तादृशं मित्र विषकुम्भं पयोमुखम् ।। **5** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की पाठीमागून कामात विघ्न आणणारे व समोर गोड बोलवारे मित्र तोंडावर विष ठेवलेल्या विषाच्या घागरीसारखे त्यागावेत.

अर्थ असा आहे की विषाने भरलेल्या घागरीवर जर थोडेही दूध टाकले तरीही ती विषाचीच घागर समजली जाते. या प्रकारे तोंडावर गोड-गोड बोलणारा व पाठीमागून काम बिघडवणारा मित्र या विषाच्या घागरीसारखा असतो. विषाच्या घागरीला कोणतीही व्यक्ती स्वीकारीत नाही. त्यासाठी अशा मित्रांचा त्याग करणेच योग्य आहे. सत्य तर हे आहे की अशा व्यक्तीला मित्र समजताच येणार नाही. त्यांना शत्रुच समजले पाहिजे.

न विश्वसेत्कुमित्रे च मित्रे चापि न विश्वसेत्।
कदाचित्कुपितं मित्रं सर्वं गुह्यं प्रकाशयेत् ।। **6** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की वाईट मित्रांचा विश्वास करू नये आणि मित्रावरही विश्वास ठेऊ नये. रूष्ट झालेला मित्र आपली गुह्य सर्वांना सांगू शकतो.

अर्थ हा आहे की दुष्ट-चहाडखोर मित्राचा चुकूनही भरवसा करू नये. तो अगदी लंगोटी-यार असला तरी, त्याला आपले रहस्य सांगू नये. शक्यता असते की तो आपल्यावर नाराज झाला तर आपला रहस्यभेद करू शकतो. याचा आपल्याला पश्चात्ताप होऊ शकतो कारण आपले रहस्य जाणून घेऊन तो मित्र स्वतःच आपल्या गुप्त बाबी उघड्या करण्याची धमकी देऊन आपल्याला अनिष्ट काम करण्यासाठी विवश करू शकतो. म्हणून आचार्य चाणक्याला खात्री आहे की ज्याला आपण उत्तम मित्र मानतो त्यालासुद्धा आपली गुह्ये सांगू नयेत. कांही गोष्टी गुप्त ठेवणे आवश्यक आहेत.

## मनातील भावना गुप्तच ठेवा-

मनसा चिन्तितं कार्यं वाचा नैव प्रकाशयेत्।

मन्त्रेण रक्षयेद् गूढं कार्य चाऽ पि नियोजयेत् ।। **7** ।।

आचार्य चाणक्याचे सांगणे आहे की मनी कल्पना केलेले काम तोंडाने सांगू नयेत. मंत्र्याासारखे गुप्त होऊन त्याचे रक्षण करावे. गुप्त ठेवूनच ते काम करावे.

अर्थ असा आहे की मनात जे काम करण्याचा विचार आहे, ते मनातच ठेवा, कोणालाही सांगू नये. मंत्र्याप्रमाणे गुप्त ठेवून चुपचाप काम सुरू करावे. जेव्हा काम चालू आहे, तेव्हाही त्याची दवंडी देऊ नये. जाहिरात करून काम झाले नाही तर हसे मात्र होईल. एखादा शत्रु काम बिघाडू शकतो. काम पूर्ण झाल्यानंतर सर्वांनाचा माहित होते. कारण मनोविज्ञानाचा नियम आहे की आपण ज्या कामासाठी जास्त चिंतन-मनन कराल आणि चुपचाप त्याचे कार्यरूपात परिवर्तन कराल त्यात यश प्राप्त करण्याची संधी निश्चित मिळेल. यासाठी आचार्याचे सांगणे आहे की मनात योजलेली गोष्ट किंवा काम, योजना कार्यांच्या रूपात आणण्यापूर्वी प्रकट करू नये यातच सभ्यजनांची भलाई आहे.

## परस्वाधीनता-

कष्टं च खलु मूर्खत्वं च कष्ट च खलु यौवनम्।
कष्टात्कष्टतरं चैव परगे हनिवासनम्।। **8** ।।

आचार्याचे सांगणे आहे की मुर्खपणा हे दुःख आहे, तारूण्य सुद्धा दुःख आहे, परंतु दुसऱ्याच्या घरी राहणे हे दुःखाचे सुद्धा दुःख आहे.

वास्तविक मुर्खपणा हेच हुःख आहे आणि तारूण्यसुद्धा व्यक्तीला दुःखी करते. ईच्छा पूर्ण झाल्या नाहीत तरी दुःख आणि एखादे बरे-वाईट काम झाले तरी दुःख. या दुःखापेक्षा मोठे दुःख म्हणजे परक्या घरात राहण्याचे दुःख. परक्या घरी माणूस ना तर स्वाभिमानाने राहू शकतो, ना तर आपल्या इच्छेने काही काम करू शकतो. कारण मुख व्यक्तीला इष्ट-अनिष्टाचे ज्ञान नसल्यामुळे नेहमी दुःख सहन करावे लागते. यामुळे मुर्ख असणे हाच एक मोठा शाप आहे असं म्हणतात. कोणती गोष्ट ईष्ट आहे आणि कोणती अनिष्ट आहे हे जाणणे जीवनासाठी आवश्यक असते. या तऱ्हेने तारूण्य वाईटांचा पाया आहे असे म्हटले गेले आहे की तारूण्य अंध आणि वेडे असते. तारूण्यात व्यक्ती कामाच्या आवेगात बुद्धी घालवून बसतो, त्याला स्वतःच्या शक्तीचा गर्व होतो. त्याच्यामध्ये एवढा अहंपणा येतो की तो स्वतःपेक्षा दुसऱ्याला कमी लेखतो. तारूण्य मनुष्याला फक्त विवेकशुन्यच नाही तर निर्लज्ज बनविते, ज्यामुळे मनुष्याला अनेक दुःख भोगावे लागतात. अशामध्ये व्यक्तीला जर दुसऱ्याच्या घरात राहावे लागले तर त्याला दुसऱ्याच्या दया, कीवेमूळे त्याच्या घरातील रीतीचे पालन करूनच राहावे लागेल. या तऱ्हेने तो स्वतःचे स्वातंत्र्य हरवून बसतो. त्यामुळेच म्हणतात “पराधीन सपनेहु सुख नाही.” यासाठीच यावर विचार करणे आवश्यक आहे. केला पाहिजे.

## साधु पुरुष-

शैले शैल न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे।
साधवो हि सर्वत्र चन्दनं व वने बने।। **9** ।।

आचार्य चाणक्याने म्हटले आहे की ना प्रत्येक पर्वतावर मोती-माणिक प्राप्त होतात ना प्रत्येक हत्तीच्या मस्तकापासून मोती प्राप्त होत नाही. विश्वामध्ये माणसांची कमी नसून सुद्धा साधुपुरुष सर्व ठिकाणी भेटत नाहीत. यात पद्धतीने सर्वच जंगलात चंदन-वृक्ष उपलब्ध होत नाहीत.

येथे असे अभिप्रेत आहे की बऱ्याच पर्वतावर मोती-माणिक प्राप्त होतात, पण सर्वच पर्वतावर नसतात. असं मानतात की काही हत्ती असे असतात की ज्यांच्या मस्तकात मोती असतो, परंतु असं सर्वच हत्तींबाबतीत नसतं. या पद्धती प्रमाणे सृष्टीतील पर्वत आणि जंगलांची संख्या कमी नाही. पण सर्वच वनामध्ये चंदन प्राप्त होत नाही. तसेच सर्वच स्थानी साधुपुरुष दिसत नाहीत.

साधु शब्द आचार्य चाणक्याला येथे सज्जन असा अभिप्रेत आहे. अशी व्यक्ती जी दुसऱ्यांचे विस्कळीत काम करते, जी स्वतःच्या मनाला निवृतीकडे प्रकृत करते व निःस्वार्थ भावनेने समाज कल्याणाची ईच्छा करते. साधु याचा अर्थ फक्त भगवे वस्त्र धारण करणारा बनावट साधु व्यक्तीच नाही. येथे याचा संदर्भ आदर्श, समाजसेवी व्यक्तीचा आहे. पण अशी आदर्श माणसं सर्व जागी कोठे भेटतात. ते तर दुर्मिळच असतात. जेथे असतील तेथे त्यांचा योग्य आदर-सत्कार केला पाहिजे.

## पुत्रासाठी कर्तव्य-

**पुनश्च विविधैः शीलैर्नियोज्या सततं बुधैः।**
**नीतिज्ञा शीलसम्पन्नाः भवन्ति कुलपूजिताः।। 10 ।।**

आचार्य चाणक्य येथे पुत्राच्या संबंधात उपदेश करताना म्हणतात की बुद्धिमान लोकांचे कर्तव्य आहे की मुलाला नेहमी अनेक प्रकारे सदाचाराचे शिक्षण द्यावे. नीति-पुण सदाचारी पुत्राचीच कुळात पुजा होते. अर्थात वडीलांचे सर्वात मोठे कर्तव्य आहे की मुलाला चांगले शिक्षण द्यावे. शिक्षण फक्त शाळेतच नसते. सदाचरणाचे, व्यवहाराचे शिक्षण देणे पित्याचे परम कर्तत्य आहे. चांगल्या आचरणाचे पुत्र आपल्या कुळाचे नाव उज्वल करतात. नीतिमंत आणि शील संपन्न मुलगाच कुळात मान मिळवतो.

नेते सांगतात आजचे तरूणच उद्याचे नागरिक आहेत. तेच देशाचे भविष्य आहेत तर त्यांचे योग्य भविष्य घडविण्याच्या दिशेने योग्य पाऊल उचलणे आई-वडील, समाजाचे कर्तव्य आहे.

माता शत्रु: पिता वैरी येनवालो न पाठितः।
न शोभते सभामध्ये हंसमध्ये वको यथा ।। **11** ।।

येथे आचार्य चाणक्य संततीच्या शिक्षणाविषयी आई-वडीलांच्या कर्तव्याचा उपदेश करताना सांगतात की मुलांना न शिकविणारी आई शत्रु व वडील वैऱ्यासमान असतात. अशिक्षित व्यक्ती सुशिक्षित लोकांमध्ये हंसांमध्ये कावळ्या प्रमाणे शोभत नाही.

अभिप्रेत असे आहे की जी स्थिती हंसामध्ये आल्यानंतर कावळ्याची होते अगदी तशी स्थिती शिकल्या-सवरल्या लोकांमध्ये आल्यानंतर अशिक्षित व्यक्तीची होते. यासाठी मुलांना शिक्षण न देणाऱ्या आई-वडीलांना शत्रु समजावे. या संबंधी आचार्य चाणक्य मानतात की संपत्तीच नाही

तर शिक्षणसुद्धा मनुष्याला आदरणीय करते आणि शिक्षण नसलेली व्यक्ती बिनशेपटाच्या शिंगवाल्या पशुसमान असते.

लालनाद् बहवो दोषास्ताडनाद् बहवो गुण:।
तस्मात्पुत्रं च शिष्यं च ताडयेन्न तु लालयेत्।। **12** ।।

आचार्य चाणक्य बालकाच्या लालन-पालन, लाड-कौतुक-प्रेमाच्या संदर्भात त्याचे प्रमाण आणि तत्वाविषयी उपदेश करताना सांगतात की अति लाडामुळे अनेक दोष व शिक्षा केल्याने गुण निर्माण होतात. यासाठी मुलगा आणि शिष्याला लाडाची नाही शिक्षेची गरज असते.

येथे असे अभिप्रेत आहे की अधिक लाड कौतुक केले तर मुले बिघडतात. त्यांच्याबरोबर कठोर वागले तर त्यांच्यामध्ये सुधारणा होते. यासाठी मुले आणि शिष्य यांचे अधिक लाड करू नयेत. त्यांच्याशी कठोर पद्धतीनेच वागले पाहिजे.

यासाठी चाणक्याचा सल्ला आहे की आई-वडील अथवा गुरूने आपला पुत्र या शिष्य यांच्या या गोष्टीकडे लक्ष ठेवले पाहिजे की त्यांना कोणतीही वाईट सवय लागू नये. यापासून वाचविण्यासाठी त्यांना शिक्षा करणे आवश्यक आह, तर मुलगा गुणाकडे आकर्षित होईल आणि दोष अंगीकारण्यापासून दूर राहील.

स्वाध्याय-

श्लोकेन वा तदर्द्धेन तदर्द्धाऽ र्द्धाक्षरेण व।
अबन्ध्यं दिवस कुर्याद् दानाध्ययनकर्मर्भि ।। **13** ।।

आचार्य अभ्यासाच्या महत्वाचे प्रतिपादन करताना म्हणतात मनुष्याने एका श्लोकाचे किंवा त्याचा अर्धा किंवा पाव श्लोक किंवा एखाद्या तरी शब्दाचा खरा अभ्यास करावा. मनन, अध्ययन, दान आदी कार्य करून दिवसाचे सार्थक करावे.

येथे अभिप्रेत आहे की कमीत कमी जेवढे शक्य होईल तेवढे मनुष्याने आपल्या कल्याणासाठी मनन करणे आवश्यक आहे. मनन करणे, अध्ययन करणे आणि लोकांना मदत करणे हे मानवी जीवनातील अनिवार्य कर्तव्य आहे. हे केल्यानेच जीवनाचे सार्थक होते. कारण मानव जीवन अमूल्य आहे. त्याचा एक-एक दिवस, एक-एक क्षण अमूल्य आहे, तो सफल करण्यासाठी स्वाध्याय, चिंतन-मनन आणि दान इत्यादी सत्कर्म करीत राहावे. हाच जीवनाचा नियम केला तर तो सर्वोत्तम आहे.

आसक्ती विष आहे-

कान्तावियोग स्वजनापमानो
ऋणस्य शेष: कुनृपस्य सेवा।
दरिद्रभावो विषया सभा च
विनाग्निमेते प्रदहन्ति कामय्।। **14** ।।

आचार्य जीवनातील त्याज्य स्थितींचा विचार करताना व्यक्तीला उपदेश करतात म्हणतात

की पत्नीचा वियोग, स्वजनाकरून अपमान होणे, कर्ज न फेडता येणे, दुष्ट राजाची सेवा, दारिद्रय आणि धूर्त लोकांची सभा या गोष्टी विना अग्नी शरीराला जाळून टाकतात.

आचार्यांना येथे अभिप्रेत आहे की एक आग सर्वांना दिसते, ही बाह्य आग आहे. पण जी एक आग मनुष्याला आतल्या आत जाळते ती कुणीही पाहू शकत नाही. पत्नीवर अत्यंत प्रेम आहे परंतु तिची ताटातूट झाली तर, कुटुंबीयांची कोठे मानहानी झाली तर, कर्जाची परतफेड करणे अशक्य झाले तर, दुष्ट राजाची चाकरी करावी लागली तर, गरीबीपासून सुटका नाही झाली तर, दुष्ट लोक एकत्र येऊन सभा करत असतील तर, अशा विवश स्थितीत अगतिक मनुष्य आतल्या आत जळत राहतो. त्याचा तडफडाट कोणी ही पाहू शकत नाही. ही अशी न दिसणारी आग आहे.

## विनाशाचे कारण-

नदीतीरे च ये वृक्षाः परगेहेषु कामिनी।
मन्त्रिहीनाश्च राजान: शीघ्रं नश्यन्त्संशयम् ।। **15** ।।

नीति वचन क्रमात आचार्य चाणक्य उपदेश करतात की वेगवान प्रवाहाच्या नदी किनाऱ्यावर उगवणारे वृक्ष, दुसऱ्याच्या घरात राहणारी स्त्री, मंत्री नसणारा राजा हे सर्व शीघ्र गतीने नष्ट होतात.

अर्थ हा आहे की प्रवाह अनिश्चित असल्यामुळे किनाऱ्यावर उगवणारे वृक्ष शीघ्र नष्ट होतात. कारण ती भूमी वृक्षांचे वजन सहन करू शकत नाही. आणि त्यांची मूळ उखडू लागतात. या प्रकारे दुसऱ्याच्या घरी गेलेली स्त्रीसुद्धा चारीत्र्याच्या दृष्टीने सुरक्षित राहू शकत नाही. तीचे पावित्र्य शंकास्पद होते. या संदर्भात एका नीतितज्ज्ञाने सांगितले आहे की,

'लेखनी पुस्तिका दारा: परहस्ते गता गाताः।
आगता दैवयोगेन नष्ट भ्रष्टा च मर्दिता।'

लेखणी (पेन), पुस्तक आणि स्त्री दुसऱ्याच्या हातात गेली तर ते हरवले असेच समजा, जर दैवयोगाने परत वापस आले तर त्यांची दशा नष्ट, भ्रष्ट आणि चोळामोळा, चुरगळलेल्या (विछिन्न) स्वरूपात असते.

याच पद्धतीने राजाचा शक्ती स्थान मंत्री असतो. मंत्री राजाला सन्मार्ग आचरण्यास व कुमार्ग टाळण्यास प्रवृत्त करतो. तो नसणे राजासाठी घातक असते. यामुळे राजाजवळ मंत्री असणे आवश्यक असते.

## व्यक्तीचे बळ-

बलं विद्या चा विप्राणां राज्ञः सैन्यं बलं तथा।
बलं वित्तं व वैश्यानां शुद्राणां च कनिष्ठता ।। **16** ।।

आचार्य चाणक्याचे कथन आहे की विद्याच ब्राह्मणांची शक्ती आहे. राजाची शक्ती सैन्य आहे. वैश्याची शक्ती धन आणि सेवा करणे क्षुद्रांचे बळ आहे.

म्हणजेच ज्ञान-विद्याच ब्राह्मणांची शक्ती मानली गेली आहे. अध्ययन-स्वाध्याय हेच त्याचे कार्यक्षेत्र आहे व त्यातच त्याने प्राविण्य मिळविळे पाहिजे तरच तो आदरास पात्र होईल. राजाचे बळ, त्याची शक्ती असते ती त्याच्ये सैन्य. त्याच शक्तीच्या बळावर तो राज्याच्या सीमा सुरक्षित ठेवतो. याच तऱ्हेने संपत्ती वैश्यांचे आणि सेवा करणे क्षुद्रांचे बळ आहे. हेच त्यांच्या कार्यक्षेत्राचे वैशिष्ट्य आहे.

## जगाची रीत-

निर्धनं पुरूषं वेश्यां प्रजा भग्नं नृपं त्यजेत्।
खगाः वीतफलं वृक्षं चाभ्यागतो गृहम् ।। **17** ।।

आचार्य चाणक्य येथे वस्तु मिळाल्यानंतर तीच्या उपयोगाच्या ऱ्हासाचे नियम लागू करून म्हणतात हा सृष्टीचा नियम आहे की पुरुष निर्धन झाल्यावर वेश्या पुरुषाचा त्याग करते. प्रजा शक्तीहीन राजाचा व पक्षी फळहीन वृक्षाचा त्याग करतात. या रीतीने जेवण केल्यानंतर अतिथी घर सोडून जातो.

येथे हे अभिप्रेत आहे की वेश्या आपल्या जुन्या ग्राहकाला तो गरीबीत आल्यानंतर सोडून देते. वाईटकाळात राजा शक्तीहीन झाला तर त्याची प्रजा त्याचा त्याग करते. वृक्षाची फळे संपल्यानंतर पक्षी त्या वृक्षाचा त्याग करतात. जेवणाच्या अपेक्षेने घरी आलेला अतिथी जेवणानंतर घर सोडून जातो. आपले काम होईपर्यंतच लोक संबंध ठेवतात. हाच सृष्टीचा संकेत येथे आहे की उपयोगानंतर वस्तु निकामी होते.

या संदर्भात आचार्य चाणक्यांनी कांही उदाहरणांद्वारे व्यक्तीच्या कर्तव्य-पालनावर भर दिला आहे. संपत्तीमुळे वेश्या ज्याला आपला प्रेमी म्हणते, निर्धन झाल्यावर त्याच्याकडे पाठ फिरविते. मानहीन राजाला प्रजा त्यागते आणि वठलेल्या वृक्षाला पक्षी त्यागतात. भोजनानंतर गृहस्थाला आशीर्वाद देऊन घर सोडून जावे हे अतिथीचे कर्तव्य आहे. तेथे मुक्काम करण्याचा त्याने विचारही करू नये. नाहीतर असे होईल की गृहस्थाला संकोच दूर सारून अतिथीला जाण्यास सांगणे भाग पडेल.

त्याला हे समजले पाहिजे की भोजन झाल्यावर स्वतःच जाण्याची परवानगी मागण्यात सन्मान आहे आणि हेच योग्य आहे.

गृहीत्वा दक्षिणां विप्रास्त्यजन्ति यजमानकम्।
प्राप्तीविद्या गरुं शिष्य दग्धारण्यं मृगस्तथा ।। **18** ।।

आचार्य चाणक्य जगरीतीची चर्चा करताना सांगतात की दक्षिणा घेतल्यानंतर ब्राह्मण यजमानाला सोडून देतात, विद्याप्राप्तीनंतर शिष्य गुरूला सोडून देतात आणि वणवा पेटल्यानंतर पशू वनाचा त्याग करतात.

म्हणजेच ब्राह्मण दक्षिणा घेईपर्यंतच यजमानाजवळ राहतो. दक्षिणा मिळाल्यानंतर तो यजमानाला सोडून जातो व दुसरीकडचा विचार करू लागतो. शिष्य शिक्षण होईपर्यंतच गुरूजवळ राहतो विद्या प्राप्त केल्यानंतर ते गुरुला सोडून जातात व जीवनकार्याचा विचार करीत पुढील योजनांच्या कामाला लागतात. हरीण आदी पशु वनात ते हिरवे आहे तोपर्यंतच राहतात.

जर वनात आग लागली तर पक्षी तेथे राहण्याची सुट्टी संपली असे समजून अंत्यत्र डेरा टाकायचा विचार करून निघून जातात वा उडून जातात. व्यक्ती कोणाच्या तरी आश्रयाला तोपर्यंत राहतो जोपर्यंत त्याला आपले ध्येय पूर्ण होताना दिसते. ध्येय पूर्ण झाल्यानंतर उपयोगिता संपल्याचा नियम लागू पडतो.

## दुष्कृत्त्यापासून सावध रहा-

> दुराचारी च दुर्दृष्टिर्दुरा**ऽऽ** वासी च दुर्जन:।
> यंमैत्री क्रियते पुम्भिर्नर: शीघ्र विनश्यति।। **19** ।।

आचार्य चाणक्य दुष्कृत्त्याच्या परिणामाप्रती सावध करताना म्हणतात दुराचारी, दुष्ट स्वभावाचा, विनाकारण दुसऱ्यांची हानी करणारा आणि दुष्ट व्यक्तीबरोबर मैत्री ठेवणारा श्रेष्ठ मनुष्य सुद्धा शीघ्र नष्ट होतो. कारण संगतीचा प्रभाव पडल्याशिवाय राहत नाही.

"खरबूज पाहून खरबूज रंग बदलतो" ही म्हणतर प्रसिद्ध आहे. जर एखादा मनुष्य दुष्ट लोकांसोबत राहात असेल तर त्यांच्या संगतीचा प्रभाव त्या मनुष्यावर नक्की पडेल. दुष्टा सोबत राहणारा मनुष्य नक्कीच दु:खी होतो हीच गोष्ट लक्षात घेऊन तुलसीदाससुद्धा म्हणतात "दुर्जनसंग न देह विधाता। इससे भलो नरक का वासा।" म्हणून मनुष्याने कुसंगती टाळावी.

## मैत्री बरोबरच्यांशी:-

> समाने शोभते प्रीती राज्ञि सेवा च शोभते।
> वाणिज्यं व्यवहारेषु स्त्री दिव्य शोभते गृहे।। **20** ।।

आचार्य मैत्री आणि व्यवहारात समपातळीवरच शोभाणाऱ्या तत्वाचे प्रतिपादन करताना म्हणतात की समपातळीवरच्या लोकांमध्येच मैत्री शोभते. राजाची केळेली सेवा शोभून दिसते. वैश्यांना व्यापार करणे शोभते. शुभ स्त्री घराची शोभा आहे.

अभिप्रेत हे आहे की मैत्री बरोबरच्यांशीच करावी. सेवा राजाचीच करावी. असं करण्यातच त्या कार्यांची शोभा आहे वैश्यांची शोभा व्यापार करण्यात आहे. घराची शोभा शुभ लक्षणयुक्त पत्नी आहे कारण असे म्हणतात की "जाही का काम वाही को साजे, और करे तो डण्डा बाजे" म्हणजेज ज्याचे काम त्यानेच करावे तर चांगले नाही तर, परिणाम चांगला होत नाही.

# तिसरा अध्याय

## दोष कोठे नसतो?

कस्य दोषः कुले नास्ति व्याधिना को न पीडित:।
व्यसनं केन न प्राप्तं कस्य सौख्यं निरन्तरम्।। **1** ।।

आचार्य चाणक्याचे कथन आहे की दोष कोठे नाही? या अर्थाने त्यांचे सांगणे आहे की कोणाच्या कुळात दोष नसतो? रोग कोणाला दुःखी करीत नाहीत? दुःख कोणाला नसते आणि निरंतर सुखी कोण राहतो? प्रत्येक जागी कांही न काही कमी आहे हे एक कटु सत्य आहे. जगात अशी एकही व्यक्ती नाही जी कधी आजारी झाली नाही आणि जीला कधीच दुःख झाले नाही किंवा सदा सर्वदा सुखी राहिली आहे. तर मग संकोच आणि दुःख कुठल्या गोष्टीचे?

यासाठी व्यक्तीने आपल्या त्रुटींची अधिक चिंता करू नये. उलट त्रुटी असताना सुद्धा आचरणाकडे लक्ष देऊन ते अन्य मानवी कुणांनी संपन्न करावे. ज्यामुळे व्यक्तिमत्वाला पूर्णता प्राप्त होऊ शकेल. कारण निरंतर सुख तर संसारात कोणलाही प्राप्त होत नाही. आज दुःख आहे तर उद्या सुख सुद्धा आहे. आज सुख आहे तर उद्या दुःख पण आहे. हीच जगरीती आहे.

## लक्षणावरून आचरण कळतेः-

आचारः कुलमाख्याति देशभाख्याति भाषाणम्।
सम्भ्रम: स्नेहमाख्यति व पुराख्याति भोजनम्।। **2** ।।

लक्षणावरून मिळणाऱ्या संकेताची चर्चा करताना आचार्य चाणक्य म्हणतात की आचरणामुळे मनुष्याच्या कुळाचा परिचय होतो. भाषेमुळे देशाचा पत्ता लागतो. आदर-सत्कारामुळे प्रेमाचा आणि शरीर पाहून मनुष्याच्या जेवणाचा परिचय होता.

अभिप्रेत असे आहे की उच्च कुळाचा मनुष्य शालीन असेल व शांत आणि चांगल्या स्वभावाचा असेल हे मानले जाईल व नीच वंशाचा मनुष्य उद्धट, गप्पीष्ट आणि मान मर्यादाचे भान न ठेवणारा असेल. या बाबींशी तर बहुतेक सर्वलोक परिचीत आहेत की व्यक्ती आपली भाषा आणि उच्चार यावरून ओळखला जातो की तो कोणत्या प्रदेशात राहणारा आहे. तसं पाहता भाषा थोड्या-थोड्या अंतरावर थोडीशी बदलते. पण जरा मोठ्या क्षेत्रत मुख्य सुर एकच असतो. बोलाचालीची मूळ भाषा एकसारखी असते. त्यामुळे मनुष्य कोठे राहणारा आहे हे ओळखण्यात अडचण येत नाही. याच प्रकारे व्यक्तीच्या हाव-भाव आणि क्रियातून त्याच्या मनातील विचारांचा पत्ता लागतो, की त्याचा स्नेह, आचरण खरे आहे की दिखाऊ. कारण मनुष्य मनातील भावना अनुरूप कार्य करतो. मनातील भावनांचे प्रतिबिंब त्याच्या कार्यात अवश्य दिसते. त्याच्या व्यवहारातूनच कळते की त्याचा लोभ खरा आहे की दिखाऊ. कोणताही मनुष्य आपल्या भावना अधिक वेळ लपवून ठेवू शकत नाही. आचार्य चाणक्याचे कथन हेच आहे की

व्यक्तीचा देह पाहून त्याच्या आहाराचा अंदाज करता येतो. चाणक्याने येथे सामान्यता लागू पडणारे नियमच सांगितले आहेत आणि हे संकेत व्यक्तीच्या सामान्य आत्मदर्शनातच मिळते.

## व्यवहार कुशल व्हा:-

सकुले योजयेत्कन्य पुत्रं पुत्रं विद्यासु योजयेत्।
व्यसने योजयेच्छत्रुं मित्रं धर्मे नियोजयेत्।। **3** ।।

व्यवहारिकतेची चर्चा करताना आचार्य चाणक्य म्हणतात की कन्येचा विवाह एखाद्या चांगल्या घरात केला पाहिजे, मुलाला शिकविले पाहिजे, मित्राला चांगल्या कार्यात व शत्रुला वाईटपणा लावला पाहिजे. हाच व्यवहार आहे आणि काळाची मागणी सुद्धा.

अर्थात कुशल व्यक्ती तीच आहे जी मुलगी उपवर झाली की तीचा विवाह पाहून-पारखून चांगल्या खानदानात करते व पुत्राला जास्तीत जास्त शिक्षण देते. म्हणजे तो त्याच्या उपजीविकेच्या दृष्टीने स्वावलंबी होऊ शकेल. मित्राला मेहनत-कष्ट, ईमानदारीची शिकवण देईल म्हणजे चांगल्या सल्ल्याने वो आपले जीवन सुधारेल. एखाद्या चांगल्या कामाला लागेल. परंतु वैऱ्याला वाईट सवयींची शिकार बनवू दे म्हणजे तो त्यात गुंतून जाईल व परेशान करणार नाही.

## दुष्टापासून सावध रहा-

दुर्जनेष च सर्पेषु वरं सर्पों न दुर्जन:।
सर्पो दंशजि कालेन दुर्जनस्तु पद-पदे।। **4** ।।

दुष्टतेची तुलना करताना आचार्य त्या पक्षाला ठेवत आहेत जेथे दुष्टतेचा दुष्प्रभाव कमीत कमी पडेल. ते माननात की दुष्ट आणि साप या दोघात साप चांगला म्हणावा पण दुष्ट नाही. साप एकदाच चावतो पण दुष्ट मात्र पावला-पावलावर चावतो, म्हणून दुष्टापासून सावध राहिले पाहिजे.

येथे हे अभिप्रेत आहे की तर विचारले की साप आणि दुष्ट यापैकी चांगला कोण? तर त्याचे उत्तर आहे दुष्टापेक्षा साप हजारपट चांगला, कारण साप कधीतरीच एखाद्याला विशेष कारणानेच चावतो, परंतु दुष्ट मनुष्य तर पावला-पावलावर चावत असतो. केव्हा काय करेल याबाबत दुष्टाचा कांही विश्वास नाही. हे सत्य आहे की साप तेव्हाच चावतो जेव्हा त्याच्यावर पाय पडतो किंवा कांही कारणांनी तो घाबरला तर पण दुष्ट मात्र अकारण दु:ख पोहोचविण्याचे प्रयत्न करतो.

## संगत चांगल्याची करावी:-

एतदर्थ कुलीनानां नृपाः कुर्वन्ति संग्रहम।
आदिमध्यावसानेषु न त्यजन्ति च ते नृपम्।। **5** ।।

येथे आचार्य चाणक्य कुलीनतेचे वैशिष्ट्य सांगताना म्हणतात कुलवंत लोक सुरूवात ते शेवटपर्यंत सोबत सोडत नाहीत. ते वास्तवात संगतीचा धर्म निभावतात. यामुळे राजा कुलवंतांचा संग्रह करतो म्हणजे वेळोवेळी चांगला सल्ला मिळू शकतो.

अभिप्रेत असे आहे की चांगल्या खानदानी व्यक्ती ज्यांच्याशी मैत्री करतात ती जीवनभर निभावतात. आरंभापासून ते अंतापर्यंत सुख-दुःखाच्या स्थितीत कधीच संगत सोडत नाहीत. यासाठी राजे अशा कुळवंताना स्वःतजवळ ठेवीत असे. राजे आणि राजपुरुष महत्वाच्या आणि विशिष्ट राजकीय सेवामध्ये कुळवंत पुरुषांची नेमणूक त्यांच्या उच्च संस्कार आणि परंपरागत शिक्षण व गुरूविद्येमुळे करीत होते. ते कधी नीच किंवा क्षुद्र युक्ती वापरून स्वतःच्या मालकाबरोबर कपट किंवा फसवणूक करीत नसत.

## सज्जनांचा सन्मान करा:-

प्रलये भिन्नमर्यादा भवन्ति किल सागराः।
सागरा भेदमिच्छन्ति प्रलयेऽ पि न सावधः।।**6** ।।

परिस्थितीमुळे आलेल्या आचरणात परिवर्तनच्या स्तरावर आणि स्थितीला वश करणाऱ्या धीर गंभीर मनुष्याची थोरवी सांगताना आचार्य चाणक्य म्हणतात की समुद्राच्या तुलनेत धीर-गंभीर पुरुषाला श्रेष्ठ मानावे कारण ज्या समुद्राला लोक एवढे गंभीर समजतात तो प्रलय आला तर आपली मर्यादा विसरतो आणि किनारा सोडून पाणी आणि भूमी एकच करून टाकतो, परंतू साधु अथवा श्रेष्ठ व्यक्ती संकटाचा पहाड कोळसून अंगावर पडला तरी थोर मर्यादेचे उल्लंघन करीत नाहीत. म्हणून साधु पुरुष सागरापेक्षा महान असतो. तसे पाहिले तर मर्यादापालनासाठी समुद्र आदर्श मानला जातो. पावसामुळे उफाळत्या नद्यांना स्वत:मध्ये सामावून घेऊन सुद्धा समुद्र मर्यादा सोडीत नाही. पण प्रलय आल्यानंतर त्याच समुदाचे पणी किनाऱ्यांना तोडून मोडून साऱ्या धरतीलाच जलमय करुन टाकतो. समुद्र प्रलयकाळात आपली मर्यादा सुरक्षित ठेवू शकत नाही परंतु या विरूद्ध साधु पुरुष जीवावरचे संकट हजर झाले तरी आपल्या चारीत्र्याची उदारतेचा त्याग करीत नाहीत. ते प्रत्येक अवस्थेत आपल्या मर्यादेचे रक्षण करतात. यासाठी संत पुरुष समुद्रापेक्षा अधिक गंभीर मानले जातात. त्यांचा सन्मान केला पाहिजे.

## मुर्खाचा त्याग करा:-

मूर्खस्तू परिहर्तव्य: प्रत्यक्षो द्विपद: पशु:।
भिनत्ति वाक्यशूलेन अदृश्ययं कण्टकं यथा।। **7** ।।

आयार्य चाणक्य येथे नरपशूची चर्चा करताना म्हणतात की मुर्ख व्यक्तीला दोन पायांचा पशु समजून त्याचा त्याग केला पाहिजे. कारण तो आपल्या शब्दांनी शूळासारखा भेदत असतो जसा की एखादा अदृष्य काटा टोचतो.

अर्थ असा की मुर्ख व्यक्ती मानव असूनही पशुच आहे. जसा पायात टोचलेला काटा दिसत तर नाही पण त्याचे दुःख सहन करता येत नाही. याच प्रकारे मुर्ख व्यक्तीचे शब्द दिसत नाहीत परंतु हृदयात शूळासारखे टोचत असतात. मुर्खांचा त्याग करणेच चांगले असते.

## विद्येचे महत्व ओळखा:-

रूपयौवनसम्प**न्ना** विशालकुलसं भवा:।

विद्याहीना न शोभन्ते निर्गन्धा इव किंशुका:।। **8** ।।

विद्येच्या महत्वाचे प्रतिपादन करतात आचार्य चाणक्य म्हणतात की रूप आणि यौवन संपन्न, उच्च कुळात जन्म घेऊन सुद्धा विद्याहीन मनुष्य सुगंधहीन फूला सारखा असतो आणि ते शोभत नाहीत.

अर्थ हा आहे की मुनष्य कितीपण सुंदर असो, तरुण असो आणि संपन्न घराण्यात जन्म घेतलेला असो पण तो जर विद्याहीन आहे, मूर्ख आहे तर त्याला सन्मान मिळत नाही. विद्या सुगंधासारखी असते. ज्या प्रमाणे सुगंध नसल्यावर साध्या फूलाला कोणीही पसंद करीत नाहीत. या पद्धतीने अशिक्षित व्यक्तीला सुद्धा समाजात काहीच मान-सन्मान मिळत नाही. विद्या व्यक्तीला खऱ्या अर्थाने गुणवंत माणूस बनविते.

## रूपापेक्षा कीर्ती चांगली:-

कोकिलानां स्वरो रूपं नारी रूपं पतिव्रतम्।
विद्या रूपं कुरूपाणां क्षमा रूपं तपस्विनाम्।। **9** ।।

रूपाची चर्चा करताना आचार्य चाणक्य रूपापेक्षा कीर्तीला महत्व देतात आणि म्हणतात की कोकिळेचे रूप तीचा स्वर आहे. पतीव्रता असणेच स्त्रीयांचे सौंद्रर्य आहे. कुरूप लोकांचे ज्ञान हेच त्यांचे रूप आहे तथा तपस्यांची क्षमाशीलताच त्यांचे रूप आहे.

अर्थ असा आहे कोकिळांचे सुरेल आवाज हीच त्यांची सुंदरता आहे. याच्याच सहाय्याने ते आपल्याविषयी आकर्षण निर्माण करतात. स्त्रियांचे खरे सौंदर्य त्यांचा पतीव्रता धर्म आहे. यातच स्त्री धर्माची सार्थकता आहे. कुरूप व्यक्तीचे सौंदर्य त्याचे ज्ञान आहे, विद्या आहे. कारण ज्ञानानेच तो आत्माविष्कार करून जगाला प्रकाशित करू शकतो. आणि तपस्वी योग्यांची सुंदरता सर्वांना क्षमा करणे ही आहे कारण तपाने क्रोधावर विजय मिळविता येतो. शालीनता आल्यावर सहजवृत्तीने क्षमा-भावना जागृत होते.

## श्रेष्ठतेला वाचवा:-

त्यजेदेकं कुलस्यार्थे ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत्।
ग्रामं जनपदस्यार्थे आत्मार्थे पृथिवीं त्यजेत्।। **10** ।।

आचार्य चाणक्य येथे क्रमाने श्रेष्ठता प्रतिपादन करताना सांगतात की व्यक्तीने कुळासाठी एका व्यक्तीचा त्याग करावा. गावासाठी कुळाचा त्याग करावा. राज्याच्या रक्षणासाठी गावाचा आणि आत्मरक्षणासाठी संसाराचा सुद्धा त्याग केला पाहिजे.

येथे आशय असा आहे की एका व्यक्तीचा त्याग केल्याने पूर्ण कुळ-खानदानाचे भले होत असेल तर त्या व्यक्तीचा त्याग करण्यात काही वाईट नाही. कुळाचा त्याग केल्याने पूर्ण गावाचे कल्याण होत असेल तर कुळाचा सुद्धा त्याग करावा. याच प्रकारे गावाचा त्याग करून देशाचे कल्याण होत असेल तर गावाचा सुद्धा त्याग करावा. परंतु आपले जीवन सर्वात मोठे आहे. जर स्वतःच्या रक्षणासाठी सर्व विश्वाचा त्याग करावा लागला तरी विश्वाचा त्याग केला पाहिजे. जीव आहे तर जग आहे. हेच उत्तम कर्तव्य आहे.

## कष्टानेच फळ मिळते:-

> उद्योगे नास्ति **दारिद्रयं** जपतो नास्ति पातकम्।
> मौनेन कलहो नास्ति जागृतस्य च न भयम्।। **11** ।।

आचरणाची चर्चा करताना आचार्य चाणक्य म्हणतात की उद्योगानी द्रारिद्रय आणि जपाने पाप नष्ट होते. मौन बाळगल्याने भांडण व जागृत राहिल्याने भीती दूर होते.

अर्थ असा आहे की उद्योग केल्यामुळे गरीबी नष्ट होते. म्हणून मनुष्याने कष्ट केले पाहिजेत जीवन संपन्न करण्यासाठी. ईश्वराचे नाम: स्मरण केल्याने पाप दूर होते. मन व आत्मा शुद्ध होतात, सत्कर्माची प्रेरणा मिळते, व्यक्ती दुष्कर्मापासून दूर राहतो. चुप बसल्यामुळे भांडण वाढत नाही व अनिष्ट स्थिती टळते. आणि जागे राहिल्याने कोणत्याही गोष्टीचे भय राहात नाही. सजग राहिल्यामुळे वस्तु धोका होण्यापूर्वीच सांभाळू शकतो.

## 'अति'चा त्याग करा:-

> अति रूपेण वै सीता चातिगर्वेण रावण:।
> आतिदानाद् बलिर्बद्धो ह्यति सर्वत्र वर्जयेत्।। **12** ।।

आचार्य चाणक्य येथे 'अति सर्वत्र वर्जयेत' या सिद्धांताचे प्रतिपादन करताना सांगतात की अति सुंदर असल्यामुळेच सीतेचे अपहरण झाले होते, अति घमेंडी झाल्यामुळे रावण मारला गेला आणि अति दानी असल्यामुळे राजा बळीचा छळ झाला.

आशय असा आहे की सीता अत्यंत सुंदर होती म्हणून रावणाने तीला उचलून नेले. रावणाला अत्यधिक घमेंड झाली म्हणून त्याचा नाश झाळा. राजा बळी अति दानी होता म्हणूनच ईश्वराने त्याला फसविले. भलेपणा वा बुरेपणा 'अति' दोन्हीत वाईट आहे.

## वाणीत गोडवा आणा:-

> को हि भार: समर्थानां किं दूर व्यवसायिनाम्।
> को विदेश सुविद्यानां को पर: प्रियवादिनाम्।। **13** ।।

आचार्य चाणक्य मधुर भाषणाला व्यक्तिमत्वाचा महत्वाचा गुण मानून सांगतात की शक्तीशाली व्यक्तीला कोणतीही वस्तु जड नसते. व्यापाऱ्यांना कोणतीही जागा दूर नसते. विद्वानाला कोठेच विदेश नसतो. गोड बोलणाऱ्याला कोणीच परके नसते.

अभिप्राय असा की समर्थ व्यक्तीसाठी कोणती वस्तु भारी असते? आपल्या सामर्थ्य बळावर तो काहीही करु शकतो. व्यापाऱ्यासाठी कोठेही जाऊ शकतो. विद्वानासाठी कोणताही देश विदेश नसतो कारण आपल्या ज्ञानाने तो सर्वजागी अनुकूल वातावरण निर्माण करतो. मधुर बोलणाऱ्या व्यक्तीला कोणीच परके नाही. गोड बोलण्याने तो सर्वांना आपले बनवितो.

## गुणवान एकच पुरेसा असतो:-

एकेनापि सुवर्ण पुष्पितेन सुगन्धिना।
वसितं तद्वनं सर्वं सुपुत्रेण कुलं यथा।। **14** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की एकच गुणवान आपल्या गुणांनी आपले नाव कमवितो. त्यांचे म्हणणे आहे की वनात फुललेल्या सुंदर फुलांचे एकच झाड आहे पण ते आपल्या सुगंधाने साऱ्या वनाला सुंगंधित करतो. याच पद्धतीने एकच सुपुत्र सगळ्या कुळाचे नाव झेंड्यावर फडकावितो.

याचा आशय असा आहे की जंगळामध्ये जर एकाच वृक्षावर सुंदर फुले फुलली असतील तर त्यांचा सुगंध सर्वत्र पसरतो. याच रीतीने एकच सुपुत्र सर्व कुळाचे नाव आपल्या गुणांनी उज्जवल करतो. कारण कोणतेही खानदान गुणी पुत्रंमुळेच उंचीवर जाते त्यामुळे अनेक गुणहीन पुत्रंच्या तुलनेत एकच गुणवंत पुत्र पुरेसा आहे. यासाठी आजच्या परिवार नियोजन संदर्भात अनेक मुलाऐवजी एकच चांगले मूल असणे अधिक सुखाचे आहे.

एकेन शुष्कवृक्षेण दह्यमानेन वह्निना।
दह्यते तद्वनं सर्वं कुपुत्रेण कुलं यथा।।**15** ।।

आचार्य चाणक्य गुणवत्ताचे प्रतिपादन करतात म्हणतात की एकाच वाळलेल्या झाडाला लागलेल्या आगीमुळे सगळे जंगल जळते. याच पद्धतीने एकच कुपुत्र सगळ्या कुळाला बदनाम करतो.

याचा अर्थ हा आहे की जंगलात जर एखादा वृक्ष वाळलेला असेल तर त्याला शीघ्र आग लागू शकते आणि त्या वृक्षाच्या आगीने सारे जंगल जळून राख होऊ शकते. याच प्रकारे जर कुळात एकाही कुपुत्राने जन्म घेतला तर तो सगळे कुळच बदनाम करतो. म्हणन संतती मर्यादेत ठेवून त्यांच्यात सत्‌गुण निर्माण करण्याचे प्रयत्न करावेत.

एकेनापि सुपुत्रेण विद्यायुक्त सा साधुना।
आह्लादितं कुलं सर्वं यथा चन्द्रेण शर्वरी।। **16** ।।

येथे सुद्धा आचार्य चाणक्य गुणवंताच्या एकटे असण्यावरही बहुसंख्येच्या तुलनेत कमतरतेची सार्थकता विशाद करताना म्हणतात की ज्या प्रकारे चंद्र एकटाच रात्रीची शोभा वाढवितो त्याच प्रकारे एकच विद्वान सज्जन पुत्र कुळाला प्रकाशित करतो.

येथे अर्थ असा आहे की एकटाच चंद्र रात्रीच्या अंधाराला दूर सारून साऱ्या जगाला आपल्या प्रकाशाने उजाळा देतो. त्याच पद्धतीने पुत्र एकच असू द्या परंतु तो गुणवंत असेल तर साऱ्या कुलाचे नाव उजाळून टाकतो. त्यामुळे चांगल्या स्वभावाचा एकच पुत्र साऱ्या कुळाचे नाव उजाळून टाकतो व परिवारातील सदस्यांना आनंदी करतो. कारण की त्याच्यामुळे ते आपल्या कुळाचा अभिमान व गर्व अनुभवू शकतात. अंधाऱ्या रात्री कोणालाच सुखावह वाटत नाहीत, तसेच कुपुत्रसुद्धा कुळाला सहन होत नाहीत. तो कुळाचे नाव बुडविणारा असतो.

किं जातैर्बहुभि: पुत्रै: शोकसन्तापकारकै:।
वरमेक: कुलावलम्बो यत्र विश्राम्यते कुलम।। **17** ।।

येथेही आचार्य चाणक्य गुणवंत एकाच पुत्रची पर्याप्तता सांगताना म्हणतात की शोक आणि संताप निर्माण करणाऱ्या अनेक पुत्रांना जन्म देण्याने काय लाभ. कुळाला आधार देणारा एकच पुत्र श्रेष्ठ असतो. त्याच्या आधारे सगळे कुल आराम करते.

अर्थ हा आहे की अनेक अवगुणी पुत्र झाले तरी कांही लाभ नाही. त्यांच्या जन्म घेण्यामुळे सगळयांना दुःखच होते. परंतु कुळाला आधार देणारा, त्याचे नाव उज्जवल करणारा एकच पुत्र चांगला अशा पुत्रमुळे कुळ स्वतःला धन्य मानते.

## आई-वडिलांनी सुद्धा दायित्व समजावे-

लालयेत् पंचवर्षाणि दशवर्षाणि ताडयेत्।
प्राप्त तु षोडशे वर्षे पुत्रं मित्रवदाचरेत्।। **18** ।।

आचार्य चाणक्य येथे पुत्र संगोपनात आई-वडिलांच्या दायित्वाचे प्रतिपादन करताना सांगतात की पुत्राचे पोषण पाच वर्षापर्यंत करावे. दहावर्षे ताडन करावे. सोळावे वर्ष लागल्यावर त्याच्याशी मित्रासारखा व्यवहार करावा.

अर्थ असा आहे की पाच वर्षाच्या अवस्थेपर्यंत पुत्राशी लाड-कौतुक प्रेम करावे. यानंतर दहा वर्षापर्यंत म्हणजेच पंधारा वर्षाचा होईपर्यंत त्याला कठोर शिस्तीत ठेवले पाहिजे. परंतु पुत्र जेव्हा पंधरा वर्ष पूर्ण करून सोळाव्या वर्षात पदार्पण करील तेव्हा तो वयाने वाढतो. तेव्हा त्याच्याबरोबर एक मित्रासारखा व्यवहार करणे योग्य असते.

## वेळेचे ज्ञान:-

उपसर्गे**ऽ** न्यचक्रे च दुर्भिक्षे च भयावहे।
असाधुजनसम्पर्के पलायति स जीवति।। **19** ।।

आचार्य चाणक्य वेळेच्या ज्ञानाची चर्चा करताना येथे सांगतात की-उपद्रव किंवा युद्ध झाल्यावर, भयानक दुष्काळ पडल्यावर आणि दुष्टांची सोबत मिळाल्यावर पलायन करणारी व्यक्तीच जगू शकते.

अर्थ असा आहे की कोठेही इतर लोकांमध्ये लढाई-भांडण, दंगा-दंगल झाल्यावर, भयानक दुष्काळ पडल्यानंतर आणि दुष्ट लोकांच्या संपर्कात आल्यानंतर त्या स्थानाला सोडून पलायन करणारा मनुष्य स्वतःला वाचवितो. अशा स्थानापासून पळून जाणे हीच सर्वात मोठी हुशारी आहे.

## जीवनाची निष्फळता:-

धर्मार्थकाममोक्षेषु यस्यौको**ऽ** पि न विद्यते।
जन्म जन्मानि मर्त्येषु मरणं तस्य केवलम्।। **20** ।।

येथे आचार्य जीवनातील निरर्थकतेची चर्चा करताना म्हणतात की ज्या मनुष्याला धर्म, धन, काम, भोग, मोक्ष यापैकी एकही वस्तु मिळत नाही, त्याचा जन्म फक्त मृत्यूसाठीच झालेला

असतो.

अर्थ असा आहे की धर्म, धन, काम (भोग)आणि मोक्ष मिळणे हे मनुष्य जीवनातील चार कार्य आहेत. जो मनुष्य न चांगले कर्म करून धर्मसंचय करतो न तर संपत्ती कमवितो, नाही काम-भोग इत्यादी इच्छा पूर्ण करतो आणि न तर मोक्ष प्राप्त करतो त्याचे जगणे व मरणे एक सारखेच आहे. तो जसा या जगात येतो तसाच येथून निघून जातो, त्याचे जीवन निरर्थक आहे.

## लक्ष्मीचा वास:-

मूर्खा: यत्र न पूज्यन्ते धान्यं यत्र सुसंचितम्।
दाम्पत्यो: कलको नासित तत्र श्री स्वयमागता।। **21** ।।

आचार्य चाणक्य येथे विद्वान आणि स्त्रियांच्या सन्मानात ख्याली खुशाली आणि शांतीची स्थिती सांगताना म्हणतात की जेथे मूर्खांचा सन्मान होत नाही, अन्न-भांडार भरलेले असते आणि पती-पत्नीमध्ये भांडण होत नाही, तिथे लक्ष्मी स्वत: येत असते.

अर्थ असा आहे की ज्या घरात एकही मुर्ख मनुष्य नसतो, धान्य खाद्य पदार्थांनी कोठार भरलेले असते आणि पती-पत्नीमध्ये आपसात भांडण-तंटा होत नाही. अशा घरांमध्ये सुख-शांती, धन-संपत्ती इत्यादी नेहमीच कायम राहते. यामुळे असे म्हणता येते की जर देशाची समृद्धी आणि देशवासी लोकांचे समाधान शुभ आहे, मंगल आहे तर मुर्खाच्या जागी गुणवंत व्यक्तींचा आदर झाला पाहिजे. वाईट दिवसासाठी-काळासाठी धान्य भांडारात भरून ठेवले पाहिजे आणि घरात संसारात वाद-विवादाचे वातावरण निर्माण होऊ नाही दिले पाहिजे. जेव्हा विद्धानांचा आदर आणि मूर्खांचा तिरस्कार होईल, अन्नाचे वैपुल्य असेल आणि पती-पत्नी मध्ये सद्भावना असेल तर गृहस्थांच्या घरात आणि देशात संपत्ती उत्तरोत्तर वाढत वाईल, यात संशय नाही आणि हेच आचरण व्यक्ती आणि उन्नत व प्रगत करण्यात सहाय्यक असेल.

# चौथा अध्याय

## काही गोष्टी भाग्याने मिळतात:-

आयु कर्म वित्तञ्च विद्या निधनमेव च।
पञ्चैतानि हि सृज्यन्ते गर्भस्थस्यैव देहिन:।। 1 ।।

येथे आचार्य चाणक्य भाग्याला लक्ष्य करून मानवी जीवनाच्या प्रारंभी त्याच्या लेखनाला प्रतिपादित करताना म्हणतात की आयु, कर्म, वित्त, विद्या, निधन या पाच गोष्टी प्राण्याच्या भाग्यात तेव्हाच लिहिल्या जातात जेव्हा तो गर्भातच असतो.

अर्थ असा आहे की प्राणी जेव्हा मातेच्या गर्भात असतो तेव्हा पाच गोष्टी त्याच्या भाग्यात लिहिल्या जातात-आयु, कर्म, धन, विद्या आणि मृत्यू.

यांच्यात नंतर कोणतेही परिवर्तन होऊ शकत नाही. त्याचे जेवढे वय होते त्यापूर्वी एक क्षण ही त्याला कोणी मारू शकत नाही. तो जे काही कर्म करतो, त्याला जी काही धन संपत्ती आणि विद्या मिळते, ती सर्व पूर्वीच निश्चित झालेले असते. जेव्हा त्याच्या मृत्यूची वेळ येते तेव्हा एका क्षणासाठीसुद्धा त्याला कोणी वाचवू शकत नाही.

## संतांच्या सेवेने फळ मिळते:-

साधुम्यस्ते निवर्तन्ते पुत्र: मित्राणि बान्धवा:।
ये य तै: सह गन्तारस्तद्धर्मात्सुकृतं कुलम्।। 2 ।।

आचार्य चाणाक्य संतांच्या सेवेला महत्व देताना म्हणतात की विश्वातील अधि कतम मूल, मित्र आणि भाईबंद साधु-महात्मा, विद्वात इत्यादींच्या सहवासापासून दूर राहतात. जे लोक संत्संगत करतात ते आपल्या कुळाला पवित्र करतात.

अर्थ हा आहे की जवळ जवळ सर्व लोक सत्संगापासून दूर राहतात. पण जे लोक खऱ्या ज्ञानी महात्मा लोकांचा सत्संग करतात ते आपल्या कुळाला पवित्र करून त्याचा उद्धार करतात.

ते या सदाचरणाने आपल्या पूर्ण परिवाराला उज्वल करतात. त्यांच्या या कार्याचा परिवाराने अभिमाल बाळगला पाहिजे. त्याला आपला आदर्श मानले पाहिजे आणि त्याच्यापासून प्रेरणा घेतली पाहिजे. मानवाला माहित आहे की शरीर नश्वर आहे. परंतु याचे नक्की ज्ञान असूनसुद्धा तो सांसारिक कार्यात गुंतलेला असतो. जेव्हा की त्याला अलिप्त निर्विकार राहून कार्य करीत राहिले पाहिजे.

दर्शनघ्यानसंस्पर्शैर्मत्स्यी कूर्मी च पक्षिणी।
शिशु पालयते नित्यं तथा सज्जनसंगतिः।। 3 ।।

आचार्य चाणक्य सत्संगतीची चर्चा करताना म्हणतात की जसा मासा, मादी कासव आणि

चिमणी आपल्या पिल्लांचे पालन क्रमश: पाहून, लक्ष ठेवून आणि स्पर्शाने करतात. त्याच पद्धतीने सत्संगती सुद्धा प्रत्येक परिस्थितीमध्ये मानवाचे पालन करते.

अर्थ असा आहे की मासा आपल्या बच्च्यांचे पालन त्यांना वारंवार पाहून करतो. मादी कासव ध्यान लावून पिल्लाकडे पाहते आणि मादी पक्षी आपल्या पिल्लांना आपल्या पंखानी झाकून त्यांचे पालन करतात. सज्जनांची संगतसुद्धा मनुष्याची याच प्रकारे देखभाल करते.

## जेवढे होईल तेवढे पुण्य कर्म करा:-

यावत्स्वस्थो ह्यय देह: तावन्मृत्युश्च दूरत:।
तावदात्महितं कुर्यात् प्रणान्ते किं करिष्यति।। 4 ।।

येथे आचार्य चाणक्य आत्मकल्णाचा मार्ग प्रशस्त करताना म्हणतात की जोपर्यंत शरीर स्वस्थ आहे तोपर्यंत मृत्यूसुद्धा दूर राहतो. म्हणूनच आत्मकल्याण तोपर्यंतच करून घेतले पाहिजे. प्राण गेल्यावर काय करणार? नंतर फक्त पश्चाताप शिल्लक राहील.

येथे याचा अर्थ असा आहे की जोपर्यंत शरीर स्वस्थ आहे तोपर्यंत मृत्यूची सुद्धा भीती राहात नाही. म्हणून याच काळात आत्मा आणि परमात्मा ओळखून आत्मकल्याण करून घ्यावे. मृत झाल्यावर काहीही करता येत नाही.

आचार्य चाणक्याचे सांगणे आहे की काळ पसार होत असतो. न जाणो रोग मनुष्याला केव्हा गाठतील आणि न जाणो केव्हा यमाचे दूत मृत्यूसंदेश घेऊन दरवाज्यात येऊन उभे राहतील. यासाठी तर मनुष्याने जीवनात जास्तीत जास्त पुण्याचे काम करावे कारण काळाचा काय भरवसा? जो कांही करायचे आहे वेळेवरच केले पाहिजे.

## विद्या कामधेनूसारखी असते:-

कामधेनुगुणा विद्या ह्ययकाले फलदायिनी।
प्रवासे मातृसदृशा विद्या गुप्तं धनं स्मृतम्।। 5 ।।

आचार्य चाणक्य येथे विद्येचे महत्व प्रतिपादित करताना तीचे प्रयोजन आणि उपयोग याची चर्चा करीत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की विद्या कामधेनु सारखी समान गुणांची आहे. वाईट काळात सुद्धा फळ देणारी आहे, प्रवास काळात आई सारखी असून गुप्त धन आहे.

आशय असा आहे की विद्या कामधेनु समान इच्छा पूर्ण करणारी आहे. वाईटातल्या वाईट काळात सुद्धा ती साथ सोडत नाही. घरातून कोठेही बाहेर गेले तरी ती आईसारखे रक्षण करते. ही एक गुप्त धन आहे या धनाला कोणीच पाहू शकत नाही. आचार्य चाणक्य मानतात की विद्या एक गुप्त धन आहे म्हणजेच एक असे धन जे कोणी पाहू शकत नाही आणि ती अनुभवाची गोष्ट आहे. तीचे कोणी हरण किवा विभाजन करू शकत नाही. म्हणून ती सर्व प्रकारे सुरक्षित आणि विश्वसनीय आहे. वेळ आल्यावर हीच मनुष्याच्या कामाला येते.

या प्रकारे विद्या संकटात कामधेनु समान आणि परदेशात आई समान आहे. सर्वात मोठी गोष्ट ही आहे की ही गुप्त व सुरक्षित धन आहे. सोन्याच्या दागिन्यासमान हिला कोणी हिरावून घेऊ शकत नाही, चोरू शकत नाही.

## एकच गुणवान पुत्र पुरेसा आहे-

> एकोऽपि गुणवान् पूत्रो निर्गुणैश्च शतैर्वर:।
> एकश्चन्द्रस्तमो हन्ति न च तारा: सहस्रश:।। 6 ।।

आचार्य चाणक्य येथे उपयोगिता, गुण आणि योग्यतेच्या आधारावर पुत्राच्या महत्वाचे प्रतिपादन करताना म्हणतात की फक्त एक गुणवान आणि विद्वान मुलगा शेकडो गुणहीन बिनकामाच्या मुलांपेक्षा चांगला असतो. ज्या प्रकारे एक चंद्र रात्रीचा अंधार दूर करतो पण असंख्य तारे मिळूनसुद्धा रात्रीचा गहन अंधार दूर करू शकत नाहीत. याच पद्धतीने एक गुणी पुत्रच आपल्या कुलाचे नाव उज्वल करतो, त्याला उंचावर नेतो, कीर्ती देतो. शेकडो बिनकामी मुळे मिळूनसुद्धा कुळाची प्रतिष्ठा उंचावू शकत नाही. गुणहीन व बिनकामाचे पुत्र उलट आपल्या वाईट कामांनी कुळाला कलंक लावतात. त्यांचे अस्तित्व कांही कामाचे नसते. ते केव्हाही अनर्थकारक आहेत.

## मूर्ख पुत्र काय कामाचा?:-

> मूर्खाश्चिरायुर्जातोऽपि जस्माज्जातमृतो वर:।
> मृतः सा चाल्पदुःखाय यावज्जीवं जडो हृदेत्।। 7 ।।

आचार्य येथे या श्लोकातून मुर्ख पुत्राच्या निरर्थकेतेवर टीका करताना म्हणतात मुर्ख पुत्र दीर्घायुषी असल्यापेक्षा मेलेला चांगला कारण असा पुत्र मेल्याने एकदाच दुःख होते, जगला तर तो जीवनभर जाळीत राहील.

येथे असा अर्थ आहे की मुर्ख पुत्रला दीर्घ आयुष्य मिलण्यापेक्षा त्याचे शीघ्र मरणेच चांगले. कारण मुर्खाच्या मृत्यूने एकदाच कांही काळ दुःख होईल पण तो जगला तर जीवनभर आई वडीलांना दुःख देत राहील.

आणि संसारात अशी अनेक उदाहरणे आहेत की मुर्ख पुत्रंनी वारशात मिळालेले विशाल साम्राज्य धुळीत मिळविले आहे. वडीलांची अलोट संपत्ती नष्ट केलेली आहे. मानव स्वभावतः स्वतःच्या संतवीवर प्रेम करतो पण त्याचबरोबर त्याने वास्तविकतेविषयी डोळेझाक केली तर काय होऊ शकते? आचार्यानी येथे याच प्रवृतीविषयी सावध केले आहे.

## या पासून नेहमी सावध रहा:-

> कुग्रामवास: कुलहीन सेवा
> कुभोजन क्रोधमुखी च भार्या।
> पुत्रश्य मुर्खो विधवा च कन्या
> विनाग्निमेते प्रदहन्ति कायम्।।**8** ।।

आचार्य चाणक्य येथे त्या गोष्टींचा उल्लेख करीत आहेत ज्यापासून व्यक्तीला नेहमी नुकसान होते. त्यांचे म्हणणे आहे की दुष्टांच्या गावात राहणे, कुळहीनाची सेवा करणे, कुभोजन, कर्कशा पत्नी, मुर्ख पुत्र आणि विधवा पुत्री हे सगळे व्यक्तीला आगीविनाच जाळून टाकतात.

अर्थ असा आहे की या गोष्टी व्यक्तीला खूप दु:ख देतात-जर दुष्टासह राहावे लागले तर, नीच खानदानातील लोकांची सेवा, घरात कर्कशा पत्नी, मुलगा मुर्ख असणे, कन्या विधवा होणे हे सगळे दु:ख अग्नीविना व्यक्तीला आतल्या आत जाळून टाकतात.

## ज्यांचा उपयोग नाही त्याचे काय होणार:-

किं तया क्रियते धेन्वा या न दोग्ध्रो न गर्भिर्णी।
येऽर्थ: पुत्रेण जातेन यो न विद्धान्न भक्तिमान।।9।।

येथे आचार्य चाणक्य या श्लोकात वस्तूच्या उपयोगितेची चर्चा करताना म्हणतात की त्या गायीचे काय करावे जी दूध देत नाही व गाभणही राहात नाही. याच प्रकारे त्या मुलाचा जन्म घेऊन काय लाभ जो विद्वान नाही व ईश्वराचा भक्तही नाही.

अर्थ असा आहे की जी गाय दूध देत नाही व गाभणही राहात नाही, अशा गायीचे असणे व नसणे सारखेच आहे. अशी गाय पाळणेसुद्धा बेकार आहे. याच प्रकारे मुलगा जो विद्वानही नाही व भक्तही नाही, त्याचे असणे व नसणे सारखेच आहे.

## यापासून सुख मिळते:-

संसारातपदग्धानां त्रयो विश्रान्तिहेतव:।
अपत्यं च कलत्रं च सतां संगतिरेव च ।। 10 ।।

येथे आचार्य चाणक्य व्यक्तीच्या दुखात तीन शांतीदायक गोष्टींची चर्चा करताना म्हणतात की संसारिक तापाने जळणाऱ्या लोकांना तीनच गोष्टी आराम देऊ शकतात. संतती, पत्नी आणि सत्संगत.

अर्थ असा आहे आपली मुले, पत्नी आणि चांगल्या लोकांची संगत या तीन गोष्टी मोठ्या कामाच्या आहेत. व्यक्ती जेव्हा कामाने थकून बेहाल होतो तेव्हा या तिन्ही गोष्टी आराम देतात. कारण बहुतांश वेळा असे दिसते की मनुष्य बाहेरच्या संघर्षांचा सामना करून दिवसभरच्या श्रमांनी थकून-भागून जेव्हा संध्याकाळी घरी परत येतो तेव्हा आपल्या संततीला पाहूनच थकवा, त्रास आणि मानसिक व्यथा सर्व विसरून स्वस्थ, शांत व संतुलित होतो. याच प्रकारे पती घरी आल्यावर जेव्हा हसत हसत येणारी पत्नी स्वागत करते, मधुरवाणीने त्याची विचारपूस करते, चहापाणी करून त्याल तृप्त व संतुष्ट करते तेव्हा पुरुष आपले सारे कष्ट विसरून जातो. याच प्रकारे जेव्हा एखादा महापुरूष एखाद्या असह्य दु:खाने संत्रस्त व्यक्तीला ज्ञानोपदेश तेव्हा देतो त्याच्या प्रभावाने तो सुद्धा शांत आणि संयत होतो. या प्रकारे आज्ञाधारक संतती, पतीव्रता स्त्री आणि साधूसंग मनुष्याला सुख देणारी साधन आहेत. व्यक्तीच्या जीवनात यांचे मोठे महत्व आहे.

## या गोष्टी एकदाच होतातः-

सकृज्जल्पन्ति राजान: सकृज्जल्पन्ति पण्डिता:।
सकृत्कन्या: प्रदीयन्ते त्रीण्येतानि सकृत्सकृत्।। 11 ।।

आचार्य चाणक्य येथे संयत आणि एकदाच कार्य करण्याच्या संदर्भात म्हणतात की राजे लोक एकदाच बोलतात, पण्डितसुद्धा एकदाच बोलतात आणि कन्यादानसुद्धा एकदाच होते. ही तिन्ही कार्ये एक-एकदाच होतात.

अर्थ असा आहे की राजा चा आदेश एकच वेळा होतो.

विद्वान लोकंसुद्धा एक गोष्ट एकच वेळा बोलतात.

कन्यादानसुद्धा जीवनात एकदाच करता येते.

या प्रकारे राजा असो वा विद्वान वा कन्येच्या विवाहसंबंधासाठी आई-वडीलांचे वचन अटळ असते. तिन्ही राजा, पंडित आणि आई-वडील यांच्या द्वारा वचन परत घेता येत नाही तर ते पूर्ण केले जातात. ते पूर्ण करण्यातच त्यांचा मोठेपणा असतो. अर्थात ज्याला जे चांगले काम करायचे असते, तो करतो. त्याला वारंवार सांगण्याची गरज नसते. हेच महान व्यक्तींचे आदर्श रूप आहे.

## केव्हा एकटे, केव्हा सोबत रहावे:-

एकाकिना तपो द्वाभ्यां पठनं गायनं त्रिभि:।
चतुर्भिगमन क्षेत्रं पञ्चमिर्बहुभि रणम् ।। 12 ।।

आचार्य चाणक्य येथे एकान्तात मनाच्या एकाग्रचित्त होण्याला प्रतिपादित करताना म्हणतात की तप एकांतात करणे उचित व योग्य असते. शिकताना दोन, गाताना तीन, जाताना चार, शेतात पाच व्यक्ती व युद्धात अनेक लोक असावेत.

अर्थ असा आहे की तप करताना मनुष्याने एकट्याने राहावे. शिकतेवेळी दोन लोकांचे बरोबर शिकणे योग्य आहे. गाणे गाताना तीन व्यक्तींची साथ चांगली असते. कोठे जाताना जर पायी जात असाल तर चार लोक चांगले असतात. शेतात काम करताना पाच लोक चांगले काम करतात. परंतु युद्धात मात्र जेवढे जास्त लोक असतील तेवढे चांगले.

## पतीव्रताच पत्नी आहे:-

सा भार्या या शुचिदक्षा सा भार्या या पतिव्रता।
सा भार्या या पतिप्रीता सा भार्या सत्यवादिनी।। 13 ।।

येथे आचार्य चाणक्य पत्नीच्या रूपाची चर्चा करताना म्हणतात की तीच पत्नी आहे जी पवित्र व कुशल आहे. तीच पत्नी आहे जी पतीव्रता आहे. तीच पत्नी आहे जीला आपल्या पतीविषयी प्रेम आहे. तीच पत्नी आहे जी पतीला सत्य सांगते.

अर्थ हा आहे की जीचे आचरण पवित्र आहे, कुशल गृहिणी आहे, जी पतीव्रता आहे, जी पतीला खरे प्रेम करते आणि त्याच्याशी कधी खोटे बोलत नाही. तीच स्त्री पत्नी म्हणण्यास लायक आहे. ज्या स्त्रीमध्ये हे गुण नसतात ती पत्नी म्हणल्या जाऊ शकत नाही.

अर्थात आदर्श पत्नी तीच आहे जी मन वचन आणि कर्माने पवित्र आहे. तीच्या गुणांचे सखोल विवेचन करताना सांगितले आहे की शरीर व अंत:करणाने शुद्ध, आचार विचार शुद्ध, गृहकार्य, भोजन, दळण-कांडण, धुणे, शिवणे-ओवणे आणि साज-शृंगार इत्यादीमध्ये निपुण, मन-वचन व शरीराने पतीवर अनुसक्त आणि पतीला आनंदी करणे हेच आपले कर्तव्य व कर्म

मानणारी, सदा सत्य बोलणारी कधी चेष्टेत सुद्धा अशी गोष्ट करणार नाही ज्यामुळे संशय निर्माण होऊ शकतो. तेच घर स्वर्ग होईल अन्यथा समजावे की या गुणाअभावी ते घर नाही नर्क आहे.

## निर्धनता अभिशाप आहे-

अपुत्रस्य गृहं शून्यं दिश: शून्यास्त्वअबान्धचस:।
मुर्खस्य हृदयं शून्य सर्वशून्यं दरिद्रता।। 14 ।।

निर्धनतेला अभिशाप मानताना आचार्य चाणक्य येथे या श्लोकाच्या माध्यमातून सांगतात की पुत्रहीनासाठी घर सूने होते, रिकामे होते. ज्याच्यात भाऊ नाही त्याच्यासाठी सर्व दिशा सुन्या रिकाम्या होऊन जातात; मुर्खाचे हृदय रिकामे असते परंतु निर्धानाचे सर्वच रिकामे असते. अर्थात ज्या व्यक्तीला एकही मुलगा नाही, त्याला आपले घर एकदम उदास वाटते. ज्याला कोणी भाऊ नाही त्याला साऱ्या दिशा रिकाम्या वाटतात. मुर्ख व्यक्तीला चांगल्या वाईटाचे कांही ज्ञान नसते व त्याच्या जवळ हृदय नावाची गोष्ट नसते. परंतु गरीबासाठी घर, दिशा, हृदय, सर्व संसार उदास होउन जातो गरीबी एक अभिशाप आहे.

## ज्ञानाचा अभ्यास करा:-

अनभ्यासे विषं शास्त्रमजीर्णे भोजन विषम्।
दरिद्रस्य विषं गोष्ठी वृद्धस्य तरूणी विषम।। 15 ।।

आचार्य चाणक्य ज्ञानाला चिरस्थायी व उपयोगी ठेवण्यासाठी अभ्यासावर भर देताना म्हणतात की ज्या प्रकारे उत्तमातील उत्तम भोजन अपचनामुळे आनंदाऐवजी नुकसान करते आणि विषसमान काम करते, तसच निरंतर अभ्यास नाही केला तर शास्त्रज्ञान सुद्धा मनुष्यासाठी विषासाखे घातक असते. असे म्हणायला तो पंडित असतो परंतु अभ्यास नसल्यामुळे तो शास्त्रचे चांगल्या प्रकारे विश्लेषण करू शकत नाही आणि चेष्टा व उपहासाचे कारण बनतो अशा परिस्थितीमध्ये सन्मानित व्यक्तीला आपल्या अपमानाचे दु:ख मृत्यूपेक्षा जास्त वाटते. जी व्यक्ती निर्धन व दरिद्री आहे. तीच्यासाठी कोणत्याही प्रकारच्या सभा, उत्सव विषासमान असतात. अशा गोष्टीमध्ये उल्लासाच्या आयोजनात तर फक्त श्रीमंत लोकच जाऊ शकतात. जर एखादा दरिद्री चुकून अथवा मुर्खपणाने अशा प्रकारच्या आयोजनामध्ये जाण्याचे साहस करील तर त्याला नेथून अपमानित होऊन बाहेर पडावे लागेल. म्हणून निर्धन व्यक्ती साठी सभा, मनोरंजन, क्रिडा व संमेलनात जाणे म्हणजे प्रतिष्ठेच्या भावनेने अपमानित करणारेच सिद्ध होते. त्याने तेथे जाऊ नये.

## यांचा त्याग करणेच चांगले:-

त्यजेद्धर्म दयाहीनं विद्याहीनं गुरुं त्यजेत्।
त्यजेत्क्रोधमुखी भार्या निःस्नेहान्बान्धवांस्यजेत्।। 16 ।।

आचार्य चाणक्य येथे त्यागाला योग्य धर्माचा उल्लेख करताना म्हणतात की धर्मामध्ये जर

दया नाही तर त्याचा त्याग केला पाहिजे. विद्येविना गुरूला, क्रोधी पत्नीला तसेच प्रेमहीन भावांचा सुद्धा त्याग केला पाहिजे. अर्थात ज्या धर्मामध्ये दया नाही त्या धर्माचा त्याग केला पाहिजे. रागीट पत्नीचा सुद्धा त्याग करावा. जे भाऊ-बहीण, नातलग, सगे-सोयरे जर प्रेम करीत नाहीत त्यांच्यांशी संबंध ठेऊ नयेत. अर्थात दया नसणाऱ्या धर्माला, विद्याहीन गुरूला, रागीट पत्नीला आणि प्रेमहीन भावा- बंदांचा त्याग करणेच चांगले आहे.

## म्हातारपणाची लक्षणं:-

अधवाजरं मनुष्याणां वाजिनां बन्धनं जरा।
अमैथुंन जरा स्त्रीणां वस्त्राणामातपं जरा।। 17 ।।

जेथे या ओळीमध्ये आचार्य चाणक्य वृद्धावस्थेवर टीका करताना म्हणतात की मनुष्याचा रस्ता, घोड्याचे बांधले जाणे, स्त्रीचे मैथून न करणे आणि वस्त्राचे उन्हात वाळणे म्हणजे म्हातारपण आहे. अर्थात रस्त्याने चालता चालता थकून मनुष्य स्वतःला म्हातारा अनुभवू लागतो. घोडा बांधून ठेवल्यामुळे म्हातारा होतो. संभोगाच्या अभावाने स्त्री स्वतःला म्हातारी समजू लागते. उन्हात वाळविल्यामुळे कपडे लवकर फाटतात व त्यांचा रंग फिका पडतो.

## कामापूर्वीच विचार करा:-

कः कालः कानि मित्राणि को देशः को व्ययागमो:।
कस्याहं का च मे शक्तिरिति चिन्त्यं मुहुर्मुहु:।। 18 ।।

आचार्य चाणक्य जीवनात व्यवहार्य वस्तुंना पूर्णपणे ओळखून घेऊनच त्यांना वापरण्याची गोष्ट प्रतिपादित करताना म्हणतात की कोणती वेळ आहे? कोण मित्र आहे? कोणते स्थान आहे? उत्पन्न-खर्च काय आहे? मी कोणाची व माझी काय शक्ती आहे? याचा वारंवार विचार केला पाहिजे.

अर्थात मनुष्याने कोणतेही कार्यास सुरूवात करण्यापूर्वी या बाबींवर चांगल्या तऱ्हेने विचार केला पाहिजे. ही वेळ ते काम करण्यासाठी योग्य आहे का? माझे खरे मित्र कोण आहेत? जे माझी मदत करतील. या स्थानी ते काम केले पर लाभ होईल का? या कामासाठी किती खर्च होईल आणि त्यापासून उत्पन्न किती येईल? मी कोणाची मदत केली आहे? आणि माझी शक्ती किती आहे?

या प्रश्नांवर विचार करताना मनुष्याने आपले जीवन व्यतीत केले पाहिजे आणि आत्मकल्याणासाठी नेहमी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. जी व्यक्ती या गोष्टींवर विचार करीत नाही ती दगडासारखी निर्जीव असते आणि नेहमी लोकांच्या पायात पडून, सापडून लाथा खात राहते. मनुष्याने समजुतदारीने काम करून जीवन व्यतीत करावे.

## आई-वडीलांचे वेगळे रूप (वडील)

जनिता चोपनेता च यस्तू विद्यां प्रयच्छति।
अन्नदाता भयत्राता पञ्चैता पितर: स्मृता:।। 19 ।।

येथे या श्लोकात आचार्य चाणक्य संस्काराच्या दृष्टीने पाच प्रकारच्या वडीलांचे वर्णन करताना म्हणतात-जन्म देणारा, उपनयन-संस्कार करणारा, विद्या देणारा, अन्नदाता आणि भीतीपासून रक्षण करणारा, हे वडीलांचे पाच प्रकार आहेत.

अर्थात स्वत: आपले वडील जे जन्म देतात, उपनयन (यज्ञोपवीत) संस्कार करणारा-गुरू, अन्न-जेवण देणारा आणि कोणत्याही कठीण प्रसंगी प्राणांची, जीवाचे रक्षण करणारा हे अशा पाच व्यक्तींना वडील मानले गेले आहे. परंतु व्यवहारात वडील म्हणजे जन्म देणारा हेच ग्राह्य मानतात.

## आई:-

राजपत्नी गुरो: पत्नी मित्रपत्नी तथेव च।
पत्नी माता स्वमाता च पञ्चैता: मातर: स्मृता:।। 20 ।।

येथे या श्लोकात आचार्य चाणक्य आईविषयी चर्चा करताना म्हणतात की राजाची पत्नी, गुरूची पत्नी, पत्नीची आई आणि आपली आई व मित्राची पत्नी या पाच प्रकारच्या माता आहेत.

अर्थात आपल्या देशाच्या राजाची पत्नी, गुरूपत्नी, मित्राची पत्नी, आपल्या पत्नीची आई म्हणजेच सासू आणि जन्म देणारी आपली आई या पाचजणींना आई मानतात.

तसे पाहिले तर माता-आई माया करूणेची साक्षात प्रतिमूर्ती असते. जेथून मुलासाठी माया आणि करूणेचा प्रवाह निघतो, तीला आई मानले गेले आहे. म्हणून या पाच ठिकाणाहून भावनामय, करूणामय, हृदयातून भावमय प्रवाह प्रवाहित होतो. यासाठी या पाचांना आई मानले जाते. त्यामुळे यांचे व्यक्तीच्या जीवनात आई सारखेच महत्व आहे.

# पाचवा अध्याय

## अभ्यागत श्रेष्ठ असतो:-

गुरूरग्निर्द्विजातीनां वर्णानां ब्राह्मणो गुरु:।
पतिरेव गुरूः स्त्रीणां सर्वस्याभ्यागतो गुरु।। **1** ।।

आचार्य चाणक्य येथे गुरूची व्याख्या-विवेचनात्मक आणि स्वरूपाची व्याख्या करताना सांगत आहेत की ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन वर्णांचा गुरू अग्नी आहे. ब्राह्मण स्वतः व्यतिरिक्त सर्व वर्णांचा गुरू आहे. स्त्रीचा गुरु पती आहे. घरी आलेला पाहुणा सर्वांचा गुरु असतो.

त्यांचे सांगणे आहे की अग्नीला ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्यांचा गुरू मानले जाते. ब्राह्मणाला क्षत्रिय, वैश्य आणि शुद्रांचा गुरू समजावे लागेल. स्त्रियांचा गुरू त्यांचा पती असतो. घरी आलेला अतिथी सर्व घराचा गुरू मानला गेला आहे. म्हणजेच अभ्यागत तो असतो जो अतिथीच्या रूपात गृहस्थाचे घरी अचानक येतो. त्याचा कोणताही स्वार्थ नसतो तो फक्त आपल्या आतिथ्य करणाऱ्याचे-यजमानाचे भले चिंतितो. यामुळे आचार्य चाणक्याने अभ्यागताला श्रेष्ठ व्यक्ती मानले आहे.

## पुरूषाची पारख गुणांनी होतेः-

यथा चतूर्भिः कनकं परीक्ष्यते
निर्घषणच्छेदन तापताडनैः।
तथा चतुर्भिः पुरुषः परहक्ष्यते
त्यागेन शीलेन गुणने कर्मणा।। **2** ।।

आचार्य चाणक्य येथे गुण कर्मांनी पुरुषाच्या परीक्षेची चर्चा करताना म्हणतात की घासणे, कापणे, तापविणे आणि मारणे या चार प्रकारांनी जशी सोयाची परीक्षा होते. त्याच प्रकारे त्याग, शील, गुण आणि कर्मांनी पुरुषाची परीक्षा होते.

अर्थात सोने खरे आहे की खोटे, हे जाणून घेण्यासाठी अगोदर त्याला कसोटीवर घासले जाते, नंतर कापले जाते व मग आगीत जाळले जाते आणि शेवटी त्याला ठोकले जाते. या पद्धतीने कुलीन व्यक्तीची परीक्षासुद्धा त्याच्या त्यागाने, स्वभावाने, गुणांनी आणि कार्यांनी घेतली जाते. कुलीन व्यक्ती त्याग करणारा सुशील, विद्या इत्यादी गुणांनी युक्त आणि नेहमी चांगले कार्य करणारा असतो.

## संकटाचा सामना कराः-

तावद् भयेषु भेतव्यं याद्रयमनागतम्।

आगतं तु भयं दृष्ट्वा प्रहर्तव्यमशकडया।। **3** ।।

येथे आचार्च चाणक्य डोक्यावर आलेल्या संकटातून निभावण्यासाठीच्या संदर्भात म्हणतात की आपत्ती आणि संकटाना फक्त तेव्हाच भ्यावे जोपर्यंत ते दूर आहेत, पण ते संकट जर डोक्यावर आले तर कोणतीही शंका न ठेवता त्यावर वार केला पाहिजे, ते दूर करण्याचा उपाय केला पाहिजे.

अर्थात जोपर्यंत भीती दूर आहे तोपर्यंतच व्यक्तीने त्याला भ्यायले पाहिजे म्हणजे अशा प्रकारचे कोणतेही कार्य करू नये ज्यामुळे भय होईल, पर जर भीती वाटलीच तर भिऊन, घाबरून सुद्धा कार्य होणार नाही. त्या वेळेस त्याचे निदान शोधले पाहिजे, त्याचा खंबीरपणे मुकाबला केला पाहिजे. नसता संसारात घाबरून, पळण्यासाठी, पलायन करण्यासाठी अशा प्रकारची जागा मिळणार नाही की जिथे भीती नाही आणि अशी भयभीत व्यक्ती कोणतेही कार्य कोठेही करू शकणार नाही. भयाने आयुष्यसुद्धा गुजरणार नाही. त्यामुळे भीतीपासून मुक्त होण्यासाठी त्यावरचा तोडगा शोधणे हाच एक श्रेयस्कर मार्ग आहे. शूर आणि धाडसी पुरूषांचा हाच धर्म आहे.

## दोन व्यक्तींचा स्वभाव सारखा नसतो:-

एकोदरसमुद्भूता एक नक्षत्र जातका।
न भवन्ति समा शीले यथा बदरिकण्टकाः।। **4** ।।

येथे आचार्य चाणक्य म्हणतात की एकाच पोटातून (गर्भातून) एकाच नक्षत्रावर जन्म घेतल्यावर सुद्धा दोन लोकांचा स्वभाव वेगळा-वेगळा असतो. याच प्रकारे एकाच आईचे एकाच नक्षत्रामध्ये जन्मलेले दोन जुव्ठया मुलांचा स्वभाव व आचरण सारखे नसते.

## स्पष्टवादी व्हाः-

निस्पृहो नाधिकारी स्या**न्न** कामी भण्डनप्रिया।
नो विदग्धः प्रियं ब्रूयात् स्पष्ट वक्ता न वंचकः।। **5** ।।

आचार्य चाणक्य स्पष्ट वक्त्याच्या गुणांची चर्चा करताना सांगतात की विरक्त मुनष्य कोणत्याही विषयाचा अधिकारी नसतो. जी व्यक्ती कामी (कामभोगी) नसते तीला श्रृंगाराची आवश्यकता नसते. विद्वान मनुष्य आवडेल ते बोलत नाही आणि स्पष्ट बोलणारा चोर नसतो.

अर्थात जो मनुष्य या दुनियादारीला वीटला आहे, ज्याला वैराग्य आले आहे, त्याच्यावर कोणतेही कार्य सोपवू नये. नटून छटणारा मनुष्य कामी (भोगी) असतो. कारण दुसऱ्यांचे ध्यान आकर्षूण घेण्यासाठीच साज-श्रृंगार करावा लागतो. म्हणून जी व्यक्ती कामी (भोगी) नसते तीला श्रृंगाराविषयी प्रेम नसते. प्रकांड पंडित, विद्वान व्यक्ती नेहमीच खरे बोलतात. ते आवडणारे बोलत नाहीत. स्पष्ट बोलणारा मनुष्य कपटी नसतो.

## यांच्यात द्वेषभावना असतेः-

मूर्खाणां पण्डिता द्वेष्या अधनानां महाधना।
वारांगना कुलीनानां सुभगानां च दुर्भगा।। **6** ।।

आचार्य चाणक्य येथे द्वेष करणाऱ्यांची चर्चा करताना म्हणतात की मुर्ख पण्डिताचा, निर्धन श्रीमंतांचा, वेश्या कुलवधूंचा आणि विधवा सौभाग्यवतींचा द्वेष करतात.

अर्थात मुर्ख व्यक्ती विद्वानाला पाहून जळफळतो व विद्वान लोकांचा द्वेष करतो. याच प्रकारे निर्धन व्यक्ती सेठ सावकारांचा तिरस्कार करतात. त्यांची संपत्ती यांच्या डोळ्यात सलते. वेश्या चांगल्या घराण्यातील मुली-सुनांविषयी जळतात कारण वेश्यांना कुलीन मुलीसारखा भावनात्मक स्नेह, प्रेम मिळत नाही. फक्त त्यांच्या शरीराचे शोषण होते आणि विधवा स्त्रिया सौभाग्यवतींना पाहून मनातल्या मनात आपल्या नशीबाला रडतात की त्यांचे सौभाग्य सुख दैवाने हिरावून घेतले आहे. पतीविहीन असणे त्यांच्यासाठी अभिशाप आहे.

## यांच्यामुळे या वस्तु नष्ट होतातः-

आलस्योपहता विद्या परहस्तं गतं धनम्।
अल्पबीजहतं क्षेत्र हतं सैन्यमनायकम्।। **7** ।।

येथे आचार्य चाणक्य कोण कोणामुळे नष्ट होते. याची चर्चा करताना म्हणतात की आळसामुळे विद्या नष्ट होते. दुसऱ्यांच्या हातात गेल्यावर धन नष्ट होते. कमी बियाणाने शेत आणि विनासेनापती सैन्य नष्ट होते.

येथे अभिप्राय असा आहे की आळशी व्यक्ती विद्येचे रक्षण करू शकत नाही, कारण तो स्वाध्याय आणि मननापासून दूर असतो. दुसऱ्यांच्या हाती गेलेलं धन जेव्हा आवश्यकता आहे तेव्हा मिळत नाही कारण दुसरी व्यक्ती वेळेवर ते परत करू शकत नाही. शेतात थोडे बियाणे टाकल्याने (पेरल्याने) भरपूर पीक येत नाही कारण जेवढे बी पेराल त्याच्याच प्रमाणात पीक येईल. आणि सेनापती नसल्यामुळे सेना रणनीति निश्चित ठरवू शकत नाही. हे स्पष्ट आहे की विद्या मिळविण्यासाठी कष्ट अपेक्षित असतात. खरे धन तेच जे आपल्या ताब्यात आहे, आपल्याजवळ आहे. पीक तेव्हाच चांगले येईल जेव्हा उत्तम बियाणे प्रमाणात पेरले जाईल आणि सेनेचा विजय होईल जीचे संचलन कुशल सेनापतीच्या हातात आहे. या सर्व गोष्टी लक्षात ठेवण्याजोग्या आहेत.

## यांच्यामुळे गुणांची ओळख होतेः-

अभ्यासाद्धार्यते विद्या कुलं शीलेन धार्यते।
गुणेन ज्ञायते त्यार्य कोपो नेत्रेण गम्यते।। **8** ।।

आचार्य चाणक्य येथे विद्या, कुळ-श्रेष्ठता आणि क्रोध रागाची ओळख करून देणाऱ्या तत्त्वांची चर्चा करताना म्हणतात की अभ्यासाने विद्येचे, शील-स्वभावाने कुळाचा, गुणामुळे थोरपणाचा आणि डोळ्यामुळे रागाचा पत्ता लागतो.

अर्थात मनुष्याच्या सोबत राहिल्यानंतर त्याचे कष्ट, बोलण्याची ढब, इत्यादीपासून त्याची

विद्या व त्याच्या आचरणामुळे त्याच्या कुळाचा, खानदाना पत्ता लागतो. व्यक्तीचे चांगले गुण दाखवून देतात की तो एक थोर मनुष्य आहे. वाटल्यास ती व्यक्ती तोंडाने नाही बोलली तरी त्याची नाराजी त्याचे डोळे सांगतात.

## कोण कोणाचे रक्षण करतो-

वित्तेन रक्ष्यते धर्मां विद्या योगेन रक्ष्यते।
मृदुना रक्ष्यते भूपः स**त्स्त्रि** या रक्ष्यते गृहम्।। **9** ।।

आचार्य चाणक्य धर्म, विद्या, राजा आणि घराचे रक्षण करणाऱ्या तत्वांचा परिचय करून देताना सांगतात की धनाने धर्माचे, योगाने विद्येचे, मृदुतेने राजाचे आणि चांगल्या स्त्रीमुळे घराचे रक्षण होते.

अर्थात संपत्तीमुळे मनुष्य आपल्या धर्म-कर्तव्याचे योग्य रीतीने पालन करू शकतो. सदाचार, संयम यांनी विद्येचे रक्षण होते. राजाचा मधुर स्वभाव त्याचे रक्षण करतो आणि चांगल्या आचरणाच्या स्त्रीमुळे घराचे रक्षण होते.

स्पष्ट आहे की धर्म पालन करण्यासाठी संपत्तीची, विद्येच्या गौरवाचे रक्षण करण्यासाठी कार्य-कुशलेची, राजाची लोकप्रियता कायम ठेवण्यासाठी कोमल व्यवहाराची आणि परिवाराचा सन्मान ठेवण्यासाठी स्त्रीच्या सतचारीत्र्याची आवश्यकता असते.

## मुर्खाचा त्याग कराः-

अन्यथा वेदपाण्डित्यं शास्त्रमाचारमन्यथा।
अन्यथा वदतः शान्तं लोकाः क्लिश्यन्ति चान्यथा।। **10** ।।

आचार्य चाणक्य महत्वपूर्ण स्थापलेल्या स्थितींना निरर्थक आणि बेकार म्हणणाऱ्या विषयी विचार व्यक्त करताना म्हणतात की जे लोक वेदांना, पांडित्याला, शास्त्रंना, सदाचाराला आणि शांत मनुष्याला बदनाम करतात, ते व्यर्थच कष्ट करीत असतात.

अर्थात जर कोणी वेद, शास्त्र, बुद्धिमंत, सदाचारी आणि शांत अशा माणसांना वाईट ठरवित असेल तर तो मुर्ख आहे, असे केल्यामुळे त्यांचे महत्व कमी होत नाही. कारण अनेक ऋषी मुनींनी कित्येक वर्षांच्या साधनेनंतर ते तत्वज्ञान प्राप्त केले आहे आणि त्याचा उजेड व्यवहारिक वेद-शास्त्रंच्या रूपात टाकला आणि जनसामान्यांच्या कल्याणासाठी ज्या नियमांचे विधान केले, त्या तत्वज्ञान आणि आचार-परंपरेला विरोध करणे व त्या महान तपोधर्मी, परोपकारी धर्मात्मा महात्म्यांविषयी अवज्ञेची भावना जोपासणे जेथे व्यक्तीच्या मुर्खपणाची पराकाष्ठा आहे, तेथे परंपरागत आणि लोकाधिष्ठीत धर्म आचरणाची उपेक्षा करून समाजाला अधर्माच्या खोल खाईत ढकलण्यासारखे आहे. याला कधी लोकहिताच्या भावनेने प्रेरित कार्य असे म्हणता येणार नाही. म्हणून वेद-शास्त्र आणि महात्मा विरोधी व्यक्ती त्याज्य व निंदनीय आहे. समाजाच्या व्यापक हिताच्या दृष्टीने अशी माणसे प्रत्येक प्रकारांनी दुःखदायी असतात. म्हणून यांचा त्याग करण्यातच समाजाचे हित आहे.

दारि**द्र्य** नाशनं दानं शीलं दुर्गतिनाशनम्।

अज्ञानतानाशिनी प्रज्ञा भावना भयनाशिनी।। **11** ।।

आचार्य चाणक्य त्या आचरणासंदर्भात विचार व्यक्त करीत आहेत ज्याच्या प्रयोगाने मनुष्य मोठी उपलब्धी प्राप्त करतो. त्यांचे म्हणणे आहे की दान दारिद्र्याला नष्ट करते. शांत, शील स्वभावाने दु:खांचा नाश होतो. बुद्धी अज्ञानाला नष्ट करते आणि भावनेने भीतीचा नाश होतो.

अर्थात सामर्थ्यानुसार दान केले पाहिजे. यामुळे आपलेच दारिद्र्य दूर होते. सदाचारामुळे व्यक्तीचे दु:ख नष्ट होते. चांगल्या-वाईट ओळखणारी बुद्धी व्यक्तीच्या अज्ञानाला दूर सारते आणि धाडस करून दृढ भावना केल्यामुळे सर्व प्रकारचे भय दूर होते.

## आत्म्याला ओळखा:-

नास्ति कामसमो व्याधिर्नास्ति मोहसमो रिपु:।
नास्ति कोप समो वह्नि र्नास्ति ज्ञानात्परं सुखम्।। **12** ।।

येथे आचार्य परम सुखाच्या महत्वाचे प्रतिपादन करताना सुखाचे वर्णन करताना म्हणतात की "कामा"सारखी व्याधी नाही, मोह-अज्ञानासारखा शत्रु नाही, क्रोधासारखी आग नाही आणि ज्ञानासारखे सुख नाही.

अर्थात काम-वासना मनुष्याचा सर्वात मोठा रोग आहे, मोहमाया वा अज्ञान सर्वात मोठा शत्रु आहे, क्रोधासारखी आग नाही आणि ज्ञानासारखे सुख नाही.

येथे ज्ञान आणि मोह हे वेदांतदर्शनाचे परिभाषिक शब्द आहेत. मायेच्या भ्रमात जीव आत्म्याला विसरून जातो, यालाच मोह, अज्ञान व माया म्हणतात, आत्म्याला जाणणे यालाच ज्ञान म्हणतात.

## मनुष्य एकटाच असतो:-

जन्ममृत्युर्नियत्येको भुनक्त्येक: शुभाशुभम्।
नरकेषु पतत्येक: एको याति परां गतिम्।। **13** ।।

येथे आचार्य चाणक्य एकाकीपणाच्या भावनेला स्पष्ट करताना म्हणतात की व्यक्ती जगात एकटाच जन्म पावतो, एकटाच मृत्यू स्वीकारतो, शुभ-अशुभ कार्याची फळे एकटाच भोगतो, नरकात एकटाच पडतो आणि एकटाच परमगतीही प्राप्त करतो.

याचा आशय असा आहे की मनुष्य जरी एक समाजात राहणारा प्राणी आहे. समाजाच्य अनेक कार्य तो इतर लोकांच्या बरोबर मिळून-मिसळून करतो, पण या कामांना त्याने एकट्यानेच पार पाडावे लागते कारण-

मनुष्य एकटाच जन्म घेतो.

एकटाच भाग्याचे शुभ-अशुभ कर्म भोगतो.

एकटाच नरकात पडतो व एकटाच परमपद (मोक्ष) प्राप्त करतो.

या सर्व कार्यात त्याची कोणाशीही भागीदारी नसते.

## संसाराला काडीसारखे समजा:-

तृणं ब्रह्मविद् स्वर्गं तृणं शूरस्य जीवनम्।
जिमाक्षस्य तृणं नारी निःस्पृहस्य तृणं ज**ग्त** ।। **14** ।।

येथे आचार्य चाणक्य सांसारिकतेला काडीसमान आहे हे सांगून म्हणतात की ब्रह्मज्ञान्याला स्वर्ग, वीराला आपले जीवन, संयमीला स्त्री आणि निस्पृहाला सर्व संसार काडीसमान असतो.

याचा आशय असा आहे की जी व्यक्ती ब्रह्म जाणते, तीला स्वर्गाची कांहीच ईच्छा नसते, कारण स्वर्गातील सुखे भोगल्यानंतर पुन्हा जन्म घ्यावा लागतो. ब्रह्मज्ञानी ब्रह्मत विलीन होऊन जातो, म्हणून त्याच्यासाठी स्वर्गाचे कांहीच महत्व राहात नाही. युद्धभूमीत शौर्य दाखविणारा योद्धा आपल्या जीवनाची पर्वा करीत नाही. जो मनुष्य आपल्या इंद्रियांना जिंकून घेतो, त्याच्यासाठी स्त्री काडी सारखी मामूली क्षुल्लक वस्तु होते, ज्या योग्याच्या सर्व ईच्छा समाप्त झालेल्या असतात तो साऱ्या विश्वाला काडीसमान मानतो.

मित्राचे वेगळे रूपः-

विद्या मित्रं प्रवासेषु भार्या मित्रं गृहेषु च।
व्याधिस्यौषधं मित्रं मृतस्य च।। **15** ।।

येथे आचार्य चाणक्य मित्राची चर्चा करताना म्हणतात की घराच्या बाहेर विदेशात राहिल्यानंतर विद्या मित्र होते, घरात पत्नी मित्र असते, रोग्यासाठी औषध मित्र असते आणि मृत्यूनंतर व्यक्तीचा धर्म त्याचा मित्र होतो. या प्रकारे प्रत्येक प्रकाराने मित्राची पर्वा केली पाहिजे आणि वेळेनुसार मित्र-विचार करणेच श्रेयस्कर असते.

कोण केव्हा बेकार आहे:-

वृथा वृष्टिः समुद्रेषु वृथा तृप्तेषु भोजनम्।
वृथा दानं धनाढ्येषु वृथा दीपो दिवापि च।। **16** ।।

आचार्य चाणक्य वृथा यावर विचार करताना म्हणतात की समुद्रात पाऊस व्यर्थ आहे. तृप्त व्यक्तीला भोजन देणे व्यर्थ आहे. श्रीमंताला दान देणे व्यर्थ आहे आणि दिवसा दिवा व्यर्थ आहे.

अर्थ असा आहे की समुद्रात पावसाचा काय फायदा. ज्याचे पोट भरलेले आहे त्याला जेवण देणे, श्रीमंत व्यक्तीला दान देणे वा दिवसा दिवा जाळणे व्यर्थ आहे. कोणतेही काम स्थान, मनुष्य आणि वेळ पाहून करणेच योग्य असते.

आवडत्या वस्तूः-

नास्ति मेघसमं तोयं नास्ति चात्मसमं बदल्।
नास्ति चक्षुसमं तेजो नास्ति चान्नसमं प्रियम्।। **17** ।।

आचार्य सर्वात आवडत्या वस्तुची चर्चा करताना सांगतात की मेघसारखे पाणी कोणतेच नाही. आपल्या बळासारखे कोणतेही बळ नाही. नेत्रसारखी कोणती ज्योती नाही आणि

अन्नसारखी कोणतीच वस्तु आवडती नसते.

अर्थात मेघांचे पाणी सर्वात जास्त उपयोगी असते. स्वतःचे बळ सर्वात मोठे बळ असते, याबरोबर अन्य कोणत्याही बळाचा विश्वास करता येत नाही. नेत्रांची ज्योतीच सर्वात चांगली ज्योती आणि जेवण प्रत्येक प्राण्याची सर्वात जास्त आवडती वस्तु आहे.

## जे समोर नाही त्याच्याशी काय ममताः-

> अधना धनमिच्छन्ति वाचं चैव चतुष्पदाः।
> मानवाः स्वर्गमिच्छन्ति मोक्षमिच्छन्ति देवताः।। **18** ।।

आचार्य चाणक्य अप्राप्य वस्तूविषयी व्यक्ती व्यक्तीच्या आसक्तीची प्रवृत्ती वर टीका करताना सांगतात की निर्धन माणसं संपत्तीची इच्छा करतात आणि चौपाद म्हणजेच पशु बोलण्याच्या शक्तीची मागणी करतात. मनुष्य स्वर्गाची इच्छा करतो आणि स्वर्गात राहणारे देवता मोक्ष-प्राप्तीची इच्छा करतात. आणि याच पद्धतीप्रमाणे जे प्राप्त आहे सर्वजण त्याच्या पुढील वस्तूची कामना करतात.

वस्तुतः पाहिले तर या विश्वात एक साधे व सरळ सत्य आहे की ज्या व्यक्तीजवळ ज्या वस्तूचा अभाव असतो, तो तीच वस्तु प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो. त्याच वस्तूची लालसा असते. तीलाच तो जास्त महत्व देतो. जसे की निर्धन व्यक्ती सर्वात जास्त महत्व संपत्तीला देतो. संपत्तीच्या प्राप्तीसाठी तो नेहमी व्याकूल असतो. पशुसाठी सर्वात मोठी उणीव म्हणजे वाणी होय. ते ती मिळविण्याची इच्छा ठेवतात मनुष्य स्वर्ग मिळण्याची कामना करतो. आणि स्वर्गात राहणारे देवता मोक्ष प्राप्तीची इच्छा करतात.

आचार्य चाणक्यांनी या श्लोकात किंवा या श्लोकाचा मूळ अर्थ, भावना हीच आहे की या विश्वातील सर्व प्राणीमात्र कोणत्या ना कशाच्या तरी अभावाने त्रस्त आहेत. जे काही त्यांना प्राप्त आहे, त्यांच्याजवळ आहे, त्याला महत्व न देता ते नेहमी अप्राप्य वस्तूची कामना करीत असतात.

> सत्येन धार्यते पृथ्वी सत्येन तपते रविः।
> सत्येन वाति वायुश्च सर्वं सत्य प्रतिष्ठतम।। **19** ।।

आचार्य चाणक्य सत्याची प्रतिष्ठा करताना असे म्हणतात की पृथ्वी सत्यावरच अवलंबून आहे. सूर्य सत्यामुळेच तापतो सत्यानेच वारा वाहतो. सर्व काही सत्यामुळेच प्रतिष्ठीत आहे.

अर्थात परमात्मालाच सत्य म्हटले जाते. सत्यामुळेच पृथ्वी अजून टिकून आहे. सूर्य आणि वायु सत्यामुळेच आपले कार्य करतात आणि हे सारे विश्व सत्यकारणानेच कार्य करते, याचा आधार सत्य आहे.

## धर्मच अटळ आहे:-

> चला लक्ष्मीश्चलाः प्राणाश्चले जीवितमन्दिरे।
> चलाचले च संसारे धर्म एको हि निश्चलः।। **20** ।।

आचार्य चाणक्य येथे धर्म-चर्चा करताना म्हणतात की लक्ष्मी चंचल आहे. प्राण, जीवन शरीर

सगळं कांही चंचल आहे, नाशवंत आहे. विश्वात फक्त धर्म निश्चल आहे. अर्थ असा आहे की लक्ष्मी-धन-संपत्ती सर्व चंचल आहे. ही कधी एकाजवळ राहाते तर कधी दुसऱ्याकडे निघून जाते. हिचा कधीच विश्वास करू नये आणि हिच्यावर गर्वही करू नये. प्राण, जीवन, शरीर आणि हे सारे विश्वसुद्धा नेहमी राहणार नाही. एक न एक दिवस हे सर्व नष्ट होणार आहे. संसारात फक्त धर्मही एकच वस्तु अशी आहे जी कधी नष्ट होत नाही. धर्मच मनुष्याचा खरा सोबती आहे, सर्वात मोठी संपत्ती आहे, जी जीवनात कामी येतेच पण जीवनानंतर सुद्धा. म्हणून संपत्तीचा नेहमी संचय करावा. धन-संपत्ती, प्राण, शरीर इत्यादींचा मोह कधीही जास्त करता कामा नये.

## यांना धूर्त माना:-

नाराणां नापितो धूर्तः पक्षिणां चैव वायसः।
चतुष्पदां श्रृगालस्तु स्त्रीणां धूर्ता च मालिनी।। **21** ।।

येथे आचार्य चाणक्य धूर्तांची चर्चा करताना सांगतात की पुरुषामध्ये न्हावी, पक्ष्यांमध्ये कावळा, चतुष्पादात कोल्हा आणि स्त्रियांमध्ये माळण ही धूर्त असते.

आशय असा आहे की पुरुषामध्ये न्हावी धूर्त असतो. पक्ष्यांमध्ये कावळा धूर्त मानला जातो. चतुष्पाद पशुमध्ये कोल्ह्याला आणि स्त्रियांमध्ये माळण हिला धूर्त समजलं जातं.

# सहावा अध्याय

## ऐकले पण पाहिजेः-

श्रुत्वा धर्म विजानाति श्रुत्वा त्यजति दुर्मतिम्।
श्रुत्वा ज्ञानमवाप्नोति श्रुत्वा मोक्षमवाप्नुयात्।। **1** ।।

येथे आचार्य चाणक्य ऐकून घेऊन ज्ञान प्राप्ती करणारी प्रक्रिया स्पष्ट करताना म्हणतात की ऐकूनच मनुष्याळा आपल्या धर्माचे ज्ञान होते, ऐकूनच तो आपल्या वाईट बुद्धीचा त्याग करतो. ऐकूनच त्याला ज्ञान प्राप्त होते आणि ऐकूनच त्याला मोक्ष मिळते.

आशय असा आहे की आपल्या पूजनीय लोकांचे किंवा महापुरुषांच्या तोंडून ऐकूनच मनुष्याला आपल्या धर्माचे म्हणजेच कर्तव्याचे ज्ञान होते, ज्यामुळे तो त्याला पतनाकडे, अधोगती कडे नेणाऱ्या कार्यांचा त्याग करतो. ऐकूनच ज्ञान आणि मोक्ष मिळतात. म्हणून हे स्पष्ट आहे की गोष्टी वाचून समजून घेण्याच्या तुलनेत एखाद्या ज्ञानी गुरुच्या तोंडून ऐकणे अधिक ग्राह्य मानले जाते. असे अनेक महापुरुष झाले आहेत. ज्यांनी फक्त ऐकूनच बरेच कांही जाणून घेतले. त्यामुळेच मनुष्याचे कर्तव्य आहे की तो स्वतः जरी शास्त्र वाचू शकला नाही तरी कोण धर्मोपदेशका कडून ऐकून ग्रहण केले तरी त्याच्या पूर्ण लाभ त्याला मिळेल.

## दुष्ट (चाण्डाल)प्रकृतीः-

पक्षिणं काकश्चाण्डाल पशूनां चैव कुक्कुरः।
मुनीनां पापश्चाण्डालः सर्वेषु निन्दकः।। **2** ।।

आचार्य चाणक्य चांडाळाविषयी सांगतात की पक्ष्यामध्ये कावळा, पशुमध्ये कुत्रा, मुनीजनामध्ये पापी आणि निंदक सगळ्या प्राण्यात चांडाळ असतो.

अर्थ असा आहे की पक्षांमध्ये कावळ्याला चांडाळ समजले पाहिजे. पशुमध्ये कुत्रा आणि मुनीजनांमध्ये पापी यांना चांडाळ समजले पाहिजे. दुसऱ्यांचे वाईटपण सांगणारी व्यक्ती पक्षी, पशु आणि मानवातसुद्धा सर्वात मोठा चांडाळ मानला जातो. अर्थात निंदक चांडाळापेक्षा चांडाळ असतो कारण ज्या व्यक्तीच्या अपरोक्ष त्याची निंदा केली जाते त्याच्या अनुपस्थितीत निंदकालाच त्याचे पाप भोगावे लागते. म्हणून सर्वात हे चांगळे की निंदेच्या प्रवृतीपासून दूर रहा. मनुष्याचा हा सर्वात मोठा कमकुवतपणा आहे की तो निंदेमध्ये जास्त रस घेतो. यामध्ये वेळेच्या अपव्ययाशिवाय हाती कांही लागत नाही,

## यांच्यामुळे शुद्धी होतेः-

भस्मना शुद्धयते कांस्य ताम्रमम्लेन शुद्धयति।

राजसा शुद्धयते नारी नदी वेगेन शुद्धयति। **3** ।।

शुद्धीची चर्चा करताना आचार्य म्हणतात की तांबे आम्लाने शुद्ध होते, कासे भस्माने, नारी रजःस्वला झाल्यानंतर आणि नदी वाहत्या वेगाने शुद्ध होते.

अर्थ हा आहे की राखेने स्वच्छ घासल्यांतर कासे उजळून निघते. तांबे तेजाब वापरून स्वच्छ करता येते. प्रत्त्येक महिन्यात होणाऱ्या मासिक धर्माने स्त्रिया आपोआप शुद्ध होतात आणि वाहत राहिल्याने नदी शुद्ध होते.

असे म्हणता येईल की जी नदी हळूहळू वाहते तीचे पाणी घाण आणि नेहमी अशुद्ध असते. तेच वेगाने वाहणाऱ्या नदीचे पाणी शुद्ध व स्वच्छ असते. या प्रकारे स्त्रीची शुद्धी तीच्या रजस्वला होऊन गेल्यानंतरच होते. त्यानंतरच ती गर्भधारणेस योग्य होते. रजोधर्म नसलेली स्त्री बंध्या (वांझ) असते.

## प्रवास आवश्यक आहे:-

भ्रमन्सपूज्यते राजा भ्रमन्सम्पूज्यते द्विजः।
भ्रमन्सम्पूज्यते योगी स्त्री भ्रमती विनश्यति।। **4** ।।

आचार्य चाणक्य येथे प्रवासाच्या म्हत्वाचे प्रतिपादन करताना सांगतात की सतत हिंडणारा-फिरणारा राजा पूजनीय असतो, प्रवास करणाऱ्या ब्राह्मणाची पुजा होते. पर्यटन करणाऱ्या योग्याची पुजा होते आणि भ्रमण करणारी स्त्री नष्ट होते.

अर्थ असा आहे की एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणाकडे नेहमी प्रवास करणारा राजा, विद्वान आणि योग्यांची तर पुजा होते परंतु असे करणारी स्त्री नष्ट होते. प्रवास करणे राजा, विद्वान आणि योगी या तिघांनाच शोभते, स्त्रीला नाही.

## संपत्तीचा प्रभावः-

यस्यार्यास्तस्य मित्राणि यस्यार्थास्तरच बान्धवाः।
यस्यार्थः स पुमांल्लोक यस्यार्थाः स च चण्डितः।। **5** ।।

आचार्य चाणक्य धनवंत झाल्यामुळे आलेल्या गुणवत्तेची चर्चा करताना सांगतात की ज्या व्यक्तीजवळ पैसा आहे, लोक स्वतःहून त्याचे मित्र होतात. भाऊबंद पण येऊन त्याला बिलगतात. जो श्रीमंत आहे त्यालाच आजच्या युगात विद्वान आणि सन्मानित व्यक्ती मानली जाते. श्रीमंत व्यक्तीलाच विद्वान आणि बुद्धीमंत समजले जाते.

वस्तुस्थितीच अशी आहे की शेकडो वर्षापूर्वी आचार्य चाणक्याने सांगीतलेले तथ्य आजच्या युगात पूर्ण तऱ्हेने सत्त्य रूपात अस्तित्वात आहे. हे तर नेहमीच पाहिले जाते की ज्याच्या जवळ संपत्ती नाही, मित्र भाऊबंद त्याच्यापासून दूर जातात, भाऊबंद आणि कुटुंबीय त्याचा त्याग करतात. येथपर्यंत मजल जाते की निर्धन व्यक्तीला माणूस समजणे सुद्धा अवघड होते. अशा व्यक्तीला कोणीही मानव समजतच नाहीत. अनेक गुणांनी युक्त पण निर्धन व्यक्ती आजच्या काळात उपेक्षितच राहतो. हाच संपत्तीच्या मोठेपणाचा लौकिक प्रभाव आहे.

बुद्धी भाग्याची देणगी असतेः-

तादृशी जायते बुद्धीर्व्यवसायोऽपि तादृशः।
सहायास्तादृशा एव यादृशी भवितव्यता।। **6** ।।

आचार्य चाणक्य येथे भाग्याला महत्त्व देताना बुद्धी ही भाग्याची देणगी असल्याचे प्रतिपादन करताना सांगतात की मनुष्य जसे भाग्य घेऊन येतो, त्याची बुद्धी त्याच सारखी होऊन जाते. काम-धंदा ही त्यानुसारच मिळतो. त्याचे सहकारी, सगे-सोबती सुद्धा भाग्यानुरूपच असतात. सर्व क्रियाकल्प भाग्यानुसारच होत असतात.

सांगण्याचा अर्थ असा आहे की मनुष्याचे प्रारब्ध अटळ आहे. जे होणार आहे ते होणारच. यामुळे कित्येक वेळा मनुष्याने कल्पीलेल्या गोष्टी, त्याचे कौशल्य व त्याचे प्रयत्न असफल होतात. शास्त्रंमध्ये हे लिहिलेले सुद्धा आहे की विपत्ती आल्यावर मनुष्याची चांगली बुद्धी सुद्धा बेकार होते. म्हणजेच 'विनाशकाळे विपरीत बुद्धी' अशी होते. इतिहासात अशी अनेक उदाहरण पाहायला भेटतिल की अनेक महापुरूषांनी या चक्रात सापडून भयंकर चुका केलेल्या आहेत. श्रीरामाचेच उदाहरण घ्या. मर्यादा पुरुषोत्तम असून सुद्धा मायावी सुवर्णमृगाच्या मागे धावले आणि सीताहरणासारखी महान घटना घडली. हे सर्वांनाच माहित आहे. याचा हाही अभिप्राय नाही की मनुष्याने एखाद्या उज्जल भवितव्याच्या भरवशाने आपल्या उद्योगाचा त्याग करावा. त्याने फळाची इच्छा न करता कर्म करीत राहावे. कर्मच भाग्याला सुद्धा बदलण्याची क्षमता बाळगून आहे.

काळ प्रबळ असतो:-

कालः पचति भूतानि कालः संहरते प्रजा:।
कालः सुप्तेषु जागर्ति कालो हि दुरतिक्रम:।। **7** ।।

आचार्य चाणक्य काळाच्या प्रभावाची चर्चा करताना सांगतात की काळच प्राण्यांना समाप्त करतो, काळच सृष्टीचा विनाश करतो. प्राणी निद्रिस्त झाल्यानंतर ही तो त्यांच्यातच असतो. यावर याचे कोणीही अतिक्रमण करू शकत नाही. अर्थ असा आहे की काळ किंवा वेळ सर्वात जास्त बलवान आहे. काल हळू हळू सर्व प्राणी आणि विश्वालासुद्धा गिळंकृत करतो. प्राणी निद्रीस्त झाले तरी हा चालतच असतो. प्रत्येक क्षणाला त्याचे वय कमी कमी होत असते. याला कोणीही टाळू शकत नाही कारण काळाच्या प्रभावापासून स्वतःला वाचविणे हे व्यक्तीसाठी असंभव आहे. योग-साधना केली तरीही आणि वैज्ञानिक उपायांचा आधार घेतला तरी काळाचा प्रभाव हटविता येणार नाही. काळाचा प्रभाव प्रत्येक वस्तुवर पडतो. शरीर निर्बळ होते, वस्तु जीर्ण व क्षतिग्रस्त होतात. सर्वजण पाहतात आणि जाणून असतात की व्यक्ती ज्याप्रमाणे तारूण्यात ज्या प्रकारची धाडसी कामे करू शकत होती तेच वृद्धावस्थेत असे कांहीही करू शकत नाही. वृद्धपणाची चिन्हे व्यक्तीच्या शरीरावर काळाचीच पाऊले आहेत. काळाला वळवून मागे फिरविता येत नाही म्हणजेच गेलेली वेळ परतून येत नाही. हे अगदी पूर्ण सत्य आहे की काळाची गती रोकणे देवांना सुद्धा शक्य नाही. अनेक कविजनांनी काळाच्या महिम्याचे वर्णन केले आहे. भतृहरीने सुद्धा म्हटले आहे की काळ समाप्त होत नाही तर मनुष्याचे शरीरच काळाचा घास बनतो. हाच सृष्टीचा

नियम आहे. म्हणून वेळेचे महत्व जाणून आचरण करीत राहावे.

### जेव्हा कांहीच दृष्टीला पडत नाहीः-

नैव पश्यति जन्मान्धः कामान्धो नैव पश्यति।
मदोन्मत्ता न पश्यन्ति अथी दोषं न पश्यति।। **8** ।।

आयार्च चाणक्य येथे मनुष्याच्या दृष्टी-क्षमतेच्या बाबतीत विचार प्रकट करतात की जन्मांध कांहीच पाहू शकत नाही. तसेच कामांध आणि नशेत तर्र झालेला मनुष्य कांही पाहू शकत नाही. स्वार्थी स्वार्थी मनुष्यसुद्धा कोणातही कसलाही दोष पाहात नाही.

अर्थ हा आहे की जन्मानेच अंध असणारा मनुष्य जगातील कोणती ही वस्तु पाहू शकत नाही. काम वासनेचे भूत स्वार झाल्यावर कामविव्हळ मनुष्यसुद्धा लोक-लाज, समाज-व्यवहार यांची फिकीर करीत नाही. या प्रकारे स्पष्ट आहे की कामपीडित, मद्य व मादक पदार्थांनी प्रभावित आणि आपली आवश्यकता पूर्ण करण्यासाठी मोहात मनुष्य अंध आणि विवेकहीन व विचारशून्य होतो.

### कर्माचा प्रभावः-

स्वयं कर्म कोत्यात्मा स्वयं तत्फलमश्नुते।
स्वयं भ्रमति संसारे स्वयं तस्मद्विमुच्यते।। **9** ।।

आचार्य चाणक्य कर्मफळाचा प्रभाव स्पष्ट करताना म्हणतात की प्राणी स्वतः कर्म करतो आणि स्वतःच त्याचे फळ भोगतो. स्वतः संसारामध्ये भटकतो आणि स्वतःच त्यापासून मुक्त होतो.

अर्थ असा आहे की मनुष्य स्वतः कर्म करतो. कर्मांच्या आधारावर त्याला चांगले वाईट फळे मिळतात. या फळांच्या आधारावरच संसारात त्यांचा वारंवार जन्म होतो, आणि वारंवार मृत्यू होतो. चांगले कर्म केल्याने पुनर्जन्मात सुख आणि वाईट कर्म केल्यावर दुःख प्राप्त होतात. वारंवार जन्ममृत्यूचे हे चक्र म्हणनेच या संसारात भटकणे आहे. या सगळ्याना स्वतःच तोंड द्यावे लागते. तेव्हा कोठे त्याला ज्ञान होते आणि तेव्हाच तो स्वतःच या चक्रातून मुक्त होऊन मोक्ष प्राप्त करतो.

राजा राष्ट्रकृतं पापं राज्ञः पापं पुरोहितः।
भर्ता च स्त्रीकृतं पापं शिष्य पाप गुरूस्तथा।। **10** ।।

आचार्य चाणक्य कर्माचे दूरलक्षी प्रभावांची चर्चा करताना सांगतात की राष्ट्राने केलेले पाप राजा भोगतो. राजाचे पाप त्याचे पुरोहित, पत्नीचे पाप पती आणि शिष्याचे पाप गुरू भोगतो.

अर्थ असा आहे की प्रजेचे पाप राजाला, राजाचे पाप त्याच्या पुरोहिताला, स्त्रीचे पाप तीच्या पतीला आणि शिष्याचे पाप त्याच्या गुरूला भोगावे लागते. कारण तसे पाहिले तर याचा प्रत्यक्ष संबंध राजाने आपले कर्तव्य पालन न करण्याशी आहे. राजा जर आपल्या राज्यात कर्तव्यपालन करीत नाही, त्या बाबतीत जर उदासीन राहतो त तेथे पाप-वृत्ती वाढते, अराजकता माजते त्याचा

दोष राजालाच असतो. पुरोहिताचे कर्तव्य आहे की राजाला चांगला, नेक सल्ला घावा, त्याला सन्मार्गाकडे प्रवृत करावे, त्याला सत्त्य गोष्टी सांगून अपकृत्त्य अनुचित कर्म करण्यास मना करावे. जर पुरोहित आपल्या कर्तव्याचे पालन करीत नसेल तर त्याच्यामुळे राजा पापकर्म करण्यास प्रवृत होत असेल तर त्याचे फळ पुरोहिताला अथवा मंत्र्याला भोगावे लागेल, कारण राजाला नियंत्रित ठेवणेही त्यांची जवाबदारी आहे. याच पद्धतीने पतीचे कर्तव्य आहे की पत्नीला पापकर्म करण्यास प्रेरित होऊ देऊ नये, तीला आपल्या नियंत्रणात ठेवावे. जर पत्नीने कांही वाईट काम केले तर त्याचे फळ पतीला भोगावे लागेल. तसेच गुरूचे कर्तव्य आहे की शिष्याला अचूक, योग्य मार्गदर्शन करावे, त्याला सत्कर्मासाठी उत्तेजन देणे, जर गुरू आपल्या कर्तव्याशी सजग नाही राहिला व शिष्य पापकर्माला प्रवृत झाला तर ते पाप गुरूच्या माथी लागते. राजा, पुरोहित आणि पतीचे कर्तव्य आहे की त्यांनी प्रजा, राजा, पत्नी व शिष्याला सन्मार्गाकडे प्रेरित करावे.

## शत्रु कोणः-

ऋणकर्ता पिता शत्रुर्माता व व्यभिचारिणी।
भार्यारूपवती शत्रुः पुत्र शत्रु र्न पंडितः।। **11** ।।

आचार्य चाणक्य शत्रुच्या स्वरुपाची चर्चा करताना सांगतात की ऋण घेणारा पिता शत्रु असतो. व्यभिचारिणी आईसुद्धा शत्रु असते. रूपवती पत्नी शत्रु असते आणि मुर्ख पुत्र शत्रु असतो.

अर्थ हा आहे की पुत्रामागे कर्ज सोडून जाणारे वडील शत्रुसमान असतात. वाईट वर्तणूकीची आईसुद्धा संततीसाठी शत्रुसमान असते. अति सुंदर पत्नीला सुद्धा शत्रु समान मानले पाहिजे आणि मुर्ख पुत्र सुद्धा आई-वडीलांसाठी शत्रु सारखाचा असतो.

वस्तुतः कर्ज काढून घर खर्च चालविणारे वडील शत्रुच असतात कारण की त्यांच्या मृत्यूनंतर ते कर्ज संततीला फेडावे लागते. व्याभिचारिणी आई सुद्धा शत्रुरूपात निंदनीय व त्याज्य आहे. कारण ती धर्मबाह्य वर्तन करून वडील व पती दोन्ही कुळांना कलंकीत करते. अशा आईच्या मुलांना सामाजिक अपमान सहन करावा लागतो. यापद्धतीने जी स्त्री आपल्या सौंदर्याच्या अभिमानाने आपल्या पतीची उपेक्षा करते, तीला सुद्धा शत्रु मानले पाहिजे. कारण ती कर्तव्यात कसूर करते. मुर्ख पुत्रसुद्धा कुळाला कलंक असतो. तो सुद्धा त्याज्य आहे. यामुळे आपल्या उद्योगाने कुटुंबाचा निर्वाह करणारे वडील, पतीव्रता आई आणि आपल्या रूप व सौंदर्याचा गर्व न करणारी स्त्री आणि विद्वान पुत्रच हितकारी असतात.

## यांना वश कराः-

लुब्धकर्थेन गृह्णीयात्स्तब्धमंजलिकर्मणा।
मुर्खश्छन्दानुरोधेने यथार्थवादेन पण्डितम्।। **12** ।।

येथे आचार्य चाणक्य वशीकरणासंबंधी सांगतात की लोभीला संपत्ती देऊन, अहंकाऱ्याला हाथ जोडून, मुर्खाला उपदेश करून आणि विद्वानाला खरे सांगून वश करावे.

अर्थ असा आहे की लालची, लोभी मनुष्याला धन देऊन कोणतेही काम करवून घेता येते. घमेंडी व्यक्तीकडून जर कांही काम करवून घ्यायचे असेल तर त्याच्यासमोर हात जोडून, नम्रतेने वाकून चालले पाहिजे. मुर्ख व्यक्तीला तर फक्त समजावून सांगून करूनच वश करता येते. विद्वान व्यक्तीला सत्त्य सांगावे. स्पष्ट बोलून त्यांना वश करण्यात येते.

## दुष्टापासून सावध रहाः-

कुराजराज्येन कुतः प्रजासुखं
कुमित्रमित्रेण कुतोऽ भिनिवृतित्तः।
कुदारदारैश्च कुतो गृहे रतिः
कृशिष्यमध्यापयतः कुतो यशः।। **13** ।।

आचार्य चाणक्य येथे दुष्टांचा प्रभाव वर्णिताना म्हणतात की दुष्ट राजाच्या राज्यात प्रजा सुखाने कशी काय राहू शकेल? दुष्ट मित्रपासून आनंद कसा काय मिळू शकेल? दुष्ट पत्नीकडून घरात सुख कसे येईल? आणि दुष्ट-मुर्ख शिष्याला शिक्षण देण्यात यश कसे मिळेल?

अर्थ असा आहे की दुष्ट-निकम्मा-निष्क्रिय राजाच्या राज्यात प्रजा नेहमी दुःखी असते. दुष्ट मित्र सतत दुःखीच करतो. दुष्ट पत्नी घरची शुख-शांती नाहीशी करून टाकते आणि दुष्ट शिष्याला शिकविण्यात कधीच यश मिळणार नाही. म्हणून दुष्टराजा, दुष्ट मित्र, दुष्ट पत्नी आणि दुष्ट शिष्य हे नसणेच अधिक चांगले. त्यामुळे सुखी राहाण्यासाठी चांगल्या राजाच्या राज्यात राहावे, संकटातून बचावण्यासाठी चांगल्या व्यक्तीचे मित्र व्हावे आणि चांगल्याच व्यक्तीला मित्र करावे. रतिभोगाच्या सुखासाठी कुलीन कन्येबरोबर विवाह करावा आणि यश व कीर्ती मिळण्यासाठी योग्य व्यक्तीला शिष्य करावे.

## कोणाकडूनही शिकून घ्यावेः-

सिंहांदेकं बकादेकं शिक्षेच्चत्वारि कुक्कुटात्।
वायसात्पंच शिक्षेच्च षट् शुनस्त्रीणि गर्दभात्।। **14** ।।

येथे आचार्य चाणक्य शिकण्याची बाब कोणाही लायक माणूस, पशु, पक्ष्याकडून शिकावे. अशी बाजू मांडून म्हणतात की सिंहाकडून एक, बगळ्याकडून एक, कोंबड्याकडून चार, कावल्याकडून पाच, कुत्र्याकडून सहा आणि गाढवापासून सात गोष्टी शिकल्या पाहिजेत.

चाणक्याने सांगितले आहे की शिकायचेच तर मनुष्य कोणापासूनही कांहीही शिकू शकतो. पण यातसुद्धा मनुष्य ज्यांच्यापासून कांही गुण शिकू शकतो त्यात त्याला सिंह आणि बगळ्यापासून एक एक, गाढवापासून तीन, कोंबड्यापासून चार, कावळ्यापासून पाच आणि कुत्र्यापासून सहा गुण शिकावेत.

याचा मूळ अर्थ असा आहे की मनुष्याला जेथून कोठून एखादी चांगली गोष्ट दिसेल ती शिकून घेण्यास संकोच करू नये. जर एखाद्या नीच माणसाजवळ एखादा गुण असेल तर तो सुद्धा शिकून घेण्याचा प्रयत्न करावा. पुढील चार श्लोकात या गुणांचे वर्णन विस्ताराने केले आहे.

सिंहापासून:-

> प्रभूतं कार्यमपि वा तत्परः प्रकर्तुमिच्छति।
> सर्वारम्भेण तत्कार्यं सिंहादेकं प्रचक्षते।। **15** ।।

येथे आचार्य चाणक्य सिंहापासून घेतल्या जाणाऱ्या बाबींविषयी सांगत आहेत की लहान वा मोठे जे कांही कार्य करायचे आहेत ते पूर्ण शक्ती लावून करावे. हा गुण आपण सिंहापासून शिकला पाहिजे.

अर्थ असा आहे की सिंह जे कांही काम करतो त्यात तो आपली सगळी शक्ती लावतो. म्हणून जे कांही काम करायचे आहे पूर्ण जीव ओतून मनोभावे करावे.

बगळ्यापासून:-

> इन्द्रियाणि च संयम्च बकवत्पण्डितो नरः।
> देशकाल बलं ज्ञात्व सर्वकार्याणि साधयेत्।। **16** ।।

येथे आचार्य चाणक्य बगळ्यापासून घ्यायच्या शिक्षणाविषयी सांगत आहेत. बगळ्यासारखा इंद्रियांना वश करून देश, काळ आणि बळ जाणून घेऊन विद्वानांनी आपले कार्य सफल करावे.

अर्थ असा आहे की बगळा सगळे काही विसरून एकटक मासोळीला पाहात राहतो आणि संधी मिळताच त्याला पकडतो. मनुष्याने सुद्धा काम करतेवेळी अन्य सर्व गोष्टींना विसरून फक्त देश, काळ आणि बळाचा विचार केला पाहिजे. देश - या स्थानी हे काम करून काय लाभ होणार? येथे या वस्तुला किती मागणी आहे? इत्यादीवर विचार करणे देशाच्या जागेवर विचार करणे आहे. काळ-वेळ-कोणती वेळ कोणत्या कामासाठी अनुकूल असेल? आणि बळ-माझी शक्ती किती आहे? माऱ्याजवळ किती पैसा वा किती अन्य साधनं आहेत? या सर्व गोष्टीवर काम सुरू करण्यापूर्वी विचार करावा.

गाढवापासून:-

> सुश्रान्तो**ऽ** पिद वेहद् भारं शीतोष्णं न पश्यति।
> सन्तुष्टश्चरतो नित्यं त्रीणि शिक्षेच्च गर्दभात्।। **17** ।।

येथे आचार्य चाणक्य गाढवापासून शिकल्या जाणाऱ्या गुणांची चर्चा करताना म्हणतात की श्रेष्ठ आणि विद्वान व्यक्तींनी गाढवापासून तीन गुण शिकावेत. जसा गाढव अत्याधि क थकावटीनंतरसुद्धा ओझे वहात असतो त्याच प्रकारे बुद्धीमान व्यक्तीने आळस न करता आपल्या ध्येय प्राप्ती आणि सिद्धी साठी सदैव प्रयत्नशील राहावे. कर्तव्याचा मार्ग सोडला नाही पाहिजे. कार्यसिद्धीमध्ये हवामान, ऋतु गरम आहे की थंड याची चिंता करू नये. आणि ज्या प्रकारे गाढव संतुष्ट होऊन इथे-तिथे चरते त्याच प्रकारे बुद्धीमान व्यक्तीने सदा संतोषी राहून, फळाची चिंता न करता कार्यात मग्न राहिले पाहिजे.

कोंबड्यापासून:-

प्रत्युत्थानं च युद्धं संविभागाश्च बन्धुषु।
स्वममाक्रम्य भोक्तं च शिक्षेच्चत्वारि कुक्कुटात्।। **18** ।।

येथे आचार्य चाणक्य कोंबड्यापासून शिकण्यायोग्य चार महत्वपूर्ण गोष्टींची चर्चा करताना म्हणतात की वेळेवर जागणे (उठणे), युद्ध-लढाई, भाऊबंदांना पळवून लावणे व त्यांचा हिस्सा स्वतःच गिळंकृत करणे या चार गोष्टी कोंबड्यापासून शिकाव्यात.

त्यांचे सांगणे आहे की कोंबड्याची चार वैशिष्ट्ये आहेत, पहाटे उठणे, अन्य कोंबड्यांशी लढणे, त्यांना भांडून पळवून लावणे आणि त्यांचा हिस्सा स्वतः खाणे. कोंबड्यापासून या चार गोष्टी शिकण्यासारखा आहेत. आणि व्यक्तीच्या जीवनात यांचे महत्व मानवीय दृष्टीने अमूल्य आहे.

कावळयापासून:-

गूढ मैथूनकारित्वं काले काले च संग्रहम्।
अप्रमत्तवचनमविश्वासं पंच शिक्षेच्च वायसात्।। **19** ।।

कावळ्यापासून शिकण्यायोग्य गोष्टींची चर्चा करताना आचार्य म्हणतात की लपून संभोग करणे, वेळोवेळी संग्रह करणे, सावध राहाणे, कुणावरही विश्वास न ठेवणे, हाका मारून बोलावून इतरांना जमा करणे हे पाच गुण कावळयापासून शिकावेत.

अर्थ असा आहे की मनुष्याने कांही कामे कावळ्यासारखीच करावीत. जसे की कावळा लपून संभोग करतो कारण की ही क्रिया निःसंशय, नितांत व्यक्तीगत असते. लहान-मोठ्या वस्तु आपल्या घरट्यात एकत्रित करून ठेवणे म्हणजे वेळेवर दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहाण्याची वेळ येऊ नये. सदा-सर्वदा सावध राहातो. काव-काव करुन आपल्या अन्य साथीदारांना गरज भासल्यावर बोलावून घेतो. कधीच कोणावर विश्वास ठेवीत नाही कारण की पारखून विश्वास ठेवला तर दुःखाची शक्यता राहात नाही. हे गुण कावळ्यापासून शिकले पाहिजेत.

कुत्र्यापासून:-

व**ह्व** शी स्वल्पसन्तुष्टः सुनिद्रो लघुचेतनः।
स्वामिभक्तश्च शूरश्च षडेते श्वानतो गुणाः।। **20** ।।

आचार्य चाणक्य येथे संतोष, सतर्कता आणि स्वामीभक्तीची चर्चा करताना कुत्र्याच्या संदर्भात या गुणांचे वर्णन करताना यांच्या आवश्यकतेच्या दृष्टीने सांगतात की जास्त भूकेला असला तरी थोड्यामध्ये समाधानी असतो, गाढ झोपेत असताना सुद्धा सतर्क राहातो, स्वामीभक्त असणे व वीरता हे सहा गुण कत्र्यापासून शिकता येतात.

अर्थ हा आहे की कुत्रा कितीही भूकेला असला तरी त्याला जेवढे मिळेल त्यातच तो समाधान करून घेतो. त्याचबरोबर त्याला जेवढे खायला घालाल तेवढे तो सगळे खातो. थोड्याच वेळात त्याला गाढ झोप लागले. परंतु गाढ झोपेतून सुद्धा थोड्याशा चाहूलीने वा आवाजाने जागा होतो. मालकाशी ईमानदारी आणि हिंमत व बहादुरीने एखाद्यावर तुटून पडणे

सुद्धा कुत्र्याची सवय आहे. कुत्र्यापासून हे सहा गुण शिकले पाहिजे.

### शिक्षण सबळ बनविते:-

ए एतान् विंशतिगुणानाचरिष्यति मानवः।
कार्याऽ वस्थासु सर्वासु अजेयः भविष्यति।। **21** ।।

येथे आचार्य चाणक्य पुर्वोक्त साधनांनी प्राप्त गुणयुक्त व्यक्तीच्या यशस्वी कार्य होण्याची चर्चा करताना म्हणतात की जो मनुष्य या वीस गुणांना आपल्या जीवनात धारण करेल तो सर्व कार्यात कोणत्याही स्थितीत विजयी होईल.

अर्थ असा आहे की हे वीस गुण त्या त्या पशूपासून शिकून घेण्याचा हेतू मनुष्याला साहसी, अभिमानरहित आणि दृढनिश्चयी बनवितो. त्याचबरोबर जीवनात चांगल्या गुणांची आयात करतो आणि दुर्गुणांचा त्याग करुन एक चांगला संकल्प व चांगला समाज निर्माण करण्यास योगदान देतो. म्हणून यात पशु-पक्षी सुद्धा आपल्यासाठी एक दृष्टांत आहे. यासाठी पं. विष्णुशर्माने पंचतंत्रत सर्व पशु-पक्षांना कथानकातील पात्र बनवून मानवाच्या ध्येय-सिद्धीत सहाय्यक कथांचे निर्माण केले. ज्याचा उद्देश्य राजाचे चार मुर्ख पुत्रांनी सहा महिन्यांचे आत राजनीतीमध्ये पारंगत आणि विद्वान व्हावे हाच होता.

या प्रकारे जो व्यक्ती वर वर्णिलेल्या गुणांचा अंगीकार करण्याचा प्रयत्न करील त्यांना आपले करून घेतो, जो जीवनात कोठेही, केव्हाही कोणत्याही परिस्थितीमध्ये पराजीत, अयशस्वी होत नाही. त्याला जीवनात सर्वत्र यशच मिळते. अशा व्यक्तीमध्ये स्वाभिमान जागृत होऊन तो आपल्या प्रत्येक कार्याला निष्ठा आणि तन्मयतेने, समरसतेने पूर्ण करून उन्नती, प्रगती प्राप्त करतो. तोच मनुष्य सफल व यशस्वी समजला जातो.

# सातवा अध्याय

## मनातील गोष्ट मनातच ठेवाः-

अर्थनाश मनस्तापं गृहिण्याश्चरितानि च।
नीचं वाक्यं चापमानं मतिमान्न प्रकाशयेत।।**1** ।।

आचार्य चाणक्य कांही व्यवहारामध्ये गुप्तता ठेवणाच्या संदर्भात चर्चा करताना सांगतात की संपत्ती नष्ट झाल्यावर, मनात दुःख झाल्यावर, पत्नीचे चाल-चलन कळल्यानंतर, नीच व्यक्तीकडून अपमानास्पद बोलणे ऐकल्यानंतर आणि स्वतः कोठेतरी अपमानित झाल्यांतर आपल्या मनातील विचारांचा कोणलाही थांगपत्ता लागू देऊ नये. हीच समजुतदारी आहे.

अर्थ असा आहे की वित्त-हानी, गृहिणीचे चारित्र्य, नीच, व्यक्तीचे शब्द आणि स्वतःचा अनादर या विषय मधील कोणालाही कांही सांगितले तर आपलेच हसे होत असते. म्हणून या सर्व गोष्टीबाबत मौन ठेवणेच चांगले असते. कारण हे स्वाभाविक आहे की संपत्तीचा नाश झाल्यावर मनुष्याला मानसिक वेदना, त्रास होतो. तो विपन्नतेचा अनुभव घेतो. जर पत्नी वाईट चारित्र्याची असेल तर अशा अवस्थेतसुद्धा त्याला दुःख सहन करावे लागते. जर एखाद्या दुष्टाने त्याला फसविले अथवा एखाद्या व्यक्तीने त्याचा अपमान केला तरीही त्याला दुःख होते. पण खरी हुशारी यात आहे की या सर्व गोष्टी दुसऱ्या कोणालाही न सांगता चुपचाप सहन करणे. कारण जो या गोष्टी दुसऱ्यांना सांगतो तेव्हा अपमानाबरोबरच लोकं त्याची टर-खिल्ली उडवितात. त्यासाठी या प्रकारचे आपमान विष समजून चुपचाप पिऊन टाकणेच योग्य आहे.

## लाज-संकोच पाहून करावाः-

धनधान्य प्रयोगेषु विद्या संग्रहेषु च।
आहारे व्यवहारे च त्यक्तलज्जा सुखी भवते्।। **2** ।।

येथे आचार्य चाणक्य मनुष्याच्या लाज, संकोच करण्याच्या संदर्भात सांगतात की संपत्ती आणि धान्याच्या (धन-धान्याच्या) देवाण-घेवाणीत, विद्या प्राप्त करते वेळी, भोजन आणि आपसातील व्यवहारात न लाजणाराचं सुखी असतो.

अर्थ हा आहे की पुढील गोष्टीत लाज ठेवणेच लाभदायक आहे, कोणाला पैसा उसणे-उधार देताना, कोणाकडून घेताना किंवा कोणापासून तरी आपले पैसे परत घेताना व धान्य वगैरे देताना-घेताना कोणत्याही प्रकारची लाज वा संकोच करता कामा नये. याच प्रमाणे शिक्षण घेताना जर एखादी बाब लक्षात नाही आली किंवा कोणत्या प्रकारी शंका वा संशय असेल किंवा जेवण करते वेळी किंवा कोणत्याही प्रकारच्या व्यवहारात.

वस्तुतः मनुष्यासाठी हे योग्य आहे की त्याने देण्या-घेण्याचे व्यवहार लेखी करावेत. विद्या संपादन वा खाणे-पीणे या बाबतीत जर तो संकोच करील तर संबंध चांगले राहाणारा नाहीत.

संबंधीतांशी व्यवहारात सुद्धा मृदु, सत्य आणि स्पष्टवादी राहावे. म्हणून मनुष्याने संकोच त्यागून नेहमी सत्त्यच बोलावे आणि व्यवहारिक मार्गांचा अवलंब करणे आवश्यक आहे. पैशांच्या देवाण-घेवाण व्यवहारात हिशोब असणे जरूरीचे आहे.

## समाधान मोठी बाब आहे:-

सन्तोषामृततृप्तानां यत्सुखं शान्तिरेव च।
न च तद्धनलुब्धानामितश्चेतश्च धावताम्।। **3** ।।

आचार्य चाणक्य येथे समाधानाचे महत्व सांगताना म्हणतात की समाधानाचे अमृताने तृप्त मनुष्याला जे सुख आणि शांती मिळते, ते सुख व शांती संपत्तीच्या मागे चौफेर इकडे-तिकडे पळणाझ्यांना मिळत नाही.

अर्थ असा आहे की समाधान हे सर्वात मोठे सुख आहे जो मनुष्य समाधानी असतो त्याला परम सुख आणि शांती प्राप्त होते. पैशाच्या मागे इकडे-तिकडे धावपळ करणाझ्यांना अशी सुख-शांती मिळत नाही.

वस्तुतः चाणक्याचे मत आहे की मनुष्याची हाव अमर्याद आहे. त्याच्या भूकेला अंत नाही. त्याच्या इच्छा व कामना निरंतर वाढतच आहेत. अशा प्रकारे इच्छा वाढत राहिल्याने मनुष्याच्या जीवनात एक प्रकारची निराशा येते व तो निरर्थक भटकतो. जो मनुष्य जेवढे मिळाले त्यातच समाधान मानतो त्यालाच सुखाची प्राप्ती होते, कारण समाधानालाच महत्व आहे.

सन्तोषरित्रषु कर्तव्यः स्वदारे भोजने धन।
त्रिषु चैव न कर्तव्या**ऽ** ध्ययन जपदानयोः।। **4** ।।

येथे आचार्य सामाधानाचे महत्व सांगतात की मनुष्याने स्वपत्नीतच संतोष मानावा मग ती सुंदर असो वा साधारण, सुशिक्षित असो की अशिक्षित त्याची पत्नी आहे हेच मोठे आहे. या प्रकारे मनुष्याने जे जेवण मिळते त्यातच समाधान मानावे, कारण आपली कोरडी भाकरीच चांगली. व्यवसायातून प्राप्त होणाऱ्या धनासंबंधी चाणक्य म्हणतात माणसाने असंतोषात दुःख करू नये. यामुळे त्याची मानसिक शांती नष्ट होत नाही. जर असे नाही केले तर तो स्वःतला कायमचे दुःखी करून घेईल. या उलट चाणक्याचे सांगणे आहे की शास्त्रामध्ये अध्ययन, ईश्वराचे नामस्मरण आणि दान-ध र्मात कधी समाधान मानू नये. या तिन्ही गोष्टी जास्तीत जास्त करण्याची इच्छा करावी. यामुळे मानसिक शांती आणि आत्मिक सुख मिळते.

वस्तुतः नेहमी असे गृहीत धरण्यात येते की मनुष्य जे कांही आपल्या भाग्यात घेऊन आला आहे, ते प्रयत्न करून सुद्धा बदलता येत नाही. त्यामुळे तो जर अशा गोष्टींच्या संबंधात समाधानपूर्वक जीवन जगेल तर त्याचे नुकसान होणार नाही. कारण मनुष्याचे जीवन पाण्यावरच्या बुडबुड्यासारखे आहे. जे आहे, असू शकते ते उद्या राहणार नाही. म्हणून चाणक्य म्हणतात की मनुष्याने सतत शुभ कार्यामध्ये मस्त रहावे.

## यापासून सावध रहाः-

विप्रयोर्विप्रवह्नश्च दम्पत्योः स्वामिभृत्ययोः।

अन्तरेण न गन्तव्यं हलस्य वृषभस्म च ।। **5** ।।

आचार्य चाणक्य येथे मार्गाने जाताना प्रतिबंधित बाबींविषयी चर्चा करताना म्हणतात दोन ब्राह्मणांच्या मधून, ब्राह्मण आणि आग या मधून, मालक आणि नोकर यांच्यामधून, पती आणि पत्नी यांच्यामधून आणि नांगर व बैल यांच्यामधून जाऊ नये.

कारण असे मानतात की जेथे दोन व्यक्ती उभ्या आहेत किंवा बसलेल्या असताना, बातचीत करीत असताना, त्यांच्या मधून न जाता त्यांच्या एका बाजूने निघून जावे. जर दोन ब्राह्मण उभे असतील तर दोघांच्या मधून न जाणे याचा अर्थ असा आहे की ते एखादी शास्त्र चर्चा करीत असतील. याचमुळे आगीमधून जाऊ नये. पती-पत्नी, मालक व नोकर जेव्हा कांही बोलत असतील तर त्यांच्या जवळ जाऊ नये आणि दोघांच्या मधून जाऊ नये. याचप्रमाणे नांगर आणि बैल यांच्यामधून जाऊ नये कारण त्यात मार लागण्याची, जखमी होण्याची शक्यता असते. आणि तसे पाहिले तर मनुष्याने नेहमीच जाताना आसपासचे वातावरण पाहूनच मार्गक्रमण करावे.

पादाम्यां न स्पृशेदग्निं गुरूं ब्रह्मणमेव च।
नैव गांव कुमारीं च वृद्धं न शिशुं तथा।। **6** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की आग, गुरू, ब्राह्मण, गाय, कुमारी कन्या, म्हातारे लोक आणि बालकांला पावलांनी स्पर्श होऊ देऊ नये. हे असभ्यतेचे लक्षण आहे. असे करण्यात त्यांचा अपमान, अनादर तर आहेच पण त्यातून उपेक्षेची भावना प्रकट होते. तसे करण्यात आपल्या मुर्खपणाचे प्रदर्शन करण्यासारखे आहे कारण हे सर्वजण आदरणीय पूज्य व प्रिय असतात.

शकटं पञ्चहस्तेन दशहस्जतेन वाजिनम्।
हस्तिनं शतहस्तेन देशात्यागेन दुर्जनम्।। **7** ।।

आचार्य म्हणतात की बैलगाडीपासून पाच हात, घोड्यापासून दहा हात, आणि हत्तीपासून शंभर हात दूर राहावे, परंतु दुष्ट व्यक्ती पासून बचावण्यासाठी मात्र थोडे-बहुत अंतर पुरेसे नाही. त्याच्या पासून स्वतःला वाचविण्यासाठी तर आवश्यकता भासली तर देश सुद्धा सोडावा लागेल.

या गोष्टींपासून दूर राहाण्याचे तात्पर्य हे आहे की गाडीला जुंपलेल्या बैलामुळे दुखापत होऊ शकते. घोड्याच्या लाथ मारण्याचे भय असते. याच प्रकारे हत्तीपासून ही दूर राहाणेच योग्य आहे. परंतु दुष्ट व्यक्तीपासून अशा प्रकारे स्वतःला वाचविले पाहिजे की त्याचा चेहरासुद्धा पाहाण्यास मिळू नये. यामुळे चाणक्याच्या मतानुसार त्याच्यामापासून वाचण्यासाठी तो जेथे राहतो त्या जागेचा सुद्धा त्याग केला पाहिजे.

हस्ती त्वंकुशमात्रेण बाजो हस्तेन तापते।
श्रृंगीलकुटहस्तेन खड्गहस्तेन दुर्जनः।। **8** ।।

येथे आचार्य चाणक्य दुष्ट व्यक्तीबरोबर दुष्टता हे सूत्र शिकवितानासुद्धा सावध गिरीचे महत्व सांगताना म्हणतात की हत्तीला अंकुशाने, घोड्याला हाताने, शिंगधारी पशुंना हात किंवा काठीने आणि दुष्टाला शस्त्र हाती घेऊन मारावे लागते.

अर्थ असा आहे की हत्तीला अंकुशाने टोचून, मारून वश करता येते. घोड्याला हाताने मारता

येते. गाय, म्हैस इत्यादी शिंगधारी प्राण्यांना हात किंवा काठीने मारता येते. पंरतु दुष्टाला मारताना हातात तलवार अथवा अन्य कोणतेही शस्त्र हातात असणे आवश्यक असते. दुष्टाला हातात शस्त्र घेऊनच सरळ करावे लागते. सभ्यतेची भाषा त्याला कळत नाही. किंवा "लातों के भूत बातों से मानते नहीं," किंवा "लकडीशिवाय मकडी वळत नाही"

तुष्यन्ति भोजने विप्रा मयूरा धनगर्जिते।
साधवः परसम्पत्तौ खलाः विपत्तिषु।। **9** ।।

आचार्य चाणक्य दुष्टांच्या दुसऱ्यांच्या दुःखात सुख मानण्याच्या दुष्टप्रवृत्तीचे वर्णन करताना म्हणतात की ब्राह्मण तर भोजनामुळे आनंदीत होतात. मोर नभांच्या गर्जनेनंतर आनंदीत होतात. सज्जन, साधु दुसऱ्यांच्या संपन्नतेत सुख मानतात, पण दुष्ट लोक दुसऱ्यांच्या संकटांना पाहून आनंदी होतात. किती विचित्र आहे.

अर्थ असा आहे की ब्राह्मण भोजन मिळाले तर, मोर ढगांचा गडगडाट ऐकून आणि सज्जन दुसऱ्यांच्या सुखात, आनंदात, धन-संपदा पाहून आनंदी होतात. परंतु दुष्टाला दुसऱ्यांचे सुख पाहून दुःख होते. ते दुसऱ्यांना दुःखी पाहून मात्र आनंदी होतात.

अनुलोमेन बलिनं प्रतिलोमेन दुर्जनम्।
आत्मतुल्बलं शत्रुं विनयेन बलेन व।। **10** ।।

आचार्य चाणक्य धर्म व्यवहार समजून सांगताना म्हणतात की बळवंत शत्रूला त्याच्याप्रमाणे वागून, दुष्टाला त्याच्या विरूद्ध जाऊन आणि समान शक्तीच्या शत्रूला विनयाने वा शक्तीने वश करावे.

अर्थ असा आहे की जर शत्रु आपल्यापेक्षा ताकदवान असेल तर त्याच्या इच्छे प्रमाणे वागले पाहिजे. जर तो आपल्या एवढाच बळवान असेल तर त्याच्या बरोबर नम्रतेने वागावे किंवा त्याचा सामना शक्तीनेच करावा परंतु दुष्टाबरोबर दुष्ट बुद्धीनेच वागावे.

## तारूण्यच स्त्रियांची शक्ती आहे:-

बाहुवीर्यं बलं राजा ब्राह्मणो ब्रह्मविद् बली
रूपयौवनमाधुर्यं स्त्रीणां बलमुत्तमम्।। **11** ।।

आचार्य चाणक्य स्त्रियांच्या गुणांची चर्चा करताना सांगतात की हातात ताकद असणारे राजे बलवान, शक्तीमान असतात. ब्रह्म जाणणारा ब्राह्मणच शक्तीमान मानला जातो. सौंदर्य, तारूण्य आणि गोडवा स्त्रीयांचे मोठे बळ आहे.

याचा आशय असा आहे की ज्या राजाच्या बाहूमध्ये शक्ती (बाहुबळ) असते तोच शक्तीमान मानला जातो. ब्रह्म जाणणारा ब्राह्मणच बळवंत आहे. ब्रह्म जाणून घेणे हेच ब्राह्मणाचे बळ आहे. सौंदर्य, तारूण्य आणि वाणीची मधुरता हेच स्त्रियांचे सर्वात मोठे बळ आहे.

नात्यन्तं सरलेन भाव्यं गत्वा पश्य वनस्थलीम्।
छिद्यन्ते सरलास्तत्र कुब्जास्तिष्ठान्ति पादपाः।। **12** ।।

जीवनाचा सिद्धांत आहे की अति हे टाळावे, वर्ज्य करावे "अति सर्वत्र वर्जयेत" मग ते जीवनच्या संदर्भात साधेपणा वा सरळपणा या पातळीवर का असेना. म्हणून आचार्य चाणक्य म्हणतात की अति म्हणजे जास्त सरळ सुद्धा राहू नये. जंगळात जाऊन पाहिले तर असे दिसून येईल की सरळ वाढलेले वृक्ष कापले जातात तर वेडेवाकडे वाढलेले वृक्ष तसेच ठेवले जातात.

अर्थात मनुष्याने सुद्धा जास्त सरळ अथवा भोळेपणाने राहू नये. जास्त सरळ माणसाला सर्वजण मुर्ख बनविण्याचे प्रयत्न करतात. त्याचे जीवन कठीण अवघड होते. या उलट दुसऱ्या रागीट व खडूस प्रकारच्या लोकांना कोणीही कांहीही बोलत नाही. हा निसर्ग नियमच आहे. जंगलात सुद्धा जे झाड सरळ असते तेच तोडले जाते आणि वेडेवाकडे झाड तसेच उभे राहातात.

## हंसा सारखे वागू नकाः-

> **यत्रो** दकं तत्र वसन्ति हंसा:**,** स्तथैव शुष्कं परिवर्जयन्ति।
> न हंसतुल्येन नरेणभाव्यम**,** पुनस्त्यजन्ते पुनराश्रयन्ते।। **13** ।।

आचार्य चाणक्य येथे हंसाच्या व्यवहाराला आदर्श म्हणून उपदेश करतात की ज्या तलावात पाणी जास्त असते तेथेच हंस राहातात. जर तेथील पाणी आटले वा कमी झाले तर हंस तो तलाव त्यागून दुसऱ्या स्थानी निघून जातात. जेव्हा केव्हा पावसामुळे किंवा नदीचे पाणी त्यात येऊन तो पाण्याने भरला तर ते पुन्हा तेथे वापस येतात. या प्रकारे हंस आपल्या आवश्यकतेनुसार कोणत्याही जलाशयाला सोडून जातात किंवा त्याचा आश्रय घेतात.

आचार्य चाणक्याचा येथे आशय असा आहे की मनुष्याने हंसासारखा व्यवहार करू नये. एकदा ज्याचा आश्रय घेतला आहे त्याला कधी सोडू नये. जर कांही कारणास्तव सोडावाच लागला तर मग परत वापस तेथे येऊ नये. आपल्या आश्रयदात्याला वारंवार सोडणे आणि परत तेथेच येणे हे माणूसकीचे लक्षण नाही. त्यासाठीच नीतीसुद्धा हेच सांगते की मैत्री अथवा संबंध स्थापित केल्यानंतर ते विनाकारण तोडणे योग्य नाही.

## कमविलेल्या धनाचा त्याग करीत राहावेः-

> उपार्जितानां वित्तानां त्याग एव ही रक्षणम्।
> तडागोदरसंस्थानां पदिाह इदाम्मससाम्।। **14** ।।

येथे आचार्य चाणक्य कमविलेल्या पैशांचा सदुपयोगासाठी खर्च करण्याविषयी सांगतात की तलावातील पाणी स्वच्छ राहाण्यासाठी त्याचे वाहते राहाणे जसे आवश्यक आहे त्याच प्रमाणे अशा पैशांचा त्याग करीत राहाणे म्हणजेच त्याचे रक्षण करणे आहे.

अर्थ असा आहे की एखाद्या तलावाचे पाणी स्वच्छ ठेवण्यासाठी त्याचे वाहात राहाणे चांगले असते. ते थांबून राहिले, अडकून राहिले तर ते घाण होते. याच पद्धतीने संपत्तीचा त्याग करीत राहावे. असे नाही केले तर मनुष्यामध्ये अनके वाईट गुण येतात. संपत्ती चांगल्या कार्यसाठी खर्च करीत राहावे. हेच संपत्तीचे सर्वात मोठे रक्षण आहे.

सत्कार्यातच महानता आहे:-

> स्वर्गस्थितानामिह जीवलोके।
> चत्वारि चिह्नानि वसन्ति देह।
> दानप्रसंगो मधुरा व वाणी
> देवार्चनं ब्राह्मणतर्पणं च।। **15** ।।

सत्कार्याचे आचरण करणाऱ्या व्यक्तीला महात्मा असे संबोधताना आचार्य सांगतात की दान देण्याची आवड, गोडवाणी, देवांची पुजा आणि ब्राह्मणांना समाधानी ठेवणे, हे चार लक्षण असणारी व्यक्ती या जगात एखादी स्वर्गातील आत्मा असू शकते.

अर्थ असा आहे की दान करण्याची सवय असलेला, सर्वात जास्त गोड बोलणारा देवांची पुजा करणारा आणि विद्वान-ब्राह्मणांचा सन्मान करणारा माणूस दिव्य आत्मा असतो. ज्या व्यक्तीमध्ये हे सर्व गुण असतात तो महान पुरूष असतो. अशा व्यक्तीला स्वर्गातील आत्म्याचा अवतार समजला पाहिजे.

दुष्कृत्त्य करणारे नरक भोगतातः-

> अत्यन्तलेपः कटुता वाणी
> दरिद्रता च स्वजनेषु वैरम्।
> नीच प्रसंगः कुलहीनसेवा
> चिह्नानि देहे नरकस्थितानाम्।। **16** ।।

आचार्य चाणक्य दुष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तीला तो नर्काचा अधिकारी होण्याच्या संदर्भात म्हणतात की अत्यंत संताप, कटू वाणी, दरिद्रता, स्वकीयांबरोबर वैर, नीच लोकांची संगत, कुळहीनांची सेवा ही सर्व नरक भोगणाऱ्यांची लक्षणे आहेत.

अर्थ असा आहे की दुष्ट व्यक्ती अत्यंत रागीट स्वभावाचा असतो. त्याचे बोळणे कडवट असते. तो गोड, मधुर बोलूच शकत नाही. तो नेहमी गरीबच राहातो. इतरांशी संबंध तर सोडा पण त्याचे त्याच्याच कुटुंबीयांशी शत्रुत्व असते. नीच लोकांची संगत आणि अशाच लोकांची नेहमी सेवा करणे हे त्याचे काम असते. ज्या व्यक्तीमध्ये हे अवगुण दिसून येतात त्याला नरकातील आत्म्याचाच अवतार समजले पाहिजे.

> गम्यते यदि मुगेन्द्रमन्विरे
> लभ्यते करिकपोलमौक्तिकम्।
> जम्बुकाश्रयगतं च प्राप्यते
> वत्सपुच्छखरचर्मखण्डम्।। **17** ।।

संगतीचा प्रभाव सांगताना आचार्य चाणक्य म्हणतात की जर कोणी सिंहाच्या गुहेत गेला तर तेथे त्याला हत्तीच्या मस्तकावरील मोती मिळेल. जर तीच व्यक्ती गिधाडाच्या घरट्यात (खोबडीत) गेली तर तेथे त्याला पिल्लाचे शेपूट आणि गाढवाच्या कातडीचा तुकडाच मिळेल.

अर्थ हा आहे की सिंहाच्या गुहेत गेल्यावर व्यक्तीला हत्तीच्या मस्तकावरील मोती मिळतो. पण तीच व्यक्ती गिधाडाच्या घरत्यात जाते तेथे त्याला फक्त वासराचे शेपूट वा गाढवाच्या कातडीचा तुकडा मिळतो. सांगण्याया अर्थ असा आहे की जर व्यक्ती महान लोकांच्या संगतीत राहिला तर तो फक्त दुष्टपणाच शिकतो. म्हणून संगत नेहमी सज्जनांचीच करावी.

## विद्येशिवाय जीवन बेकार आहे:-

शुन: पुच्छमिव व्यर्थं जीवितं विद्यया विना।
न गुह्यगोपने शक्तं न च दंशनिवारणे।। **18** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की जसे कुत्र्याच्या शेपटीमुळे ना तर त्यांचे गुप्तांग झाकले जाते, ना तर ती डास, किड्यांच्या चावण्यापासून वाचवू शकते. याच प्रकारे विद्याविना जीवन व्यर्थ आहे. कारण विद्या नसणारा मनुष्य मुर्ख असल्यामुळे ना तर स्वतःचे रक्षण करू शकतो न आपले भरण-पोषण. तो आपल्या कुटुंबाचे दारिद्रय दूर करू शकत नाही आणि ना नतर शत्रुचे आक्रमण थांबविण्यासाठी समर्थ असतो. म्हणून विद्येचे म्हत्व व्यक्तीच्या जीवनात खूप मोठे आहे.

## सर्वात मोठी शुद्धता आहेः-

वाचा च मनसः शौचं शौचमिन्द्रियनिग्रहः।
सर्वभूतदया शौचमेतच्छौचं परमार्थिनाम्।। **19** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की मन, वाणी पवित्र ठेवणे, इंद्रीयांचा निग्रह, सर्व प्राण्यांवर दया करणे व दुसऱ्यावर उपकार करणे सर्वात मोठी शुद्धता आहे.

अर्थ असा आहे की मनात वाईट विचार न येऊ देणे, तोंडाने कांही अप्रिय बोलणे टाळणे, आपल्या सर्व इंद्रीयांना ताब्यात ठेवणे, सर्व प्राण्यावर दया करणे आणि सर्वांचे चांगले करणे हेच मनुष्याये सर्वात मोठे पावित्र्य आहे.

## देहातच आत्मा पहाः-

पुष्पे गन्धं तिले तैलं काष्ठे वह्निः पयोघृतम्।
इक्षौ गुडु तथा देहे पश्यात्मानं विवेकतः।। **20** ।।

आचार्य चाणक्य आत्म्याच्या संदर्भात असे सांगतात की फुलात वास, तीळात तेल, लाकडात अग्नी, दूधात तूप आणि उसात गूळ या प्रमाणेच विवेकाने देहात आत्मा पहा.

अर्थ असा आहे की जसा फुलात सुगंध एकाच जागी नसतो तर पूर्ण फुलात पसरेलला असतो, तीळामध्ये तेल असते, लाकडामध्ये आग असते, दूधामध्ये लोणी आणि उसामध्ये गोडवा, हे सगळे गुण पूर्ण वस्तुमध्ये असतात, कोणत्याही एकाच जागी नसतात. याच प्रकारे परमात्मासुद्धा मनुष्याच्या सगळया देहात राहातो. फक्त त्याला ओळखण्याची गरज असते. याला प्रत्त्येक जण ओलखू शकत नाही. फक्त ज्ञानी पुरूषच ओळखू शकतात.

# आठवा अध्याय

## सन्मानच महापुरूषांची संपत्ती आहेः-

अधमा धनमिच्छन्ति धनं मानं च मध्यमाः।
उत्तमा मानमिच्छन्ति मानो हि महतां धनम्।। **1** ।।

महापुरूषांच्या संपत्तीची चर्चा करताना आचार्य चाणक्य असे सांगतात की अध म लोक संपत्तीची इच्छा करतात, मध्यम लोक पैसा व मान मागतात परंतु उत्तम लोक फक्त मानाची इच्छा करतात. महापुरूषाची संपत्ती म्हणजे मानच असतो.

नीच, दुष्ट लोकासांठी संपत्ती सर्वस्व असते. ती मिळविण्यासाठी ते चांगल्या तसेच गैर मार्गाचाही अवलंब करतात. तसे तर सरासरी सर्वच लोकांना पैसा हवा असतो. परंतु अपमानाऐवजी नको असते तर ते सन्मानाने हवे असते. म्हणजेच त्याला मान व संपत्ती दोन्ही हवे असतात. परंतु महापुरुष संपत्तीची मुळीच इच्छा करीत नाहीत. ते मिळणाऱ्या मान-सन्मालाच महत्त्व देतात. त्यांच्यासाठी मान-सन्मान हीच संपत्ती असते.

## दान करण्यास कोणतीही वेळ नसतेः-

इक्षरापः पयोमूलं ताम्बूलं फलमौषधम्।
भक्षयित्वापि कर्तव्या स्नानदानदिकाः क्रिया ।। **2** ।।

येथे आचार्य चाणक्य स्नान, दानासाठी कोणताही वेळ-काळाला वर्ज्य किंवा वेळेची अडचण मानीत नसताना म्हणतात की उस, पाणी, दूध, कंद, पान, फळ आणि औषध घेतल्यानंतर सुद्धा स्नान, दान इत्यादी कार्य करू शकता.

अर्थ असा आहे की उस (रस)चोखल्यानंतर, पाणी व दूध प्यायल्यानंतर, पान खाल्ल्यानंतर, एखादा कंद किंवा फळ किंवा औषध खाल्ल्यानंतर सुद्धा स्नान, पुजा व दान इत्यादी कार्य करता येतात. तर इतर वस्तु, पदार्थ खाल्या-प्यायल्यानंतर ही कार्ये करता येत नाहीत.

## जसे अन्न तशी संततीः-

दीपो भक्षयते ध्वान्तं कज्जलं च प्रसूयते।
यदन्नं भक्ष्यते नित्य जायते तादृशी प्रजा।। **3** ।।

जसे अन्न तसे मन (विचार) या विषणी चर्चा करताना आचार्य सांगतात की दिवा अंधाराला गिळंकृत करून काजळ निर्माण करतो. तसेच जो नेहमी जसे अन्न खातो, तो तशाच संततीला जन्म देतो.

व्यक्तीचे भोजन जसे असते, तशीच त्याची संतती जन्म घेते. सात्विक भोजन करण्यामुळे

संतान सुद्धा योग्य व बुद्धिमान होईल, आणि तामसी भोजन केल्याने मुर्ख संतान जन्माला येईल दिवा अंधाराला गिळतो तर तो काळिमाच उत्पन्न करतो.

## सर्वात मोठा नीचः-

चाण्डालानां सहस्रैश्च सूरिभिस्तत्वदर्शिभिः।
एका हि यवनः प्रोक्तो न नीचो चवनात्परः।। **4** ।।

यवनाला नीचातला नीच कोटीचा मानताना आचार्य चाणक्य सांगतात की तत्वदर्शी विद्वानांचे सांगणे आहे की हजार चाण्डालाच्या बरोबर एक यवन असतो. यवनापेक्षा नीच कोणीच नसतो.

आशय हा आहे की विद्वान महापुरुषांच्या कथनानुसार एक हजार चाण्डाळाच्या बरोबरीत वाईटपण, नीचपणा एका यवनात असतो. यामुळे यवन सर्वात नीच मानला जातो. यवनापेक्षा नीच कोणीही नाही.

## संपत्तीचा सदुपयोगः-

वित्तं देहि गुणान्वितेषु मतिमान्नन्यत्र देहि क्वचित**,**
प्राप्तं वारिनिधेर्जलं धनयुचां माधुर्ययुक्तं सदा।
जीवाः स्थावर जंगमाश्च सकला संजीव्य भूमण्डलं
भूयं पश्च तदैव कोटिगुणितं गच्छन्त्यम्भोनिधिम्।। **5** ।।

संपत्तीची पात्रता सांगताना आचार्य चाणक्य सांगतात की-हे बुद्धिमंत, गुणी लोकांनाच संपत्ती द्यावी, अवगुणी लोकांना कधीच देऊ नका. नभ (ढग) समुद्रातून पाणी घेऊन मधुर जलवर्षा करतो, यामुळे पृथ्वीवरील चराचर प्राणी जीवन जगतात, मग हेच पाणी कोटीपट अधिक होऊन पुन्हा परत समुद्रातच जाते.

आशय हा आहे की ढग समुद्रातून पाणी घेतात आणि पृथ्वीवर पाऊस पाडतात. याच पावसामुळे पृथ्वीवरील मनुष्य पशु-पक्षी वृक्ष वगैरे जगतात. नंतर हेच पाणी अनेक पटीने वाढून नद्यातून वाहात वाहात परत समुद्रातच जाते. श्रीमंत लोकांनी सुद्धा योग्य व्यक्तीला एखादा व्यवसाय करण्या करीता पैशांची मदत करावी. यामुळे ती व्यक्ती कित्येक लोकांचे कल्याण करते आणि मदत करणाऱ्या व्यक्तीचा सुद्धा लाभ होतो.

## स्नानामुळे शुद्धताः-

तैलाभ्यंगे चिताधूमे मैथुने क्षौर कर्मणि।
तावद्भवति चाण्डलो यावत्सनानं न समाचारेत्।। **6** ।।

स्नान केल्यानंतरच मनुष्य पवित्र होतो अन्यथा तो शुद्र आहे. हेच जास्त स्पष्ट करून सांगताना आचार्य चाणक्य म्हणतात की तेल लावल्यानंतर, चित्तेचा धूर अंगाला लागल्यानंतर, संभोग केल्यानंतर आणि केस कापल्यानंतर जोपर्यंत मनुष्य स्नान करीत नाही तोपर्यंत तो शुद्र

असतो.

अर्थ असा आहे की शरीराला तेलाने मालिश केल्यानंतर, चितेचा धूर लागल्यानंतर, संभोग केल्यानंतर आणि दाढी नखे व केस कापल्यानंतर स्नान करणे आवश्यक आहे. या कामानंतर मनुष्य जोपर्यंत स्नान करीत नाही तोपर्यंत तो शुद्र मानला जातो.

## पाणी एक औषध आहेः-

अजीर्णे भेषत वारि जीर्णे तद् बलप्रदम्।
भोजने चामृतं वारि भोजनान्तें विषप्रदम्।। **7** ।।

पाण्याची गुणवत्ता सांगताना आचार्य म्हणतात की भोजन पचन नाही झाले तर पाणी हे औषधासमान असते. जेवण करते वेळी पाणी अमृत आहे आणि जेवणानंतर ते विषा सारखे कार्य करते.

याचा अर्थ हा आहे की अन्नाचे अपचन झाल्यावर पोट भरून जेवढे पीता येईल तेवढे पाणी प्यावे. पाणी औषधाचे काम करते. जेवणाचे पचन झाल्यानंतर पाणी प्यायल्यानंतर शरीराच्या शक्तीत वाढ होते. भोजन करताना अधे-मधे पाणी पीत राहिले तर ते अमृताचे कार्य करते पण हेच पाणी जेवणानंतर ताबडतोब प्यायले तर ते विषाचे कार्य करते. जेवतानाच मधून मधून पाणी प्यावे, जेवण झाल्यावर ताबडतोब नाही.

## ज्ञान व्यवहारात आणाः-

हतं ज्ञानं क्रियाहीनं हतश्चाज्ञानता नरः।
हतं निर्णायकं सैन्यं स्त्रियो नष्टा ह्यभर्तृका।। **8** ।।

आचार्य चाणक्य चांगतात की ज्या ज्ञानाप्रमाणे आचरण नाही केले, तर ते ज्ञान नष्ट होते. अज्ञानामुळे मनुष्याचा नाश होतो. विना सेनापती सेना आणि विना पती स्त्री नष्ट होतात.

अर्थ असा आहे ज्ञान हे व्यवहारात आणले पाहिजे. असे नाही केले तर ते ज्ञान नष्ट होते. अज्ञानी मनुष्य, विना सेनावती सैन्य व पतिविना पत्नी नष्ट होतात.

## याला विडंबनाच समजाः-

वृद्धकाले मृता भार्या बन्धुहस्तगतं धनम्।
भोजन च पराधीनं तिस्र पुंसां विडम्बना।। **9** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की वृद्धपणी पत्नीचा मृत्यु, संपत्ती भाईबंदाच्या ताब्यात जाणे, भोजनासाठी परावलंबी असणे याला पुरुषाची विडंबना समजावी.

अर्थ हा आहे की व्यक्तीच्या म्हातारपणी पत्नीचे निधन होणे ही मोठीच दुर्दैवी बाब आहे. कारण वृद्धपणी फक्त पत्नीच जोडीदार असते. संपत्ती भाई-बंदांच्या ताब्यात गेली तर मनुष्य फक्त तडफडत राहतो. या प्रकारची अवहेलना व्यक्ती सहन करू शकते पण भोजनासाठी विवश होणे, दुसऱ्यांच्या तोडांकडे पाहणे या विवशतेला काय म्हणावे? या तीन दुःखामुळे व्यक्तीचे

जीवन दूर्धर होते.

## शुभ कार्य करा:-

नाग्निंहोत्र विना वेदा न च दानं विना क्रिया।
न भावेन विना सिद्धिस्तस्माद् भावो हि कारणम्।। **10** ।।

आचार्य चाणक्याचे कथन आहे की अग्नीहोत्र, यज्ञ, याज्ञिकी यांच्याशिवाय वेदांचा अभ्यास निरर्थक आहे आणि दानधर्माशिवाय यज्ञासारखे शुभ कार्य संपन्न होत नाही. त्याशिवाय यज्ञाची सांगता होऊच शकत नाही. परंतु जर दानाशिवाय केवळ श्रद्धेचा देखावा करून यज्ञ केला तर त्यामुळे कधीही अभिष्ट कार्य पूर्ण होत नाही. अर्थात महत्व मनुष्याच्या भावनेला असते. पवित्र भावनेने केलेल्या यज्ञामुळे मनुष्याला निश्चितपणे शुभ लाभ होतो. म्हणून श्रद्धा ठेवूनच शुभ कार्य करावीत.

आचार्य चाणक्य येथे श्रेष्ठ माणसाच्या मोठेपणाचे महत्व सांगताता म्हणतात की देव लाकडात ही राहात नाही आणि दगडात ही नाही. देवाचा वास मनुष्याच्या भावनेत असतो. त्याच्या हृदयात असतो. जर भावना असेल तर मूर्तीत देव आहे नसता ते साधारण लाकूड-पाषण यापेक्षा वेगळे नाही. अशा प्रकारे निश्चित आहे की मूर्तीमध्ये देवतेची प्रतिष्ठेचा आधार भावना आहे. भावनाच प्रतिमेत देवबुद्धी निर्माण करते तेच भावनेचे मूळतत्व आहे.

## भावनेतच परमेश्वर असतो:-

काष्ठपाषाण धातूनां कृत्वा भावेन सेवनम्।
श्रद्धया च तथा सिद्धिस्तस्य विष्णोः प्रसादत।। **11** ।।

येथे सुद्धा आचार्य चाणक्य भावनेला ईश-प्राप्तीचे महत्वाचे साधन असे वर्णन करताना सांगतात की लाकूड, पाषाण किंवा धातुंच्या मूर्तीची सुद्धा भावना व श्रद्धेने उपासना केली तर ईश्वराच्या आशिर्वादाने सिद्धी मिळते.

आशय असा आहे की जरी मूर्ती परमेश्वर नाही, तरी जर कोणी खऱ्या भावनेने व श्रद्धेने लाकूड, पाषण वा एखाध्या धातुच्या मूर्तीची ईश्वराच्या रूपात पुजा करीत असेल तर ईश्वर त्याच्यावर नक्कीच प्रसन्न होतो. त्याला अगदी निश्चितपणे यश मिळते.

न देवो विद्यते काष्ठ न पाषणे न मृण्यमे।
भावे ही विद्यते देवस्तस्माद् ही भावो की करणाम्।। **12** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की परमेश्वर ना लाकडात आहे ना मातीत, ना तर मूर्तीत. तो केवळ भावनेत आहे. म्हणूनच भावनाच श्रेष्ठ आहे.

अर्थात ईश्वर प्रत्यक्षात लाकूड, माती वगैरेच्या मूर्तीत नसतो. तो मनुष्याच्या भावनेत असतो. व्यक्तीची जशी भावना आहे तो ईश्वराला त्याच रूपात बघतो. म्हणून ही भावनाच सगळ्या विश्वाचा आधार आहे.

## शांतीच तप आहे:-

> शान्तितुल्यं तपो नास्ति न सन्तोषात्परं सुखम्।
> न नृष्णया परो व्याधिर्न च धर्मो दयापरः।। **13** ।।

महत्वाच्या साधनांची चर्चा करताना आचार्य म्हणतात की शांतीसारखी कोणतीच तपस्या नाही. समाधानापेक्षा मोठे सुख नाही, तहानपेक्षा मोठी व्याधी नाही आणि दयेपेक्षा मोठा धर्म नाही.

अर्थात आपला मनाला व इंद्रियांना शांत, समाधानी ठेवणे हीच मोठी तपस्या आहे. समाधान सर्वात मोठे सुख आहे, मनुष्याच्या इच्छा सर्वात मोठा रोग आहे. त्याचा कांहीच ईलाज होऊ शकत नाही. सर्वावर दया करणे हाच सर्वात मोठा धर्म आहे.

## समाधान मोठी गोष्ट आहे:-

> क्रोधो वैवस्वतो राजा तृष्ण वैतरणी नदी।
> विद्या कामदूधा धेनुः संतोश नन्दनं वनम्।। **14** ।।

आचार्य चाणक्य येथे क्रोध, तहान याची सापेक्ष विद्या व समाधानाची प्रतिकात्मक महत्ता सांगताना म्हणतात की क्रोध यमराजासारखा असतो, तृष्णा-तहान वैतरणी नदी आहे, विद्या कामधेनु आहे आणि समाधान नंदनवन आहे.

अर्थ असा आहे की राग मनुष्याचा सर्वात मोठा शत्रू आहे, याला यमराजासारखेच भयंकर समजले पाहिजे. तहान अथवा इच्छा वैतरणी नदीसारख्या असतात. यांच्यापासून सुटका करून घेणे कठीण काम आहे. विद्या कामधेनुसारखी सर्व इच्छा पूर्ण करणारी आहे. समाधान परमसुखदायक नंदनवनासारखे आहे.

## यांच्यामुळे शोभा वाढते:-

> गुणो भूषयते रूपं शील भूषयते कुलम्।
> सिद्धिर्भूषयते विद्यां भोगो भूषयते धमन्।। **15** ।।

येथे आचार्य शोभा वाढविणाऱ्या तत्वांची चर्चा करताना म्हणतात की गुण रूपांची शोभा वाढवितात, शील-स्वभाव कुळाची शोभा वाढवितो, सिद्धी विद्येची शोभा वाढविते आणि भोग घेणे संपत्तीची शोभा वाढविते.

अर्थात गुणवान व्यक्तीचे गुण हेच त्याचे सौंदर्य असते. चांगले आचरण कुळाचे नाव उज्वल करून त्याची शोभा वाढविते. कोणत्याही विद्येत निपूणता प्राप्त करूनच विद्येचे सार्थक होते. हीच विद्येची शोभा आहे. धनाचा भोग घेणे हीच धनाची शोभा आहे.

## दुर्गुण सद्गुणांना गिळंकृत करतात:-

> निर्गुणस्य हतं रूपं दुःशीलस्य हतं कुलम।

असिद्धस्य हता विद्या अभोगस्य हत धनम्।। **16** ।।

आचार्य चाणक्य दुर्गुणामुळे होणाऱ्या सद्गुणांच्या नाशाची चर्चा करताना सांगतात की गुणहीनाचे रूप, दुराचाऱ्याचे कुळ आणि अयोग्य व्यक्तीचे शिक्षण नष्ट होते. धनाचा उपभोग नाही घेतला तर धन नष्ट होते.

आशय असा आहे की व्यक्ती कितीही सौंदर्यवान असो जर तो गुणवान नसेल तर त्याला सुंदर म्हणता येणार नाही. वाईट चाल वर्तणूकीची व्यक्ती आपल्या कुळाला बदनाम करते. अयोग्य व्यक्ती विद्येचा सदुपयोग करू शकत नाही. जी व्यक्ती आपल्या धनाचा उपभोग घेत नाही त्याची संपत्ती नष्ट झालीच असे समजा. यामुळेच असे म्हणतात की दुराचाऱ्याचे कुळ, मुर्खाचे रूप, नालायकाची विद्या आणि भोग नसणाऱ्या संपत्तीचा नाश होतो.

## यांना शुद्ध मानाः-

शुद्धं भूमिगतं तोयं शुद्धा नारी पतिव्रता।
शुचिः क्षेमकरो राजा सन्तोषी ब्रह्मण शुचिः।। **17** ।।

येथे शुद्धतेची चर्चा करताना आचार्य चाणक्य म्हणतात की भूमिगत पाणी शुद्ध असते, पतीव्रता स्त्री शुद्ध असते, प्रजेचे कल्याण करणारा राजा शुद्ध असतो आणि समाधानी ब्राह्मण शुद्ध असतो. अर्थ असा आहे की भूमीच्या पोटात असलेले पाणी, पतीव्रता स्त्री, प्रजेचे सुख-दुःखाकडे लक्ष देणारा राजा आणि समाधानी असणारा ब्राह्मण स्वतः शुद्ध मानले जातात.

## दुष्ट गुणांचा दुष्ट प्रभावः-

असन्तुष्टा द्विजा नष्टाः सन्तुष्टाश्च महीभूतः।
सलज्जा गणिका नष्टानिर्लज्जाश्च कुलांगनाः।। **18** ।।

आचार्य चाणक्य येथे त्या दुर्गुणांची चर्चा करतात ज्यांचा प्रभाव दुष्ट असतो. हे पाहिले असंतुष्ट ब्राह्मण व संतुष्ट राजाचा विनाश होतो. लाज बाळगणारी वेश्या आणि निर्लज्ज चांगल्या कुळातील कन्या नाश पावतात.

आशय हा आहे की ब्राह्मणाने समाधानी असले पाहिजे, जो ब्राह्मण समाधानी नसतो त्याचा नाश होतो. राजाला संपत्ती व राज्याचा संतोष वाटला नाही पाहिजे. यामुळे संतुष्ट राहाणाऱ्या राजाचा नाश होतो. वेश्येचा व्यवसायच निर्लज्जपणाचा आहे, म्हणून लाज बाळगणारी वेश्या नष्ट होते. गृहिणी-कुळवधू वा कोणत्याही घरातील लेकी-सूना लज्जा बाळगणाऱ्या असणेच आवश्यक आहे. लज्जा हाच त्यांचा सर्वात मोठा अलंकार आहे निर्लज्ज गृहिणींचा नाश होतो.

## विद्वानाची सर्वत्र जागी पूजा होते :-

किं कुलेन विशालेन विद्याहीने चे देहिनाम्।
दुष्कुलं चापि विदुषी देवैरपि हि पूज्यते।। **19** ।।

विद्वानाचा मोठेपणा, महत्व सांगताना आचार्य सांगतात की विद्याच नसेल तर मोठ्या विशाल

कुळाचे काय करावे? विद्वान नीच कुळातील असला तरी देवासारखा पूजनीय असतो, त्याची पुजा होते.

अर्थ असा आहे की विद्वानाचा सन्मान होतो खानदानाचा नाही होत. नीच खानदानात जन्म घेतलेली व्यक्ती विद्वान असेल तर सगळेच सन्मान करतात.

विद्वान प्रशस्यते लोक विद्वान सर्वत्र गौरवम्।
विद्वया लभते सर्वं विद्या सर्वत्र पूज्यते।। **20** ।।

आचार्य चाणक्य विद्वानाची प्रशंसा करताना म्हणतात की विद्वानाची जनात प्रशंसा होते. विद्वानाचा सर्वत्र गौरव होतो, विद्येमुळे सर्व कांही प्राप्त होते आणि विद्येची सर्वत्र पुजा होते.

अर्थ असा आहे की विद्येमुळेच मनुष्याला समाजात आदर प्रशंसा मान-सन्मान आणि तो ज्या कशाची इच्छा करील ते सर्व त्याला मिळते, कारण सर्वजण विद्येचा सन्मान, आदर करतात.

मांस भक्ष्यैः सुरापानैमूखैश्छास्त्रवर्जितैः।
पशुभिः पुरूषाकारैण्क्रांता**ऽस्ति** च मोदिनी।। **21** ।।

दुर्गणांनी लिप्त झालेल्या मनुष्याच्या स्थितीचे वर्णन करताना आचार्य म्हणतात की मांसाहारी, दारूडा आणि मुर्ख पुरुष याच्या रूपात पशु असतो. यांच्या भाराने पृथ्वी खचत आहे.

याचा आशय असा आहे की मांस खाणारे, दारू पिणारे आणि मुर्ख या तिघांना पशु समजले पाहिजे. जरी यांचे शरीर मनुष्याचे असले तरीही. मनुष्याच्या रूपातील हे पशु पृथ्वीसाठी भार आहेत.

यांच्यामुळे नुकसान होतेः-

अन्नहीनो दहेद्रष्ट्रं मन्त्रहीनश्च ऋत्विजः।
यजमानं दानहीनो नास्ति यज्ञसमो रिपुः।। **22** ।।

आचार्य चाणक्य नुकसानदायक कारणांची चर्चा करताना सांगतात की अन्नहीन राजा राष्ट्रला नष्ट करतो. मंत्रहीन ऋषी आणि दान न देणारा यजमान हे सुद्धा राष्ट्राचा नाश करतात. या प्रकारच्या ऋषीकडून यज्ञ करून घेणे आणि अशा यजमानाचे असणे आणि त्यांचे यज्ञ करणे म्हणजेच देशाशी शत्रुत्व केल्यासारखे आहे.

अर्थात ज्या राजाच्या राज्यात धान्याची टंचाई आहे, ज्या ऋषीला मंत्र माहित नसून त्यांचे पूर्ण ज्ञान नाही. यज्ञानंतर यजमान दान देत नाही. असा राजा, असा ऋषी आणि यजमान हे तिघेही राष्ट्रनाश करतात. यांचे यज्ञ करणे म्हणजे राष्ट्रशी शत्रुत्व करणे आहे.

धान्य नसल्यावर यज्ञ केले जाते. यज्ञाचे ब्राह्मण विद्वान असले पाहिजेत. त्यांना यज्ञातील मंत्रंचे पूर्ण ज्ञान पाहिजे. यज्ञानंतर यजमान ब्राह्मणांना दान करतो. जर मंत्रहीन ब्राह्मण आणि दक्षिणा न देणारा यजमान यज्ञ करतील तर त्यांना देशाचे सर्वात मोठे शत्रु म्हटले गेले आहे.

# नववा अध्याय

मोक्षः-

मुक्तिमिच्छसि चेतात विषयान् विषवत् त्यज।
**क्षमाऽऽर्जवदयाशौ** चं सत्य पीयूषवत् विब।। **1** ।।

आचार्य चाणक्य येथे मोक्षासाठी अपेक्षित स्थितीची चर्चा करताना असे सांगतात की हे प्रिय, जर तुम्हाला मुक्ती हवी असेल तर विषयांना (भोगांना) विष मानून त्यांचा त्याग केला पाहिजे. क्षमा, आर्जव, दया, सत्य आणि पवित्रता इत्यादी गुणांचे अमृतासारखे सेवन करा.

अर्थ हा आहे की जर एखाद्या मनुष्याला मोक्ष प्राप्तीची इच्छा असेल तर सर्वात अगोदर त्याला आपल्या इंद्रिय भोगांचा त्याग केला पाहिजे, त्यांना विषासमान मानले पाहिजे. त्याने आपल्या इच्छा-वाईट गुण यांचा त्याग केला पाहिजे. मगच दया, क्षमा इत्यादी गुणांचा स्वीकार केला पाहिजे. सत्त्याच्या मार्गावर चालताना आपल्या स्वतःच्या आत्म्याला पवित्र केले पाहिजे. तेव्हाच मोक्ष प्राप्त होऊ शकतो.

परस्परस्य मर्माणि ये भाषन्ते नराधमाः।
ते एव विजयं यान्ति वल्मीकोदरसर्पवत्।। **2** ।।

आचार्य सांगताच की जो मनुष्य आपसातील संभाषण परस्पर अन्य लोकांना सांगतो तो वारुळातील सापासारखे नष्ट होतात.

अर्थात जे दुष्ट एकमेकातील गोष्टी सांगतात, गुपिते सांगतात आणि नंतर मग ती गुपिते इतर लोकांना सांगतात असे लोक त्या सापाप्रमाणे नष्ट होतात जे आपल्या बिळातच मारले जातात, ज्यांना स्वतःला वाचविण्याची संधी मिळत नाही.

विडंबनाः-

गन्धं सुवर्णे फलमिक्षुदण्डे
नाकारिपुष्पं खुल चन्दनस्य।
विद्वान घनी भूपतिदीर्घजीवी
धातूः पूरा को**ऽ** पि न बुद्धिदो**ऽ** भूत।। **3** ।।

मोठ्या महत्वाच्या वस्तुमध्ये प्रदर्शन करण्याचा गुण नसतो, याची चर्चा करताना आचार्य म्हणतात की सोन्यात सुगंध, उसात फळ, चंदनाला फुल नसते. विद्वान श्रीमंत नसतो आणि राजा दीर्घायुषी नसतो. ब्रह्मला हे ज्ञान अगोदर कोणीच दिले नाही का?

याचा आशय असा आहे की सोने हा मौल्यवान धातु आहे, परंतु त्यात सुगंध नसतो. उसामध्ये गोडवा असतो पण त्याला फळ लागत नाही. चंदनाला सुगंध असतो पण फुल येत

नाही. विद्वान व्यक्ती निर्धन असते आणि राजा अल्पायुषी असतो. सृष्टी निर्माण करणाऱ्या ब्रह्मला या सर्व गोष्टींविषयी सल्ला अगोदर कोणी दिला नसेल का?

## सर्वात मोठे सुखः-

सर्वौषधीनाममममृतं प्रधानं
सर्वेषु सौख्येष्वशनं प्रधानम्।
सर्वेन्द्रियाणां नययं प्रधानं
सर्वेषु गात्रेषु शिरः प्रधानम्।।**4** ।।

आचार्य चाणक्य येथे वस्तुच्या मोठेपणाचे महत्व सांगताना म्हणतात की सर्व औषधांमध्ये अमृत प्रमुख आहे. सर्व सुखांमध्ये भोजन प्रमुख आहे. सर्व इंद्रीयांमध्ये डोळे प्रमुख आहेत. सर्व अंगामध्ये मस्तक (डोके) महत्वपूर्ण आहे.

येथे आशय असा आहे की औषधांमध्ये गुलवेल महत्वपूर्ण आहे. भोजन करणे व तो पचविणे ही शक्ती कायम राहावी हेच सर्वात मोठे सुख आहे. हात, कान, वगैरे सर्व इंद्रीयांमध्ये डोळे सर्वात आवश्यक आहेत. डोकं शरीराचा सर्वात जास्त महत्वाचा अवयव आहे.

## विद्येचा सन्मानः-

दूतो न **सञ्चरित** च चलेच्च वार्ता
पूर्वं न जल्पितमिदं न च **संगमोऽस्ति।**
व्योम्निस्मिं **रविशशिग्रहणं** प्रशस्तं
जानाति यो द्विजवरः स कथं न विद्वान।। **5** ।।

आचार्यांचे कथन आहे की आकाशात कोणीही दूत जाऊ शकत नाही आणि त्याच्याशी बोलणे होऊ शकत नाही, ना यापूर्वी कोणी सांगितले आहे, ना तेथे कोणाला भेटू शकतात. तरीसुद्धा विद्वान चंद्र-सूर्य ग्रहणाविषयी अगोदरच सांगतात. अशा लोकांना कोण विद्वान म्हणणार नाही.

आशय असा आहे की विद्वान लोकं अगोदरच गणिती विद्येचा वापर करून सूर्य-चंद्राच्या ग्रहणाविषयी माहिती देतात. आकाशात तर माणसाला पाठविता येत नाही, तेथे कोणाशी बोलताही येत नाही, सूर्य व चंद्राला कोणीच भेटू शकत नाही आणि ना तर पूर्वी कोणी हे सांगितले आहे की ते ग्रहण केव्हा होणार आहे? अशा ज्ञानी विद्वानांचा कोण सन्मान करणार नाही.

## यांना झोपू देऊ नकाः-

विद्यार्थी सेवकः पान्थः क्षुधार्तो भयकातरः।
भाण्डारी च प्रतिहारी सप्तसुप्तान् प्रबोधयेत।। **6** ।।

आयार्च चाणक्य निद्रेतून जागृत होणाऱ्या पात्रंची चर्चा करताना सांगतात की विद्यार्थी,

नोकर, वाटसरू, भूकेने व्याकूळ, भीतीग्रस्त, कोठीवान, पहारेकरी या सात लोकांना झोपेतून जागे करावे.

अर्थ हा आहे की विद्यार्थ्यांना, नोकरांना, वाटेवर झोपलेल्या वाटसरूला, भूकेल्या व्यक्तीला, कशाला तरी खूप भ्यायलेल्या एखाद्या गोदामाच्या रक्षकाला आणि पहारेकऱ्याला झोपू नाही दिले पाहिजे. जर ते निद्रीस्त असतीत तर त्यांना जागे करावे.

## यांना जागे करू नयेः-

> अहिं नृपं च शार्दूलं वराटं बालकं तथा।
> परश्वानंच मुर्खं च सप्तसुप्तात्र बोधयेत।। **7** ।।

येथे आचार्यांचे कथन आहे की साप, राजा, सिंह, गांधीलमाशी, बालक, दुसऱ्याचा कुत्रा आणि मुर्खांना झोपलेले असताना जागे करू नये.

अर्थ असा आहे की जर साप, राजा, सिंह, गांधीलमाशी, बालक, लोकांचा कुत्रा आणि मुर्ख हे सातजण जर झोपलेले असतील तर त्यांना झोपूच द्यावे. यांना उठविणे चांगले नाही.

## यांच्यापासून कांही नुकसान नाहीः-

> अर्थाधीताश्च यैर्वेदास्तथा शुद्धान्नभोजिनः।
> ते द्विजाः कि करिष्यन्ति निर्विषा इव पन्नगाः।। **8** ।।

येथे आचार्यांचे कथन आहे की संपत्तीसाठी वेदांचे अध्ययन करणारा, शूद्रांचे अन्न खाणारा ब्राह्मण, विषहीन सापासारखे आहेत, अशा ब्राह्मणाचे काय करावे.

आशय असा आहे की वेदांचा अभ्यास फक्त ज्ञान प्राप्तीसाठी केला जातो परंतु संपत्ती कमविण्यासाठी जो ब्राह्मण वेदांचे अध्ययन करतो, आणि शूद्रांचे अन्न खातो तो ब्राह्मण विनविषारी सापासारखा असतो. असा ब्राह्मण आपल्या आयुष्यात कोणतेही चांगेले काम करू शकत नाही.

## यांना भिऊ नयेः-

> यस्मिन रूष्टे भयं नास्ति तुष्टे नैव धनागमः।
> निग्रहोऽ नुग्रहो नास्ति स रूष्टः किं करिष्याति।। **9** ।।

येथे आचार्य सांगतात की ज्याच्या नाराज होण्याची कांही भीती नसते आणि प्रसन्न नाही झाला तर पैसाच मिळतो, जो कोणाला शिक्षा करू शकत नाही आणि कोणावर कृपाही करू शकत नाही. असा मनुष्य रूष्ट झाला तरी तो काही करणार नाही?

याचा अर्थ असा आहे की जी व्यक्ती कोणत्याही उच्च पदावर नाही आणि श्रीमंतसुद्धा नाही, अशी व्यक्ती नाराज झाली तरी कोणाचेच कांही नुकसान करू शकत नाही आणि प्रसन्न झाली तरी कोणाला काय देऊ शकते? अशा व्यक्तीचे रूष्ट होणे वा प्रसन्न होणे याला कांहीच अर्थ नसतो.

अवडंबरसुद्धा आवश्यक आहेः-

निर्विषेणापि सर्पेण कर्तव्य महती फणा।
विषमस्तु न वाप्यस्तु घटटोपो भयंकरः।। **10** ।।

आचार्य येथे गाजावाजा करण्याविषयी चर्चा करताना सांगतात की विषरहित सापाला सुद्धा आपला फणा काढावा लागतो. विष असो वा नसो, हे कोणाला माहित नसते, पण फणा काढलेल्या सापाला पाहून लोक भीतात. बिनविषारी सापाला सुद्धा आपले रक्षण करण्यासाठी फणा काढावाच लागतो. समाजात जीवंत राहण्यासाठी व्यक्तीला केव्हातरी देखावा व राग करावाच लागतो.

महापुरुषांचे जीवनः-

प्राप्त द्यूतपसंगेने मध्याह्ने स्त्रीप्रसंगतः।
रात्रै चौरप्रसंगेन कालो गच्छति धीमतात्।। **11** ।।

महापरुषांच्या जीवनाची चर्चा सांगत असताना आचार्य म्हणतात की विद्वानांचा प्रातःकाळचा वेळ जुगाराच्या प्रसंगात (महाभारत कथा)जातो, दुपारचा वेळ स्त्री प्रसंग (रामायण कथा) सांगताना जातो आणि रात्रीचा वेळ चोर-प्रसंग (कृष्ण कथा) सांगताना जातो. हीच महापुरूषांची जीवनचर्या असते.

आशय हा आहे की विद्वान महापुरुष प्रातःकाळी जुगाराची कथा (महाभारत) अध्ययन करतात. या कथेमध्ये जुगार-छळ-कपट-इत्यादी वाईट गुणांचे ज्ञान होते. दुपारी ते स्त्री कथा म्हणजेच रामायणाचा अभ्यास करतात. रामायणमध्ये रावणाच्या स्त्री-आसक्तीचे वर्णन आहे. हीच आसक्ती रावणाच्या विनाशाचे कारण होते. या कथेतून शिकायला मिळते की मनुष्याने इंद्रियांचा गुलाम होता कामा नये. इंद्रियांचा गुलाम होऊन परक्या स्त्रीकडे वाईट दृष्टीने पाहिल्यामुळेच रावणाचा नाश झाला होता. रात्रीच्या वेळी महापुरुष भगवान कृष्णाच्या कथेचे अध्ययन करतात.

तात्पर्य असे आहे की महापुरुषांची जीवनचर्चा एक नियमित वेळ पत्रकानुसार चालत असते. ते नेहमी ज्ञान प्राप्त करुन घेण्यात मग्न असतात.

सौंदर्यांचा ऱ्हासः-

स्वहस्तग्रथिता माला स्वहस्तघृचन्दम्।
स्वहस्तलिखितस्तोत्रं याक्रस्यापि श्रियं हरते्।। **12** ।।

आचार्य चाणक्याचे सांगणे आहे की आपल्या हाताने गुंफलेला हार, स्वतःच्या हाताने उगाळलेले चंदन आणि स्वहस्ते लिहिलेले स्त्रेत इंद्राची शोभा सुद्धा हिरावून घेतात.

याचा आशय असा आहे की आपल्या हाताने विणलेली माळ घालू नये, आणि स्वतः उगाळलेले चंदन आपल्या शरीराला लावू नये. असे केलं तर कोणाही व्यक्तीच्या सौंदर्यात घट होते. आपल्या हाताने लिहिलेल्या मंत्र वा पुस्तकाने पुजा करू नये. असं केलंतर पुजेचे फळ

मिळत नाही, आणि उलट नुकसानच होते.

दाबणे:-

> इक्षुदण्डास्तिलाः शुद्रा कान्ताका**ञ्च** नमेदिनी।
> चन्दनं दधि ताम्बूलं मर्दनं गुणवर्धनम्।। **13** ।।

येथे आचार्य चाणक्य दाबल्या जाण्याच्या गुणवत्तेविषयी सांगताना म्हणतात की उस, तीळ, शुद्र, पत्नी, सोने, पृथ्वी, चंदन, दही आणि पान (विडा) यांच्या दाबण्यामुळेच त्यांचे गुण वाढतात.

अर्थ असा आहे की उसाला आणि तीळाला कुटल्या -ठेचल्यामुळे, शुद्राची सेवा घेतल्यामुळे, स्त्रीसोबत संभोग केल्यामुळे सोन्याला ठोकल्यामुळे, पृथ्वीमध्ये कष्ट केल्यामुळे, चंदन घासले गेल्यामुळे, दही घुसळल्यामुळे आणि पान चावल्यामुळेच यांचे गुण वाढतात.

उपचार गुणः-

> दरिद्राता धीरतया विराजते।
> कुवस्त्रता स्वच्छतया विराजते।
> कदन्नता चोष्णातया विराजते
> कुरूपता शीलतया विराजते।। **14** ।।

आचार्य चाणक्य येथे सापेक्ष गुणांच्या प्रभावाची चर्चा करताना म्हणतात की धीराने निर्धनतासुद्धा सुंदर वाटते, स्वच्छ राहिल्यामुळे साधारण कपडे सुद्धा चांगले वाटतात, गरम केले तर शिळे भोजनसुद्धा चविष्ट होते आणि शांत-सुशील स्वभावामुळे कुरूपतासुद्धा सुंदर वाटते.

अर्थ असा आहे की धीर गंभीर राहिले तर व्यक्ती आपल्या गरीबीत सुद्धा सुखाने राहू शकतो. स्वच्छ कपडे वापरले तर साधारण कपडे सुद्धा चांगले वाटू लागतात. शिळे भोजन गरम केले तर स्वादिष्ट लागते. जर कुरूप व्यक्ती चांगल्या आचरणाची आणि स्वभावाची असेल तर सर्वजण त्याच्यावर प्रेम करतात गुणांमुळे वैगुण्यांमध्ये सुद्धा सुंदरता येते.

# दहावा अध्याय

## विद्या संपत्तीपेक्षा मोठे धन आहेः-

धनहीनो न च हीनश्च धनिक स सुनिश्चयः।
विद्या रत्नेन हीनो याः स हीनः सर्ववस्तुषु।। **1** ।।

आचार्य चाणक्य येथे विद्येला संपत्तीपेक्षा मोठे धन आहे असे सांगताना म्हणतात की धनहीन मनुष्याला हीन म्हणतात येत नाही. त्याला श्रीमंतच समजले पाहिजे. जो विद्यारत्न वंचित आहे, वस्तुतः जो सर्व वस्तुमध्ये हीन आहे.

याचा अर्थ असा आहे की विद्वान व्यक्ती जर निर्धन आहे तर त्याला हीन मानू नये तर तो श्रेष्ठच मानला जातो. विद्या नसणारा मनुष्य सर्वगुणहीन समजला जातो. मग तो श्रीमंत असला तरीही, कारण विद्येमुळे गुण किंवा कलेमुळे व्यक्ती अर्थप्राप्ती करू शकतो. यासाठी मनुष्याने विद्येची उपासना करावी वा एखादी कला शिकावी ज्यामुळे तो पैसा प्राप्त करून घेऊ शकेल आणि आपले जीवन त्यानुसार व्यतीत करेल.

## विचार करून कर्म कराः-

दृष्टिपूतं न्यसेत् पादं वस्त्रपूतं जलं पिवेत्।
शा**स्त्रा** पूत्रं वदेद् वाक्यं मनःपूतं समाचारेत्।। **2** ।।

येथे आचार्य कर्माचे प्रतिपादन करताना, त्याची चर्चा करताना सांगतात की डोळ्यानी चांगल्या रीतीने पाहूनच मग पाऊल टाकावे, पाणी वस्त्राने गाळून प्यावे. शास्त्रानुसार गोष्ट करावी आणि जे काम करण्यास मन होकार देईल तेच करावे.

आशय असा आहे की कोठेही पाय ठेवताना चांगल्या प्रकारे पाहून घ्यावे, कपड्याने गाळून घेतलेले पाणीच प्यावे, तोंडाने कोणतीही अप्रिय, चूक गोष्ट बोलू नये आणि पवित्र मन ज्या कामाला सम्मती देईल तेच काम करावे. लक्षात ठेवण्यासारखी बाब ही आहे की ध्यानपूर्वक (कार्य करण्यापूर्वी विचार करून) आचरण केले तर सावधानपूर्वक कर्माची प्रक्रिया पूर्ण होते. यात संशयाला मुळीच जागा नाही.

सु**खा** र्थी चेत् त्यजेद्विद्यां त्यजेद्विंद्यां विद्यार्थी चेत् त्यजेत्सुखम।
सूखार्थिन कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम्।। **3** ।।

आचार्य म्हणतात की जर सुखाची इच्छा आहे तर विद्येचा त्याग करा आणि जर विद्येची इच्छा आहे तर सुखांचा त्याग करा. सुखाची इच्छा करणाऱ्यांना विद्या नसते आणि विद्येची इच्छा करणाऱ्याला सुख नसते.

अर्थ असा आहे की विद्या खूप कष्टाने प्राप्त होते. विद्या प्राप्त करणे आणि सुख प्राप्त करणे

दोन्ही गोष्टी बरोबर, एकाच वेळी होणे शक्य नसते. ज्याला सुख व आराम हवा आहे त्याला विद्या सोडावी लागते आणि ज्याला विद्या प्राप्त करायची इच्छा आहे त्याला सुख-आरामांचा त्याग केला पाहिजे.

> कवयः कि न पश्यन्ति किं न कुर्वन्ति योषितः।
> मद्यपा किं न जल्पन्ति किं व खादन्ति वायसाः।। **4** ।।

आचार्य चाणक्य व्यक्तीच्या मर्यादेबाहेरील जास्त कल्पना व कर्माची चर्चा करताना म्हणतात की कवि काय काय नाही पाहात? स्त्रिया काय एक करीत नाहीत? दारूडा, मद्यपी काय नाही बरळत? आणि कावळे काय खात नाहीत?

आशय हा आहे की आपल्या कल्पनेने कविजन सूर्याच्या पुढे निघून जातात. ते काय व कशाचा विचार करू शकत नाही तेच कमी आहे. स्त्रिया कोणतेही चांगल-वाईट काम करू शकतात. मद्यपी नशेच्या अंमलात जे जे बोलतो ते कमी नसते, तो कांहीही बरळू शकतो. कावळा कोणतीही चांगली-घाण वस्तु खातो.

भाग्यः-

> रंकं करोति राजानं रकमेव च।
> धनिनं निर्धनं चैव निर्धनं धनिनं विधिः।। **5** ।।

येथे भाग्याची चर्चा करताना आचार्य चाणक्य सांगतात की भाग्य रंकाला राजा आणि राजाला रंक बनवितो. श्रीमंताला गरीब व गरीबाला श्रीमंत करतो.

आशय असा आहे की भाग्य मोठे बळवान असते. ते एका भिकाऱ्याला क्षणातच राजा बनवीते व एकाच क्षणात राजाला रंक करते. भाग्य विरूद्ध असेल तर एखाद्या संपन्न व्यक्तीला निर्धन होण्यास कांहीच वेळ लागत नाही आणि भाग्य चांगले असते तर मामूली मनुष्यसुद्धा क्षणात पुन्हा सावकार होऊ शकतो आणि हा सगळा भाग्याचा खेळ आहे. कर्मानंतर फळ बरेच कांही भाग्यावर अवलंबून असते.

## लोभी व्यक्तीला कांही मागू नयेः-

> लुब्धानां याचकः शत्रुर्मूर्खाणां बोधकः रिपुः।
> जारस्त्रीणां पतिः शत्रुश्चौराणां चन्द्रमा रिपुः।। **6** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की लोभी माणसासाठी भीक, वर्गणी व मदत, दान मागणारे व्यक्ती शत्रुसमान असतात कारण ह्या मागणाऱ्या लोकांना देण्यासाठी त्यांना स्वतःजवळचा पैसा बाहेर काढावा लागतो. याच प्रकारे मुर्खांना समजाऊन-उमजाऊन सांगणारी व्यक्ती स्वतःची वैरी वाटते. कारण तो मनुष्य यांच्या मुर्खपणाचे समर्थन करीत नाही. दुराचारिणी स्त्रीसाठी तीचा पती तीचा शत्रु असतो कारण तो तीच्या स्वतंत्र व स्वच्छंद वागण्यात मोठा अडथळा असतो. चोर चंद्राला आपला शत्रु मानतात कारण त्यांना अंधारात लपणे सोपे असते. चंद्राच्या प्रकाशात ते जमत नाही. माकड आणि सुताराची गोष्टसुद्धा मुर्खांना उपदेश करण्याचा परिणाम सांगते, की

मुर्खापासून फक्त नुकसानच होते, लाभ नाही. यामुळे मुर्खांना शिकविण्याची आणि लोभी व्यक्तीला कांही मागणी करण्याची चूक करू नये. नसते पदरी फक्त दु:ख आणि निराशाच पडते.

## गुणविना नर पशु समानः-

येषां न विद्या न तपो न दानं
न चापि शीलं च गुणो न धर्मः।
ते मर्त्यलोके भुवि भारभूता
मनुष्यरूपेण मृगाश्चरन्ति।। **7** ।।

आचार्य चाणक्य येथे विद्या, दान, शील इत्यादी गुण नसलेल्या व्यक्तीची निरर्थकता सांगताना म्हणतात की ज्यांना विद्या, तपस्या, दान देणे, शील, गुण आणि धर्मात कांही देणे-घेणे नाही. ती माणसे पृथ्वीला भार आहेत. ते मानवाच्या रूपात पशु आहेत जे माणसांमध्ये वावरत असतात.

याचा अर्थ असा आहे की जो मनुष्य विद्याभ्यास करीत नाही आणि जो मुर्ख आहे, जो तपस्या करीत नाही, जो कोणाला कधीच कांही देत नाही, ज्याचा स्वभाव आणि आचरण चांगले नाही, ज्याच्यामध्ये एक सुद्धा सदगुण नाही आणि जो पुण्य कार्य, धर्म कार्य करीत नाही, यातली एकही चांगली गोष्ट त्यांच्या स्वभावात नाही. असे लोक विनाकारण पृथ्वीचा भार होऊन राहतात. अशा लोकांना मनुष्याच्या रूपात वावरणारे पशु समजले पाहिजे.

## उपदेश सत्पात्रीला करावाः-

अन्तःसार विहीनानामुपदेशो न जायते।
मलयाचलसंसर्गात् न वेणुश्चन्दनायते।। **8** ।।

येथे आचार्य चर्चा करताना म्हणतात की जी व्यक्ती आतून रिकामी वा पोकळ आहे आणि ज्यांच्यात समजून घेण्याची बुद्धी नाही, अशा लोकांना उपदेश करून कांही लाभ नसतो. कारण त्यांच्यात समजण्याची शक्तीच नसते. जसे की मलयाचलावर उगवले तरी आणि चंदनासोबत राहूनसुद्धा बांबू सुगंधित होत नाही, तसेच विवेकहीन व्यक्तीवर सुद्धा सज्जनांच्या संगतीचा कांहीच प्रभाव पडत नाही.

वस्तुतः प्रभाव त्या लोकांवर पडतो ज्यांच्यात विचार करण्याची, समजून घेण्याची व ग्रहण करण्याची योग्यता असते. ज्याच्याजवळ स्वतः समजण्याची, विचार करण्याची बुद्धी नाही तो दुसऱ्यांचे गुण ग्रहण करू शकत नाही.

यस्य नास्ति स्वयं प्रज्ञा शास्त्रं तस्य करोति किम्।
लोचनाभ्यां विहीनस्य दर्पणः किं करिष्यति।। **9** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की जे लोक शास्त्रला समजून घेण्याची बुद्धी ठेवीत नाहीत, शास्त्र त्यांचे काय व कसे कल्याण करू शकतो? जस एखाद्याच्या दोन्ही डोळ्यात ज्योती नाही, जो जन्मांध आहे तो आरशात स्वतःचा चेहरा कसा काय पाहू शकेल? तसेच आरसा जसा अंध व्यक्तीच्या उपयोगाचा नाही तर त्यामध्ये आरशाचा कांही दोष नाही.

याच पद्धतीने बुद्धीविहीन लोकांसाठी शास्त्र आहे. शास्त्र मुर्ख मुनष्याचा कोणत्याही प्रकाराने उद्धार करू शकत नाही. शास्त्र अथवा शिक्षणसुद्धा त्यांनाच लाभदायक आहे जे स्वतःच्या बुद्धीचा वापर करून त्यांना समजू शकतो.

दुर्जनं सज्जनं कुर्तमुपायो न हि भूतले।
आपानं शतधा धौतं न श्रेष्ठमिन्द्रियं भवत्।। **10** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की मळाचा (घाणीचा) त्याग करणाऱ्या इंद्रीयांना कितीही वेळा स्वच्छ केले, साबण पाण्याने शेकडो वेळा धुतले तरी ते स्पर्श करण्यायोग्य होत नाही. त्याच पद्धतीने दुर्जनाला समजाऊन सुद्धा तो सज्जन होत नाही.

आशय असा आहे की या विश्वात दुर्जनांना सुधारण्याचे प्रयत्न निरर्थक आहेत. कारण की असे कोणतेही साधन नाही ज्याच्या मदतीने त्याला सुधारता येईल. ही गोष्ट कुत्र्याच्या गोष्टीशी साम्य दाखविते. कुत्र्याची शेपूट कितीही दिवस काचेच्या नळीत ठेवली तरी बाहेर काढल्यानंतर ती वाकडीच राहते. मुर्खाला कितीही समजाऊन सांगितले तरी तो मुर्खच राहतो.

आप्तद्वेषाद् भवेन्मृत्युः परद्वेषात्तु धनक्षयः।
राजद्वेषाद् भवेन्नाशो ब्रह्मद्वेषात्कुलक्षयः।। **11** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की साधु-महात्मा यांच्याशी शत्रुत्व केले तर मृत्यू होतो. शत्रुचा द्वेष केला तर संपत्तीचा नाश होतो. राजाचा द्वेष-शत्रुत्व केले तर सर्वनाश होतो. आणि ब्राह्मणाचा द्वेष केला तर कुळाचा नाश होतो.

आशय असा आहे की साधु महात्मा, ऋषी-मुनी, पूज्य लोकांशी द्वेष भावना-शत्रुत्व ठेवले तर मनुष्याचा मृत्यू होतो. शत्रुचा द्वेष केला तर लढाई भांडण वाढते आणि त्यामुळे संपत्ती नष्ट होते. राजाशी शत्रुत्व केले तर व्यक्तीचे सर्व कांही नष्ट होते आणि ब्रह्मज्ञानी मनुष्याचा द्वेष केला तर आपल्या कुळाला कलंक लावण्यासारखे आहे.

## निर्धनता अभिशाप आहेः-

वर वनं व्याघ्रगजेन्द्रसेवितं**,**
द्रुमालयः पत्रफलाम्बु सेवनम्।
तृणेषु श**य्या** शतजीर्णवल्कलं**,**
न बन्धुमध्ये धनहीनजीवनम्।। **12** ।।

आचार्य म्हणतात की मनुष्य हिंस्य, क्रूर प्राणी-वाघ, हत्ती, सिंह अशा भयंकर प्राणी असलेल्या जंगलात जरी राहिला, झाडावर घर करून, फळे-पान खाऊन आणि पाणी पिऊन निर्वाह करीत असला तरी, जमिनीवर गवताचा बिछाना करून झोपला आणि जुन्या, तुटक्या वृक्षाची तुकडे तुकडे झालेल्या सालीचा अंगावर वस्त्रसारखा उपयोग केला, पण पैशाविना अवस्थेत आपल्या नातलगांच्या बरोबर कधीही राहू नये, कारण त्यामुळे त्याला उपेक्षा व अपमानाचे कडू विष प्यावे लागते. तो सर्व दृष्टीने असहाय असतो.

अर्थ असा आहे की निर्धन होणे मोठे पाप आहे. अशा स्थितीत निर्धन व्यक्तीने आपल्या

संबंधी लोकात जे अपमान सहन करावे लागतात. ते मोठे असहृय असतात.

### ब्राह्मण धर्मः-

विप्रो वृक्षस्तस्य मूलं सन्ध्या
वेदाः शा**स्त्रा** धर्मकर्माणि पत्रम्।
तस्मान्मूलं यत्नतो रक्षणीचं
छिन्ने मूले नैव शाखा न पत्रम।। **13** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की ब्राह्मण हा वृक्ष आहे, संध्या त्याचे मूळ आहे, वेद त्यांच्या फांद्या आहेत आणि धर्म-कर्म म्हणजे त्याची पाने आहेत. यामुळे मूळाची हर प्रकारे रक्षा केली पाहिजे. मूळापासून तोडला तर त्याच्या फांद्याही राहाणार नाहीत आणि पाने ही.

येथे अर्थ असा आहे की पुजा-संध्या हे ब्राह्मणाचे मुख्य कर्म आहे. हे न करणारा ब्राह्मण, ब्राह्मण समजला जात नाही. पुजा-संध्या करूनच त्याला वेदांचे खरे ज्ञान होते. तेव्हा तो धर्म-कर्म करू शकतो.

### घरातच त्रैलोक्य-सुखः-

माता च कमला देवी पिता देवो जनार्दनः।
बान्धवा विष्णुभक्ताश्च स्वदेशो भुवनत्रयम्।। **14** ।।

येथे आचार्य तिन्ही लोकांच्या सुखाची चर्चा करताना सांगतात की ज्या मनुष्याची आई लक्ष्मीसारखी आहे, पिता विष्णुसारखा आहे, भाऊबंद विष्णुचे भक्त आहेत, त्याच्यासाठी स्वतःचे घरच त्रिलोकासारखे असते.

अर्थ असा आहे की ज्या मनुष्याची आई गुणांनी लक्ष्मी आहे, आणि वडील भगवान विष्णु सारखे सर्वांचा कल्याण करणारे आहेत आणि नातेवाईक, भाऊबंद ईश्वराचे भक्त आहेत त्या मुनष्याला त्रैलोक्याचे सुख याच सांसारात प्राप्त होते.

### भावनेपासून स्वतःला वाचवाः-

एक वृक्षे समारूढा नानावर्णविहंगमाः।
प्रभाते दिक्षु गच्छन्ति तत्र का परिवेदना।। **15** ।।

आचार्य चाणक्य येथे आरामासाठी घरट्यात येऊन सर्वांना भेटून, सकाळी आप-आपल्या भोजनाच्या शोधात वेगळे-वेगळे निघून जाण्याच्या प्रवृत्तीचे वर्णन करताना सांगतात की एकाच वृक्षावर असलेले अनेक प्रकारचे रंगाचे पक्षी पहाटे वेगवेगळ्या दिशांनी निघून जातात. यात नविन असे कांही नाही. याच प्रकारे कुटुंबातील सर्व सदस्य परिवार रूपी वृक्षावर येऊन बसतात आणि वेळ झाल्यावर निघून जातात. याच्यामध्ये निराशा किंवा दुःख कशाचे? येणे-जाणे व मिलन-विरह तर सृष्टीचा नियम आहे. जो आला तो एक दिवस जाणारच आहे. या साठीच या भावनाप्रधानते पासून वाचले पाहिजे.

बुद्धीच बळ आहेः-

> बुद्धीर्यस्य बलं तस्य निर्बुद्धेस्तु कुतो बलम्।
> वने सिंहो मदोन्मत्तः शशकेन निपातितः।। **16** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की ज्या व्यक्ती जवळ बुद्धी असते, शक्तीसुद्धा त्याच्या जवळ असते. बुद्धीहीनाचे बल सुद्धा निरर्थक आहे, कारण बुद्धीच्या जोरावरच तो त्याचा उपयोग करू शकतो अन्यथा नाही. बुद्धीच्या बळावरच एक ससा बुद्धिमान गर्विष्ट सिंहाच्या जंगलातील विहीरीत झालेल्या मृत्यूला कारणीभूत होतो.

ही कथा अशी आहे की एकदा सर्व पशुंनी सिंहासोबत करारानुसार दरराजे आळी-पाळीने जंगलातील एक पशु सिंहाच्या भोजनासाठी जात असे. एक दिवस एका सशाची पाळी होती तर तो मुद्दाम खूप उशिरा गेला आणि उशीराचे कारण सांगताना सिंहाला म्हणाला की दुसऱ्या एका सिंहाने त्याला खाण्याची इच्छा व्यक्त केली. तेव्हा तो याला सूचना देऊन परत येतो अशी शपथ घेऊन आला आहे. सिंहाने त्याला तो दुसरा सिंह दाखवायला सांगितले तेव्हा सशाने त्याला विहीरीत त्याचेच प्रतिबिंब दाखविले. मुर्ख सिंहाने शत्रुला मारण्यासाठी विहीरीत उडी मारली आणि तेथेच त्याचा मृत्यू झाला.

या कथेचे सार हे आहे की बुद्धीमानच शक्तीचा योग्य उपयोग करू शकतो. बुद्धीहीनाची शक्ती त्याचा उपयोगी पडत नाही. एका छोट्या बुद्धीवंत सशाने स्वतःपेक्षा अधिक शक्तीशाली असणाऱ्या सिंहाला मारले. अक्कल मोठी की म्हैस ही म्हण येथे सर्वार्थाने लागू पडते.

सगळी माया ईश्वराची आहेः-

> का चिन्ता मम जीवने यदि हरिर्विश्वम्भरो गीयते,
> नो चेदर्भकजीवनाय जनजीस्तन्यं कथं निर्मयेत्।
> इत्यालोच्य मुहुर्मुहुर्यदुपते लक्ष्मीपते केवलं,
> त्वत्पादम्बुजसेवनेन सततं कालो माया नीययो।। **17** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की मला जीवनात काय चिंता, जर हरीला विश्वंभर म्हटले तर. जर असं नसतं तर मुलाच्या जीवनासाठी आईच्या स्तनात दूध कसे येते. हेच समजून हे यदुपती, लक्ष्मीपती, मी आपल्या चरणांचे ध्यान, जप करीत वेळ-काळ व्यतीत करतो.

आशय हा आहे की मला आपल्या जीवनाची कांही चिंता नाही कारण ईश्वराला विश्वाचे पालन-पोषण करणारा समजतात. ते सत्त्यच आहे कारण बालकाच्या जन्मापूर्वीच आईच्या स्तनात दूध येते. ही ईश्वराचीच माया आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून हे भगवान विष्णु, मी रात्रं-दिवस आपलेच ध्यान करतो आणि काळ व्यतीत करतो.

> गीर्वाणवाणीषु शिशिष्टबुद्धी
> स्तथा**ऽ** पि भाषान्तर लोलुपो**ऽ** हम्।
> यथा सुरगणेष्वमृते व सेविते
> स्वर्गांगनानामधरासवे रूचिः।। **18** ।।

आचार्य चाणक्याने कथन आहे की संस्कृत भाषेचे विशेष ज्ञान झाल्यावर सुद्धा मी अन्य भाषामध्ये शिकू इच्छितो. स्वर्गात देवाजवळ पिण्यासाठी अमृत असते, तरी सुद्धा ते अप्सरांच्या ओठातील रस पिण्याची इच्छा करतात.

## तूप सर्वात मोठी शक्तीः-

अन्नाद् दशगुणं पिष्टं पिष्टाद् दशगुणं पयः।
पयसोऽ ष्ट गुणं मासं मांसाद् दशगुणं घृतम्।। **19** ।।

येथे आचार्य चाणक्य शक्तीची चर्चा करताना सांगतात की साधारण अन्नाच्या पीठात दहा पट शक्ती आहे. पीठापेक्षा दहापट शक्ती दूधात आहे. दूधापेक्षा दहापट अधिक शक्ती मांसात आणि मांसापेक्षा दहापट अधिक शक्ती तूपामध्ये आहे.

याचा आशय असा आहे की साधारण जेवणापेक्षा पीठात दहापट जास्त शक्ती असते, पीठा पेक्षा दूधात दहापट अधिक शक्ती असते, दूधापेक्षा दहापट अधिक शक्ती मांसमध्ये आहे आणि मांसपेक्षा दहापट जास्त शक्ती तूपामध्ये असते. या अशा प्रकारे आरोग्यासाठी तूप सर्वात जास्त लाभदायक आहे.

## चिंता चित्तेसमानः-

शोकेन रोगाः वर्धन्ते पयसा वर्धते तुनः।
घृतेन वर्धते वीर्य मांसान्मांसं प्रवर्धते।। **20** ।।

आचार्य चाणक्य येथे कार्य-कारणाची चर्चा करनताना सांगतात की दुःखाने रोग वाढतात. दूधाने शरीर वाढते. तूपामुळे वीर्य वाढते. मांसामुळे मांस माढते.

आशय असा आहे की चिंतामग्न राहिल्याने वा दुःखी राहिल्याने मनुष्याला अनेक रोग होतात. दूध प्यायल्यामुळे मनुष्याचे शरीर वाढते. तूप खाल्ल्याने बळ वीर्य वाढते. मांस खाल्ल्यामुळे फक्त मांसच वाढते.

# अकरावा अध्याय

## संस्काराचा प्रभावः-

दातृत्वं प्रियवक्तृत्वं धीरत्वमुचितज्ञता।
अभ्यासने न लभ्यन्ते चत्वारः सहजा गुणानाः।। **1** ।।

आचार्य चाणक्य मनुष्याच्या जन्मजात गुणांची चर्चा करताना सांगतात की दान करण्याची सवय, प्रिय बोलणे, धीर आणि उचित ज्ञान हे चार मनुष्याचे सहज गुण आहेत, जे अभ्यासाने, शिकून येत नाहीत.

आशय हा आहे की दान करण्याचा स्वभाव, सर्वांबरोबर मधुर संभाषण करणे, धीर आणि खऱ्या वस्तुची पारख करणे हे व्यक्तीचे नैसर्गिक गुण आहेत. अर्थात हे गुण व्यक्तीबरोबरच उत्पन्न होतात. हे गुण कोणाला शिकविता येत नाहीत. मनुष्याने स्वतः यांचा कितीही अभ्यास केला तरी यांना प्राप्त करता येत नाही.

## नाशः-

आत्मवर्गं परित्यज्य परवर्गं समाश्रयेत्।
स्वयमेव लयं याति यथा राज्यमधर्मतः।। **2** ।।

आचार्य चाणक्य जाती आणि वंशाच्या बाहेरची मदत घेण्याच्या प्रवृत्तीचा निषेध करताना म्हणतात की आपल्या स्तराला सोडून दुसऱ्या वर्गाचा आधार घेणारा मनुष्य त्याच प्रकाराने नष्ट होतो, जसे की अधर्मामुळे एक राज्य नष्ट होते.

आशय असा आहे की देशात धर्म म्हणजेच न्याय-कायदा याची व्यवस्था चौपट होते तो देश हळूहळू नष्ट होतो. याच प्रकारे आपला समाज वा देशाशी द्रोह करून दुसऱ्या समाज वा देशात सामील होणारा मनुष्य सुद्धा नष्ट होतो.

## सूखापेक्षा किर्ती मोठीः-

हस्ती स्थूलतनूः स चांकुश वशः किं हसितमात्रेंऽ कुशः
दीपो प्रज्वलिते प्रशश्यति तमः कि दीममात्रं तमः।
वज्रेणभिहताः पतन्ति गिरयः कि वज्रमात्रं नगाः
तेजोयस्य विराजते व बलवान् स्थूलेषु कः प्रत्ययः।।**3** ।।

आचार्य चाणक्य येथे वस्तु वा व्यक्तीच्या आकाराच्या तुलनेत गुणवत्तेवर भर देताना म्हणतात की स्थूळ (महाकाय) शरीराचा असून सुद्धा हत्तीला अंकुश वापरून वश करता येते. म्हणजे काय अंकुश हत्तीच्या बरोबरीचा थोडाच असतो? दीपक लावला तर अंधाराला दूर करतो तर काय

अंधार दिव्याच्या बरोबरीचा थोडाच असतो? वज्राच्या आघाताने पहाड तोडता येतो म्हणून काय पहाड वज्रासारखा असतो? नाही-ज्याच्यामध्ये तेज असते तोच शक्तीमान असतो. लठ्ठ, मोठा असल्यामुळे काही लाभ होत नाही.

अर्थ असा आहे की लहानसा अंकुश मोठ्या अजस्त्र हत्तीला वश करतो. छोटासा दिवा दाट पसरलेल्या अंधाराला दूर करतो. छोटे असले तरी वज्र मोठ्या-मोठ्या पहाडांना पाडू शकतो. नुसतेच मोठे, महाकाय असण्याचा कांही लाभ होत नाही. ज्यांच्यामध्ये हिमंत आहे, तेज आहे तोच शक्तीमान असतो. कारण तो मोठमोठ्या शक्तीमान असणाऱ्यांना धूळ चारतो.

कलौ दशसहस्राणि हरिस्त्यजति मेदिनीम्।
तदर्द्धे जाह्नवी तोयं तदर्द्धे ग्रामदेवता।। **4** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की कलियुगाची दहावर्षी संपल्यावर ईश्वर पृथ्वी सोडून जातात. याच्या अर्ध्या काळात गंगा आपले पाणी सोडून देते. त्याच्याही अर्ध्या काळात ग्रामदैवत पृथ्वीचा त्याग करतात.

याचा अर्थ असा आहे की कलियुगाची दहा हजार वर्ष पूर्ण झाल्यावर भगवान विष्णु पृथ्वीचा त्याग करून स्वर्ग लोकात निघून जातात. पाच हजार वर्षांचा काळ पूर्ण झाल्यावर गंगा नदीचे पाणी आटून जाते. अडीच हजार वर्षे पूर्ण होताच ग्रामदैवत या पृथ्वीचा त्याग करतात.

## जसे गुण तशी प्रवृतीः-

गृहासक्तस्य नो विद्या न दया मांसभोजिनः।
द्रव्य लुब्धस्य नो सत्य न स्त्रैणस्य पवित्रता ।। **5** ।।

आचार्य चाणक्य असंभवावर चर्चा करताना सांगतात की घर आकर्षण असणाऱ्या व्यक्तीला विद्या प्राप्त होत नाही. मांसाहार करणाऱ्यांमध्ये दया नसते. धन लोभी व्यक्तीमध्ये खरेपणा नसतो व स्वैर व्यक्तीत पवित्रता असंभव असते.

याचा अर्थ हा आहे की ज्याला घराविषयी अत्यंत प्रेम आहे तो विद्या प्राप्त करू शकत नाही. मांसाहारी व्यक्तीकडून दयेची अपेक्षा करणे व्यर्थ आहे. अर्थलोभापासून सत्य दूर असते. स्त्रियांच्या मागे-मागे करणाऱ्या कामुक व्यक्तीमध्ये पावित्र्य नसते.

## सवय बदलत नाहीः-

न दुर्जन साधुदशामुपैति
बहु प्रकारैरपि शिक्ष्यमाणः।
आमलसिक्तं पयसा घृतेन
न निम्बवृक्षोः मधुरत्वमेति।। **6** ।।

आचार्य चाणक्य येथे दुष्ट स्वभावाची चर्चा करतात सांगतात की दुष्टाला सज्जन करता येत नाही. दूध आणि तूपाने शिंपले तरी लिंबाचा वृक्ष गोड होत नाही.

आशय असा आहे की दुष्टाला कितीही शिकविले, समजावले तरी त्याला सज्जन बनविता

येत नाही. लिंबाच्या वृक्षाला हवे तर मूळापासून ते शेंड्यापर्यंत दूध आणि तूपाने न्हाऊ जरी घातले तरी त्यामध्ये गोडवा येत नाही. म्हणजेच "नीम न होय मीठो, चाहे कितना सींचो गुड़-घी से."

अन्तर्गतमलो दुष्टस्थीर्थस्नानशतैरपि।
न शु**द्ध्य** तियथाभाण्डं सुरया दाहितं च तत्।। **7** ।।

आचार्य चाणक्य येथे पापी माणसाला दारूच्या भांड्याची व्याख्या देऊन सांगतात की जसे ते भांडे अग्नीमध्ये जाळल्यानंतर सुद्धा शुद्ध होत नाही. तसेच ज्याच्या मनात पाप आहे तो दुष्ट शेकडो तीर्थ-स्नान केले तरी तो पवित्र होत नाही.

आशय असा आहे की दारूचे भांडे अग्नीत जाळून घेतले तरी त्याला शुद्ध समजता येत नाही. त्याच अर्थाने ज्या व्यक्तीच्या मनान पाप आहे. त्याला तीर्थ-स्थानाचे फळ मिळत नाही. तीर्थ-स्नानाने फार तर शरीर स्वच्छ करता येईल, मन नाही. पापी व्यक्तीने शेकडो तीर्थ-स्नान केले, तरी तो पापीच राहतो.

न वेत्ति यो यस्य गुणप्रकर्षं
स तु सदा निन्दति नात्र चित्रम्।
यथा किराती करिकुम्भलब्धां
मुक्तां परित्यज्य विभर्ति गु**ञ्जा** म्।। **8** ।।

आचार्य चाणक्य वस्तुच्या गुणग्राहकतेविषयी सांगतात की जो त्याच्या गुणांना ओळखत नाही, त्याची जरी निंदा केली तर त्यात आश्चर्य कशाचे? जसे की भिल्ल स्त्री हत्तीच्या मस्तकातील मोती टाकून गुंजाचा हार घालते.

आशय असा आहे की भिल्ल स्त्री हत्तीच्या मस्तकापासून मिळणाऱ्या मोत्यांची किंमत समजू शकत नाही. हा मोती मिळाला तरी ती गुंजांचा हारच घालते. याच प्रकारे एक मुर्ख मनुष्य जर एखाद्या विद्वानाचे गुण समजून घेत नाही आणि त्याची निंदा करतो तर त्यात आश्चर्य वाटण्याचे कांही कारण नाही.

मौनः-

यस्तु संवत्सरं पूर्णं नित्यं मौनेन भु**ञ्ज** ते।
युगकोटिसहस्रन्तु स्वर्गलोक महीयते।। **9** ।।

येथे आचार्य चाणक्य मौनाचे महत्व सांगताना म्हणतात की मौन ठेवणे एक प्रकारची तपश्चर्या आहे. जो मनुष्य फक्त एका वर्षाचे मौन ठेवतो आणि भोजन करतो त्याला कोटी-कोटी युगापर्यंत स्वर्ग लोकांचे सुख प्राप्त होतात.

विद्याशर्थ्यांनी करू नयेत अशा गोष्टीः-

कामं क्रोधं तथा लोभं स्वाद श्रृंगारकौतुकम्।

अतिनिद्राऽ तिसेवा च विद्यार्थी ह्याष्ट वर्जयेत्।। **10** ।।

आचार्य चाणक्य येथे विद्यार्थ्यांनी वर्ज्य करायच्या प्रवृत्तींची चर्चा करताना सांगतात की काम, क्रोध, लोभ, स्वाद, प्रणय, कौतुक, जास्त निद्रा, जास्त सेवा करणे या आठ कामांचा विद्यार्थ्यांनी त्याग करावा.

याचा अर्थ असा आहे की स्त्री-संग, क्रोध करणे, लोभ करणे, जीभेचे छछोरपण, साज-शृंगार, जत्रा-नाटक-तमाशा पाहणे, अति निद्रा आणि कोणाचाही अति सेवा करणे ही आठ काम विद्या प्राप्त करण्यासाठी सोडून द्यावेत.

ऋषीः-

अकृष्ट फळमलानि वनवासरतः सुदा।
कुरूतेऽ हरहः श्राद्धमृषिर्विप्रः स उच्यते।। **11** ।।

आचार्य चाणक्य ऋषीच्या स्वरूपाची चर्चा करताना सांगतात की जो ब्राह्मण विनामशागतीच्या शेतातून फळ, मूळ वगैरे जेवणात खातो, नेहमी वनात राहातो आणि नित्य श्राद्ध करतो त्याला ऋषी म्हणतात.

याचा अर्थ असा आहे की त्याच ब्राह्मणाला ऋषी म्हणतात जो घराचा त्याग करून वनात राहातो, बिना नांगरलेल्या शेतातून उत्पन्न झालेले फळ आणि कंदमूल खातो. नेहमी पितरांचे श्राद्ध करतो.

ब्राह्मणः-

एकाहारेण सन्तुटः षड्कर्मनिरतः सदा।
ऋतुकालेऽ भिगामी व स विप्रो द्विज उच्यते।। **12** ।।

येथे आचार्य ब्राह्मणांच्या गुणांची चर्चा करताना सांगतात की दिवसातून फक्त एकदाच भोजन करणारा, अध्ययन, तप इत्यादी सहा कार्य करणारा आणि फक्त ऋतुकाळातच पत्नीशी संभोग करणारा ब्राह्मणाच विद्वान समजला जातो.

आशय असा आहे की जो ब्राह्मण दिवसातून फक्त एकदाच अन्न सेवन करतो, व त्यातच समाधानी राहातो, जो शिकणे - शिकविण्यात, तपश्चर्या वगैरे कार्यात मग्न असतो आणि जो फक्त मासिक धर्मानंतर ऋतुकाळातच आपल्या पत्नीसोबत संभोग करतो तोच ब्राह्मण विद्वान मानला जातो.

वैश्यः-

लौकिके कर्माणि रतः पशूनां परिपालकः।
वाणिज्यकृषिकर्मा यः स विप्रो वैश्य उच्यते।। **13** ।।

येथे आचार्य चाणक्य ब्राह्मणांनी केलेल्या अशा कर्मांची चर्चा करीत आहेत की ज्यांच्या प्रभावाने तो वैश्य वर्गात मोडला जातो. आचार्यांचे सांगणे आहे की जो ब्राह्मण संसार-कर्मात

मग्न असतो, पशु-पालन करतो, व्यापार व शेती करतो त्याला वैश्य म्हणतात.

आशय असा आहे की दुनियादारीचे, व्यवहाराचे काम करणारा, पशुपालन करणारा, व्यापार करणारा, शेती करणारा ब्राह्मणसुद्धा वैश्यात गणला जाईल. ही काम करण्याऱ्या व्यक्तीला, मग ती कुणीही असो, वैश्य म्हटले जाते.

## मार्जार (मांजर)

परकार्यविहन्ता च दाम्भिकः स्वार्थसाधकः।
छलीद्वेषी मदुक्रूरो मार्जार उच्यते।। **14** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की दुसऱ्यांच्या कामात विघ्न आणणारे, दंभी, स्वार्थी, छळ-कपटी, द्वेषी, मुखात गोडवा असून हृदयातून क्रूर असणारा ब्राह्मण मांजर म्हणून संबोधला जातो.

आशय हा आहे की ज्या ब्राह्मणाच्या स्वभावात पुढील गुण आहेत त्याला मांजर म्हणतात. दुसऱ्यांचे कामात बिघाड घडविणारा गर्विष्ठ स्वभावाचा, फक्त स्वतःचा स्वार्थ साधणारा, दुसऱ्यांचा द्वेष-मत्सर करणारा, छळ-कपट, खोटे बोलणारा, फसवणूक करणारा, तोंडावर गोड - गोड बोलणारा पंरतु मनात पाप असणारा.

## यवनः-

वापीकूपड़ागानामारामसुखश्वनाम्।
उच्छेदने निराशंक स विप्रो म्लेच्छ उच्यते।। **15** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की विहीर, तलाव, देवालय यांना बेडर होऊन नष्ट करणारा ब्राह्मण यवन मानला जातो.

अर्थ हा आहे की जो ब्राह्मण विहीर, कुंड, तलाव, बाग-बागीचा, मंदिर वगैरे नष्ट करतो, ज्याला समाज अथवा लोकलाजेचे भय नसते, त्याला यवन मानावे.

## चांडाळः-

देवद्रव्यं गुरूद्रव्यं परदाराभिमर्षणम्।
निवार्हः सर्वभूतेषु विप्रश्चाडाल उच्यते।। **16** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की जो ब्राह्मण देवांचे वा गुरूच्या वस्तु चोरतो, परस्त्रीसोबत संभोग करतो आणि सर्व प्राण्यांमध्ये निर्वाह करतो त्याला चांडाळ म्हणतात.

अर्थ असा आहे की देवालयातून देवाच्या वस्तु चोरणारा, परस्त्री सोबत कामक्रीडा करणारा आणि सर्व प्रकारच्या चांगल्या वाईट लोकांमध्ये राहून खाणे-पिणे, आचार-व्यवहारांचे पालन न करणारा ब्राह्मण चांडाळ मानला जातो. ही कर्म करणारी व्यक्ती ब्राह्मण समजला जात नाही.

## दानाचा महिमाः-

देयं भोज्यधनं सुकृतिभिर्नो संचयस्तस्य वै,
श्रीकर्णस्य बलेश्च विक्रमपतेरद्यापि कीर्ति रिथता।
अस्माकं मधुदानयोगरहितं नष्ट चिरात्संचित
निर्वाणादिति नष्टपादयुगलं घर्षत्यमी मक्षिकाः।। **17** ।।

दानाची चर्चा करताना आचार्य चाणक्य म्हणतात की महापुरूषांनी खाण्याचे पदार्थ आणि संपत्तीचे दान करावे. यांचा संग्रह करणे उचित नाही. कर्ण, बळीराजा यांची कीर्ती अजूनही कायम आहे. आपले दीर्घकाळ साठवलेले धन, मध ज्याचे आपण दान नाही केले वा त्याचा उपभोग घेतला नाही, नष्ट होते, हाच विचार करून दुःखाने या मधमाश्या आपले दोन्ही पाय घासतात.

आशय हा आहे की महान पुरूषांनी अन्न, संपत्ती यांचे दान करीत राहावे. महारथी कर्ण आणि बळीराजा यांचे नाव फक्त दान-धर्मामुळे अमर आहे. मधमाशा आपला मध स्वतःही खात नाही आणि कोणाला देत ही नाही. तेव्हा एखादा मनुष्य त्या जमा केलेल्या मधाला काढून घेतो आणि त्या दुःखी होऊन स्वतःचे पाय जमिनीवर घासून, आपटून घेतात.

# बारावा अध्याय

गृहस्थ धर्मः-

सानन्दं सदनं सुताश्च सुधयः कान्ता प्रियालापिनी,
इच्छापूर्तिधनं स्वयोषिति रतिः स्वाज्ञापारः सेवकाः।
अतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्नापानं ग्रहे,
साधोः संगमुपासते च सततं धन्यो गृहस्थाश्रमः।। **1** ।।

येथे आचार्य चाणक्य गृहस्थाची चर्चा करताना म्हणतात की ज्या गृहस्थाचे घरी निरंतर उत्सव, यज्ञ, पुजा, कीर्तन वगैरे कार्य होतात, संतती सुशिक्षित असते, पत्नी मधुरभाषिणी, गोड बोलणारी असते, गरज पूर्ण करण्यासाठी पुरेसा पैसा असतो, पती-पत्नी एकमेकावर अनुरक्त असतात, नोकर स्वामीभक्त असतात आज्ञाधारक असतात, पाहुण्यांना भोजन देऊन आदर करतात आणि शिवपूजन होते, मित्रांचे स्वागत घरात जेवण वगैरे देऊन करतात. आणि संत-महात्मा पुरूषांचे येणे-जाणे असते अशा पुरुषाचा गृहस्थाश्रम खरोखरीच प्रशंसनीय असतो. असा मनुष्य अत्त्यंत सौभाग्यशाली आणि कृतार्थ असतो.

आर्ते**षु** विप्रेषु दयान्वितश्चेच्छ्रद्धेन यः स्वल्पमुपैति दानम्।
अनन्तपारं समुपैति दानं यद्दीयते तन्न लभेद् द्विजेभ्यः ।। **2** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की दुःखी लोकांना व विद्वानांना थोडेसे जरी दान केले तर त्याच्या अनंतपटीने त्याला मिळते.

आशय असा आहे की जो मनुष्य दुःखी, गरीब, विद्वान महापुरूषांना थोडे जरी दान करतो, त्याला त्यांच्याकडून प्रत्यक्षात जरी कांही मिळाले नाही तरी यामुळे त्याला खूप मोठे पुण्य मिळते. या पुण्याईमुळेच त्याला त्याने केलेल्या दानाच्या हजारो-लाखोपटीने जास्त कांही प्राप्त होते.

दाक्षिण्यं स्वजने दया परजने शाठ्यं सदा दुर्जने
पीतिः साधुजने समय खलजने विद्धज्जने चार्जवम्।
शौर्यं शत्रूजने क्षमा गुरूजने नारीजने धूर्तताः
इत्यं ये पुरूषा कलासु कुशलास्तेष्वेव लोकस्थितिः।। **3** ।।

आचार्य या श्लोकात त्या कांही चांगल्या लोकांची चर्चा करताना सांगतात की जे आपल्या लोकांवर प्रेम, परक्या लोकांवर दया, दुष्टासोबत कठोर, सज्जनासोबत सरळ, मुर्खांपासून दूर, विद्वानांचा आदर, शत्रुशी शौर्याने आणि गुरूजनांचा आदर करतात, ज्यांना स्त्रियांचे आकर्षण

नसते अशा लोकांना महापुरूष म्हणतात. अशाच लोकांमुळे जग टिकून आहे.

याचा अर्थ असा आहे की जे व्यवहारकुशल लोक आपल्या भाऊबंदावर प्रेम करतात, इतर लोकांवर दया करतात, दुष्टासोबत दुष्टतेनेच कठोर वागतात, साधु, विद्वान, आई-वडील आणि गुरूजनांचा आदर करतात, मुर्ख लोकांपासून दूर राहातात. शत्रुचा शौर्याने सामना करतात आणि स्त्रियांना दूर ठेवतात, अशा लोकांना समाजाचा व्यवहार समजतो, यांच्यामुळेच समाज जिवंत राहातो.

हस्तौ दानवर्जितौ श्रुतिपुटौ सारस्वतद्रोहिणी
नेत्रे साधुविलोकरहिते पादौ न नीर्थं गतौ।
अन्यायार्जितवित्तपूर्णमदरं जार्वेच तुंगं शिरौ
रे रे जम्बुक **मुञ्च मुञ्च** सहसा नीचं सुनिन्द्यं वपुः।। **4** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की हांतानी दान नाही केले, कानांनी कांही ज्ञान नाही श्रवण केले, डोक्यांनी एखाद्या साधूचे दर्शन नाही घेतले, स्वतःच्या पायांनी कधी तीर्थक्षेत्री नाही गेले, अन्यायाने कमविलेल्या कमाईतून उदर निर्वाह केला आणि गर्वाने मस्तक उंचावले, तर हे गिघाडा शरीराचा तात्काळ त्याग कर.

आशय असा आहे की मनुष्यात या प्रकारचे दुर्गुण आहेत त्याला कोल्हा समजले पाहिजे. जसे की ज्याने कधी कोणत्या वस्तुचे दान केले नाही, ज्याच्या कानी कधी ज्ञानाच्या गोष्टी पडल्या नाहीत, ज्याने डोळ्यांनी कधी सज्जनांच-महात्म्यांचे दर्शन घेतले नाही, जो कधी कोणा तीर्थक्षेत्री गेला नाही, जो अवैध मार्गांनी संपत्ती कमवितो आणि गर्विष्ठ असतो. अशा मनुष्यरूपी गिधाडाचा लवकर मृत्यू होणेच चांगले असते.

येषा श्रीमद्यशोदासुत पद-कमले नास्ति भक्तिर्नराणाम्
येषामाभीरकन्य प्रियगुणकथने नानूरक्ता रसज्ञा।
तेषां श्रीकृष्णलीला ललितरसकथा सादरौ नैव कर्णौ**,**
धिक्तान् धिक्तान् धिगेतान् कथयति सततं कीर्तनस्था मृदंग।। **5** ।।

येथे ईश्वर गुणगाणाचे महत्त्व सांगताना आचार्य चाणक्य म्हणतात की मृदंग वाद्यापेक्षा फार चांगला असतो. मृदंगातून 'धिक्रतान' असा आवाज निघतो त्याचा अर्थ असा आहे की त्यांचा धिक्कार आहे. यापुढे जाऊन कवी कल्पना करतो की ज्या लोकांना श्रीकृष्णाच्या चरणांमध्ये अनुराग नाही, ज्यांच्या वाणीला कधी श्रीराधा आणि गोपिकांचे गुणगान करण्यात आनंद नाही, ज्यांचे कान श्रीकृष्णाच्या कथा श्रवण करायला नेहमी उत्सुक नसतात, मृदंग सुद्धा त्यांचा 'धिक्कार आहे, धिक्कार आहे' असे म्हणतो, वस्तुतः जो मनुष्य जीवनात परमेश्वराचे गुणगान करीत नाही त्याचा धि क्कार असो, त्याचे जीवन व्यर्थ आहे.

प**त्रं** नैव यदा करीरविटपे दोषो वसन्तस्य किं
नोलूको**ऽ** प्यवलोकयते यदि दिवा सूर्यास्त किं दूषणम्**?**

वर्षा नैव पतति चातकमुखे मेघस्य किं दूषणम्
यत्पूर्वं विधिना ललाट लिखितं तन्मार्जितुं कः क्षमः।। **6** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की जर कारवीला पान नाही लागले तर वसंत ऋतुचा काय दोष? जर घुबड दिवसा पाहू शकत नाही तर सूर्याचा काय दोष? पावसाचे पाणी चातकाच्या मुखात नाही पडले तर नभांचा काय दोष? भाग्याने जे ललाटी लिहिले आहे त्याला कोण मिटवू शकते?

अर्थ असा आहे की कारवीला पाने येत नाहीत, घुबड दिवसा पाहू शकत नाही आणि चातकाच्या मुखी पावसाचे पाणी पडत नाही. या सर्व गोष्टींसाठी वसंत, सूर्य आणि ढगांना दोषी मानता येत नाही. हा तर त्यांच्या भाग्याचा दोष आहे. तो कोणीही मिटवू शकत नाही.

## सत्संगतीचा महिमाः-

सत्संगतेर्भवति हि साधुता खलानां
साधूनां न हि खलसंगतेः उलत्वम्।
आमोदं कुसुमभवं मृदेव धत्ते
मृदगन्धं न हि कुसुमानि धारयन्ति।। **7** ।।

आचार्य चाणक्य सत्संगाचे महत्व विषद करताना म्हणतात की सत्संगतीमुळे दुष्टामध्येही साधुत्व येते पण दुष्टांच्या संगतीने साधुजनांमध्ये दुष्टता येत नाही. मातीला तर फुलांचा सुगंध लागतो परंतु फुलाला मातीचा वास येत नाही.

अर्थ हा आहे की फुलाच्या सुवासाने माती सुगंधी होते पण मातीच्या गंधाचा फुलावर कांही प्रभाव पडत नाही. तसेच साधु-सज्जनांच्या संपर्कात आल्यावर दुष्टातसुद्धा चांगले गुण येतात. पण दुष्टांच्या दुष्टतेचा सज्जनांवर कांहीच प्रभाव पडत नाही आणि हे चारीत्र्याच्या दृढतेमुळेच शक्य असते. जसे म्हणतात की-

चन्दन विष व्यापत नाही लिपटे रहत भूजंग।

म्हणजेच भुजंगाच्या विळख्यात राहूनसुद्धा चंदनामध्ये विषाचा संचार होत नाही. तो स्वतःची शीतलता कायम ठेवतो.

## साधु दर्शनाचे पुण्यः-

साधूनां दर्शनं पुण्यं तीर्थभूताः हि साधवः।
कालेन फलते तीर्थः सद्यः साधु समागमः।। **8** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की साधुजनांच्या दर्शनाने पुण्य लाभते. साधु तीर्थासारखे असतात. तीर्थाचे फळ कांही काळानंतर मिळते पण साधु समागम त्वरीत फळ देतो.

आशय असा आहे की साधुजनांचे दर्शन केल्यामुळे मनुष्य पापमुक्त होतो आणि त्याला पुण्य मिळते. साधु तीर्थासमान असतात, त्यांची कृपा झाली तर मनुष्याच्या सर्व इच्छा पूर्ण होतात. तीर्थांना गेल्याचे पुण्य उशिरा मिळते पण साधु संगतीचे फळ ताबडतोब मिळते (तीर्थ-मनुष्याच्या इच्छा जेथे पूर्ण होतात त्याला तीर्थ म्हणतात.)

तुच्छतेमध्ये मोठेपणा नाहीः-

> विप्रास्मिन्नगरे महान् कथन कस्ताल द्रुमाणां गाणः
> को दाता रजको ददाति वसनं प्रातर्गृहीत्वा निशि।
> को दक्षः परिवित्तदारहरणं सर्वेऽ पि दक्षाः जनाः
> कस्माज्जीवति हे सखे विषकृमिन्यायेन जीवाम्यहम्।। **9** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की हे मित्रा! या नगरात मोठा कोण आहे? ताडवृक्ष मोठे आहेत. दानी कोण आहे? धोबीच येथे दानी आहे जो सकाळी कपडे घेऊन जातो आणि संध्याकाळी परत करतो. चतुर व्यक्ती कोण आहे? परक्यांचे धन आणि स्त्री हस्तगत करण्यात सगळे चतुर आहेत. तर तुम्ही या नगरात जिवंत कसे राहता? घाणीतील किड्यासारखे जगत आहात.

अर्थ हा आहे की ज्या शहरात विद्वान बुद्धिमान पुरुष राहात नाहीत तेथील लोकांना दान करणे जमत नाही, तेथे चांगली काम करण्यात कोणी चतुर नाही, परंतु लूटमार, वाईट चाल-वागणूकीत सारेच एकापेक्षा एक सरस आहेत. अशा स्थानाला घाणीचा उकिरडा समजावे आणि तेथील लोकांना पाण्यातील किडे. आणि दुःखाची गोष्ट ही आहे की आज विश्व याच गोष्टीवर चालू आहे.

> न विप्रपादोदक पंकिलानि
> न वेदाशास्त्रध्वनिगर्जितानि।
> स्वाहास्वधाकारध्वनिवर्जतानि
> श्यशानतुल्यानि गृहाणितानि ।। **10** ।।

आचार्य चाणक्य घराच्या स्वरूपाची चर्चा करताना म्हणतात की ज्या घरी विप्रांच्या पायाची धूळ पडत नाही, जेथे वेद-शास्त्रांचे उच्चारण ऐकू येत नाही आणि यज्ञातील 'स्वाहा' 'स्वधा' इत्यादी मंत्रउच्चारांचा अभाव असतो असे घर स्मशानासारखे असते.

आशय हा आहे की ज्या घरात विद्वान ब्राह्मणांचा आदर होत नाही, वेद, शास्त्र वगैरेचे अध्ययन, पठण होत नाही आणि जेथे यज्ञ होत नाही अशा घरांना स्मशान समजले पाहिजे.

नातलगांचे सहा गुणः-

> सत्यं माता पिता ज्ञानं **धर्मो** भ्राता दया सखा।
> शान्तिः पन्ती क्षमा पुत्रः षडेते मम बान्धवाः।। **11** ।।

आचार्य चाणक्य मनुष्याच्या गुणांना त्याचा जीवलग हितचिंतक आहे हे सांगताना म्हणतात की सत्त्य माझी जननी आहे, ज्ञान जनक आहे, धर्म भाऊ आहे, दया मित्र आहे, शांती पत्नी आहे आणि क्षमा पुत्र आहे, हे सहाही माझे सगे-सोयरे आहेत.

अर्थ असा आहे की सत्त्य हे व्यक्तीच्या आईसारखे असते, ज्ञान वडीलासारखे असते धर्म भावासमान असतो, दया करणे मित्रासमान, शांती पत्नीसमान आणि क्षमाकरणे पुत्रसमान आहे. हे सहा गुणच त्याचे खरे नातलग आहेत.

दुष्ट दुष्टच असतोः-

> वयसः परिणामे हि यः खला खल एव सः।
> सुपक्वमपि माधुर्यं नोपायतीन्द्र वारूणम्।। **12** ।।

आचार्य चाणक्यांचे म्हणणे आहे की चौथ्या अवस्थेतसुद्धा जो दुष्ट असतो तो दुष्टच राहातो. चांगले पिकल्यानंतरही इन्द्रवारूणाचे फळ मधुर होत नाही.

अर्थ हा आहे की वयाचा सुद्धा दुष्ट प्रवृत्ती वर कांही प्रभाव पडत नाही. दुष्ट जरी वृद्ध झाला तरी तो नेहमी दुष्टच असतो. इंद्रवारूणाचे फळ कच्चे असो वा पिकलेले असो त्यामध्ये गोडवा येत नाही, नेहमी ते कडूच लागते. तसेच वृद्ध झाल्यानंतरही दुष्टाचा विश्वास करू नये.

प्रेमच जीवन आहेः-

> निमन्त्रणोत्सवा विप्रा गावो नवतृणोत्सवः।
> पत्युत्साहयुता नार्याः अहं कृष्ण-रणोत्सवः।। **13** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की ज्या प्रकारे यजमानाचे निमंत्रणच ब्राह्मणासाठी आनंदाचे कारण असते अर्थात निमंत्रण मिळाल्यामुळे ब्राह्मणाला स्वादिष्ट भोजन आणि दान-दक्षिण मिळणे सुलभ असते. तसेच हिरवे गवत, चारा मिळणे गाईसाठी आनंददायक असते. याच प्रकारे पतीचा आनंद पत्नीसाठी उत्सवासारखा असतो. पण माझ्यासाठी तर भयानक युद्धात प्रेमच जीवनाची सार्थकता म्हणजेच उत्सव आहे.

> मातृवत् परदारेषु परद्रव्याणि लोष्ठवत्।
> आत्मवत् सर्वभूतानि यः पश्यति सः पण्डितः।। **14** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की मनुष्याने इतर व्यक्तींच्या पत्नीला आईसमान समजावे, दुसऱ्यांच्या संपत्तीवर डोळा ठेवू नये ते परकेच समजावे आणि सर्व लोकांना स्वतः सारखेच समजावे. आचार्य चाणक्य मानतात की दुसऱ्यांच्या पत्नीला आईसमान, परकया धनाला मातीच्या ढेकूळासमान आणि सर्व प्राणीमात्रांना स्वतःसारखे पाहाणारेच खऱ्या अर्थाने ऋषी आणि विवेकी पंडित मानला जातो.

रामाचा महिमाः-

> धर्मे**ऽ** तत्परता मुखे मधुरता दाने समुत्साहता
> मित्र**ऽ** व**ञ्च** कता गुरौ विनयता चित्ते**ऽ** पि गम्भीरता।
> आचारे शुचिता गुणे रसिकता शास्त्रेषु विज्ञातृता
> रूपे सुन्दरता शिवे भजनता त्व**य्य** स्ति भो राघव।। **15** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की धर्म-तत्परता, मुखी मधुरता, दानात उत्साह, मित्रांसोबत निष्कपटता, गुरूप्रती विनम्रता, चित्तात गंभीरता, आचरणात पवित्रता, गुणांप्रती आदर, शास्त्रांचे

विशेष ज्ञान, रूपात सुंदरता आणि शिवामध्ये भक्ती-हे सर्व गुण राघवा, आपणातच आहेत.

आशय असा आहे की हे राम, आपण धर्माचे तत्परतेने पालन करता आहात, आपल्या मुखी एक अनोखा गोडवा आहे. आपल्याला दान-धर्मात अत्यंत आवड आहे. आपण मित्रासाठी निष्कपट आहात. गुरूजनासाठी आपण विनम्र आहात. आपण अत्यंत गंभीर हृदयाचे आहात. आपले आचरण पवित्र आहे. आपण गुणांचा आदर करतात आणि सर्व शास्त्र विद्यांमध्ये आपल्याला विशेष ज्ञान आहे आपल्या सौंदर्याचे वर्णन करणे अशक्य आहे. आपण शिवभक्त आहात. हे सर्व गुण एकाच वेळी फक्त आपणातच मिळू शकतात.

> काष्ठं कल्पतरूः सुमेरूरचलश्चिन्तामणिः पस्तरः
> सूर्यस्तीव्रकरः शशि क्षयकरः क्षारोहित निरवारिधिः।
> कामो नष्टतनुर्बलर्दितिसुतो नित्य पशुः कामगोः
> नैतास्ते तुलयामि भो रघुपते कस्योपमा दीयते।। **16** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की कल्पवृक्ष लाकूड आहे. सुमेरू पहाड आहे. पारस फक्त एक दगड आहे. सूर्य किरणे तीव्र असतात. चंद्र झीजत असतो. समुद्र खारट आहे. कामदेवाला शरीर नाही. बळी दैत्य आहे. कामधेनू पशु आहे. हे राम! मी आपली तुलना कोणाशीही करू शकत नही. आपली उपमा कोणाला द्यावी.

अर्थ हा की हे भगवान राम लोक आपल्याला कल्पवृक्ष आणि कामदेवासारखे सर्वांच्या इच्छा पूर्ण करणारा मानतात. आपण सर्वांच्या इच्छा पूर्ण करतात हे सत्त्य आहे. परंतु कल्पवृक्ष हे लाकूड आहे आणि कामधेनू पशु आहे. आपल्याला सोन्याचा पर्वता सारखे म्हटले जाते. हे सत्य आहे की आपल्या संपत्तीला अंत नाही. परंतु सुमेरू तर एक पर्वत आहे. आपल्याला चिंतामणी (पारस)समान मानले जाते. पारस लोखंडाचे सोन्यात रूपांतर करतो. आपल्याजवळ येणारा प्रत्येक चांगला-वाईट मनुष्य गुणवान होतो. पण पारस सुद्धा एक दगड आहे. आपल्याला सूर्यासारखा तेजस्वी म्हणतात. पण सूर्याची तीव्र किरण दुखीसुद्धा करतात पण आपल्या दर्शनानेच सर्व सुखी होतात. आपल्याला चंद्रासारखे सुखदायक म्हणतात. परंतु चंद्रकिरण कमी जास्त होतात, आपण नेहमी समतोल ठेवता. आपणास सागराप्रमाणे गंभीर मानले जाते परंतु कोठे सागर आणि कोठे आपण? समुद्राचे पाणी खारट असते. आपल्याला कामदेवासारखे सुंदर म्हणणे सुद्धा योग्य नाही. कामदेवाचा तर देहच नाही तर तो सुंदर कसा झाला? आपल्याला बळीसारखे दानशूर म्हणतात. आपण सर्वात मोठे दानी आहात हे सत्त्य आहे, बळीसुद्धा महान दानी होता पण तो राक्षस होता. आपण साक्षात ईश्वर आहात. यामुळे आपली तुलना यांच्याशी करता येत नाही. आपली उपमा कोणाला द्यावी?

## शिक्षण कोठूनही घ्याः-

> विनयं राजपुत्रेभ्यः पण्डितेभ्यः सुभाषितम्।
> अनृतं द्यूतकोरभ्यः स्त्रीभ्यः शिक्षेत् कैतवम्।। **17** ।।

आचार्य चाणक्यांचे कथन आहे की व्यक्ती सर्वांकडून कांही शिकू शकतो. त्याने राजपुत्रपासून विनयशीलता आणि नम्रता, पंडितापासून उत्तम रीतीने बोलण्याची, जुगाऱ्यापासून

खोट्या बोलण्याच्या रूप भेदांचे, आणि स्त्रियांपासून छळ-कपटाचे शिक्षण घेतले पाहिजे.

अभिप्राय हा आहे की राजपुत्र विनम्र पंडित मधुरभाषी, जुगारी खोटारडा आणि स्त्रिया छळ-कपटमध्ये निपूण असतात. मनुष्याला कांही शिकण्याची इच्छा असेल तर तो लहानात लहान व्यक्तीपासून सुद्धा कांही शिकू शकतो.

विनयं राजपुत्रेभ्यः पण्डितेभ्यः सुभाषितम्।
अनृतं द्यूतकोरभ्यः स्त्रीभ्यः शिक्षेत् कैतवम्।। **18** ।।

आचार्य चाणक्यांचे कथन आहे की राजापुत्रपासून विनम्रता शिकली पाहिजे. पंडितापासून सुंदर भाषण शिकले पाहिजे. जुगाऱ्यापासून खोटे बोलणे आणि स्त्रियांपासून छळ शिकला पाहिजे.

आशय असा आहे की राजकुमार अत्यंत विनम्र व शालीन असतात. म्हणून त्यांच्यापासून विनम्रता व शालीनता शिकून घ्यावी. विद्वान लोकांच्या बोलण्याची पद्धत सभ्य आणि सुंदर असते. म्हणून त्यांच्यापासून मधुर बोलण्याची कला शिकली पाहिजे. जर कधी एकदम खोटे बोलण्याची आवश्यकता भासली तर हा गुण जुगारी व्यक्तीपासून शिकला पाहिजे. छळ-प्रपंच व कपट स्त्रीपासून शिकून घेतले पाहिजे.

विचार करून काम कराः-

अनालोच्य व्ययं कर्ता चानाथः कलहप्रियः।
आर्तः स्त्रीसहर्वक्षेत्रेषु नरः शीर्घं विनश्यति।। **19** ।।

आचार्य चाणक्य विचार करून समजून कर्म करण्याचा उपदेश देताना सांगतात की विनाविचार खर्च करणारा अनाथ, भांडखोर आणि सर्व प्रकारच्या स्त्रियांसाठी व्याकूळ राहाणारा व्यक्ती ताबडतोब नष्ट होतो.

आशय असा आहे की संपत्तीचा अभाव व विनाकारण खर्च करणारा, ज्याचे कोणी आपले नाही, जो भांडखोर स्वभावाचा आहे आणि जो स्त्रियांच्या मागे धावतो असा मनुष्य शीघ्र गतीने बरबाद होतो.

जलबिन्दुनिपातेन क्रमशः पूर्यत घटः।
स हेतु सर्वविद्यानां धर्मस्य च धनस्य च।। **20** ।।

आचार्य चाणक्य येथे अल्प बचतीचे महत्व सांगताना म्हणतात की एक-एक थेंब टाकला तरी थोड्या काळाने हंडा भरतो. याच पद्धतीने विद्या, धर्म आणि संपत्तीचा सुद्धा संचय केला पाहिजे.

आशय हा आहे की एक-एक थेंब टाकीत राहिलं तरी हळू हळू कळशी भरते. याच प्रकारे हळूहळू ज्ञान, धर्म आणि संपत्तीचा संचय करीत राहिले तर यांची वृद्धी होते. लहान-लहान बचतच वाढून एक मोठी रक्कम बनते.

# तेरावा अध्याय

## कर्माचे प्राधान्यः-

मुहूर्तमपि जीवेच्च नरः शुक्लेन कर्मणा।
न कल्पमपि कष्टेन लोक द्वय विरोधिता।। **1** ।।

येथे आचार्य चाणक्य कर्माचे प्राधान्य आणि उपयोगिता यांची चर्चा करताना सांगतात की उज्वल कर्म करणारा मनुष्य क्षणभर जरी जगला तरी चांगलेच आहे, परंतु दोन्ही लोकाविरूद्ध काम करणाऱ्या मनुष्याचे एका युगापर्यंत जगणेसुद्धा व्यर्थ आहे.

आशय असा आहे की चांगले कार्य करणारा मनुष्य जर थोडेही आयुष्य जगला तर चांगले आहे. तो आपल्या अल्प जीवनात सुद्धा समाज आणि स्वतःचे सुद्धा कल्याण करून घेतो. परंतु जो मनुष्य स्वतः ही सुखी राहात नाही आणि इतरांनाही सुख देत नाही असा मनुष्य आपला परलोक सुद्धा सुधारू शकत नाही. म्हणून या लोकात किंवा परलोकात दोघांनाही नष्ट करणारा मनुष्य पृथ्वीवर भार आहे. त्याचे मरणेच चांगले आहे.

## गेलेली गोष्ट विसरून जाः-

गतं शोको कर्तव्यं भविष्यं नैव चिन्तयेत्।
वर्तमानेन कालेन प्रवर्तन्ते विचक्षणाः।। **2** ।।

आचार्य चाणक्य येथे झालेली गोष्ट विसरून पुढचा विचार करण्यावार जोर देताना म्हणतात की झाल्या-गेल्या गोष्टीवर विचार करू नये. भविष्याविषयी सुद्धा विचार करू नये. बुद्धिमान लोक वर्तमान काळाप्रमाणेच वागतात.

झालेल्या गोष्टींचे दुःख केल्याने कांहीच लाभ होत नाही. भविष्यासाठी ही दुःखी होऊ नये. वर्तमानच सुंदर केला पाहिजे. यामुळे भविष्यसुद्धा सुंदर होतो. यातच बुद्धिमानी आहे. आणि म्हटलेले सुद्धा आहे की झाले-गेले विसरून जा व पुढचा विचार करा.

## मधुर बोलः-

स्वभावेन हि तुष्यन्ति देवा सत्यपुरुषाः पिताः।
ज्ञातयः स्नानापानाभ्यां वाक्यादानेन पडितताः।। **3** ।।

आचार्य चाणक्य येथे प्रसन्नते संबंधी चर्चा करताना सांगतात की देवता, सज्जन आणि वडील स्वभावाने, भाऊ स्थान-पानाने आणि विद्वान मधुर वाणीने प्रसन्न होतात.

आशय असा आहे की देवता, सज्जन लोक आणि वडील स्वभावाने प्रसन्न होतात, विद्वान लोक गोड बोलण्याने प्रसन्न होतात आणि भाऊबंद व नातेवाईक खाऊ-पिऊ घातल्याने म्हणजेच

स्वागत सत्काराने प्रसन्न होतात. या प्रकारे प्रसन्नतेचे अनुभव प्रत्येक व्यक्तीचे वेगवेगळे मापदंड असतात.

अहो स्वित् विचित्रणि चरितानि महात्म्नाम्।
लक्ष्मीं तृणाय मन्यन्ते तदभरेण नमन्ति च।। **4** ।।

महापुरूषांच्या विनम्रतेची चर्चा करताना आचार्य चाणक्य सांगतात की महापुरूषांचे चरित्रसुद्धा विचित्र असते. ते लक्ष्मीला (संपत्तीला) कसपटासमान मानतात परंतु तीच्या भाराने दबून जातात.

अर्थ असा आहे की महापुरुषांच्या लेखी संपत्तीला कांहीच महत्व नाही. तीला काडीसमान एखादी मामूली वस्तु समजतात. जसे जशी त्यांची संपत्ती वाढेल तसे ते अधिकच विनम्र होतात. संपती ऐश्वर्य आल्यामुळे ते गर्विष्ठ, घमेंडी होत नाहीत.

## अति प्रेमच दुःखाचे मूळ आहेः-

यस्य स्नेहो भयं तस्य स्नहो दुःखस्य भाजनम्।
स्नेहमूलानि दुःखानि तानि त्यक्त्वा वसेत्सुखम्।। **5** ।।

आचार्य चाणक्याचे कथन आहे की ज्याला कोणाला कोणाविषयी प्रेम असते त्याला त्याच्यापासूनच भीती वाटते- प्रेमच दुःखाचे मूळ आहे. म्हणून प्रेमाचे पाश तोडून सुखाने राहावे.

अर्थ असा आहे की विश्वात प्रवर्तन प्रेमाचे कारण असते. बहुतेक संसारी लोक यातच फसतात. श्रीमद्भागवतामध्ये सुद्धा जड़ भरताची कथा याचाच दृष्टांत आहे. कारण त्याला राजपद, घर-दार, आई-वडीलांचा त्याग केल्यानंतर सुद्धा अतिप्रेमामुळे हरिण योनीत जन्म घ्यावा लागला. यामुळेच म्हणतात की संसारात अनेक प्रकारचे पाश आहेत. पण प्रेमपाश अपूर्व आहे. लाकूड पोखरणारा भूंगा प्रेमपाशामुळेच कमळ फुलात निष्क्रिय होतो.

## भविष्याविषयी जागरूक राहाः-

अनागत विधाता च प्रत्युत्प**न्न** मतिस्तथा।
द्वावेतौ सुखामेवेते यद्भविष्यो विनश्याति।। **6** ।।

आचार्य चाणक्याचे कथन आहे की जो मनुष्य भविष्यात येणाऱ्या संकटाविषयी जागृत राहतो आणि ज्याची बुद्धि तेज असते तोच मनुष्य सुखी असतो. याच्या विपरीत भाग्याच्या भरवशावर राहणारा मनुष्य नाश पावतो.

आशय असा आहे की मनुष्य येणाऱ्या कोणत्याही संकटाचा धैर्याने, ठामपणे सामना करतो आणि ज्याची बुद्धि अशा संकटकाळी वेगाने काम करू लागते, असा मनुष्य संकटाना सुद्धा पराभव करतो, आणि सुखी असतो. पण जो मनुष्य नशिबात लिहिले आहे ते होणारच असा विचार करून हातावर हात ठेवून बसून राहतो तो बरबाद होतो. म्हणून दुःखाचा धैर्याने सामना केला पाहिजे.

## जसा राजा तशी प्रजाः-

राज्ञेधर्मणि धर्मिष्ठाः पापे पापाः समे समाः।
राजानमनुवर्तन्ते यथा राजा तथा प्रजाः।। **7** ।।

आचार्य चाणक्य येथे 'जसा राजा तशी प्रजा' या म्हणीला स्पष्ट करून सांगताना म्हणतात की राजा पापी असेल तर प्रजासुद्धा पापी, धार्मिक असला तर प्रजा धार्मिक आणि सम असेल तर प्रजासुद्धा सम असते. प्रजा राजासमान असते.

आशय हा आहे की जसा राजा असतो प्रजाही तशीच असते. राजा धार्मिक असेल तर प्रजासुद्धा धार्मिक असते, राजा पापी असेल तर प्रजासुद्धा पापी असते. कारण प्रजा राजाचेच अनुकरण करते.

## धर्महीन मृतसमान असतोः-

जीवन्तं मृतवन्मन्ये देहिनं धर्मवर्जितम्।
मृतो धर्मेण संयुक्तो दीर्घजीवी न संशयः।। **8** ।।

आचार्य चाणक्याचे कथन आहे की धर्महीन प्राण्याला मी जिवंत असताना ही मृत समजतो. धर्मपरायण मेल्यावर सुद्धा दीर्घजीवी असतो. यात शंका नाही.

आशय असा आहे की मनुष्य दोन प्रकारचा असतो. एक जिवंत असताना सुद्धा मृतःप्राय असतो व दुसरा मृत्यूनंतर सुद्धा दीर्घकाळ जिवंत असतो. जो मनुष्य आपल्या जीवनात कोणतेही चांगले कार्य करीत नाही, ज्याच्या धर्माची पोतडी रिकामीच असते असा धर्महीन मनुष्य जिवंत असताना सुद्धा मृतसमान असतो. जो मनुष्य आपल्या जीवनात लोकांचे भले करतो आणि धर्म संचय करून मृत्यू पावतो, त्याला लोक त्याच्या मृत्यूनंतरही त्याची आठवण ठेवतात. असा मनुष्य मृत्यूनंतर सुद्धा यशामुळे दीर्घकाल जीवित असतो.

धर्मार्थकाममोक्षाणां यस्यैको**ऽ** पि न विद्वते।
अजागलस्तनस्येव तस्य जन्म निरर्थकम्।। **9** ।।

आचार्य चाणक्य येथे व्यक्तीच्या सार्थकतेची चर्चा करताना म्हणतात की धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यापैकी ज्या मनुष्याला एकही भेटत नाही, त्याचे जीवन शेळीच्या गळ्यात असलेल्या स्तनासारखे व्यर्थ आहे.

येथे आशय हा आहे की जो मनुष्य आपल्या जीवनात ना तर कोणते धर्माचे काम करतो नाही श्रीमंत होतो, ना भोग करतो ना मोक्ष प्राप्तीचा प्रयत्न करतो, त्या व्यक्तीचे जीवन शेळीच्या गळ्यात उत्पन्न झालेल्या स्तनासारखे असते, जे कोणत्याही उपयोगाचे नसते.

दह्यमानां सुतीव्रेण नीचा परयशो**ऽ** ग्निना।
अशक्तास्तत्पदं गुन्तु ततो निन्दां प्रकुर्वते।। **10** ।।

आचार्य चाणक्य दुसऱ्यांच्या प्रगतीविषयी संकुचित विचार ठेवणाऱ्या दुष्टांची चर्चा करताना

सांगतात की दुष्ट मनुष्य दुसऱ्याची उन्नती पाहून मत्सर करतो तो स्वतः प्रगती करू शकत नाही. त्यामुळे तो निंदा करतो.

अर्थ असा आहे की दुसऱ्या लोकांची प्रगती पाहून दुष्ट व्यक्ती अतिशय दुःखी होतो, तो ते पाहून मत्सराने जळतो. स्वतः उन्नती करू शकत नाही. म्हणून तो प्रगती करणाऱ्या मनुष्याची निंदा करतो. अर्थात 'कोल्हयाला द्राक्षे आंबट'.

## मोक्ष मार्गः-

बन्धधन्य विषयासंगः मुक्त्यै निर्विषयं मनः।
मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयों:।। **11** ।।

आचार्य चाणक्याचे कथन आहे की वाईटपणात मन लावणे गुंतविणे म्हणजेच बंधन आहे आणि यामधून लक्ष काढून घेणे हेच मोक्षाचा मार्ग दाखविते. अशा प्रकारे मनच बंधन वा मोक्ष देणारे आहे.

आशय असा आहे की मनच मनुष्यासाठी एक बंधन आहे आणि तेच मोक्षाचे कारण आहे. कारण याचे स्वरूपच संकल्प-विकल्प रूपात आहे. हे कधी स्थिर राहात नाही, निरंतर ऊहापोह, तर्क-वितर्क आणि गुण-दोषांच्या विवेचनात मग्न असते. त्यामुळे यापासून सिद्धांत तर निर्माण होत नाही, नेहमी भ्रम राहतो. पण मनालासुद्धा वैराग्य आणि अभ्यासाद्वारा वश करून मोक्ष प्राप्त करता येतो. या दोघा व्यतिरिक्त मन बंधनाचे कारण तर होऊ शकते.

देहाभिमानगालिते ज्ञानेन परमात्मनः।
यत्र-यत्र मनो याति तत्र-तत्र समाधयः।। **12** ।।

आचार्य चाणक्य समाधी अवस्थेची चर्चा करताना सांगतात की परमात्म्याचे ज्ञान झाल्यावर देहाचा अभिमान नष्ट होतो. तेव्हा मन जेथे जाईल, त्याची तेथेच समाधी लागते.

अर्थ हा आहे की साधकाला जेव्हा परमात्म्याचे ज्ञान होते तेव्हा त्याला संसारातील प्रत्यके वस्तु म्हणजे माया वाटते म्हणून तो स्वतःच्या देहावर सुद्धा हक्क दाखवित नाही. असे ज्ञान प्राप्त झाल्यानंतर व्यक्तीचे लक्ष कोठेही असले तरी त्याला ध्यानावस्था प्राप्त होते.

## सुख-दुःखः-

ईप्सितं मनसः सर्वं कस्य सम्पद्यते सुखम्।
दैवायत्तं यतः सर्वं तस्मात् सन्तोषमाश्रयेत्।। **13** ।।

आचार्य चाणक्याचे कथन आहे की मनात इच्छिलेले सर्व सुख कोणाला प्राप्त झाले आहेत? कारण सगळं काही दैवाधीन आहे म्हणून समाधान केले पाहिजे.

अर्थ हा आहे की जगात असा कोणताही मनुष्य नाही की ज्याच्या सर्व इच्छा-आकांक्षा पूर्ण झालेल्या आहेत, ज्याला त्याने मनात कल्पना केलेले सुख मिळाले आहे. सुख अथवा दुःख प्राप्त होणे हे भाग्याच्या अधीन आहे. मनुष्याच्या हातात नाही. म्हणून जी वस्तु आपल्या स्वाधीन नाही, हातात नाही तीच्यासाठी दुःखी होऊ नये, तर समाधान मानावे.

यथा धेनु सहस्रेषु वत्सो गच्छति मातरम्।
तथा यच्च कृतं कर्म कर्तारमनुगच्छति।। **14** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की जसे हजारो गायी असताना सुद्धा वासरू स्वतःच्याच मातेजवळ जाते, त्याप्रमाणे केलेले कर्म कर्त्याच्या मागे लागते.

अर्थ असा आहे की हजारो गायी चरत असतात आणि वासराला जर सोडले तर तो मूक पशु सुद्धा स्वतःच्याच आईकडे धावते. अन्य कोणाही गाईकडे जात नाही. त्याच प्रमाणे मनुष्याचे चांगले-वाईट कर्माचे फळ त्याच्या मागे-मागे धावते. ते फळ मनुष्याला भोगावेच लागते. त्यासाठी मनुष्याने नेहमी चांगलेच कर्म करीत राहावे.

अनवस्थितकायस्य न जाने न वने सुखम्।
जानो दहति संसर्गाद् वनं सगविवर्जनात।। **15** ।।

आचार्य चाणक्य चंचलतेच्या दुःखाची चर्चा करताना सांगतात की ज्याचे चित स्थिर नसते त्या मनुष्याला ना धड लोकांपासून सुख मिळते ना जंगलात. लोकांमध्ये राहिल्यास त्यांची संगत त्याला जाळते तर जंगलात एकाकीपणा.

अर्थ असा आहे की कोणतेही काम करताना चित्त स्थिर ठेवले पाहिजे. चंचल मनामुळे मनुष्य कोणतेही काम एकाग्रचित्ताने करू शकत नाही आणि त्याला कोठेही सुख मिळत नाही. असा मनुष्य समाजात राहिला तर स्वतःच्या नाकर्तेपणा आणि इतर लोकांचे हास्य, आनंद पाहून त्याला ते सहन होत नाही. जरी तो वनात निघून गेला तर तेथे त्याला एकटेपणा त्रस्त करतो. अशा प्रकारे तो कोठेही सुखाने राहू शकत नाही. मनाची चंचलता फक्त दुःखी करते.

## सेवा भाव:-

यथा खनित्वा खनित्रेण भूतले वारि विन्दति।
तथा गुरूगतां विद्यां शुश्रूषुरधिगच्छति।। **16** ।।

आचार्य चाणक्याचे सांगणे आहे की ज्याप्रमाणे फावड्याने खोदून जमीनीतून पाणी काढले जाते त्याप्रमाणे सेवा करणारा विद्यार्थी गुरूपासून विद्या प्राप्त करतो.

आशय असा आहे की जमीनीतून पाणी काढण्यासाठी धरती खोदली जाते, त्यासाठी मनुष्याला परिश्रम, कष्ट करावे लागतात. त्याचप्रमाणे गुरूपासून विद्या प्राप्त करण्यासाठी परिश्रम आणि सेवा करावी लागते.

## पूर्वजन्म :-

कर्मायत्तं फलं पुंसा बद्धिः कर्मानुसारिणी।
तथापि सूधियाचार्यं: सुविचार्येव कुर्वते।। **17** ।।

आचार्य चाणक्य विचारांना महत्वाचे प्रतिपादन करताना सांगतात की जरी मनुष्याला फळ कर्मानुसार मिळते आणि बुद्धीसुद्धा कर्माधीन असते. तरी बुद्धिमान मनुष्य विचारपूर्वक काम

करतो.

अर्थ हा आहे की सुख-दुःख, बुद्धी हे सर्व पूर्वजन्माच्या कर्मानुसारच मिळतात. तरीसुद्धा बुद्धिमानी यातच आहे की सर्व कार्ये चांगल्या तऱ्हेने विचारपूर्वक व समजून घेऊनच करावीत.

## गुरूमाहात्म्य :-

एकाक्षरं प्रदातारं यो गुरूं नाभिवन्दते।
श्वानयोनि शतं भुक्तवा चाण्डालेष्वभिजायते।। **18** ।।

येथे आचार्य चाणक्य कृतघ्न शिष्याची चर्चा करताना सांगतात की जो एकाक्षराने ज्ञान देणाऱ्या गुरूचे वंदन करीत नाही, तो शंभर वेळा श्वान(कुत्रा) योनीत जन्म घेऊन पुन्हा चांडाळ होतो.

अर्थ असा आहे की परमात्म्याचे नाव 'ॐ' आहे ज्याला एकाक्षरी ब्रह्म म्हणतात - जो परमात्म्याचे दर्शन करून देणाऱ्या गुरूचा आदर करीत नाही, त्या शिष्याला शंभर वेळा जन्म घेऊन श्वान व्हावे लागते आणि पुन्हा त्याला चांडाळाच्या घरी जन्म घ्यावा लागतो.

युगान्ते प्रचलेन्मेरूः कल्पान्ते सप्त सागराः।
सावधः प्रतिपन्नर्थान्न चलन्ति कदाचन।। **19** ।।

आचार्य चाणक्य महापुरूषांच्या स्वभावाची चर्चा करताना म्हणतात की युगाचा अंत झाल्यानंतर जरी मेरू पर्वत आपल्या स्थानावरून सरकला आणि कल्पांत झाल्यावर जरी सप्त सागर विचलित झाले - तरीही सज्जन आपल्या मार्गावरून कधीही विचलित होत नाहीत.

अर्थ असा आहे की महापुरूष स्वतःच्या आचार-विचारात नेहमी दृढनिश्चयी असतात, जरी युगांतावेळी मेरू पर्वत जरी जागेवरून हलला, कल्पांत झाल्यावर समुद्रसुद्धा आपली सीमा ओलांडतात आणि पृथ्वीला जलसमाधी देतात. परंतु सज्जन लोक स्वतःचा खरेपणा आणि परोपकाराच्या मार्गाचा त्याग करत नाही.

# चौदावा अध्याय

## पृथ्वी रत्न

पृथिव्यां त्रीणि रत्नानि अन्नमापः सुभाषितम्।
मूढैः पाषाणखण्डेषु रत्नसंज्ञा विधीयते।। **1** ।।

आचार्य चाणक्य पृथ्वीच्या तीन प्रमुख रत्नांची चर्चा करताना म्हणतात की अन्न, पाणी आणि सुंदर शब्द हे पृथ्वीचे तीन रत्न आहेत. मुर्खांनी पाषाणाच्या या तुकड्यांना रत्न असे नाव दिले आहे.

अर्थ असा आहे की अन्न, पाणी सर्वाबरोबर मधुर संभाषण-या तीन वस्तु पृथ्वीचे खरे रत्न आहेत. हीरे-जवाहीर हे सर्व दगडाचे तुकडे आहेत यांना रत्न म्हणणे म्हणजे केवळ मुर्खपणा आहे. रहीम म्हणतो की-

रहिमन पानी राखिये**,** बिन पानी सब सून।
पानी गए न उबरें**,** मोती**,** मानुष चून।।

(रहीम, पाण्याचे रक्षण कर, विनापाणी सर्व सुने आहे, पाण्याशिवाय मोती, मनुष्य व चूणा काही कामाचा नाही.)

याच प्रमाणे अन्न आणि संत-वचनाचे महत्व आहे. बाकी सर्व वस्तु यांच्या तुलनेत अर्थहीन भासतात. यासाठी यांची कदर करावी.

## जसे पेरले तसे उगवतेः-

आत्मापराधवृक्षस्य फलान्येतानि देहिनाम्।
दारिद्र्यरोग दुःखानि बन्धनव्यसनानि च।। **2** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की द्रारिद्रय, रोग, दुःख, बंधन आणि व्यसन हे सगळे मनुष्याचे अपराध रूपी वृक्षाची फळे आहेत.

आशय असा आहे की गरीबी, रोग, दुःख, बंधन आणि वाईट व्यसनं मनुष्याच्या कर्मांचीच फळं आहेत. जो जसे पेरतो, लावतो तशीच फळे त्याला मिळतात, तयामुळे नेहमी चांगली कामे करावीत.

## शरीराचे महत्वः-

पुनर्वित्तं पुनर्मित्रं पुनर्भार्या पुनर्मही।
एतत्सर्वं पुनर्लभ्यं न शरीरं पुनः पुनः।। **3** ।।

आचार्य चाणक्य मानवी शरीराचे वर्णन-महत्वाला विशद करून सांगताना म्हणतात की मनुष्याच्या जीवनात संपत्ती, मित्र, पत्नी, पृथ्वी ही सर्व पुन्हा-पुन्हा मिळू शकतात पण एकदा गेल्यावर जीवन वा शरीर पुन्हा मिळत नाही.

अर्थ असा आहे की संपत्ती जरी नष्ट झाली तर परत कमवता येते, मित्र नाराज झाले तर त्यांना विनवून प्रसन्न करता येते, एखादा मित्र सोबत सोडून गेला तर दुसरा करता येतो. हीच गोष्ट पत्नीच्या बाबतीतही लागू पडते. जर एखादी जमीन-शेती हातातून निघून गेली तर ती पुन्हा प्राप्त करता येते. परंतु शरीर एकदा साथ सोडून गेले तर ते परत पुन्हा मिळत नाही.

एकताः-

बहूनां चैव सत्त्वानां **रिपुञ्जयः** ।
वर्षान्धाराधरो मेधस्तृणैरपि निवार्यते।। **4** ।।

आचार्य चाणक्य येथे एकीचे बळ सांगताना म्हणतात की बरेचसे लहान प्राणीसुद्धा एकत्र होऊन शत्रुवर विजय मिळवितात. मुसलधार पाऊसाला सुद्धा गवताचे मिळून केलेले छप्पर अडविते.

थोडेही जास्त आहेः-

जले तैलं खले गुह्यं पात्रे दानं मनागपि।
प्राज्ञे शास्त्रं स्वयं याति विस्तारे वस्तुशक्तितः।। **5** ।।

आचार्य चाणक्य येथे थोड्यात जास्त विस्तार पावणाऱ्या वस्तुंविषयी सांगतात की पाण्यात तेल, दुष्टाला सांगितलेल्या कांही गुप्त गोष्टी, योग्य व्यक्तीला केलेले दान, बुद्धिवंताला दिलेले ज्ञान थोडे असताना सुद्धा आपोआप विस्तार पावते.

आशय असा आहे की पाण्यात थोडेही तेल टाकले तर ते ताबडतोब पूर्ण पाण्यात पसरते. दुष्ट चहाडखोराला एखादी गुप्त गोष्ट सांगितली तर तो ती गोष्ट पसरवून टाकतो. योग्य व्यक्तीला पैशांची थोडी जरी मदत केली तर तो ते धन शतपटीने वाढवितो विद्वानाला जर थोडीही विद्या दिली तर तो त्या विद्येचा विस्तार स्वतः करतो.

वैराग्य महिमाः-

धर्मा**ऽऽ** ख्याने श्मशाने च रोगिणं या मतिर्भवत्।
सा सर्वदैव तिष्ठेच्चेत् को न मुच्येत बन्धनात्।। **6** ।।

आचार्य चाणक्य येथे वैराग्याचा महिमा सांगताना म्हणतात की धार्मिक कथा ऐकल्यावर स्मनाशात आणि व्याधीग्रस्तांना पाहिल्यावर मनुष्याच्या बुद्धिला जे वैराग्य येते जर असे वैराग्य नेहमी कायम राहिले तर बंधनातूत कोण मुक्त होणार नाही?

अर्थ हा आहे की एखादी वस्तु वा पदार्थ पाहून निर्माण होणारे ज्ञान हे कांही क्षणाचे असते त्यात चिरस्थायित्व नसते. धर्माख्यान,स्मशान आणि रोगयुक्त देहात सुद्धा स्वभाव-परिवर्तन,

विरक्ती आणि ईशभक्तीची भावनासुद्धा या पद्धतीची क्षणिक असते. या भावनेत जर स्थायीभाव आला तर प्राणीजीवाचे कल्याण होते.

## केल्यानंतरा विचार कशाचा?

> उत्पन्न पश्चात्तापस्य बुद्धिर्भवति यादृशी।
> तादृशी यदि पूर्वा स्यात्कस्य स्यान्न महोदयः।। **7** ।।

या श्लोकात आचार्य चाणक्य कर्मानंतर पश्चातापाचे निरर्थकते विषयी चर्चा करताना सांगतात की चूक झाल्यानंतर जो पश्चाताप होतो, जर तशी बुद्धी चूक करण्यापूर्वी आली तर कोण उन्नती करणार नाही. आणि पश्चाताप कोणाला होईल.?

याचा अर्थ असा आहे की वाईट कर्म केल्यानंतर पश्चाताप होतो आणि बुद्धी जागेवर येते. जर अशी बुद्धी त्यापूर्वीच आली तर पश्चातापाची वेळच येणार नाही. म्हणून कोणतेही काम विचारपूर्वक करावे.

## अहंकारः-

> दाने तपसि शौर्य च विज्ञाने विनय नये।
> विस्मयो न हि कर्तव्यो बहुरत्ना वसुन्धरा।। **8** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की मानवात कधीही अहंकाराची भावना येता कामा नये. त्या ऐवजी मानवाला दान, तप, शौर्य, विद्वता, सुशीलता आणि नीतीनैपुण्यता यांचा कधीही अहंकार बाळगता कामा नये. कारण या धरतीवर एकाहून एक मोठे दानशूर, तपस्वी, शूरवीर आणि नीतीनिपूण व विद्वान आहेत. असे म्हणतात की शेराला सव्वाशेर अनेक मिळतात. त्यासाठी कोणत्याही कार्यक्षेत्रात स्वतःहा विशिष्ट, अति शहाणा मानणे हा मुर्खपणा आहे. हा अहंकारच मानवजातीच्या दुखाःला कारण ठरतो आणि त्यालाच घेऊन नाश पावतो.

## मनाचा दूरपणा (अंतर) :-

> दूरस्थो**ऽ** पि न दूरस्थो या यस्य मनसि स्थितः।
> या यस्य हृदय नास्ति समीपस्थो**ऽ** पि दूसतः।। **9** ।।

आचार्य चाणक्य येथे निकटचे स्थानाची तुलना हृदयाशी करताना सांगतात की जी व्यक्ती हृदयात राहते ती दूर अंतरावर गेली तरी दूर नसते. जो हृदयात, मनात राहात नाही तो निकट राहूनही दूर वाटतो.

अर्थ असा आहे की ज्या व्यक्तीसाठी हृदयात जागा असते, ती कितीही दूर असली तरीही तीला दूर म्हणता येत नाही. कारण ती व्यक्ती नेहमी हृदय व्यापून राहते. ज्या व्यक्तीला हृदयात स्थान नाही, जागा नाही ती कितीही निकट असली तरी ती निकट आहे असे म्हणता येत नही.

## मधुर वाणीः-

यस्माच्च प्रियमिच्छेत् तस्य ब्रूयात्सदा प्रियम्।
व्याघ्रो मृगवधं गन्तुं गीतं गायति सुस्वरम्।। **10** ।।

आचार्य चाणक्य येथे वाणीची मधुरता वर्णन करताना म्हणतात की ज्याच्याकडून आपले कल्याण करून घ्यायचे आहे त्याला नेहमी मधुर, गोड वाणीने बोलले पाहिजे कारण पारधी हरिणाची शिकार करतो त्यावेळेस त्याला भूलविण्यासाठी सुंदर स्वरात गीत गातो.

अर्थ असा आहे की ज्याच्याकडून आपला कांही स्वार्थ साधला जाणार आहे त्या व्यक्तीसमोर खूप मधुर, गोड-गोड बोलावे. कोणाला चीत करायचे असेल, त्याला वश करायचे असेल तर लोणी लावणे हा सर्वात चांगला उपाय आहे. गोड, मधुर बोलण्याने, वाणीने मारलेला मनुष्य पाणीही मागत नाही. एखाद्या पारध्याला पाहा, हरिणाला बोलविण्यासाठी किती सुरेल आवाजात गातो. भोळे हरिण त्या मधुर स्वरामुळे आकर्षित होऊन जवळ येतो. जवळ आल्यानंतर पारधी त्याला मारतो. म्हणतात की “वचनें किं दरिद्रता” म्हणजे वाणीत संकोच कशाला? तीच्यामधून गोडवाच प्रकट झाला पाहिजे.

यांच्याजवळ राहूनका:-

अत्यासन्न विनाशाय दूरस्था न फलप्रदा।
सेव्यतां मध्यभागेन राजवह्नि गुरूस्त्रियः।। **11** ।।

आचार्य चाणक्य कांही विशिष्ट लोकांपासून दूर राहाण्याचे कारणाची चर्चा करताना सांगतात की राजा, अग्नी, गुरू आणि स्त्री यांच्या अति निकट राहिल्यामुळे विनाश होतो आणि दूर राहिले तर कोणतेच फळ मिळत नाही. त्यामुळे मध्यम (मध्य) अंतरावरून यांचे सेवन केले पाहिजे.

याचा अर्थ हा आहे की, राजा, गुरू, अग्नी आणि स्त्री-या चार गोष्टींपासून जास्त अंतर ठेऊ नये पण प्रत्येक वेळी त्यांच्या एकदम जवळ सुद्धा राहू नये. त्यांच्या जास्त जवळ राहिले तरी नुकसान होते आणि अति दूर राहिले तरी काम भागत नाही. त्यासाठी ना तर त्यांना जास्त दूर ठेवावे आणि ना जास्त जवळीक असावी.

ईश्वर सर्वव्यापी आहे:-

अग्निर्देवो द्विजातीनां मनीषिणां हृदि दैवतम्।
प्रतिमा स्वल्पबुद्धीनां सर्वत्र समदर्शिनः।। **12** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की द्विजातींची देवता अग्नी आहे, बद्धिवंत परमेश्वराला स्वतःच्या हृदयात पाहतो. अल्पबुद्धि असणारे लोक प्रतिमेला ईश्वर समजतात. समान विचाराचे लोक ईश्वराला सर्वत्र पाहतात.

आशय हा आहे की यज्ञ वगैरे मध्ये ब्राह्मण अग्नीला इशरूप मानतात. बुद्धिमान लोक ईश्वराचे दर्शन आपल्या हृदयात घेतात. अल्प बुद्धिचे लोक मुर्तीला ईश्वर मानतात. समज्ञानी, समविचारी लोक संसारामधील प्रत्येक प्राणीमात्रत, वस्तु या अशा स्थानी परमात्म्याला पाहतात. त्यांच्या मतानुसार परमेश्वर कणा-कणात बसलेला आहे. मातीचा कण-कण त्याने व्यापलेला

आहे.

गुणशहीनाचे जीवनच कायः-

स जीविति गुणा यस्य धर्म स जीवति।
गुण धर्म विहीनस्य जीवितं निष्प्रयोजनम्।। **13** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की ज्या व्यक्तीमध्ये गुण आहेत, तोच मनुष्य जिवंत आहे. तो माणूसच जिवंत आहे ज्याच्यामध्ये धर्म आहे, गुणहीन आणि धर्महीन मनुष्याचे जीवन व्यर्थ आहे.

अर्थ हा आहे की जो मनुष्य गुणवंत आहे आणि जो धर्म-पुण्याचे कार्य करतो तोच मनुष्य खऱ्या अर्थाने जिवंत आहे. जो गुणहीन आहे आणि जो धर्म-पुण्याचे काम करीत नाही त्याचे जिवंत राहणे कांहीच उपयोगाचे नाही. असा माणूस मृतच समजला पाहिजे.

यदीच्छसि वशीकर्तुं जगदेकेन कर्मणा।
परापवादशास्त्रेभ्यो गां चरन्तीं निवारय।। **14** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की जर एकच कर्म करून सर्वजग वश करू पाहात असाल तर दुसऱ्यांची निंदा करणे सोडून द्या. वाणीला लगाम घाला.

अर्थ असा आहे की साऱ्या, अखिल जगाला वश करण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे आपल्या वाणीने कोणाचीही निंदा करू नका. जेव्हा जीभ, वाणी असे करेल तर तीला लगाम घाला. वशीकरणाचा यापेक्षा दुसरा उत्तम उपाय नाही.

प्रस्तावसदृशं वाक्यं प्रभावसदृशं प्रियम्।
आत्मशक्तिसमं कोपं यो जानाति स पण्डितः।। **15** ।।

आचार्य चाणक्य येथे पंडित, विद्वान लोकांच्या विषयी सांगताना म्हणतात की जे प्रसंगानुसार भाषण, संवाद करतात, प्रभाव टाकणारे प्रेम करता आणि आपल्या शक्तीनुसारच राग करतात, त्याला विद्वान म्हणतात.

आशय हा आहे की एखाद्या सभेत केव्हा व काय बोलावे, कोणाबरोबर प्रेम करावे आणि कोठे किती राग, संताप करावा जो या सर्व गोष्टी जाणतो त्याला ज्ञानी मनुष्य म्हणतात.

वस्तु एक गोष्टी अनेकः-

एक एव पदार्थस्तू त्रिधा भवति वीक्षति।
कुपणं कामिनी मांसं योगिभिः कामिभिः श्वमिः।। **16** ।।

आचार्य चाणक्य आपआपल्या दृष्टीकोनाची चर्चा करताना म्हणतात की एकच वस्तु- स्त्रीच्या शरीराला कामासक्त लोकं कामिनीच्या रूपात, योगी घाणेरडे दुर्गंधी प्रेताच्या रूपात, आणि कुत्रे मासाच्या रूपात पाहतात.

अर्थ असा आहे की वस्तु एकच असते परंतु आपआपली दृष्टी असते. याच दृष्टीने एकाच स्त्रीच्या शरीराला योगी, रसिक, कुत्रा किती वेगळड्या-वेगळड्या रूपात पाहतात. तपस्वी तीला एक

दुर्गंधीयुक्त प्रेत समजतो आणि तीची घृणा करतो, रसिक कामातुर तीला लालसायुक्त नजरेने पाहतो व तीला उपभोगाची वस्तु समजतो. पण एक कुत्रा तीला फक्त एक मासाचा गोळा समजतो आणि तो खाण्याची इच्छा ठेवतो.

## गुप्तः-

> सुसिद्धमौषधं धर्मं गृहछिर्दं च मैथूनम्।
> कुभक्तं कुश्रुतं चैव मतिमान्न प्रकाशयेत्।। **17** ।।

गुप्ततेवर जोर देताना आचार्य चाणक्य म्हणतात की बुद्धिमान व्यक्ती सिद्ध औषध, धर्म, घरातील कमतरता, मैथुन, केलेले निकृष्ट जेवण आणि ऐकलेल्या वाईट गोष्टी वगैरे गोपनीय ठेवतात.

अर्थ असा आहे की या बाबी विषयी कुणाला कांही बोलू नये. सिद्ध औषध, धर्म, घरातील कमतरता, संभोग, निकृष्ट भोजन आणि ऐकलेली वाईट गोष्ट. कांही औषध कुणाला वश होतात त्यामुळे लोकांचे कल्याण होते पण ते त्याविषयी कांही बोलत नाहीत. कारण अशा औषधाविषयी दुसऱ्यांना सांगितले तर त्यांचा प्रभाव नष्ट होतो. तसेच आपला धर्म व कर्तव्य या विषयी कांहीही सांगू नये. फक्त यांचे पालन करावे. आपल्या घरातील उणीवा बाहेर सांगितल्या तर आपलीच बदनामी होते. उणीवा तर सर्वच घरामध्ये असतात. म्हणून उणीवा सांगणे म्हणजे मुर्खपणा आहे. संभोगाविषयी कांही बोलणे म्हणजे असभ्यता आणि अश्लीलता आहे. हे काम गुप्त रीतीने करायचे असते. जर एखादा असा पदार्थ खाण्यात आला जो धर्मात निषिद्ध मानला आहे. तर ते कुणाला सांगू नका. जर एखादा मनुष्य आपल्याला वाईट कांही बोलला असेल तर ती बाब गिळून टाका, कोणाला कांही सांगू नका.

## हे गुण वाचेने प्रकट होतातः-

> तावन्मौनेन नीयन्ते कोकिलयचैव वासराः।
> यावत्सर्वं जनानन्ददायिनी वाड् न प्रवर्तते।। **18** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की कोकिळा तोपर्यंत तोंड बंद ठेवून बसते, जोपर्यंत तीला मधुर आवाज प्राप्त होत नाही. हा गोड गळा सर्वांना आनंद देतो.

अर्थ असा आहे की कोकिळा वसंत ऋतु येईपर्यंत मौन ठेवते. वसंत आल्यावर तीला गळा फूटतो. हा गोड, मधुर स्वर सर्वच प्राण्यांना आनंद देतो. म्हणून बोलाल तेव्हा मधुर शब्द बोला. कटु बोलण्यापेक्षा मौन ठेवणे चांगले आहे.

## यांची साठवण कराः-

> धर्मं धनं च धान्यं च गुरोर्वचनमौषधम्।
> संगृहीतं च कर्तव्यमन्यथा न तु जीवति।। **19** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की धर्म, धन, धान्य, गुरूशिकवण, आणि औषध यांचा संग्रह

करावा नाही तर मनुष्य जगू शकणार नाही.

अर्थ हा आहे की मनुष्याने आपल्या जीवनात जास्तीत जास्त धर्म कार्य करावे. संपत्ती कमवावी, गुरूजनांपासून चांगली शिकवण घ्यावी आणि औषधांचा संग्रह करावा, तरच तो सुखाने जगू शकतो. दुःखद आयुष्याचे लोक जगणे-मरणे एकच.

## मानव धर्मः-

त्यज दुर्जनसंसर्गं भज साधुसमागमम्।
कुरु पुण्यमहोरात्रं स्मर निष्यमनितत्यतः।। **20** ।।

आचार्च चाणक्य म्हणतात की दुष्टांच्या संगतीचा त्याग करा, सज्जनांची संगत धरा, रात्रंदिवस चांगले काम करा आणि ईश्वराचे नाव स्मरा हाच मानव धर्म आहे.

अर्थ असा आहे की नेहमी सज्जनांची संगत-सोबत करावी आणि दुष्टांची संगत सोडून दिली पाहिजे. सज्जनांचा संताप विकार सुद्धा लाभदायक असतो, आणि दुष्टापासून होणारा लाभ सुद्धा दुःखदायक असतो. कारण "किरातार्जुनीयम्" ग्रंथात भारवीने म्हटले आहे की

'समुन्नयन भूतिमनार्य संग्डंमात् वरं विरोधीषि ामं महात्माभिः'!

म्हणजेच दुष्टासोबत राहून उन्नती प्राप्त होणे चांगले नाही, परंतु सज्जना सोबत विरोध सुद्धा चांगला असतो.

असा विचार करावा की धर्म नेहमी सुखदायक व सतत कृती करण्याजोगा आहे. धर्ममार्गावर चालून अनेकांनी प्रतिष्ठा कीर्ती प्राप्त करून घेतली आहे. ऋषीजन, सज्जन आणि नेता लोक याचे उदाहरण आहे.

भीतीने सर्व कार्य होतात. भीतीमुळे मनुष्य आपल्या मार्गावर चालून श्रेय आणि ध्येय दोन्ही प्राप्त करतात. शरीर नाशवंत असते, एक दिवस त्याचा नाश होणारच आहे. याच्या भीतीमुळे लोभ-मायामोहात सापडलेला मनुष्य सुद्धा एकवेळ विचार करतो की मला वाईट कृत्त्य करणे योग्य नाही वाईट मार्गापासून स्वःतला वाचविण्याचा हा एक सर्वश्रेष्ठ उपाय आहे. सत् संगती मध्येच जीवनाचे वास्तविक सुख आहे.

# पंधरावा अध्याय

दयावान व्हाः-

यस्य चित्तं द्रवीभूतं कृपया सर्वजन्तुषु।
तस्य ज्ञानेन मोक्षेण किं जटा भसमलेपनैः।। **1** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की ज्या मनुष्याचे हृदय सर्व प्राणीमात्राकरीता दयेने भरून जाते, त्याला ज्ञान, मोक्ष, जटा, भस्म-लेपन इत्यादींशी काय देणे-घेणे?

अर्थ असा आहे की ज्या मनुष्याच्या हृदयात सर्व मनुष्य, पशु-पक्षी, जीव-जंतु वगैरेसाठी खूप दया आहे तोच मनुष्य खरा असतो. त्याला आत्म्याचे ज्ञान, मोक्षाची, जटा-जूट होण्याची किंवा भस्म, टिळा, चंदनलेप वगैरे लावण्याची कांहीच गरज नाही.

गुरू ब्रह्म आहेः-

एकमवाक्षरं यस्तु गुरुरु शिष्यं प्रबोधयेत्।
पृथिव्यां नास्ति तद्द्रव्यं यद् दत्त्वा चाऽ नृणी भवते्।। **2** ।।

आचार्य चाणक्य येथे गुरूचा महिमा आणि महत्वाचे प्रतिपादन करताना म्हणतात की जो गुरू एखाद्या शब्दाचेही ज्ञान करून देतो त्याच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी त्याला देण्यायोग्य या पृथ्वीमध्ये एकही पदार्थ नाही.

अर्थ असा आहे की गुरू शब्दाचा अर्थ हा आहे की अज्ञानाचा अंधार दूर करून तेथे ज्ञानाचा प्रकाश पसरविणारा असा गुरू ब्रह्मा, विष्णु आणि साक्षात परब्रह्मसमान आहेत. एकाक्षरी ‘ॐ’ ला परब्रह्म मानतात. जर त्या एकाक्षरी ॐकाराचे ज्ञान ज्या गुरूने करून दिले तर मग त्याच्या शिवाय उरतेच काय? वेदांमध्ये तर असे सांगितले आहे की एका शब्दाच्या प्रयोग आणि ज्ञानाने स्वर्गलोक आणि या लोकात साऱ्या इच्छांची पूर्तता होते.

दुष्टांचा उपचारः-

खलानां कण्टकानां च द्विविधैव प्रतिक्रिया।
उपानामुखभंगो वा दरतैव विसर्जनम्।। **3** ।।

आयार्य चाणक्य दुष्टांच्या उपचाराबाबतीत चर्चा करताना सांगतात की दुष्टाचा आणि काट्याचा दोनच प्रकारचा उपचार आहे. पादत्राणाने ठेचून टाकणे किंवा दूर अंतरावरून टाळणे.

अर्थ हा आहे की दुष्ट आणि काटे सारखेच असतात. यांच्या पासून बचाव करण्याचे दोनच मार्ग आहेत. एक तर यांना चपलांनी ठेचून काढणे किंवा त्यांच्या समोरून बाजूला निघून जाणे. एक तर दुष्टासोबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये, त्याच्यापासून नेहमी दूरच राहावे.

नाहीतर त्याला असा धडा शिकवावा की तो परत आपले नुकसान करण्याच्या भानगडीत पडणार नाही. परिस्थितीनुसार जो कोणता उपाय चांगला वाटेल त्याचाच अंगीकार करावा.

## लक्ष्मी कोठेच थांबत नाहीः-

कुचैलिनं दन्समलोपधारिणं
बह्नाशिनं निष्ठुरभाषितं च।
सूर्योदये चास्तमिते शयानं
विमु**ञ्च** तेश्रीर्यदि चक्राणिः।। **4** ।।

येथे आचार्य चाणक्य लक्ष्मीच्या चंचल स्वभावाविषयी सांगतात की घाण वस्त्र धारण करणारे, घाणेरड्या दातांचे, अति अन्नाचे सेवन करणारे, कटु शब्द बोलणारे, सुर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत झोपून राहणारे अशा मनुष्यांचा लक्ष्मी त्याग करते. मग ती व्यक्ती साक्षात चक्रपाणी ईश्वर विष्णु स्वयं असला तरी.

अर्थ असा आहे की जया व्यक्तीमध्ये खालील दुर्गुण आहेत लक्ष्मी तीचा त्याग करते. जसे-

जी व्यक्ती घाणेरडे, मलीन कपडे वापरते.

ज्याचे दात किडके, घाण असतात व त्यांच्यात घाणच असते.

जो अति भोजन करतो. म्हणजेच वखवखलेला मनुष्य.

जो पूर्ण दिवस सूर्यादयापासून सायंकाळपर्यंत झोपलेला असतो.

असा मनुष्य मग तो कितीही मोठा असला तरी लक्ष्मीला त्याच्याकडे जाणे आवडत नाही. घाणेरडेपणा व आळस हे दोन्ही लक्ष्मीचे वैरी आहेत. म्हणून गरीबी हटविण्यासाठी आणि जीवनात प्रगती करण्यासाठी साफ स्वच्छ राहणे आणि आळसाचा त्याग करणे आवश्यक आहे.

## संपत्तीच खरे भाऊबंदः-

त्यजन्ति मित्राणि धनौर्विहीनं**,** दाराश्च भृत्याश्च सुहृज्जनाश्च।
तचार्थवन्तं पुनराश्रयन्ते**, ह्य** र्थों कि लोक पुरुषस्य बन्धुः।। **5** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की जगाची एक रीत आहे की येथे सर्व व्यापार, कारभार पैशांनी म्हणजे संपत्तीनेच चालतो.

मनुष्य जेव्हा कधी संपत्तीहीन होतो तेव्हा त्याचे मित्र, नोकर आणि नातलग एवढंच काय पण त्याची पत्नी सुद्धा त्याचा त्याग करतात. जर कधी योगायोगाने तोच मनुष्य श्रीमंत, धनवान झाला तर त्याचा त्याग करणारे तेच नातलग, नोकर वगैरे परत फिरत त्याच्याजवळ येतात. यामुळे हेच सिद्ध होते की संपत्तीच माणसाची खरी सहोदर आहे. ती असेल तर जगातील सर्व प्राणीमात्र प्रेम करतील आणि नसल्यावर पाठ फिरवतील.

**अन्या** योपार्जिजं वित्तं दशवर्षाणि तिष्ठति।
प्राप्त चैकादशे वर्षे समूलं तद् विनश्यति।। **6** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की लक्ष्मी चंचल असते, परंतु चोरी, जुगार, अन्याय आणि

फसवणूक करून कमावलेली संपत्ती स्थिर राहात नाही. ती अतिति शीघ्र गतीने नष्ट होते. त्यामुळे आचार्यांनी त्या सीमा आखून दिलेल्या आहेत. ते म्हणतात की अन्याय धूर्तपणा किंवा बेईमानीने कमविलेले धन जास्तीत जास्त दहा वर्ष टिकते. अकराव्या वर्षी हे वृद्धि झालेले धन मूळासहित नष्ट होते.

म्हणून मनुष्याने कधी ही अन्यायाने धन कमविण्यासाठी उद्युक्त होऊ नये.

## सत्संगती:-

अयुक्तस्वामिनो युक्तं नीचस्य दूषणम्।
अमृतं राहवे मृत्युर्विषं शंकरभूषणम्।। **7** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की योग्य व्यक्तीजवळ आल्यावर अयोग्य वस्तुसुद्धा सौंदर्य वाढविणारी ठरते. पण अयोग्याजवळ गेल्यामुळे कामाची उपयोगी वस्तुसुद्धा हानिकारक होते. शंकरच्या हाती आल्यावर विष सुद्धा गळड्याचा अलंकार झाले परंतु राहूला अमृत मिळून सुद्धा मृत्यूचा स्वीकार करावा लागला.

अर्थ असा आहे की कोणी व्यर्थ बिनाउपयोगी व हानिकारक वस्तु एखाद्या महापुरूषाच्या हाती पडली तर ती उपयोगी सिद्ध होते आणि एखादी मौल्यवान वस्तुसुद्धा दुष्टाच्या हातात पडली तर तो तीचा कांहीही फायदा करून घेऊ शकत नाही परंतु आपले स्वतःचे नुकसानच करून घेतो. भगवान शंकराला विष दिले गेले व त्याने ते प्राशन केले. त्यामुळे त्यांच्या गळड्याचे सौंदर्य वाढले तो निळकंठ झाला. राहूला अमृत मिळाले तरी सुद्धा त्याला आपला गळा कापून घ्यावा लागला. खरेच महापुरूषांचा प्रभाव कांही वेगळाच असतो.

## आचरण:-

तद् भोजनं यद् द्विज भुक्तशेषं
तत्सौहृदं सत्क्रियते परस्मिन्।
सा प्राज्ञता या न करोति पापं
दम्भं विना यः क्रियते स धर्मं। **8** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की ब्राह्मणांना खाऊ घातल्यावर जे अन्न उरते तेच खरे भोजन. दुसऱ्यावर केलेलेच प्रेम खरे असते. जी पाप करीत नाही तीच बुद्धि. धर्म तोच आहे जो करण्यात घमेंड नाही.

अर्थ हा आहे की विद्वानांना जेवण्यास घालूनच जेवण करावे. स्वजनावर सर्वच लोक प्रेम करतात पण खरे प्रेम तेच आहे जे तुम्ही दुसऱ्यावर करता. जी पापाचा, पाप करण्याचा साधा विचारही करीत नाही तीच बुद्धि महान आहे. दुसऱ्यांचे चांगले करताना गर्व, ताठा कधीही करू नये. अशा पुण्यकर्मालाच धर्म म्हणतात.

मणिर्लुण्ठति पादाग्रे काँचः शिरसि शर्यते।
क्रय विक्रयवेलायां कायः काँचो मणिर्णणि।। **9** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की जरी मणी पायायमोर टाकले व काच डोक्यावर ठेवला परंतु विक्रीच्या वेळी काच काचच असतो व मणी हा मणीच असतो.

अर्थ असा आहे की परिस्थितीमुळे जरी मोती जमीनीवर पाया समोर पडलेला असेल आणि काच डोक्यावर बसलेली असेल तर त्यामुळे काय फरक पडतो. शेवटी मोती हा मोतीच असतो. केव्हातरी एखादा पारखी येईल व त्या मोत्याचे मूल्य करीलच तो काचेचे मूल्य करणार नाही. सांगण्याचे तात्पर्य हे आहे की परिस्थितीच्या दबावामुळे कधी कधी योग्य विद्वान व्यक्तीला सुद्धा आदर मिळत नाही. तर एखाद्या मुर्ख व नाकर्त्या व्यक्तीला उच्च स्थान मिळते. परंतु जेव्हा योग्य व्यक्तीची आवश्यकता भासते तेव्हा त्या योग्यतेचे खरे मूल्य कळते.

## तत्व ग्रहणः-

अनन्तशास्त्रं बहुलाश्च विद्या
अल्पं च कालो बहुविघ्नता च।
आसारभूतं तदुपासनीयं
हंसो यथा क्षीरमिवाम्बुमध्यात्।। **10** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की शास्त्र अनंत आहेत, विद्या अनेक आहेत. पण मनुष्याचे जीवन लहान असून त्यात अनेक विघ्न, संकट आहेत. यासाठी हंस जसा दूध आणि पाणी मिसळून ठेवले तर फक्त दूध पीतो आणि पाणी टाकून देतो तसे चांगल्या गोष्टी ग्रहण करा व बाकीच्या सोडून द्या.

अर्थ असा आहे की शास्त्र आणि विद्या अनेक आहेत. मनुष्याचे जीवन एवढे लहान आहे की तो या सर्वांचा अभ्यास करू शकत नाही. या छोट्या आयुष्यात त्याला अनेक कार्ये करायची असतात. त्याचबरोबर जीवनातील अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे या शास्त्र-विद्यापेक्षा महत्वाच्या गोष्टी शिकणे आहेत.

## वाईट कृत्त्यः-

दूरादागतं पथिश्रान्तं वृथा च गृहमागतं।
अनर्चयित्वा यो भुंक्ते स वै चाण्डाल उच्यते।। **11** ।।

आचार्य चाणक्य चंडाळाची चर्चा सांगतात की जो दूरून थकून घरी आलेल्या व्यक्तीला तो कोणत्याही उद्देशाने आलेला नसला तरी त्याचे योग्यच स्वागत करावे, ते न करता जो स्वतः जेवण करतो त्याला चांडाळ म्हणतात.

अर्थ हा आहे की घरात जर कोणी व्यक्ती पायी-पायी दूर अंतराहून चालून थकून आली तर, मग तो निरूद्देश आला असला तरी त्याचे स्वागत करावे. जो मनुष्य त्याला जेवायला घातल्याशिवाय स्वतः जेवण करतो, त्याला नीच माणूस म्हणतात.

## मुर्ख कोण?:-

पठन्ति चतूरो वेदान् धर्मशास्त्रण्यनेकशः।

आत्मानं नैव जानन्ति दर्वी पाकर सं सथा।। **12** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की मुर्ख व्यक्ती चार वेद आणि अनेक धमशास्त्र वाचतात. तरी जेवणाचा स्वाद कढई जाणत नाही तसेस मुर्ख आपला आत्मा जाणत नाही.

अर्थ असा आहे की सर्व भाजी जरी कढईत असली तरी ती स्वाद घेऊ शकत नाही. तसेच मुर्खसुद्धा जरी त्याने सर्व वेद आणि धर्मशास्त्रांचे वाचन केले असले तरी तो शेवटपर्यंत मुर्खच राहतो.

ब्राह्मणाला मान द्याः-

धन्या द्विजमयीं नौका विपरीता भवार्णवे।
तरन्त्यधोगता सर्वे उपस्थिता पतन्त्येव हि।। **13** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की भवसागरात सुद्धा प्रवाह विरूद्ध चालणारी ब्राह्मण रूपी नौका धन्य आहे. याच्या आधाराखाली राहणारे तरून जातात परंतु वर बसलेले खाली पडतात.

अर्थ असा आहे की ब्राह्मण नौकेसारखा असतो तो लोकांना संसार रूपी सागर पार पाडण्यास मदत करतो. पण या नावेत वर बसावे लागत नाही तर याच्या खाली राहावे लागते. ही एक उलटी नाव आहे. हिच्या खाली राहिल्यामुळे म्हणजेच ब्राह्मणाला दबून राहणाऱ्या व्यक्ती हा सागर पार करतात. त्याला स्वर्ग मिळतो. पण वर बसला तर म्हणजेच त्याचा अपमान केला तर बुडतो. त्याचे कल्याण होत नाही.

पराधीनतेमध्ये सुख कोठे?:-

अयममृतणनिधानं नायका औषधीनां
अमृतमयशरीरः कान्तियुक्तो**ऽ** पि चन्द्रः।
भवति विगतश्मिर्मण्डले प्राप्य भानोः
परसदननिविष्टः को न लघुत्वं याति।। **14** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की ही अमृतकोश, औषधीपती, अमृताने बनलेले शरीर असलेला चंद्र सुंदर कांतीचा असून सुद्धा सूर्यमंडळात आल्यावर तेजहीन होतो. परक्या घरी आल्यावर मनुष्य थिटा होतो.

अर्थ हा आहे की चंद्राचे शरीर अमृताने तयार झाले आहे, तो अमृताचे भांडार आहे आणि त्याला औषधांचा स्वामी म्हणतात. त्याचे सौंदर्य अलौकिक आहे. हे सगळे असताना सुद्धा सूर्य उगवल्यावर तो फिका पडतो. त्याचे अमृत सुद्धा त्याचे रक्षण करू शकत नाही. दिवस सूर्याचा निवास असतो. दुसऱ्यांच्या घरात गेल्यावर कोणालाही मान मिळत नाही. परक्या घरी सगळेच लहान होतात. परक्या घरी राहणे दुःखदायक असते.

अलिश्यं नलिनिदलमध्यमः
कमलिनीमकरन्दमदालसः।

विधिवशात्प्रदेशमुपागतः
कुरजपुष्परसं बहु मन्यते।। **15** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की भूंगा कमळदलामध्ये राहतो आणि त्यांचाच रस प्राशन करून आळशी राहतो. कुणा कारणामुळे परदेशी यावे लागले आणि आता कारवीच्या फुलांचा रसच खूप झाला.

अर्थ हा आहे की कमळांच्या तलावात राहणारा भूंगा त्याच्या रसाला क्षुल्लक समजतो. जेव्हा कमळं सुकतात तेव्हा तो दुसऱ्या जागी निघून जातो, तेव्हा तिथे एखाद्या साधारण फुलाचा रस मिळाला तरी तो त्यालाच मोठी गोष्ट समजतो. एका सधन, संपन्न परिवारातील व्यक्ती, ज्याला घरात प्रत्येक सुविधा मिळालेली असते. कधी जेव्हा बाहेर जाती तेव्हा त्याला त्या सुविधा मिळत नाहीत. त्याला तेथे जे कांही मिळते, नाईलाजाने त्यातच त्याला समाधान मानावे लागते.

ब्राह्मण आणि कन्याः-

पीत कुद्धेन तातश्चरणतलहतो वल्लभो**ऽ** येन रोषा
अबाल्याद्विप्रवयैः स्ववदनविवरे धार्यते वैरिणी मे।
गेहं में छेदयन्ति प्रतिदिवसममाकान्त पूजानिमित्तात्
तस्मात् खिन्ना सदा**ऽ** हं द्विज कुलनिलयं नाथ युक्तं त्यजामि।। **16** ।।

आचार्य चाणक्य ब्राह्मण आणि लक्ष्मी यांच्या वैराची चर्चा करताना सांगतात की ज्याने कोपिष्ट होऊन माझ्या वडीलांचे प्राशन केले, ज्याने रागाने माझ्या पतीला लाथ मारली, जो लहानपणापासूनच माझी वैरीण सरस्वतीला मुखी धारण करतो आणि जो शिवाच्या पूजेसाठी माझे कमळ पुष्प तोडतो, अशा ब्राह्मणांनीच माझा सर्वनाश केला आहे म्हणून मी या घरांना सोडून राहते.

अर्थ असा आहे की लक्ष्मी म्हणते अगस्ती ब्राह्मण होते, त्यांनी माझे वडील जे समुद्र त्याचे प्राशन केले होते. भृगु ऋषीने माझ्या पतीच्या छातीत लाथ मारली होती. भृगु सुद्धा ब्राह्मण होते. सरस्वतीशी माझे वैर जन्मजात आहे. या ब्राह्मणांची मुले लहानपणापासूनच सरस्वतीचे पूजन करतात. शिवाची पूजा करण्यासाठी नेहमी कमळ तोडतात. कमळ माझ्या घरासारखे आहे. यांनी माझे अनेक प्रकारांनी नुकसान केलेले आहे. यामुळे मी यांच्या घरी कधीही जाणार नाही.

प्रेम बंधनः-

बन्धनानि खुल सन्ति बहूनि
प्रेमरज्जुकृतबनधनमन्यत्।
दारूभेदनिपुणो**ऽ** पि षडंघ्रि
र्निष्क्रियो भवति पंकजकोशे।। **17** ।।

आचार्य चाणक्य प्रेम-पाशाची चर्चा करताना म्हणतात की बंधन तर अनेक आहेत. परंतु प्रेमाचा पाश वेगळाच आहे. कठीण लाकूड पोखरणारा भ्रमर सुद्धा कमलपाशात निष्प्रभ होतो.

अर्थ असा आहे की जगात अनेक प्रकारचे पाश आहेत पण प्रेमाचे बंधन निराळेच असते. ते अत्यंत नाजुक असून सुद्धा मोठ्या मोठ्यांचे चातुर्य सुद्धा निकामी करते. भूंग्याकडे पाहिले असता, तो लाकूड कोरून त्यात छिद्र बनवू शकतो, तोच भ्रमर सुर्यास्त झाल्यावर कमळ पाकळ्यांमध्ये कैद होतो. परंतु त्याचे कमळावर आत्यंतिक प्रेम असते यामुळे तो त्याला पोखरत नाही. बिचारा भ्रमर सर्वरात्र कमलपाकळ्यामध्ये प्रेमाची कैद भोगतो यालाच प्रेमाची कमाल म्हणतात.

दृढता-:

छिन्नो**ऽ** पि चन्दनतरूर्न जहाति गन्धं
वृद्धो**ऽ** पि वारणपतिर्न जहाति लीलानम्।
यन्त्रर्पितो मधुरतां न जहार्ति चेक्ष
क्षणो**ऽ** पि न त्यजति शीलगुणान्कुलीनः।। **18** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की तोडल्यानंतर सुद्धा चंदनवृक्षाचा सुगंध बंद होत नाही. वृक्ष झाला तरी हती आपल्या लीला बंद करीत नाही. चरक्यात पिळल्यानंतर सुद्धा ऊस आपला गोडवा सोडीत नाही. तसच गरीब झाला तरी कुलीन स्वतःचे शील, गुण सोडीत नाही.

याचा आशय असा आहे की चंदन वृक्ष जरी कापला तरी तो स्वतःचा सुगंध सोडीत नाही. हत्तीदळाचा राजा वृद्ध झाला तरी आपल्या सवयी सोडीत नाही. उसाला चरक्यात घालून पिळले तरी तो आपला गोडवा सोडीत नाही. कुलीन व्यक्तीला कितीही दुःख होऊ द्या तो आपले गुण सोडीत नाही.

पुण्यामुळे यशः-

उर्ध्यां को**ऽ** पि महीधरो लघुतरो दौर्म्यां धृतौ लीलया
तेन त्वं दिवि भूतले च सततं गोवर्धनो गीयसे।
त्वां त्रैलोक्यधरं वहायि कुचयोरग्रेण नो गण्यते
किं व केशव भाषणेन बहुना पुण्यं यशसा लभ्यते।। **19** ।।

आचार्य चाणक्य यशाची प्राप्ती सुद्धा पुण्यामुळे होत असल्याचे सांगून म्हणतात की एक लहान पर्वत सहजपणे आपल्या हातांनी उचलला. यामुळेच आपल्याला स्वर्ग आणि पृथ्वीवर गोवर्धन म्हणतात. आपण तिन्ही लोक धारण करतात आणि आपल्याला माझ्या स्तनांच्या पुढच्या भागात धारण करते परंतु याचे कांही मोजमाप नाही. जास्त सांगून कार्य फायदा? तर मग हे कृष्णा, यशसुद्धा पुण्यानेच मिळते.

अर्थ असा आहे की भगवान कृष्णाने आपल्या दोन हातांनी एक छोटासा गोवर्धन पर्वत उचलला होता. यामुळे त्याची एवढी प्रसिद्धी झाली की लोक त्याला गोवर्धन गिरधारी म्हणू लागले. तीन लोकांचा स्वामी त्या कृष्णाला गोपी आपल्या स्तनाचा पुढच्या भागात ठेवतात. परंतु त्यांच्या या कार्याचे कोठेच मोजमाप नाही. कोणाला त्यांचे नाव सुद्धा माहित नाही. हे सत्यच आहे की व्यक्तीला यशसुद्धा त्याच्या पुण्यामुळे वा सत्कर्मांनीच मिळत असते.

# सोळावा अध्याय

संततीः-

न ध्यातं पदमीश्वस्य विधिवत्संसारविच्छित्तये
स्वर्गद्वारकपाटपाटनपटुः धर्मोऽ पि नोपार्जितः।
नारीपीनपयोधरयुगलं स्वप्नऽ पि नार्लिगितं
मातुः केवलमेव यौवनच्छेदकुठारो वयम्।। **1** ।।

आचार्य चाणक्याचे कथन आहे की संसारातून मुक्ती मिळविण्यासाठी ना तर आम्ही ईश्वराचे चरणांचे ध्यान केले ना ही स्वर्ग-द्वार प्राप्तीसाठी धर्माचा संचय केला आणि ना ही स्वप्नात सुद्धा स्त्रीच्या कठोर स्तनाला आलिंगन दिले. या प्रकारे आम्ही जन्म घेऊन आईचे यौवन नष्ट करण्यासाठी कुऱ्हाडीचे काम केले.

अर्थ असा आहे की ना तर मोक्ष प्राप्तीसाठी परमात्म्याचे ध्यान करतो, ना स्वर्ग प्राप्तीसाठी धर्मकार्य करतो, नाही स्त्रीच्या स्तनाशी आलिंगन संभोग करतो. अशा मनुष्याचे जीवन व्यर्थ आहे. संततीला जन्म दिल्यावर आईचे तारूण्य तर नष्ट होतेच पण गुणवान संततीला जन्म देऊन माता स्वतःला धन्य मानते. या अशा प्रकारची संतती जी मोक्ष प्राप्तीसाठी काही प्रयत्न करीत नाही, ना धर्म करते आणि ना तर काम भोग भोगते, ते आईचे तारूण्य नष्ट करणारी कुऱ्हाडच असते. अशा संततीला जन्म देऊन आई सुखी होत नाही.

स्त्री चरित्रः-

जलपन्ति सार्धमन्येन पश्यन्त्यन्यं सविभ्रमाः।
हृदये चिन्तयन्त्यन्यं न स्त्रीणामेकतो रतिः।। **2** ।।

आचार्य चाणक्य येथे स्त्रियांच्या स्वभावाची चर्चा करताना म्हणतात की स्त्रिया बोलतात एकाशी, नजरेचे तीर दुसऱ्यावर टाकतात आणि मनातून कोण्या तिसऱ्याचीच अभिलाषा ठेवतात.

याचा अर्थ असा आहे वारांगना रूपात स्त्री अनेकरूपी असते. ती पैशांच्या बळावर निष्ठा बदलते. तीला कोणाचेच प्रेम नसते. तीचा स्वभाव धनलोभी असतो. म्हणून उत्तम पुरुष वेश्याबरोबर संबंध न ठेवता सन्मार्गाने आपले आयुष्य काढतात.

यो मोहयन्मन्यते मूढो सत्तेयं मयि कामिनी।
स तस्य वशगो भूत्वा तृत्येत् क्रीडा शकुन्तवत्।। **3** ।।

आचार्य चाणक्य येथे स्त्रीरूपाने वश झालेल्या मुर्ख मनुष्याच्या आसक्तीवर टीका करताना म्हणतात की जो मनुष्य मुर्खपणाने स्त्रीच्या मोहपाशात गुंतून असे समजतो की ही सुंदरी

माझ्यावर अनुरूक्त झाली आहे तोच तीला वश होऊन खेळण्यातल्या चिमण्यासारखे नाचू लागतो.

अर्थ असा आहे की जर एखाद्या स्त्री विषयी पुरुष असा विचार करतो की ती त्याच्यावर लुब्ध आहे तर तो महामुर्ख आहे, त्याला कांहीच अक्कल नसते. याच भ्रमात तो स्त्रीला वश होतो व त्या स्त्रीच्या ईशाऱ्यावर खेळण्याप्रमाणे नाचतो-गातो. स्त्रीकडून प्रेमाची अपेक्षा करणे मुर्खपणा आहे.

कोऽ र्थान्प्राप्य न गर्वितो विषयिणः कस्यापदोऽ स्तंगताः।
स्त्रीभिः कस्य न खण्डितं भुवि मनः को नाम राज्ञप्रियः।।
काः कालस्य न गोचरत्वमगमत् कोऽ र्थो गतो गौरवय्।
को वा दुर्जनदुर्गणेषु पतितः क्षेमेण यातः पथि।। **4** ।।

आचार्य चाणक्य येथे वाईट संगती वा संपत्ती, स्त्री किंवा राजाच्या संबंधातून न वाचण्याची स्थिती स्पष्ट करताना म्हणतात की असा कोण मनुष्य आहे ज्याला संपत्ती मिळाल्यावर गर्व झाला नाही? कोणत्या विषयासक्त मनुष्याची दुःख नाहीशी झालीत? स्त्रियांनी कोणाचे मन मोडले नाही? कोण व्यक्ती राजाची आवडती होऊ शकली आहे? काळाची नजर कोणावर नाही पडली? कोण्या भिकाऱ्याला सन्मान मिळाला आहे? असा कोण मनुष्य आहे जो दुष्टांच्या दुष्ट जाळ्यात सापडून परत वापस आला आहे.

अर्थ हा आहे की संपत्ती मिळाल्यावर सर्वानाच गर्व, माज येतो. वासना, वाईट कर्मात सापडून कोणाच्या दुःखाचा अंत होत नाही. स्त्रिया सर्व पुरुषमनाला मोहात टाकतात. कोणताही मनुष्य राजाचा आवडता होऊ शकत नाही. मृत्यूच्या नजरेतून कोणीही सुटका करून घेऊ शकत नाही. भिक मागणाऱ्याला मान मिळत नाही. दुष्टांसोबत राहून कोणी चांगले राहू शकत नाही.

## विनाश काले विपरीत बुद्धिः-

न निर्मिता केन न दुष्टपूर्वा न श्रयते हेमयमी कुरंगी।
तथाऽ पि तृष्ण रघुनन्दनस्य विनाशकाले विपरीतबुद्धि।। **5** ।।

येथे आचार्य चाणक्य नाशाची वेळ आल्यावर बुद्धि साथ सोडून जाते या म्हणीला स्पष्ट करताना सांगतात की सोन्याची हरिणी ना तर कोणी तयार केली आहे ना कोणी ती पाहिली आहे आणि ना ती ऐकण्यात आली आहे, की सोन्याची हरिणी सुद्धा असते. तरीही रघुनन्दनाची लालसा पाहा. वास्तविक विनाशाचा काळ आल्यावर बुद्धि सुद्धा विपरीत होते.

याचा आशय असा आहे की विधात्याने ही सोन्याचे हरिण तयार केले नाही, कोणीही असे हरिण पाहिले नाही आणि ऐकलेही नाही. तरीही प्रभू रामाला काय सुचले? सोन्याचे हरिण पाहून त्यांना लालसा सुटली आणि ते त्याची शिकार करायला निघाले. एका नसणाऱ्या अस्तित्वावर त्यांनी विश्वास ठेवला. खरेच सोन्याचे हरिण असते का, यावरही त्यांनी विचार केला नाही. त्यांचा तरी काय दोष? संकटात जे सापडायचे होते. संकटाच काळ आल्यावर मनुष्याची अक्कल मारली जाते.

मोठेपणा-:

> गुणैरूत्तमतां यान्ति नोच्चैरासनसंस्थितैः।
> प्रसादशिखरस्थोऽ पि किं काको गरूडायते।। **6** ।।

आचार्य चाणक्य गुणांचा मोठेपणा सांगताना म्हणतात की गुणामुळेच मनुष्य मोठा होतो, केवळ उंच स्थानी बसला म्हणून नाही. राजवाड्याच्या शिखरावर बसल्यामुळे कावळा गरूड होत नाही.

अर्थ असा आहे की मनुष्य गुणांनीच मोठा होतो. गुणहीनता त्याला तात्पूरती लाभदायक असते. ती कायमच लाभ देऊ शकत नाही.

> **गुणाः** सर्वत्र पुजयन्ते न महत्योऽ पि सम्पदः।
> पूर्णेन्दु किं तथा वन्द्यो निष्कलंको यथा कुशः।। **7** ।।

आचार्य चाणक्य गुणाविषयी पुजेचा भाव ठेवून म्हणतात की गुणांचीच सर्वत्र पुजा होते. संपत्ती कितीही असली तरी सर्वच जागी त्याची पुजा होत नाही. पूर्णचंद्राची प्रार्थना काय क्षीण चंद्राएवढीच होते.

आशय असा आहे की मनुष्यजवळ कितीही धन-संपत्ती असली तरी त्याचा सर्वच ठिकाणी सन्मान होत नाही. गुणवान व्यक्तीचा आदर सर्वत्र होतो. पौर्णिमेचा चंद्र कितीही मोठा असला तरी त्याच्यामध्ये डाग असल्यामुळे मनुष्य त्याची पुजा करीत नाही. त्या उलट दूजेच्या चंद्रासमोर सारेच मस्तक नम्र करतात कारण त्याच्यात डाग नसतात, गुण असतात.

> परमोक्तगुणो यस्तु निर्गुणोऽ पि गुणी भवेत्
> इन्द्रोऽ पि लघुतां याति स्वयं प्रख्यापितैर्गुणैः।। **8** ।।

स्वतःची प्रशंसा स्वतःच करण्याच्या प्रवृत्तीवर टीका करताना आचार्य चाणक्य म्हणतात की दुसऱ्या लोकांनी जर गुणहीन मनुष्याची प्रशंसा केली तर तो मोठा होतो. स्वतःची स्तुती स्वतःच केली तर इंद्रसुद्धा लहान होऊन जातो.

अर्थ असा आहे की मनुष्य स्वतःची प्रशंसा करीत नाही. आपल्याच तोंडाने आपणच पोपटा सारखी बडबड केली तर इंद्राची इज्जत सुद्धा कमी होते. मग इतरांचे काय सांगावे. खरा गुणी मनुष्य तोच आहे ज्याची स्तुती इतर लोक करतात.

> विवेकिनमनुप्राप्तो गुणो याति मनोज्ञताम्।
> सुतरां रत्नमाभाति चामीकरनियोजितम्।। **9** ।।

आचार्य चाणक्य गुण आणि स्थानाच्या संदर्भात चर्चा करताना सांगतात की गुण सुद्धा योग्य विनयशील व्यक्तीजवळ असणेच सुंदर दिसते कारण रत्न सोन्यात जडविल्यानंतर सुंदर दिसते.

याचा आशय असा आहे की एखादा गुण एखाद्या समजदार व्यक्ती मध्ये असला तरच लाभदायक असतो. तेच गुण एखाद्या दुष्टाच्या अंगी असतील तर ते बदनाम होतात. रत्न सोन्यात जडविल्यानंतर त्याचे सौंदर्य अजून वाढते. जर हेच रत्न लोखंडात जडविले तर त्याचे सौंदर्य

नाहीसे होईल.

**गुणं** सर्वत्र तुल्योऽ पि सीदत्येको निराश्रयः।
अनर्घ्यमपि माणिक्यं हे माश्रयमपेक्षते।। **10** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की गुणी व्यक्ती सुद्धा उचित योग्य, आश्रय नाही मिळाला तर दुःखी होतात कारण की निर्दोष मोत्याला सुद्धा आश्रयाची गरज असते.

याचा अर्थ असा आहे की व्यक्ती जर गुणी असेल तर त्याला योग्य स्थानाची आवश्यकता असते. जर योग्य स्थान नाही मिळाले तर तो व्यथित होतो. कारण की मौल्यवान आणि निर्दोष मोत्याला सुद्धा सोन्याच्या आधाराची आवश्यकता असते, ज्याच्यात त्याला जडविले जाते.

अयोग्य धनः-

अतिक्लेशने ये चार्थाः धर्मसयातिक्रमेण तू।
शत्रूणां प्रणिपातेन ते ह्यर्थाः न भवन्तु मे।। **11** ।।

आचार्य चाणक्य येथे अनुचित संपत्तीचा तिरस्कार करताना सांगतात की दुसऱ्यांना दुखी करून अधर्माने आणि शत्रूच्या शरणागतीने मिळत असलेले धन मला नको.

अर्थ हा आहे की जी संपत्ती एखाद्याला दुःखी करून मिळत असेळ जी चोरी, काळाबाजार, तस्करी वगैरे अवैध धंद्यांपासून मिळत असेल किंवा देशाच्या शत्रुपासून म्हणजे देशद्रोह करून मिळत असेल तर अशी संपत्ती घेण्याची इच्छा करू नये.

किं तया क्रियते लक्ष्मया या वधूरिव केवला।
या तु वेश्यैव सामान्यपथिकैरपि भुज्यते।। **12** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की वधुसमान असणाऱ्या घरात बंद राहणारी लक्ष्मी काय कामाला येते. आणि ज्या लक्ष्मीचा भोग सर्वजन एखाद्या वेश्येप्रमाणे घेतात, अशी लक्ष्मी सुद्धा काय कामाची?

आशय असा आहे की कंजूष मनुष्याची संपत्ती तिजोरीमध्ये बंद असते. अशी संपत्ती समाज उपयोगी नसते. मुर्ख मनुष्य सुद्धा संपत्तीचा योग्य उपयोग करणे जाणीत नाही. त्याची संपत्ती वेश्येसारखी असते. तीचा उपयोग दुष्ट, चोर लोकच करतात. ही संपत्ती सुद्धा कोणत्याही चांगल्या कार्याला येत नाही. संपत्तीचा समाज कल्याण, परोपकार आणि गरजू लोकांना मदत करण्यासाठीच उपयोग करावा.

धनेषु जीवितव्येषु स्त्रीषु चाहारकर्मषु।
अतृप्ता प्राणिनः सर्वे याता यास्यन्ति यान्ति च।। **13** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की सर्व प्राणी धन, जीवन, स्त्री आणि भोजन या गोष्टीत नेहमीच अतृप्त राहून विश्वातून निघून गेले, जात आहेत व जातील.

अर्थ असा आहे की संपत्ती, आयुष्य, स्त्री आणि जेवण यांची इच्छा कधीच पूर्ण होत नाही. यांची आसक्ती नेहमीच कायम असते. हीच इच्छा घेऊन लोक या विश्वात मरण पावले आहेत,

मरत आहेत आणि भविष्यात सुद्धा असेच होत राहणार.

## सार्थक दानः-

> क्षीयन्ते सर्वदानानि यज्ञहोमबलि क्रियाः।
> न क्षीयते पात्रदानम भयं सर्वदेहिनाम्।। **14** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की सर्व यज्ञ, दान, बळी वगैरे नष्ट होतात परंतु पात्र, योग्य व्यक्तीला दिलेले दान आणि आश्रम यांचे फळ नष्ट होत नाही.

अर्थ असा आहे की योग्य आणि गरजवंतालाच दान करावे इतर दान, यज्ञ वगैरे नष्ट होतात. पण योग्य गरजवंताला दिलेले दान आणि एखाद्याच्या जीवाचे रक्षण करण्यासाठी अभयदान यांचे फळ कधीच नष्ट होत नाही.

## याचकताः-

> तृणं लघु तृणात्तूलं तुलादपि च याचकः।
> वायुना किं जीतो**ऽ** सौ मामयं याचयिष्यति।। **15** ।।

आचार्य चाणक्य मागणे या गोष्टीला मृत्यूसमान मानून सांगतात की गवताची काडी हलकी असते, त्यापेक्षा हल्की रूई (कापूस) असते, आणि याचक रूईपेक्षा हलका असतो. मग त्याला वारा उडवून का लावीत नाही? यामुळे की वारा विचार करतो की हाच मला कांहीतरी मागेल.

अर्थ असा आहे की सर्वात हलकी गवताची काडी असते. रूई काडीपेक्षाही हलकी असते परंतु भिकारी रूईपेक्षाही हलका असतो. तेव्हा प्रश्न असा पडतो की त्याला हवा उडवून का टाकीत नाही? याचे उत्तर आहे वाऱ्याला पण ही भीती असते की जर की त्याला उडवून घेऊन जाऊ लागलो तर तो माझ्यापाशीही एखादी मागणी करील. म्हणून वारा याला उडवित नाही. भीक मांगणे सर्वात हल्के काम आहे. भिकाऱ्याला इज्जत नसते.

## गरीबीः-

> वरं वनं व्याघ्रगजेन्द्रसेवितं
> द्रुमालयं पक्वफलाबुसेवनं।
> तृणेषु श**य्या** शतजीर्णवल्कलं
> न बन्धुमध्ये धनहीन जीवनम्।। **16** ।।

आचार्य चाणक्य गरीबीला जीवनातील अभिशाप मानून म्हणतात की बाघ-हत्ती असणाऱ्या जंगलामध्ये राहणे, वृक्षा खाली घर, जंगताल फळ खाणे आणि पाणी पिणे, गवताचा बिछाना आणि शेकडो वृक्षांच्या सालीचे तुकडे यांचे कपडे वापरणेच चांगले.

याचा अर्थ असा आहे की समाजात भाऊबंदामध्ये गरीबीत जगणे चांगले नाही. यापेक्षा मनुष्याने भयंकर वाघ, सिंह, हत्ती असणाऱ्या जंगलात गेला आणि तेथे एखाद्या वृक्षाखाली गवतावर निद्रा घेणे, जंगलातील फळे खाणे, तेथीलच पाणी पिणे आणि झाडाच्या सालीची वस्त्रे

वापरणे चांगले आहे. गरीब होऊन समाजात जगण्यापेक्षा वनवास चांगला.

## मधुर बोलः-

प्रियवाक्याप्रदानेन सर्वे तुष्यन्ति मानवाः।
तस्मात् तदेव वक्तव्यं वचने का दरिद्रता।। **17** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की प्रिय, गोडवाणी बोलण्यामुळे सर्व माणसं संतुष्ट होतात. म्हणून मधुर बोलले पाहिजे. बोलण्याने गरीब कोणी होत नाही.

असा अर्थ आहे की मधुर भाषण करणे हे दान करण्यासारखे आहे. यामध्ये या सर्व मनुष्यांना आनंद मिळतो. म्हणून गोडच बोलावे. बोलण्यात कशाची गरीबी.

संसार कटु वृक्षास्य द्वे फले ह्यमृतोपमे।
सुभाषितं च सुस्वादुः संगति सज्जने जने।। **18** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की या संसाररूपी वृक्षाला अमृतासारखी दोन फळ आहेत. सुंदर बोलणे आणि सज्जनाबरोबर संगत करणे.

याचा आशय हा आहे की सर्वांशी मधुर बोलणे आणि महापुरुषांचा सत्संग करणे या विश्वात मनुष्याच्या हातात या दोन गोष्टी असतात. म्हणून सर्वांशी मधुर, गोड बोलले पाहिजे आणि सज्जनाबरोबर सत्संग केला पाहिजे.

जन्मजन्मनि चाभ्यस्तं दानमध्ययनं तपः।
तेनैवाभ्यासयोगेने देही वाऽ भ्यस्यते।। **19** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात जन्म-जन्मापर्यंत अभ्यास केला तरच मनुष्याला दान, अध्ययन आणि तप प्राप्त होते. या अभ्यासामुळेच प्राणी मात्र हे वारंवार करतात.

याचा अर्थ असा आहे की खूप जन्म दान, अध्ययन आणि तपश्चर्या केल्यानंतरच मनुष्य दानशूर होतो, अध्ययन करतो आणि तपस्वी बनतो. हे गुण कोणा एका जन्मात येत नाहीत, कितीतरी जन्मांच्या अभ्यासामुळेच हे गुण प्राप्त होतात.

## विद्या आणि संपत्तीच उपयोगः-

पुस्तकेषु च या विद्या परहस्तेषु च यद्धनम्।
उत्पन्नेषु च कार्येषु न सा विद्या न तद्धनम्।। **20** ।।

आचार्य चाणक्य वेळेवर कामाला न येणाऱ्या विषयी बोलताना म्हणतात की जी विद्या पुस्तकात आहे आणि जी संपत्ती दुसऱ्यांच्या हातात गेली आहे, या दोन ही वस्तु वेळेवर कामाला येत नाहीत.

अर्थ असा आहे की आपल्याला ज्ञात विद्या आणि आपल्या हातातील संपत्ती हेच वेळेला उपयोगी पडतात. कर्ज म्हणून दिलेली संपत्ती आणि पुस्तकात लिहिलेली विद्या एकाएकी काम पडले तर साथ देत नाहीत.

# सतरावा अध्याय

## ज्ञान ही गुरुकृपा आहेः-

पुस्तकं प्रत्याधीतं नाधीतं गुरुसन्निधौ।
सभामध्ये न शोभन्ते जारगर्भा इव स्त्रियः।। **1** ।।

आचार्य चाणक्य विद्याध्ययनासाठी गुरुचे महत्व सांगताना म्हणतात की जी व्यक्ती फक्त ग्रंथवाचून विद्या प्राप्त करते, कोणा गुरुपासून नाही, त्या व्यक्तीचा कुठल्या सभेत अवैध संबंधामुळे गर्भवती झालेली स्त्रीच्या समान कांही आदर नसतो.

याचा आशय असा आहे की कोणतीही विद्या एखाद्या योग्य गुरू पासूनच शिकली जाऊ शकते. जर एखादी व्यक्ती फक्त पुस्तके वाचूनच स्वतःला विद्वान समजते, तर तो त्याचा भ्रम आहे असे ज्ञान "अर्धवट वैद्य जीवाची गाठ" असते. जसे एखाद्या परक्या व्यक्तीपासून गर्भवती झालेली स्त्री तीचा कोणताही मान नसतो. त्याच प्रकारे स्वतःच पुस्तकामधून विद्या प्राप्त करणाऱ्या व्यक्तीला विद्वान सभेत कांहीच इज्जत मिळत नाही.

## शठ्यं प्रति शाठ्यंमः-

कृते प्रतिकृतिं कुर्यात हिंसेन प्रतिहिंसनम्।
तत्र दोषो न पतति दुष्टे दौष्ट्यं समाचरते्।। **2** ।।

आचार्य चाणक्य जशास तसे या व्यवहाराची बाजू उचलून सांगतात की उपकारकर्त्याबरोबर उपकार, हिंसेशी प्रतिहिंसा केली पाहिजे. दुष्टाबरोबर दुष्टतेनेच वागले पाहिजे. यात कांहीच चूक नाही.

याचा अर्थ हा आहे की जी व्यक्ती आपल्यावर उपकार करते त्याच्याबरोबर आपण सुद्धा उपकार करूनच करावे. जो भांडणासाठी प्रवृत होईल त्याच्याशी मारहाणच केली पाहिजे. त्याच्याशी जर असे वागले नाही तर भित्रेपणा जरी नसला तरी मुर्खपणा मात्र आहे.

दुष्टाबरोबर दुष्टतेचाच व्यवहार केला पाहिजे. त्याच्याबरोबर सभ्यतेने वागणे म्हणजे महामुर्खपणा आहे. उपकारकर्त्याशी उपकार, हिसांचारी सोबत हिंसा आणि दुष्टपणा करणेच बुद्धिमानी आहे. असे करण्यामध्ये कोणताही वाईटपणा नाही.

## तपाचा महिमाः-

यद् दूरं यद् दुराराध्यं यच्च दूरे व्यवस्थितम्।
तत्सर्वं तपसा साध्यं तपो हि दुरतिक्रमम्।। **3** ।।

येथे तपाची चर्चा करताना आचार्य चाणक्य सांगतात की जी वस्तु दूर आहे, दुराराध्य आहे,

दूर स्थित आहे त्या सर्व तपाने साध्य आहेत. तप सर्वात जाास्त प्रबळ वस्तु आहे.

याचा अर्थ असा आहे की कोणतीही वस्तु, कितीही दूर असली तरी, ती मिळविणे कितीही कठीण असले तरी किंवा ती आवाक्या बाहेर असली तरी कठोर तपश्चर्या म्हणजेच परिश्रमाने ती प्राप्त करता येते तप मोठे शक्तीशाली आहे.

> लोभश्चेदगु**णो** न किं पिशुनता यद्यस्ति किं पातकैः
> सत्यं यत्तपसा च किं शुचिमनो यद्यस्ति तीर्थेन किम्।
> सौजन्यं यदि किं गुणैः सुमहिमा यद्यहिस्त किं मण्डनैः
> सद्विद्या यदि किं धनैरपयशो यद्यस्तिइ मृत्युना।। **4** ।।

आचार्य चाणक्य येथे व्यक्तीच्या संबंद्धतेची चर्चा करताना सांगतात की लोभी व्यक्तीला दुसऱ्यांच्या अवगुणांशी काय देणे-घेणे? चहाडखोराला पापाचे काय? खऱ्या व्यक्तीला तपश्चर्येचे काय. मन शुद्ध असेल तर तीर्थांचा काय संबंध? कीर्ती झाल्यावर सोंग कशाला करायचे? सद्विद्या आहे तर संपत्तीचा काय संबंध? बदनामी झाल्यावर मृत्यूचे काय?

याचा अर्थ आहे की लोभी व्यक्ती गुणी वा अवगुणी व्यक्तीला पाहात नाही. त्याचा स्वार्थ जर दुष्ट व्यक्तीपासून साध्य होत असेल तर तो त्याचे तळवे सुद्धा चाटतो. तो फक्त आपला स्वार्थ पाहतो, अवगुणी व्यक्तीला नाही. चहाडखोर मनुष्य पापाला भीत नाही. तो चहाडी करून कोणतेही पाप करू शकतो. खऱ्या मनुष्याला तपश्चर्येची गरज नसते. सत्य हे सर्वात मोठे तप आहे. मन शुद्ध असेल तर मनुष्याला तीर्थयात्र करण्याशी कांही संबंध नाही. म्हणजेच मन शुद्ध तर परातीत गंगा. जी व्यक्ती स्वतः सज्जन आहे तीला उपदेश करण्यात काय अर्थ? जर एक व्यक्ती समाजात आपल्या सत्कर्मामुळे प्रसिद्ध झाला असेल तर त्याला दिखावा करण्याची कांहीच आवश्यकता नाही. व्यक्तीजवळ विद्या असेल तर संपत्तीशी काय संबंध? कारण सर्वात मोठे धन विद्या आहे. बदनाम व्यक्तीला मृत्यूशी काय देणे-घेणे. बदनामी स्वतःच मृत्यूपेक्षा भयंकर आहे.

विटंबनाः-

> पिता रत्नाकरो यस्य लक्ष्मीर्यस्त सहोदरी।
> शंखो भिज्ञाटनं कुर्यान्न दत्तमुपतिष्ठति।। **5** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की ज्याचे वडील रत्नांची खाण आहे, सागर आहे आणि सख्खी बहीण लक्ष्मी आहे, असा शंख भिक्षा मागतो. यापेक्षा मोठी विटंबना काय असू शकते?

याचा अर्थ असा आहे की शंख समुद्रातून उत्पन्न होतो. समुद्रामध्ये अगणित रत्ने आहेत. ही रत्नाची खाण हा समुद्र त्याचा जनक आहे. धनाची, संपत्तीची देवी लक्ष्मी त्याची सख्खी बहीण आहे. एवढे सगळे असून सुद्धा जर शंख भीक मागतो तर त्याला काय म्हणावे? ती फक्त आपल्या भाग्याची विटंबना आहे.

लाचारीः-

अशवतस्तुभवेत्साधुर्ब्रह्मचारी च निर्धनः।
व्याधिष्ठो देवभक्तश्च वृद्धा नारी पतिव्रता।। **6** ।।

आचार्ण चाणक्य मजबूरीच्या परिस्थितीमध्ये व्यक्तीचा पक्ष घेऊन सांगतात की शक्तीहीन मनुष्य साधु बनतो, निर्धन ब्रह्मचारी बनतो, रोगी भक्त बनतो आणि वृद्ध स्त्री पतीव्रता होते. ही सर्व लाचारीची कामे आहेत.

आईपेक्षा मोठे कोण?

नान्नोदकसमं दानं न तिथिर्द्वादशी समा।
न गाय**त्र्याः** परो म**न्त्रो** न मातुर्दैवतं परम्।। **7** ।।

आचार्य चाणक्य आईचे स्थानाला सर्वात मोठे मानून म्हणतात की अन्न आणि पाणी यांच्या दानासारखे दान नाही. द्वादशी सारखी कोणती तिथी नाही. गायत्रीपेक्षा कोणताही मंत्र मोठा नाही. आईपेक्षा मोठा देव नाही.

अर्थ असा आहे की अन्न आणि पाणी सर्वात मोठे दान आहे द्वादशी सर्वात पवित्र तिथी आहे. गायत्री सर्वात मोठा मंत्र आहे. आई सर्वात मोठी देवता आहे.

दुष्टताः-

तक्षकस्य विष्य दन्ते मक्षिकाया मुखे विषम्।
वृश्चिकस्य विषं पुच्छे स**र्वों** गे दुर्जन विषम्।। **8** ।।

आचार्य चाणक्य दुष्टतेला सर्वात मोठी कमकुवत बाजू सांगताना म्हणतात की सापाच्या दातामध्ये विष असते, माशीच्या डोक्यामध्ये, विंचवाच्या शेपटीमध्ये आणि दुष्टाच्या संपूर्ण शरीरात विष असते.

याचा आशय आहे की सापाच्या फक्त दातात विष असते, माशीच्या डोक्यातच विष असते, विंचवाचे विष त्याच्या शेपटीच्या नांगीत असते. पण दुष्ट यांच्यापेक्षा जास्त विषारी असतो. त्याच्या संपूर्ण शरीरात विष असते. म्हणून नेहमी दुष्टापासून सावध राहिले पाहिजे.

कुपत्नीः-

पत्युराज्ञां विना नारी उपोष्य व्रतचारिणी।
आयुष्य हरते भर्तुः सा नारी नरकं व्रजेत्।। **9** ।।

येथे आचार्य वाईट पत्नीची चर्चा करताना म्हणतात की आपल्या पतीची परवानगी न घेता उपवास करून व्रत करणारी पत्नी पतीचे आयुष्य हिरावून घेते. अशी स्त्री शेवटी नरकात जाते.

याचा अर्थ असा आहे की पतीची आज्ञा नसताना पत्नीने उपवास-व्रत करू नयेत. पतीच्या आज्ञेशिवाय व्रत उपवास करणारी स्त्री आपल्या पतीचे आयुष्य कमी करते. अर्थात असे केल्याने जे पाप लागते त्यामुळे तीच्या पतीचा मृत्यू सुद्धा होऊ शकतो. अशी स्त्री मृत्यूनंतर स्वःत सुद्धा

नरकात जाते.

## पती परमेश्वरः-

> न दानै शुध्यते नारी नोपवासशतैरपि।
> न नीर्थसेवया तद्वद् भतूः पादोदकैर्यथा।। **10** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की स्त्री ना दानाने ना शेकडो व्रतांनी आणि ना ही तीर्थयात्रा केल्याने त्या प्रकारे पवित्र होते, ज्या प्रकारे आपल्या पतीच्या चरणांना धुवून मिळालेल्या पाणी प्राशनाने शुद्ध व पवित्र होते.

अर्थ असा आहे की पत्नीसाठी पतीच सर्व कांही असतो. म्हणून त्याच्या आज्ञेचे सर्वार्थाने पालन केले पाहिजे. त्याच्या इच्छेविरूद्ध कोणत्याही प्रकारचे व्रत, तप आणि अनुष्ठान करू नये.

ब्राह्मणांचे गुरु अग्नी, वर्णांचे गुरु ब्राह्मण व स्त्रीचा एकमात्र गुरु पती असतो. पण अतिथी सर्वांचे गुरु असतात. म्हणून 'अतिथी देवोभव' चा उपदेश श्रुतीने केला आहे.

भारतीय संस्कृतीचा हा आदर्श आहे की स्त्रीला सर्वतोपरी महत्त्व दिलेले आहे जसे की 'यत्र नार्यस्तु पुजयन्ते रमन्ते तत्र देवताः'

'जेथे नारीची पुजा होते तेथे देवता वास करतात'.

परंतु स्त्रीसाठी तीचा पतीच तीचा देव असतो. यामुळे पतीपरायण भारतीय नारीसाठी पतीदेवपेक्षा दुसरा मोठा देव नाही. म्हणून सावित्रीने आपल्या पती-सेवेच्या बळावर यमापासून आपला पती सत्यवानाला वाचविले. भाग्यवती सीता आपल्या पती सोबत राजमहालाचे भोग-ऐश्वर्य सोडून चौदा वर्षापर्यंत जंगलात घर करून राहिली आणि अनेक प्रकारच्या अडचणी, अपहरणासारख्या पीडा भोगाल्या. ह्या सगळ्यामागे त्यांचा उद्देश फक्त पती-सेवा होता.

## सुंदरताः-

> दानेन पाणिर्न तु कंकणेन
> स्नानेन शुद्धिर्न तु चन्दनेन।
> मानेन तृप्तिर्न तु भोजनेन
> ज्ञानेन मुक्तिर्न तु मण्डनेन।। **11** ।।

आचार्य चाणक्य येथे खऱ्या सुंदरतेची चर्चा करताना म्हणतात की दान केल्यामुळे हाताची सुंदरता आहे. कंकण घातल्यामुळे नाही. शरीर स्नानाने शुद्ध होते. चंदन लावल्यामुळे नाही. तृप्ती मान मिळाल्याने होते, भोजनामुळे नाही. मोक्ष ज्ञानामुळे मिळतो श्रृंगारामुळे नाही.

याचा अर्थ असा आहे की हातांचे खरे सौंदर्य दानामुळे आहे सोन्या-चांदीचे कडे-कंगण वापरल्यामुळे हाताला सुंदर म्हणत नाहीत. शरीर स्नान केल्याने साफ-स्वच्छ होते चंदन तेल लावल्यामुळे नाही. सज्जन सन्मानाने संतुष्ट होतात, खाण्या-पिण्यामुळे नाही. आत्म्याचे ज्ञान मिळाल्यानंतरच मोक्ष मिळतो, सजणे-नटणे व साज श्रृंगाराने मिळत नाही.

## शो भाः-

नापितस्य गृहे क्षौरं पाषाणे गन्धलेपनम्।
आत्मरूपं जले पश्यन् शक्रस्यापि श्रियं हरेत्।। **12** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की न्हाव्याचे घरी क्षौर कर्माने, दगडाने चंदन घासल्याने, ते लावल्याने आणि पाण्यामध्ये आपले रूप पाहिल्याने इंद्राची सुद्धा शोभा नष्ट होते.

आशय असा आहे की न्हाव्याच्या घरी जाऊन दाढी, केस वगैरे कापू नयेत. दगडावर घासलेले चंदन व कोणतीही सुगंधित वस्तु शरीराला लावू नये. आपले तोंड पाण्यात पाहू नये. असे केल्याने सर्वांची सुंदरता नष्ट होते.

नापितस्य गृहे क्षौरं पाषाणे गन्धलेपनम्।
आत्मरूपं जले पश्यन् शक्रस्यापि श्रियं हरेत्।। **13** ।।

आचार्य चाणक्य येथे कांही निषेध बाबींची चर्चा करताना म्हणतात की न्हाव्याच्या घरी जाऊन केस कापणे, दगडात सुगंधीत गन्ध लावणे आणि पाण्यामध्ये आपल्या रूपाचे प्रतिबिंब पाहणे हे सर्व करणाऱ्यांची लक्ष्मी नष्ट होते.

याचा आशय असा आहे की नीतीकार तज्ज्ञांनी या श्लोकाचे चांगले मनोवैज्ञानिक विश्लेषणाच्या आधारावर उल्लेख केला आहे. केस कापणे वेळेप्रमाणे आवश्यक आहे. म्हणून त्याच्या घरी जाण्यामुळे उशीर होऊ शकतो. न्हावी सुद्धा कामात गुंतलेला असू शकतो. व्यर्थच वाया घालविण्यापेक्षा निश्चित वेळ व स्थानावर क्षौर कर्म केले पाहिजे.

मूर्तीपुजेमध्ये मूर्तीमध्ये प्राणप्रतिष्ठा केल्यावर देवबुद्धि व भावनायुक्त गंधाक्षता टाकल्या जातात. फक्त दगडावर गंधाक्षता वाहण्यात कोणतेही औचित्त्य नाही. पाण्यामध्ये पाहिलेले रूप स्पष्ट दिसत नाही म्हणून भ्रम होऊ शकतो. त्यामुळे पाण्यात पाहिलेले रूप खरे नसते. म्हणून ही तिन्ही कार्ये करणारे अप्रामाणिकतेमुळे नष्ट होतात.

सद्यः प्रज्ञाहरा तुण्डी सद्यः प्रज्ञाकरी वचा।
सद्यः शक्तिहरा नारी सद्यः शक्तिकरं पयः।। **14** ।।

आचार्य चाणक्य सांगतात की तुण्डीच्या सेवनामुळे बुद्धि तात्काळ नष्ट होते, वच सेवनामुळे बुद्धिचा शीघ्र गतीने विकास होतो. स्त्रीबरोबर संभोग केल्यामुळे शक्ती तात्काळ नष्ट होते. आणि दूधाच्या वापरामुळे गेलेली शक्ती परत मिळते. म्हणून हे स्पष्ट आहे. तुण्डी बुद्धिनाशक आहे तर वच बुद्धिवर्धक आहे. स्त्री बळनाशक आहे तर दूध बळवर्धक आहे. म्हणून स्त्री व तुण्डीमुळे होणारी क्षति पूर्ण करण्यासाठी वच आणि दूधाचे सेवन करावे.

सुगृहिणीचा महिमाः-

यदि रामा यदि च रमा यदि तनयो विनयगुणोपेतः।
तनयो तनयोत्पत्तिः सुरवरनगरे किमाधिक्यम्।। **15** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की ज्या घरात शुभ लक्षण असलेली स्त्री असते, धन-संपत्ती आहे, विनम्र गुणवान पुत्र आहे आणि पुत्रचाही पुत्र आहे तर असा घरातच स्वर्गलोकाच्या सुखापेक्षा

मोठे सुख असते.

याचा अर्थ असा आहे की ज्या घरात सुशील, सुंदर आणि शुभ लक्षण असणारी स्त्री आहे, संपत्तीची कमतरता नाही, पुत्र आई-वडीलांचा आज्ञाधारक आहे आणि मुलाचाही मुलगा म्हणजेच नातूसुद्धा झालेला असेल, असे घर पृथ्वीमध्येही स्वर्गासमान आहे. स्वर्गसुखसुद्धा यापेक्षा जास्त नसते.

## गुणहीन पशुः-

आहारनिद्रा भय मैथुरानि
समानि चैतानि नृणां पशूनाम्।
ज्ञाने नराणामधिको विशेषो
ज्ञानेन हीना पशुभिः समाना।। **16** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की भोजन, झोप, निद्रा, भीती आणि मैथुन करणे या सर्व गोष्टी मनुष्य आणि पशुमध्ये समान रूपात पाहायला मिळतात. परंतु ज्ञान फक्त मनुष्यातच असते. म्हणून ज्ञानाशिवाय मनुष्य पशु सारखा समजला पाहिजे.

याचा अर्थ असा आहे की भोजन करणे, निद्रा करणे, एखाद्या भयंकर वस्तुला घाबरणे आणि मैथुन करून संततीला जन्म देणे या सर्व गोष्टी मनुष्यात पाहायला मिळतात, आणि त्या पशुमध्ये सुद्धा असतात. परंतु चांगल्या-वाईटाचे ज्ञान, विद्येचे ज्ञान इत्यादी फक्त मनुष्यच प्राप्त करू शकतो, पशु नाही. यामुळे ज्या मनुष्याला ज्ञान नाही त्याला पशुच समजले पाहिजे.

दानार्थिनो मधुकरा यदि कर्णतालै
दूरीकृत करिवरेण मदान्धबु**द्ध्या** ।
तस्यैव गुण्डयुगमण्डनहानिरेव
भृंगाः पुननिर्वकचप**द्म** वने वसन्ति।। **17** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की मदाने अंध झालेल्या मुर्ख हत्तीने आपल्या कानाजवळ उडणाऱ्या भूंग्यांना कानाने उडवून लावले यामध्ये भ्रमरांचे काय नुकसान झाले? हत्तीच्याच गंडस्थळाची शोभा कमी झाली. भ्रमर तर फिरून कमळ तळ्यात परत जातात.

याचा अर्थ असा आहे की तरूण हत्तीच्या कानातून गोड मद वाहायला लागतो. त्यावर भ्रमर घुमायला लागतात. हे भुंगे हत्तीची सुंदरता वाढवितात. मुर्ख हत्ती कान फडफडवून त्यांना उडवून लावतो. यामुळे हत्तीचेच सौंदर्य कमी होते. भुंग्यांचे कांही बिघडत नाही. ते पुन्हा कमळ असणाऱ्या तलावाकडे निघून जातात. जर मुर्ख व्यक्ती गुणी लोकांचा आदर करीत नाही तर त्यामध्ये गुणीजनांचे कांहीच नुकसान होत नाही. त्यांचा आदर करणारे इतर लोक असतात. परंतु मुर्खाला गुणी लोक भेटत नाहीत.

## परदुःख कातरताः-

राजा वेश्या यमश्चाग्निः चौराः बालक याचकाः।

परदुःखं न जानन्ति अष्टमो ग्रामकण्टकः।। **18** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की राजा, वेश्या, यमराज, आग, चोर, बालक, याचक आणि ग्रामकंटक हे आठजण व्यक्तीचे दुःख समजून घेत नाही.

आशय हा आहे की राजा, वेश्या, यमराज, आग, चोर, बालक, भिकारी आणि लोकांची भांडण लावून तमाशा पाहणारे लोक हे आठजण दुसऱ्यांचे दुःख समजू शकत नाहीत. राजा त्याला तर दुःख काय असते हेच माहित नसते. कारण की ज्याच्या अनुभवात दुःख हा प्रकारच नाही तो दुसऱ्यांचे दुःख काय समजू शकणार? त्याशिवाय राज्यकारभार चालविण्यासाठी राजाला कठोर व्हावेच लागते. एका वेश्येला दुसऱ्यांच्या सुख-दुःखाशी काय देणे-घेणे? कोणी मेले काय आणि जगले काय, कोणाचे घर जळाले काय किंवा बरबाद झाले काय, तीला केवळ पैसा हवा असतो. यमराज सुद्धा दुसऱ्यांचे दुःख पाहात नाही. कोणाचे कुटुंब रहो वा आक्रोश करो त्याला आपले काम करावेच लागते. चोराचा धंदा चोरी करणे हाच आहे. महापुरुष नसतो जो की दुसऱ्यांचे दुःख समजून घेईल. बालक आपले आई-वडील किंवा इतरांचे दुःख समजू शकत नाही.हट्ट व खोड्या करणे हे त्याचे कामच आहे. भिकारी सगळ्यापुढे हात पसरतो. त्याला काय माहित की समोरच्या मनुष्याजवळ कांही आहे की नाही? आणि कांही लोकांना दुसऱ्यांचे आपसात भांडण लावून देण्यातच आनंद असतो. अशा लोकांचा आत्मा व माणूसकी मेलेली असते. दुसऱ्यांना दुःखी करण्यामध्ये हे आनंदी असतात.

अधः पश्यसि किं बाले पतितं तव किं भुवि!
रे रे मुर्ख न जानासि गतं तारूण्यमौक्तिकम्।। **19** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की बालिके! खाली धरतीमध्ये काय बघत आहेस? मुर्ख, तुला माहित नाही का माझ्या यौवनाचा मोती हरवला आहे?

याचा अर्थ असा आहे की कोणा एका युवतीने एका पुरूषाला पाहून लाजेने मुखकमळ खाली केले. पण तो घीट म्हणाला तू खाली जमिनीत काय पाहात आहेस? “तुझे कांही हरवले आहे का?” तेव्हा ती युवती म्हणाली “मूर्खा येथे माझ्या तारूण्याचा मोती हरवला आहे. तुला माहित नाही का?”

पतीपरायणताः-

न दानात् शु**द्ध्य**ते नारी नोपवोसैः शतैरपि।
न तीर्थसेवया तद्वद् भूर्तः पादोदकैर्यथा।। **20** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की दान केल्यामुळे, शेकडो उपवास करून जे मिळते वा तीर्थयात्र करून स्त्री जेवढी शुद्ध होत नाही तेवढी ती पतीच्या पायाच्या पाण्यापासून होते.

याचा अर्थ असा आहे की पतीचे पाय धुण्याचे पाणीच स्त्रीला सर्वांत जास्त पवित्र करते. या पाण्याने तीला जी शुद्धता मिळते, तशी शुद्धता दान, तीर्थयात्र आणि शेकडो उपवास करून सुद्धा मिळत नाही.

गुण मोठे दोष छोटेः-

व्यालाश्रयापि विफलापि सकण्टकापि
वक्रापि पंकसहितापि दुरासदापि।
गन्धेव बन्धुरसि केतकि सर्वजन्तो-
रेको गुणः खलु निहन्ति समस्तदोषान्।। **21** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की हे केतकी! जरी तू सापांची आश्रय स्थान आहेस, फळहीन आहेस, काटेरी आहेस, वाकडी-तिकडी आहेस, चिखलातून उगवलेली आणि मोठ्या अडचणीतून तुझ्यापर्यंत पोहोचता येते, तरीही तुझ्या सुगंधामुळे तू सर्वांची आवडती आहेस. अगदी खात्रीने हा एकच गुण सर्व दोषांना नष्ट करून टाकतो.

आशय हा आहे की केवड्याच्या वृक्षावर साप राहतो, त्याला फळ लागत नाही, तो वाकडा-तिकडा असतो, त्याला काटेसुद्धा असतात आणि तो चिखलात उगवतो आणि त्याच्यापर्यंत पोहोचणे सुद्धा अवघड असते. एवढ्या उणीवा असताना देखील आपल्या एकाच गुणाने सुवासिक सुगंधामुळे केवडा सर्वांना प्रिय असतो. एकच गुण साऱ्या दोषांना झाकून टाकतो हे म्हणणे योग्यच आहे.

यौवनं धनसम्पत्तिः प्रभुत्वमविवेकता।
एकैकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टयम्।। **22** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की तारूण्य धन-संपत्तीची अधिकता, अधिकार आणि विवेकहीनता या चार मधील प्रत्येक एकएकटी गोष्टसुद्धा मनुष्याला नष्ट करण्यासाठी पुरेशी आहे. पण जर हे चार एकत्र झाले तर आणि मनुष्य तरूण सुद्धा आहे, त्याच्याजवळ पैसाही आहे आणि तो स्वतःच्या इच्छेनुसार काम करणारा असेल अर्थात त्याच्या कामात अडथळे आणणारा कोणी नसेल आणि दुर्भाग्याने त्याला विचार बुद्धि ही नसेल तर मनुष्याचा विनाश व्हायला एक क्षणही लागत नाही.

म्हणून संपन्न झाल्यावर मनुष्याला विवेकशील होणे आवश्यक आहे. म्हणजे कोणत्याही प्रकाराच्या विनाशाचा सामना करण्याची वेळ येऊ नये. जीवन गर्तेत (खड्ड्यात) जाते.

परोपकर**णं** येषां जागर्ति हृदये सताम्।
नश्यन्ति विपदस्तेषां सम्पदः स्यु पदे-पदे।। **23** ।।

आचार्य चाणक्य म्हणतात की ज्याच्या हृदयात परोपकाराची भावना असते, त्याची संकट नष्ट होतात आणि पावला-पावलांवर संपत्ती प्राप्त होते.

-रेणुकादास गं. देशपांडे,
18 ,'अभ्योदय'
विद्युत कॉलोनी,
बेगमपूरा, औरंगाबाद.